म. ग्रं. सं. ठाणे
नै. १७
य निबंध
क. १७०८९
REFBK-0017303

डॉ. राममनोहर लोहिया

प्रेस्टीज प्रकाशन

निबंध

नोंद क्र. ६०३९५

ता. १४-८-६८

१७६८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

क्रमांक ६०३९५ वि: निबंध

नों. १७६८ नों. दि: १४-८-६८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि ........................



96303
REFBK-0017303

डॉ. राममनोहर लोहिया

प्रेस्टीज
प्रकाशन

| | | जन गण मन

लेखक : डॉ. राममनोहर लोहिया

अनुवाद : श्रीपाद केळकर

प्रकाशक : सर्जेराव जी. घोरपडे

प्रेस्टीज प्रकाशन, पुणे २

मुद्रक : सर्जेराव जी. घोरपडे

मुद्रण : प्रिंटेक्स्ट पुणे २

हक्क : लोहिया साहित्य प्रकाशन

प्रथमावृत्ति १५ जुलै १९६९

किंमत आठ रुपये

अनुक्रम 60395 वि: निबंध
क्रमांक १७६९ नोंद दि: १४-८-६९

# अनुक्रमणिका

भारत भाग्य १।

आमच्या शासकांचा 'अर्धा बाप' २१।

भारतीय इतिहास लेखन ३०।

ऑलिम्पिक आणि भारत ४८।

भारतीय सेना ५८। भारतमाता ८६।

दो गज जमीन ९१।

भारताचा राजा : इंग्लंडची राणी ९७।

हिंदू विरुद्ध हिंदू १०५।

रामायण मेळा : एक स्वप्न १२२।

■ ■ जन – गण – मन

भारतीय व्यक्ती–भारतीय समाज–भारतीय मन.

त्यांचे गुण-दोष, भ्रामक धारणा इत्यादींची अंतर्मुख होऊन निर्भीड चर्चा करताना लोहियांनी आपल्या मौलिक चिंतनाचा प्रत्यय आणून दिला आहे. ते आशावादी होते. ते म्हणतात, “भारतीय समाजातील दोष आता आपण काहीसे ओळखू लागलो आहोत. म्हणूनच त्यांच्यावर आपण विजय मिळवू अशी मला आशा आहे.”

जन
गण
मन

■ ■ आमच्या देशाच्या शासकांनी इंग्रजांची मानसिक व वैचारिक गुलामी अद्याप सर्व क्षेत्रांत आग्रहपूर्वक जतन करून ठेविली आहे याचा लोहियांना कमालीचा संताप आहे.

वाठा
क्र:
नों. दि:

■ ■ परकीय व स्वकीय इतिहासकारांनी भारताचा इतिहास ज्या पद्धतीने लिहिला आहे त्यामुळे भारतीयातील आत्मवंचनाप्रवृत्ती जोपासली गेली आणि यांना भेकड, संकल्पशून्य, सामर्थ्यहीन, सुस्त आणि अधम बनविले अशी लोहियांची कठोर टीका आहे. भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन झाले पाहिजे याबाबत ते आग्रही आहेत.

■ ■ कोणाही राजकीय नेत्याने आजवर बहुधा न हाताळलेल्या अशा एका नाजूक राष्ट्रीय विषयावर लोहियांनी आपले परखड विचार मांडले आहेत. भारतीय सेना, भारत-पाक, भारत-चीन युद्धाच्या संदर्भात त्यांनी भारतीय सेनेची घडण, तिचे नेतृत्व, युद्धतयारी व सेना आणि सेनाविषयक सरकारी धोरण यांची राष्ट्रहिताची काळजी सदैव मनात ठेवून चर्चा केली आहे.

जन
गण
मन

जन
गण
मन

■ ■ भारतमातेचे भू-क्षेत्र किती? खरे क्षेत्रफळ व सरकारने वेळोवेळी प्रसिद्ध केलेले त्यासंबंधीचे आकडे यांतील तफावत लोहियांच्या सूक्ष्म व राष्ट्रवादी नजरेतून सुटली नाही. आणि त्यांनी गर्जना केली, " राष्ट्राची सीमा आकुंचित केली जात आहे. राष्ट्राची भूमी ही सरकार काय आपली खाजगी मालमत्ता समजते?"

■ ■ दरिद्री भारताचा राजा, ब्रिटिश सम्राज्ञीच्या भारतभेटीवर कोटयवधी रुपये खर्च करावयाची सिद्धता करीत होता तेव्हा लोहिया संतापून उठले आणि त्यांनी त्यानिमित्ताने सम्राज्ञीचे स्वागत करणारा राजा व देश यांच्या मनःप्रवृत्तीची विदारक छाननी केली.

अनुक्रम ८०३१५ ... निबंध
२८६८ ... १५-८-६८

■ ■ हिंदुधर्मात गेली पाच हजार वर्षे चालू असलेला कट्टरपंथ व उदारपंथ यांतील संघर्ष कायमचा संपविण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

■ ■ रामायणमेळ्याची आपली भव्य कल्पना समजावून सांगताना समाजवादी लोहिया रामायणातही आनंद, प्रेम, शांती व भारतीय ऐक्य यांच्या प्राप्तीची साधने धुंडताना दिसतात.

जन
गण
मन

■ ■ आणि—

जन—गण—मन म्हणजेच
भारतीय व्यक्ती, भारतीय समाज, भारतीय मन
यांच्या गुणदोषांचा वेध घेत असतानाही लोहिया आपले विश्वनागरिकत्व विसरलेले नाहीत.

कोठेही जगण्याचा व मरण्याचा अधिकार मानवाचा मूलभूत अधिकार म्हणून मानला गेला पाहिजे, अशी त्यांची आकांक्षा आहे.

६०३७५ निबंध
१६६८ १४-८-६८
१६३०३

# भारत–भाग्य

जन्मकुंडलीवरून किंवा हात पाहून ज्योतिषी जसे नशीब सांगतात तसे काही भारताचे भविष्य वर्तविण्याचा माझा विचार नाही. कित्येक ज्योतिष्यांजवळ तर राष्ट्रांच्याही कुंडल्या असतात. माझ्याजवळ काही तशी कुंडली नाही.

आज जगातील सारी राष्ट्रे आपली प्रगती करण्याच्या हेतूने ग्रह-नक्षत्रांचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास करीत आहेत. पण त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणावर आपल्या देशात नक्षत्र, तारे, चंद्र, सूर्य यांचा विचार आपण करीत असतो. प्रत्येक गावात एकतरी ज्योतिषी असतोच. हिंदुस्थानात ग्रह-नक्षत्रांचा जेवढा अभ्यास केला जातो तेवढा रशिया-अमेरिकेतही होत नसेल. पण कशासाठी? जगाचे ज्ञान करून घेण्यासाठी नाही किंवा स्वतःची प्रगती साधण्याकरिता नाही, तर लग्न वगैरेसाठी; शुभमुहूर्त काढण्याकरिता. फलित ज्योतिष समजून घेण्यासाठी ज्या देशातील लोकांची अधिकांश बुद्धी खर्च होते त्या देशाचे भवितव्य काही फारसे उज्ज्वल नाही, हे भविष्य वर्तवायला ज्योतिष्याची गरज आहे काय?

मी सांगणार आहे ते ऐकल्यावर कदाचित काहीजणांना असे वाटेल, की एक पराजित, निराश माणूस हे बोलत आहे. पण माझी निराशा पराभवातून जन्मलेली नाही, तर माझा पराभव निराशेतून उद्भवला आहे. आशेच्या भ्रामक मृग-

जळात फसण्याची माझी इच्छा नाही; पण निराशेतही माझे कर्तव्य मी सोडणार नाही. मी आज जे बोलणार आहे ते एका सच्चा भारतीयाचे कठोर आत्म-चिंतन आहे.

एखाद्या देशाचे भाग्य समजून घेण्यापूर्वी जरा जगाचे भविष्यही अगोदर समजून घेतले पाहिजे. म्हणून त्यासंबंधी थोडे सांगून मग भारताच्या भविष्याविषयी मी माझे विचार सांगेन. आज जगात दोन गोष्टी संभवतात; कदाचित् तीन. त्यांपैकी एक किंवा दोन गोष्टींची सरशी होईल. एक : युद्धे कायमची थांबतील. दोन : सारी दुनिया एकरंगी बनेल, व तिसरीः गरिबीचा नाश होईल. या तीनही गोष्टी होण्याची आज शक्यता वाटत आहे. त्यांपैकी युद्धविनाश आणि गरिबीचे उच्चाटन या दोन गोष्टी घडण्याची आशा थोडी अधिक आहे. मी सांगतो या घटना काही येत्या साल दोन सालांत घडतील असे नाही. त्याला चांगली चाळीस पन्नास वर्षे लागतील. विसावे शतक पुरे होण्याच्या बेतास सारा मानवसमाज बऱ्याचशा समतेच्या व शांततेच्या दुनियेत राहू लागेल अशी शक्यता वाटते. अर्थातच मी असे म्हणत नाही, की जगात कोठे अन्यायच राहणार नाही. अन्यायाविरुद्धचा संघर्ष देखील कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात सतत चालूच राहील परंतु शांती व समतेच्या मार्गावर या शतका-अखेर जग चालू लागेल.

शस्त्र टाकून देण्याचा उपदेश आज हजारो वर्षे सर्व भले लोक करीत आले आहेत – अगदी येशू ख्रिस्तापासून महात्मा गांधींपर्यंत. पण शस्त्रे कोणीही टाकलेली नाहीत. कारण शस्त्राने विजय मिळत असतो. पूर्वीही तो मिळाला आणि आजही मिळत आहे. पण १९४५ साली अणुबॉंबचा वापर झाल्यापासून परिस्थिती बदलली आहे. अणुबॉंबमुळे आता शस्त्रे निकामी बनलेली आहेत. बंदुका, रणगाडे, मशीनगन्स इत्यादी परंपरागत शस्त्रांनी अनेक युद्धे खेळली गेली आणि आजही जात आहेत. पण अण्वस्त्र युद्ध होणे जवळ जवळ असंभव आहे. अण्वस्त्रासारखी मोठी शस्त्रे ही खरी विकसित शस्त्रे आहेत. त्यांचा वापर करण्याचे सामर्थ्य जगातील फक्त दोनच राष्ट्रांत आहे. एक अमेरिका व दुसरे रशिया. क्यूबाच्या प्रश्नावरून या दोन राष्ट्रांत युद्ध होऊन कदाचित या भयाग्रह अस्त्राचा वापर होण्याची भीती काही दिवसांपूर्वी निर्माणही झाली होती. असे अणुयुद्ध खरोखरच झाले तर जगातील तीनशे कोटी लोकांपैकी दोनशे कोटी लोक तरी मृत्युमुखी पडतील. म्हणून प्रत्येक देशाला अशी भीती वाटते की, अणुअस्त्रे वापरली तर विजय मिळेल. पण तो स्वतःचीच राखरांगोळी

करून. मग त्याचा काय उपयोग ? युद्ध जिंकणारे किंवा हरणारे कोणीच या युद्धात जिवंत राहणार नाहीत. दुसऱ्याचा विनाश करावयास निघालेलाच स्वतः नाश पावेल.

मनात आले तर अमेरिका रशियाला अणुबॉंबने पूर्णपणे नाहीसा करू शकेल, तसेच रशिया अमेरिकेचा निकाल लावू शकेल. दोघांचाही सारखाच नाश होईल. फरक राहिलाच तर एखाद्या टक्क्याचा. आपल्या भूमीचा एखादा भाग रशिया व अमेरिका अणुबॉंबपासून वाचवायचा प्रयत्न करील. पण त्यात कोणालाच यश येणार नाही.

जर मी म्हणतो तशी युद्धास्त्रे निरुपयोगी होत आहेत आणि त्यांनी विजय किंवा पराजय यांपैकी काहींच होत नाही, आणि फक्त विनाशच होतो; तर मग ही शस्त्रास्त्रे साठविण्यासाठी या दोन बड्या राष्ट्रांत एवढी शर्यत का चालू आहे? रोज नवनवीन शस्त्रास्त्रे का शोधून काढली जात आहेत आणि ती वापरण्याची धमकी ही राष्ट्रे एकमेकांना का देत आहेत ? माझ्या मते ही शर्यत फार काळ चालणार नाही. केव्हातरी ती थांबलीच पाहिजे. एकतर या शस्त्रांचा वापर होऊन जगातील सुधारलेली राष्ट्रे संपूर्ण नाश पावतील किंवा ही शस्त्रेच एक दिवस नष्ट होतील. किती दिवस ही राष्ट्रे विध्वंसक शस्त्रे साठवीत बसणार? गेली दहा वर्षे रशिया, अमेरिका या शस्त्रास्त्रांचा साठा करीत आहेत, त्यावर प्रचंड खर्च करीत आहेत. या हत्यारांवर सर्व जगात दरसाल आठ अब्ज रुपये खर्च होत आहेत. हिंदुस्थानात सरकारतर्फे आणि सर्व जनतेमार्फत दरसाल एकूण सुमारे दीड अब्ज रुपये खर्च केले जातात. या रकमेच्या जवळ जवळ पाचपट रक्कम या दुनियेत या शस्त्रास्त्रांवर खर्च होत आहे. हा खर्च दरवर्षी वाढतच आहे. आणखीही वाढत जाईल. त्या वेळी अमेरिका व रशियातील सर्वसामान्य जनता, पुढारी, अध्यापक, विद्यार्थी या खर्चाविरुद्ध बंड केल्या-शिवाय राहणार नाहीत. ते म्हणतील, "असल्या निरुपयोगी गोष्टीवर एवढी प्रचंड उधळपट्टी करून आम्हांला किती दिवस बरबाद करणार ?" आजच नाही पण येत्या दहा - पंधरा - वीस वर्षांत हे होण्याची जरूर शक्यता आहे.

आणखीही एक प्रश्न या बाबतीत विचारला जातो. केवळ अणु-अस्त्रे नाहीशी करून भागणार नाही. बंदुका, पिस्तुलेही नष्ट केली पाहिजेत. कारण यांपैकी कोणतेही एक शस्त्र राहिले तर दुसरेही राहणारच. आणि बंदूक, पिस्तूले नाहीशी करण्याचा विचार करू लागलो की डोके चकरावू लागते. या शस्त्रांशिवाय दुनिया कशी चालेल ? राज्य कसे चालेल ? छोटी राष्ट्रे बड्या राष्ट्रांपासून आपला बचाव कसा करू शकतील ? शस्त्रविहीन राष्ट्रातील एखाद्या

गटाने राज्यसत्ता काबीज करण्यासाठी शस्त्रपूर्ण कट केला तर त्यापासून त्या राष्ट्राने आपले संरक्षण कसे करावयाचे ! चोर-डाकूंचा बंदोबस्त कसा राहणार ? असे एक ना एक अनेक प्रश्न उत्पन्न होतील. चोर-डाकूंविषयी अधिक काही सांगण्याची गरज नाही. संघटित सत्याग्रहाच्या सहाय्याने शस्त्रविहीन राष्ट्रांची स्थापना करता आली तर या छोट्या मोठ्या गुंडांचा प्रश्न सहज सुटेल.

बंदूक, पिस्तूल ही लहान शस्त्रे राहिली तर अणुशस्त्रे राहणारच हा प्रश्न मात्र महत्त्वाचा आहे. या प्रश्नाचा मुळात जाऊन विचार केला पाहिजे. जोवर दुनियेत विषमता आहे व अन्याय होत आहे तोवर लहानमोठी हत्यारे नाहीशी करता येणार नाहीत. हत्यारांचा उपयोग काय ? जुलूम करण्याकरिता किंवा तो नाहीसा करण्यासाठीच ना ? दुनियेतला बराचसा जुलूम नष्ट झाला आणि हत्यारे नसली तरीही जुलुमापासून आपला बचाव होऊ शकेल अशी मानवाची खात्री पटली तर हत्यारे निःसंशय नष्ट होतील.

जगातील अधिकांश अन्याय व असमानता नाहीशी झाली पाहिजे असे म्हणताच पुनः तोच प्रश्न उपस्थित होतो हे कसे होणार ? एवढा भयंकर अन्याय व विषमता कशी जाणार ? आणि मग शस्त्रे नाहीशी कशी होणार ? व त्यांच्यावरची पैशांची अवाढव्य उधळपट्टी कशी थांबणार ? हे दुष्ट विचारचक्र मनात फिरू लागते. पण येत्या वीस वर्षांत हा पेच संपेल असे मला वाटते. एकतर जगातील शक्तिशाली प्रदेश (लक्षात ठेवा, मी केवळ शस्त्रसंपन्न व शक्तिशाली प्रदेशच म्हणत आहे) नष्ट होतील किंवा शस्त्रे नाहीशी होतील व साथ साथ अन्याय आणि विषमताही नष्ट पावेल. निदान ती नाहीशी होण्याचा रस्ता सुकर होईल आणि विनाशक शस्त्रास्त्रांवर दरसाल खर्च होणारे आठ अब्ज रुपये केवळ रशिया व अमेरिकेतील जनतेच्या विकासाकरिता नव्हे, तर साऱ्या दुनियेतील लोकांच्या प्रगतीसाठी उपयोगात आणले जातील.

जगातील यांत्रिक व तांत्रिक प्रगती पाहून पुष्कळजण म्हणतात की, जग सुधारत आहे. आर्थिक प्रगती होत आहे. आणि जेथे अन्नवस्त्राची मुळीही ददात नाही अशा संपन्न व वैपुल्यपूर्ण युगात जग प्रवेश करीत आहे. हिंदुस्थानातील आणि सर्व जगातील सुशिक्षित लोकांत हा समज वावरत आहे. पण हा समज चुकीचा आहे. मला स्वतःला तसे वाटत नाही. माझ्याजवळ जी आकडेवारी आहे तिचा अभ्यास केल्यावर हिंदुस्थानच्या बाबतीत तरी मी निश्चितच म्हणू शकतो की, दोन हजार वर्षांपूर्वीच्या चाणक्याच्या काळात आजच्यापेक्षा भारतीयांना चांगले खायला प्यायला मिळत होते. जगातील बहुतेक सगळ्याच कृष्णवर्णीय लोकांची आज ही स्थिती आहे.

याउलट दुसरे चित्र पाहा. युरोप-अमेरिकेतील फक्त एक अब्ज गोऱ्या लोकांना आपल्या जीवनाची प्रगती करण्याची आणि चांगले जीवन जगण्याची संधी मिळत आहे. अशी संधी जगाच्या लोकसंख्येपैकी उरलेल्या दोन अब्ज काळ्या किंवा पिवळ्या जनतेमधील केवळ मूठभर बड्या लोकांना, त्यातल्या त्यात पुढारी, नगरशेठ आणि नोकरशहा या तिघांनाच मिळत असते. त्यांना राहायला चांगला बंगला मिळतो, खायला उंची अन्न मिळते, ऐषाराम मिळतो, आणि सत्ताही लाभते. बाकी सामान्य जनतेला मात्र यांपैकी काहीच कधी दिसतही नाही. मग असे आहे, तर गरिबीच्या युगातून श्रीमंतीच्या युगात जग प्रवेश करीत आहे असे कशाच्या जोरावर सांगितले जाते ?

जे सांगितले जाते ते मुळातच साफ चूक आहे. काही तरी चमत्कार घडून येत्या वीस-तीस वर्षांत गरिबीचे पूर्ण उच्चाटन होईल असा भ्रम मला पसरवावयाचा नाही. गरिबी नाहीशी करण्यासाठी खास प्रयत्न करावे लागतील. मला एवढेच सांगावयाचे आहे की, शस्त्रे नष्ट झाली आणि अन्याय व जुलुमांविरुद्ध दुनियेतील लोकांनी आपला संघर्ष निरंतर चालू ठेवला तर गरिबीचे उच्चाटन होऊ शकेल. आपण राहत आहोत ते विसावे शतक अतिशय क्रूर आणि निर्दयी शतक आहे. या शतकात जेवढा जुलूम व अन्याय झाला तेवढा मानवी इतिहासात पूर्वी कधीही झालेला नाही. तथापि त्याचबरोबर दुसऱ्या एका दृष्टीने हे शतक वैशिष्ट्यपूर्ण म्हटले पाहिजे. या शतकात मानवजात आपल्यावर होणाऱ्या प्रत्येक अन्यायाविरुद्ध सतत कोठे ना कोठेतरी लढत आहे. पूर्वी असे कधी घडलेले नाही. मानवजात या शतकात राजकीय व आर्थिक अन्यायाविरुद्ध लढत आहे. तशी रंग-वर्ण-भेदांविरुद्धही झगडत आहे. हा संघर्ष असाच चालू राहिला आणि त्यात मानवी समाज विजयी झाला तर गरिबी नष्ट पावेल अशी आशा करावयास हरकत नाही.

आपण टेलस्टारचे नाव ऐकले असेल. या टेलस्टारवरून पृथ्वीपासून एक हजार, नव्हे पन्नास हजार मैलांवर देखील संदेश पाठवून तेथून तो आकाशवाणी इत्यादी साधनांद्वारे जगातील या ठिकाणाहून त्या ठिकाणी पोचविता येईल. या पद्धतीमुळे संदेशवाहनाचा आजचा खर्च बराच कमी होईल. गोऱ्या राष्ट्रांमध्ये विज्ञानात इतकी प्रगती होत आहे की, येत्या शंभर वर्षांत तेथील माणूस हे एक खातेपिते यंत्र बनेल. नव्या नव्या शास्त्रीय शोधांमुळे जगाचे रूप झपाट्याने बदलत जाईल आणि एक जमाना तर असा येईल की, ज्या वेळी जगातील सर्व मानव समूह एकाच प्रकारचे अन्नवस्त्र वापरू लागतील. पाश्चात्त्य गोऱ्या राष्ट्रांना त्यामुळे अशी भीती वाटू लागली आहे की, काही वर्षांनी जगातील सर्व मानव-

वंशाचे चेहरे, मोहरे, वर्ण, संगीत, राहणी, विचारपद्धती इत्यादी सर्व काही एकाच प्रकारचे होईल. सर्वजण खाऊन पिऊन मजेत राहू लागतील. पण एकाच पद्धतीने. मग आपले श्रेष्ठत्व कोठे राहिले ? ही भीती गोऱ्या राष्ट्रांच्या पोटात आहे. पण याविषयी मी या ठिकाणी चर्चा करीत नाही. एवढेच सांगतो की, झपाट्याने होत असलेल्या वैज्ञानिक व औद्योगिक प्रगतीमुळे एक तर सारी दुनिया अर्धमेली व अर्धजिवंत बनेल, किंवा इतिहासात मानव पहिल्या प्रथमच आर्थिक क्षेत्रात व भौतिक साधनांच्या बाबतीत सुखी होईल.

आता या पार्श्वभूमीवर भारताच्या भवितव्याचा विचार करावयाचा आहे. पण त्याआधी भारताच्या भूतकालाचे अवलोकन केले पाहिजे. कारण देशाचा भविष्यकाळ बहुतांशी त्याच्या भूतकाळात दडलेला असतो.

भारताचे भविष्य सांगणारी सर्वांत महत्त्वाची रेषा त्याच्या तत्त्वज्ञानात सापडते. भारतीय दर्शनात आढळते तशी सगुण-निर्गुणातील भयंकर तफावत जगातील कोणत्याही तत्त्वज्ञानात सापडत नाही. भारतीय दर्शनात सर्वत्रच असे नाही; दुसऱ्याही तऱ्हेने तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे किंवा नाही या-विषयी मी या क्षणी चर्चा करीत नाही. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, सगुण-निर्गुण यांतील अंतर हा भारतीय जीवनाचा आधार बनला आहे.

या अनुरोधाने हिंदुस्थानी लोकांची विचारपद्धती व इतर देशांतील लोकांची विचार करण्याची तऱ्हा ह्याची तुलना करून पाहण्यासारखी आहे. भारतीय जनतेचे व्यापक विचार आणि त्यांची प्रत्यक्ष कृती यात भयंकर तफावत आहे. त्यांच्या बुद्धीत विचार आणि प्रत्यक्ष कृती यात भयंकर अंतर आहे. त्यांच्या बुद्धीत विचार व कृतीचे दोन अगदी स्वतंत्र कप्पे आहेत. एक निर्गुण विचारांचा व दुसरा सगुण कृतीचा. सगुण व निर्गुण यांत तसे पाहिले तर सर्वत्र फरक असतो. परंतु जगातील इतर देशांत सगुण-निर्गुणांचे दोन निरनिराळे कप्पे नसतात. या दोघांचा एकमेकांशी संबंध असतो. देवाण-घेवाण असते. आपल्या देशात निर्गुण विचार व सगुण कृती यांत आपण एक भिंत बांधली आहे आणि त्यामुळे दोहोंची एकमेकांपासून पूर्णपणे फारकत झाली आहे.

शंकराचार्यांपूर्वी बहुधा अशी फारकत नसावी. परंतु त्याची बीजे त्या वेळीही होती. शंकराचार्यांनी सत्याचे दोन कप्पे असतात असे प्रतिपादन केले. एक लौकिक सत्य व दुसरे पारलौकिक सत्य. त्यामुळे भारतीय बुद्धीचे दोन गट पडले. एक सगुण सत्याचा व दुसरा निर्गुण सत्याचा. माझा तर असा अनुभव

आहे की, आपल्या देशातील कोणत्याही राजकीय व अन्य सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करणे त्यामुळे अशक्यप्राय होऊन जाते. कारण आम्ही सगुण-निर्गुणांची जबरदस्त फारकत केली आहे. कोणाशी आपण चर्चा करू लागलो तर तो सांगतो, सिद्धान्ताची चर्चा करा; तपशिलात जाऊ नका; कार्यक्रमाची चर्चा करू नका. हा कोणता अजब सिद्धान्त ? याचा अर्थ तरी काय ? कोणत्याहि सिद्धान्ताला हातपाय असले पाहिजेत.

आणि परिणामांती भारतीय माणूस जगातील इतर कोणाहीपेक्षा धोका-दायक ठरला आहे. मात्र तो दुसऱ्याला विशेष धोका देत नाही. स्वतःलाच अधिक देत असतो. मी थोडा स्वार्थी आहे म्हणा हवे तर ! आपल्या देशाने दुसऱ्याला धोका देऊन स्वतःचा फायदा करून घेतला तर ते मी वाईटच म्हणेन; पण क्षमा करण्याजोगे ते कृत्य आहे, असे मी समजेन. पण आमची तऱ्हा उलटी आहे, आम्हांला दुसऱ्याला धोका देणे आवडत नाही. आम्ही स्वतःच धोका खात असतो.

युरोप-अमेरिकेत काय स्थिती आहे ? तेथे सिद्धान्त आणि कर्म यांचे दोन कप्पे जरूर आहेत. पण त्यात देवाण-घेवाण चालू असते. मात्र तेथे एक अनिष्ट गोष्ट दिसून येते. तेथे सिद्धान्ताला कर्माच्याजवळ इतके नेऊन ठेवले आहे की, कित्येकदा तेथील लोक वेड्यासारखे कर्मालाच कवटाळतात. आणि स्वतःचा असा समज करून घेतात की, आपण सिद्धान्त प्राप्त केला आहे. रशिया-अमेरिकेतही हेच आहे. तेथील लोकांच्या बुद्धीतील दोष असा आहे की, ते लोक आपल्या सांप्रतच्या परिस्थितीला, आपल्या सिद्धान्ताला इतके मूर्त व सगुण स्वरूप प्राप्त झाले आहे असे समजतात की, त्यामुळे त्यांच्याशीही वादविवाद करणे मुष्किल झाले आहे. तेथील लोकांची बुद्धी एखादी गोष्ट समजून घेण्यासाठी वापरली जात नाही, तर ती एकतर आरोप व निंदा करण्याकरिता उपयोगात आणली जाते किंवा स्वतःचे समर्थन करण्यासाठी वापरली जाते. एक तर आरोप करावयाचे, शिव्या द्यायच्या किंवा आपणच बरोबर असल्याचे सिद्ध करावयाचे. अशा लोकांच्या बुद्धीत समजून घेण्याची क्षमता नसते.

भारतीयांच्या बुद्धीमध्ये तर फारच दोष निर्माण झाला आहे. त्याचे एकच उदाहरण दिले तर पुरेसे आहे. कोणाही भारतीयाशी आपण निर्गुण सिद्धान्ताची चर्चा करू लागलो की तो सांगतो, सर्व एक आहे. ब्रह्म एक आहे. अद्वैत आहे. तारे, गाढव, माणूस, दगड सर्व एक आहेत. काहीही फरक नाही. पण त्याच भारतीयाशी आपण समाजशास्त्रावर वाद घालायला लागलात की मग

मात्र तो एकदम बदलतो. म्हणतो, चांभार, तेली, ठाकूर आणि ब्राह्मण एक कसे असतील ? आणि आपण अद्वैत सिद्धान्ताचा दाखला देऊन या सर्व जातींतील माणूस एकच आहे असे सांगताच आपला भारतीय माणूस एकदम भडकतो आणि म्हणतो, " छेः छेः ! अद्वैत हा पारलौकिक सिद्धान्त आहे. जातिप्रथा हे लौकिक सत्य आहे ! " असे तो म्हणतो त्याचे कारण आपणा सर्वांच्या डोक्यात शंकराचार्यांनी दिलेला तो तर्क पक्का रुजलेला आहे, की लौकिक सत्याचा विचार करताना पारलौकिक अद्वैत सिद्धान्ताचा विचार करणे बरोबर नाही. पूजा-अर्चा-स्नान-संध्या करताना मात्र अद्वैत आणि बाकीच्या वेळी मात्र लौकिक सत्य ! हिंदी माणसाच्या बुद्धीची बैठक ही अशी आहे.

आपले लक्ष्य फार उंच आहे. तेथे आपण तीर मारायला जातो पण कमजोर असल्यामुळे आपला तीर तेथपर्यंत पोचतच नाही. माणूस हा मुळातच दोषपूर्ण आहे. त्यामुळे इतर देशांतील लोकांच्या बोलण्यात व करण्यातही तफावत दिसत असते. परंतु हिंदुस्थानात विचार व कृतीचा संबंधच पार तोडला गेला आहे. हा संबंध मुळातच मानलेला नाही. आपण असे मुळी ठरवूनच टाकलेले आहे की, विचाराप्रमाणे माणसाला आचार करणे शक्यच नाही. त्यात माणूस कमीच पडणार. विचाराप्रमाणे कृती होत नाही अशी रुखरुख लागायला नको म्हणून आपण आपल्या जीवनाची विचार व आचार ही दोन दालने प्रथमपासूनच स्वतंत्र ठेविली आहेत आणि या दोन दालनांचा अलग अलग विचार करण्याचीच शिकवण आपणांस मिळाली आहे.

आदर्शवाद भारताप्रमाणे युरोपात आणि अन्य देशांतही होता. पण युरोपातील आदर्शवाद व भारतातील आदर्शवादी तत्त्वज्ञान एक नाहीत. युरोपातील आदर्शवादी दर्शनाचा भारतीय आदर्शवादी दर्शनाशी काहीही संबंध नाही. कारण युरोपीय तत्त्वज्ञानात सगुण व निर्गुण यांचा परस्पर संबंध निरंतर दिसून येतो. युरोपीय आदर्शवादातील निर्गुण सिद्धान्त सगुण सृष्टीला आपल्याप्रमाणे बनवायचा सतत प्रयत्न करीत असतो. त्यासाठी मोडणे, जोडणे, तोडणे, बदलणे असे जरूर ते सर्व करतो. सर्व युरोपीय तत्त्वज्ञान्यांनी सगुण जगाला अधिक चांगले शुद्ध करण्याचाच आपापल्या मतीप्रमाणे प्रयत्न केला आहे. त्याचे दोन्ही परिणाम झाले, चांगले किंवा वाईट.

भारताने, ' एकोऽव शिष्याच्छिवः केवलोऽहम् ' हे निर्गुण तत्त्व स्वीकारले. त्याला वाटले की, यापेक्षा आणखी श्रेष्ठ तत्त्व कोणते ? मी नुकताच बद्रीनारायणाला गेलो होतो. त्या वेळी माझ्या मनात आले की, शंकराचार्यांनी हे सूत्र

मनाच्या कोणत्या विशिष्ट अवस्थेत प्रतिपादिले असेल ? बद्रीकेदारचे दृश्य खरोखरच अद्‌भुत आहे. ते पाहिल्यावर मदिरा पिऊनही जेवढी धुंदी चढत नसेल इतकी मनाची धुंद अवस्था होते. चारी दिशांना बर्फ. गंगाप्रवाह बर्फाने झाकलेला; घरांवर बर्फाचे आच्छादन, झाडेझुडपे बर्फाने माखलेली – सारेच बर्फमय. एक प्रकारची विभिन्न समता. साऱ्या जगात विभिन्नतेतील समतेचे असे दृश्य कोठे दिसत नाही. बर्फाने सगळेच सारखे करून टाकलेले असते. कोठे निराळेपण नाहीच. ते दृश्य पाहूनच शंकराचार्य उद्‌गारले असतील, 'एकोऽव शिष्याच्छित्रः केवलोऽहम् !' आणि त्या मनोवस्थेच्या जोरावर त्यांनी नंतरची कडाक्याची सारी थंडी काढली असेल. त्यांना काय चिंता सगुण सृष्टीची, जगाची ? कारण सगुण जग नाहीच, तर त्याची कसली आली आहे फिकीर ?

परंतु भारतीय मनाची गंमत अशी की, ते हे महान् निर्गुण तत्त्व स्वीकारीत असते त्याच वेळी त्याची सगुणभक्तीही ते करीत असते. राम-कृष्ण-शिव यांची मंदिरे उभारते. मात्र सगुण सृष्टी राममय, कृष्णमय व्हावी यासाठी ती मोडणे, जोडणे, सुधारणे वगैरेची क्रिया येथे तितकीशी प्रबल दिसत नाही. सारा भर मंदिरे उभारण्यावर; पूजापाठ, स्तोत्र व मंत्रपठणावर.

आणि या पूजाअर्चेत, मंत्रपठणात भारतीय मन व बुद्धी इतकी काही गुरफटून गेलेली असते की, तिला निर्गुण सत्याचा, अद्वैताचा शोध घेण्याचे खरे कार्य करायला सवडच मिळत नाही. मी मथुरा, वृंदावन पाहिले. तेथे राहणाऱ्या भक्तजनांना सारा दिवस हेच काम. सकाळी आरती, दुपारी भोग, परत सायंकाळी आरती, रात्री पुन्हा भोग; मग देवासाठी शय्या तयार करण्याचे काम. अकरा-अकरा वेळा प्रसाद म्हणजे भोजन. यातच हे भक्त गुंतलेले असतात. आपण स्वतःच निर्मिलेल्या एका कल्पनामय जगतात ते दंग असतात. त्यांचा जणू सगुण जगाशी काही संबंधच नसतो. याच पद्धतीने त्यांची निर्गुणाची, अद्वैताची भक्ती चालू असते.

म्हणूनच भारताची बुद्धी जितकी पुराणांनी पछाडलेली दिसते तेवढी अन्यत्र कोणत्याही देशांत दिसत नाही; दिसणे शक्य नाही. येथील सामान्य माणूस कोणत्याही विषयावर चर्चा करीत असला, मग ती चर्चा अगदी एखाद्या आधुनिक विषयावर असो की राजकारण-अर्थशास्त्रावर असो, तर थोड्याच वेळात तो पुराणावर आल्याशिवाय राहत नाही. चर्चेच्या ओघांत तो विचारू लागतो, मग अर्जुनाने असे का केले ? कृष्ण तसे का वागला ? कर्णाने असे का

केले आणि रावणाने तसे का केले? म्हणजेच वादविवादातील सगुण प्रश्नांचे उत्तर निराकार, निर्गुण, काल्पनिक जगात शोधण्याची भारतीय मनाला संवयच आहे. वास्तव जगतापासून दूर जाऊन अशाप्रकारे पुराणातील काल्पनिक कथा, किस्से अणि मंदिरे यांत भारतीय बुद्धी निर्गुणाचा शोध घेत असल्यामुळे निर्गुण सिद्धान्ताची अवस्था मोठी विचित्र बनलेली आहे.

जगाला अधिक शुद्ध, सुंदर व पूर्ण बनविण्याच्या युरोपमधील लोकांच्या प्रयत्नात त्यांना यश मिळत नसेल. कारण जग कधीच संपूर्ण व पूर्ण शुद्ध होऊ शकणार नाही. जोवर माणूस देह धारण करीत आहे तोवर कोणत्या ना कोणत्या तरी रूपांत माणसात म्हणजेच जगात दोष व अपूर्णता राहणारच; निर्गुण व सगुण यात काही ना काही अंतर राहणारच. पण हे अंतर नष्ट करण्याचा युरोपियनांचा प्रयत्न आहे. अर्थात् त्यात त्यांना यश येत नाही; येणे शक्य नाही. मग याचा त्यांच्यावर परिणाम काय होतो? तीन परिणाम संभवतात. एक तर माणूस जगाला पूर्ण, शुद्ध बनविण्याचा प्रयत्नच निराश होऊन सोडून देतो; अथवा विलास, सुखचैनीत रमून जातो, किंवा आपण करीत असलेल्या प्रयत्नांनी जग पूर्ण व शुद्ध बनत आहे असे खोटेच समजून स्वतःची वंचना करून घेतो. युरोपातील आजचे कोणतेही तत्त्वज्ञान घ्या. कम्युनिझम, धनिक-शाही किंवा फासिझम. या सर्व तत्त्वज्ञानांचे पाईक आपापल्या निर्गुण सिद्धान्ता-नुसार समाज मोडतात, जोडतात; समाजावर ते लादतात. या प्रयत्नातून जे निष्पन्न होते ते मनासारखे नसल्याने काहीजणांना घोर निराशा वाटू लागते. तर जे स्वतःची फसवणूक करून घेणारे असतात, ते स्वतःची समजूत करून घेतात की आपण थोडे तरी मिळविले ना? हे सर्व खरे असले तरी युरोपीय बुद्धी निर्गुण सिद्धान्ताचे सगुणसृष्टीवर प्रयोग करीत असते हे निश्चित. सगुण सृष्टी-पासून निर्गुणाची फारकत करून व आपलेच एक छोटेसे घरटे बनवून भारतीय माणूस त्यात राहत असतो.

कोणी म्हणेल की, भारतीय दर्शनात कर्मयोगही प्रतिपादिला आहे. ठीक आहे. मलाही ते माहीत आहे. परंतु १५०० वर्षांपूर्वी काय सांगितले होते याचा विचार येथे प्रस्तुत नाही. गेल्या पंधराशे वर्षांत भारतीय दर्शन कोणते होते त्याची मी चर्चा करीत आहे. कारण भारताच्या भविष्याचा अंदाज घेण्यासाठी गेल्या १५०० वर्षांचाच विचार केला पाहिजे. या १५००-१७०० वर्षांत भारतात कर्मयोग सांगितला गेला असे म्हणणे मला गैर वाटते. कर्मवाद म्हणजे केवळ फलनाश नाहीं; खुद्द कर्माचाही नाश आहे. कोणी म्हणतील, तुम्ही अति-

शयोक्ती करीत आहात. भारतीय दर्शनात कर्म, फलनाश हे भेद आहेत पण मुक्ती याचा वास्तव अर्थ काय आहे ? संचित कर्मांचा नाश करा, तसेच नवीन कर्मही करू नका म्हणजे मुक्ती असाच वास्तवात अर्थ आहे ना ?

म्हणून भारतीय दर्शनात कर्मयोग आहे, ते कर्मप्रधान असे म्हणणे निरर्थक आहे. कर्मांचा नाश करा; निर्गुणाची उपासना करा; कारण सगुणाच्या उपासनेने मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही; म्हणून त्याचा विचार अलगपणाने करा हाच भारतीय दर्शनाचा वास्तविक संदेश आहे. त्याचे कांही अपरिहार्य परिणाम झाले. भारत सगुण जगाचा विचार करण्याच्या बाबतीत दुर्बल ठरला.

श्रेष्ठ जागेवर बसलेला व शिकलेला प्रत्येक भारतीय बढाई सांगत असतो की येथे विभिन्नतेत एकता आहे. हिंदुस्थानात अनेक जाती, भाषा, प्रांत व धर्म असले तरी एक प्रकारची येथे एकता आहे. हे सारे झूट आहे. भाषण करायला दुसरे काही उरले नाही की सांगण्याचे एक भारूड आहे. म्हणे, कपड्यांत विभिन्नता असली, खाण्या-पिण्यात असली, भाषेत असली तरी ती वरवरची आहे. विभिन्नतेतच एकता आहे. सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रांत अशी एकता शेकडो वर्षे आढळते हे खरे, पण राजकीय व सामाजिक संबंधांच्या क्षेत्रात नाही. ज्याला आपण एकसंध, एकजीव राष्ट्रीय ऐक्य म्हणतो ते येथे अस्तित्वात नाही.

मी दुसऱ्या एका देशांत विविधतेतील अवर्णनीय एकता पाहिली आहे. आम्ही काहीजण एकदा टोकियोला गेलो होतो, सारखे प्रवास करीत होतो. सतत नवा देश, नवे शहर, त्यामुळे झोपेतून सकाळी उठल्यावर डोके एकदम चकरावून जात असे. आपण कोठल्या गावी आहोत हे एकदम कळत नसे. चांगली पाच-दहा मिनिटे अशा अवस्थेत जात, एक दिवस सकाळी असेच झाले. मी उठलो तेव्हा माझ्या लक्षात येईना की आपण आहोत कुठे ? थोड्याच क्षणांत एक अद्भुत दृश्य पाहिले. एकसारख्या निळ्या रंगाचे लेंगे किंवा पाटलूणी आणि पांढरे स्वच्छ शर्ट घातलेली हजारो मुले-मुली रस्त्यावरून चालली होती. मग लक्षात आले, आपण जपानमधील एका शहरात आहोत. पाच-सात मिनिटे मी ते दृश्य पहातच होतो. ती मुले शाळेत चालली होती.

त्याच्या अगदी उलट दृश्य अलाहाबादेत पाहायला मिळाले. एक दिवस सकाळी काही कामासाठी मी माझ्या मित्राबरोबर चाललो होतो. समोरून मुला-मुलींचा एक ताफा येत होता. त्यांनी विविध रंगांच्या फुलपाखरांची चित्रे असलेले रंगीबेरंगी कपडे घातले होते. कोणाचा लाल तर कोणाचा पिवळा,

कोणाचा काळा तर कोणाचा निळा, अनेक रंग. लोक मोठ्या मजेत ते दृश्य पाहत होते. विविधतेतील एकता हीच काय? एक विचित्र प्रकारचे असे ढोंग आपणाला भारतामधील प्रत्येक गोष्टीत दिसते. एखाद्या गोष्टीच्या मुळात जाऊन ती समजून घेणे, ती पारखणे आणि त्यातून काही निष्कर्ष काढणे हे कधी आपण करीतच नाही. मुलांचे कपडे किती विविध रंगांचे आहेत यावर काय त्यांची संस्कृती ठरत असते?

भारताला चीनबरोबरच्या लढाईत जो अपमानकारक पराभव पत्करावा लागला त्याच्या बुडाशी हेच विभिन्नतेत एकता पाहण्याचे ढोंग व जहरी सिद्धांत आहे. हिमालयाच्या परिसरात एकूण दोन कोटी लोक राहतात. भारतीय हिमालयात त्यांपैकी एक कोटी लोक वस्ती करून आहेत. या एक कोटी लोकांच्या बाबतींत आपण काहीतरी करावयास हवे होते. कारण ते आपले लोक आहेत; जसे आपण तसे ते. पण त्यांना अजबघरातील एक अजब विचित्र वस्तू आहे असेच जणू आपण समजतो. विविध रंगांच्या फुलपाखरांचे कपडे घातलेल्या अलाहाबादच्या मुलांप्रमाणे या एक कोटी लोकांत भारतासंबंधी प्रेम आणि निष्ठा किंवा खरीखुरी विश्व-एकतेची भावना निर्माण व्हावी म्हणून आपण गेल्या सतरा वर्षांत काय केले?

एक कोटी लोकसंख्या असलेल्या या हिमालय परिसराचे रक्षण आज कोण करीत आहे? हे एक कोटी स्थानिक लोक करीत नाहीत, तर लष्करातले अन्य-प्रांतीय जवान, त्यांची सेना. हे हिमालयातील लोक नाहीत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की हिन्दी सेना लोकसेना नाही, धंदेवाईक जवानांची सेना आहे. अन्य धंद्याप्रमाणे याही धंद्यात गरजू लोक भरती होतात, आणि देशाचे रक्षण करण्याचे काम करतात. हिमालयात राहणारे एक कोटी लोक हे विभिन्नतेत एकता या आपल्या भ्रामक कल्पनेचे बळी आहेत. त्यांना आपण स्वतःचे रक्षण करण्याइतके बलिष्ठ बनविले नाही.

'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ता हमारा' ही काव्य पंक्ती ऐकली की नेहमीच मी मनाशी म्हणतो, "हे खरे आहे काय?" लहानपणी मलाही हे काव्य फार आवडे; खरेच आहे असे वाटे. पण आता अगदी असत्य वाटते. कोणत्या बाबतीत आपला हिंदुस्थान साऱ्या जगात चांगला आहे? ग्रीक, रोमन, ईजिप्त या संस्कृती विनाश पावल्या, पण आमची भारतीय संस्कृती मात्र अद्याप जीवित आहे असे आपण म्हणतो. पण ते खरे नाही. त्याही संस्कृती अद्याप जीवित आहेत. कोणत्या अर्थाने त्या नष्ट झाल्या असे आपण म्हणतो? आणि

भारतीय संस्कृती तेवढी जीवित आहे असे आपण म्हणतो ? त्याला तरी आधार काय ? तेव्हा उत्तर मिळते, भारत आपले वैशिष्ट्य टिकवून आहे. कोठे आहे ते वैशिष्ट्य ? ग्रीस व रोम तर अद्याप जिवंत आहेत. आणि चांगल्या रीतीने जीवित आहेत. तेव्हा सांगितले जाते, "ग्रीस, रोम, ईजिप्त हे आपला धर्म गमावून बसले. सॉक्रेटिसाचा ग्रीस पुढे खिश्चन बनला; रोमही खिश्चन झाला आणि ईजिप्त नंतर मुसलमान झाला. पण भारत बदलला नाही; जबरदस्तीने झालेली धर्मपरिवर्तने सोडून द्या; पण भारत आपल्या धर्मनिष्ठेवर मूलतः अटळ राहिला; आपल्या पूर्वपरंपरेचे त्याने रक्षण केले." म्हणजेच आपण अद्यापही शरीरापेक्षा आत्म्यालाच अधिक महत्त्व देतो असे यांना म्हणावयाचे असेल. परंतु या प्रश्नाच्या इतरही बाजूंचा विचार केला पाहिजे. तसा विचार केला म्हणजे असे दिसून येईल की, जितका हिंदुस्थान जीवित आहे, तितकेच ग्रीस, ईजिप्त व रोमही जिवंत आहेत. खरे म्हणजे ते आपल्यापेक्षा चांगल्या रीतीने जगत आहेत. आपल्यापेक्षा शक्तिशाली आहेत; विद्येत प्रगत आहेत; चांगले खाते-पिते आहेत. जगात त्यांना चांगले स्थान आहे.

भारत आपली पूर्वपरंपरा टिकवून आहे असे सांगितले जाते. मला या वेळी महात्मा गांधी एकदा म्हणाले होते त्याची आठवण होते. या विषयावर लिहिताना गांधीजी म्हणाले होते, "हिंदुस्थानचे वैशिष्ट्य हे आहे की, तो जलदी बदलत नाही; हवेच्या प्रत्येक झोक्याबरोबर तो बदलत नाही. तो आपल्या जागेवर स्थिर असतो." यालाच आपण स्थिरता म्हणतो. आपल्या देशाची थोरवी यात आहे असे आपण मानतो.

म्हणे स्थिरता ! कसली आली आहे स्थिरता ? हिंदुस्थानात एकाच गोष्टीच्या बाबतीत स्थैर्य आढळते. आणि ते म्हणजे दुष्काळ, महामारी व अपुरे अन्न यामुळे माणसे मरणे. माझा तर अंदाज आहे की, भारतात अपुऱ्या व कदान्ना-मुळे किंवा बिलकुल अन्न न मिळाल्यामुळे, तसेच देवी, प्लेग, कॉलरा इत्यादी साथीत दरसाल निदान ३० लक्ष लोक मरतात. मी हा आकडा हिशेब करून काढला आहे. आणि दुर्दैव असे की, देवीची साथ आली की भारतीय माणूस शितलादेवीला सांकडे घालतो की, "माते, येऊ नकोस." युरोपीय लोक शितलादेवीला दंडा मारून हाकलून लावतात तर आम्ही तिची प्रार्थना करतो. मग देवीही म्हणते, "आपले लाडके भक्त खूप भक्तिभावाने आपली पूजा करताहेत, तर द्या त्यांना प्रसाद !"

ही म्हणे स्थिरता ! ज्या देशात स्थैर्य जास्त त्या देशात प्रगती कमी असे अनुमान काढावयास हरकत नाही. याला अपवाद नसतो असे नाही. अर्थातच

ज्या देशात जितकी अधिक अस्थिरता तितकी जास्त तो देश प्रगती करतो असा याचा अर्थ नाही. अस्थिरता सुद्धा मर्यादित असावी लागते. अस्थिरता दोन प्रकारची असू शकते. जिने समाजाची प्रगती होते हा एक प्रकार आणि जिने प्रगती थंडावते हा दुसरा प्रकार. अस्थिरता मर्यादित असली तर देशाची व जनतेची प्रगतीहि तिच्यांतून होऊ शकते. देश तोडणारी अस्थिरता अर्थातच घातक असते. आपल्या देशातील स्थिरता देशाची प्रगती घडवून आणणारी नाही तर देशाला कमालीची जड बनविणारी आहे. मर्यादित अस्थिरतेचे एक उदाहरण देतो. काही वर्षांपूर्वी अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष आयसेनहोअर जपानला भेट देण्यासाठी जाणार होते. जपानी जनतेचा या भेटीला विरोध होता. सतत चार-सहा दिवस पन्नास हजार, एक लाख लोकांची उग्र विरोधी निदर्शने तेथे झाली. लोकसभेला गराडा पडला. जनतेचा विक्राळ विरोध पाहून जपान सरकारला आयसनहोअरचा कार्यक्रम रद्द करणे भाग पडले. याला म्हणतात जिवंतपणा, अस्थिरता.

भारतीय जनतेलाही आपला जिवंतपणा, अस्थिरता व्यक्त करण्याची संधी नुकतीच आली होती; हिंद-चीन युद्धाचे प्रसंगी. भारत सरकार या युद्धात कच खाऊ लागले तेंव्हा दिल्लीत लाख पन्नास हजारांची जबरदस्त जननिदर्शने होऊन जनतेने नेहरू सरकारला " लढा, आता ही लढाई शेवटपर्यंत लढा; कच खाऊ नका " असे सांगितले असते तर दुनिया म्हणाली असती, की हिंदी जनतेत काही तरी दम आहे, प्राण आहे. मला अशी अस्थिरता हवी आहे. पण येथे तर प्राणघातक जडता आहे.

देशात ही प्राणघातक जडता आली कोठून? देश असा मुडदा का बनला, बंड करण्याचे सामर्थ्य त्यांत का नाही?

जातिबद्ध समाज व्यवस्था हे याचे सर्वात मोठे कारण आहे. शेकडा ९० लोकांना आमच्या पूर्वजांनी जातिबद्ध समाजाची पक्की चौकट उभारून गेली हजारो वर्षे सार्वजनिक जीवनापासून संपूर्णपणे दूर ठेवले आहे. मग येथे बंड कसे होणार? राजकारण, विद्या, व्यापार, देशाचे संरक्षण ही सारी कामे ब्राह्मण-क्षत्रियांची आहेत; तिथे स्त्री-शूद्रादिकांचे काम नाही असेच भारतात गेली हजार वर्षे सांगितले गेले ना? त्यामुळे येथील ९० टक्के शूद्रादि समाज निकम्मा व प्राणहीन बनला आहे.

दुसरे कारण विषमता; छोट्या-मोठ्यातील अंतर. येथे कैलास व पाताळा-इतका छोट्या-मोठ्यांत फरक आहे. सर्वत्र, सर्व क्षेत्रात आम्ही इतकी विषमता

निर्माण करून ठेविली आहे की, येथील सामान्य जनतेत बंड करण्याची ताकदच कधी निर्माण होऊ नये.

आम्ही आमच्या जातिप्रथेमुळे कनिष्ठ समाजीय शेकडा ९० लोकांना तर निकम्मे बनविलेच आहे पण उरलेल्या १० टक्के वरिष्ठ समाजीयांनाही कुच-कामी बनविले आहे. कारण जातिप्रथेची चक्कीच अशी आहे की, तिच्यात साराच्या सारा समाज पिसला जात असतो; आणि त्यामुळे योग्यता व संधी ही समाजातील छोट्या गटापुरतीच मर्यादित राहते. आपल्या देशात योग्यता व संधी फक्त एक टक्का लोकांना लाभत असते. पण ही योग्यता कसली ? आपल्या-प्रमाणेच इतरांनाही योग्य बनविणारी ती विस्ताराभिमुख योग्यता नाहीं; ती स्वत:पुरतीच पाहणारी संकुचित योग्यता आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील अधिकाधिक हिस्सा आपल्याकडे कसा येईल यासाठी धडपडणारी योग्यता; बसण्यात, उठण्यात, बोलण्यात, कपडेलत्ते करण्यात विलासी आधुनिकतेची नकल करण्याची योग्यता, पोकळ बडबड व चर्चा आणि शब्दबाजी करणारी योग्यता.

भारताला शब्दबाजीचा फार षोक आहे. येथे निरर्थक शब्दांना तोटा नाही. जीभ आहे; फिरवा ती वाटेल तशी ! त्यात नुकसान काय ? उलट सर्वांना शब्दांनी खुश करता येते. मी नुकताच भरतपूरला गेलो होतो. तेथे एक ‘पक्षीरक्षणगृह’ आहे. देश-विदेशांतील अनेक जातींचे पक्षी आणून तेथे त्यांचे रक्षण व संवर्धन केले जाते असे सांगितले जाते. परंतु मी तेथे ऐकले की. रोज तेथे अनेक हौशी शिकारी येऊन दोन-दोन, तीन-तीन हजार पक्षी मारतात. पण नाव मात्र ‘पक्षीरक्षणगृह’ ! कोणी विचारले की मग पक्षी का मारता ? की उत्तर तयार. पक्षी मारले नाहीत तर त्यांची संख्या एवढी वाढेल की, त्यांना ठेवायला जागा आणि घालायला चारा मिळणार नाही. यालाच मी भारतीय बुद्धीतील निर्गुण व सगुण म्हणतो. ‘पक्षीरक्षणगृह’ हे निर्गुण आणि त्यांची हत्या हे सगुण.

आपल्या देशातील शब्दबाजीच्या रोगाबद्दल सांगावे तेवढे थोडेच. आपल्या देशाचे हल्लीचे सरकार व त्याचा प्रधानमंत्री यांनी गेल्या पंधरा वर्षांत उच्चार-लेले शब्द व वाक्ये आपण एकत्र केलीत तर ते एकमेकांशी विसंगत व विरोधी आहेत असे शेकडो वेळा आपणास दिसेल. येथे शब्दांना काही अर्थच उरलेला नाही. जिभेचा आदर करणे भारतीय माणसाला माहीतच नाही. म्हणून तर देशाची ही दशा आज झाली आहे. बोलाल तेव्हा विचारपूर्वक बोला; आणि एकदा बोललेल्या शब्दाला चिकटून राहा. पण हे आम्हाला माहीतच नाही. नुकतेच ॲव्हरेल हॅरिमन व सँडीस साहेब येऊन गेले. त्यांच्या मध्यस्थीने भारत-पाकने वाटाघाटी केल्या. त्या वेळी भारताच्या प्रधानमंत्र्यांनी केवळ

चौवीस तासाच्या अवधीत निरनिराळया अर्थाची तीन निवेदने केली. प्रधानमंत्री असे का करू शकतात ? त्यांना माहीत आहे की कोण आपणाला विचारणार आहे ? उलट हिंदी लोक असेच म्हणतील की, आपला पंतप्रधान किती हुषार व चतुर आहे ! आणखी एक उदाहरण पाहा. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे. ते दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून येण्यापूर्वी महाराष्ट्र विधान सभेत, फक्त एक दिवस आधी " १५ ऑगस्ट १९४७ ला होती ती भारताची सीमा आम्ही मानतो " असा ठराव पास झाला. पण दिल्लीला आल्यावर हे सद्‌गृहस्थ ८ सप्टेंबर, १९६२ रोजी होती ती भारतचीनमधील सीमा या गोष्टीचे समर्थन करू लागले.

भारताचे भाग्य ठरविणाऱ्या स्थिरतेशी संबंधित अशी दुसरी एक रेखा आहे – समन्वय. समन्वय करा. जेथे तेथे समन्वय. दर्शनात समन्वय, विचारात समन्वय, चालीरीतीत समन्वय; सर्वत्र समन्वय. ज्या स्थितीत असाल तिच्याशी जमवून घ्या; मिसळून जा; समन्वय करा; उगीच त्रास नको. झंझट नको. सिद्धांतांच्या समन्वयातून एखादवेळी मोठी गोष्ट निघू शकेल. पण येथे तशा प्रकारच्या समन्वयाचा आग्रह नाही. तर संकटांपासून, कटकटीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी समन्वय. जे घडले असेल त्याचा स्वीकार करा; जमवून घ्या म्हणजे समन्वय.

मलाही समन्वय मान्य आहे. पण आपण ज्याचे स्तोम माजवतो तो नाही. परक्यांनी ज्या गोष्टी ताकदीच्या जोरावर आम्हांस पत्करावयास लावल्या; किंवा श्रेष्ठांची व बलिष्ठांची नक्कल करण्याच्या गुलामी वृत्तीतून आपण ज्या स्वीकारल्या त्याला समन्वय म्हणत नाहीत. परकीयातील काही चांगल्या गोष्टी विचारपूर्वक नीट पारखून पत्करणे हा खरा समन्वय. भारतीय माणूस दुसऱ्याचे घेतो; आणि ते स्वतःमध्ये मिसळून टाकतो हे धादांत असत्य आहे. तर आपण दुसऱ्या श्रेष्ठ, बलिष्ठ संस्कृतीशी लाचार लगट करतो हे सत्य आहे. गुलाम व दुर्बल देशाने स्वतंत्र व बलिष्ठ परकीयांची नक्कल करणे; आपली बुद्धी विकून किंवा कमजोर बनवून बलवानांची नक्कल करणे म्हणजे समन्वय खासच नव्हे. गेली एक हजार वर्षे भारतात हाच समन्वय चालू आहे; आणि आपण त्याची शेखी मिरवीत आहोत. या समन्वय तत्त्वज्ञानाने भारताचा आत्मा कायमचा नष्ट केला आहे; त्याला गुलाम बनविले आहे. परचक्रापुढे भारताने या तत्त्वज्ञानामुळेच सतत शरणागती स्वीकारली आहे. जो कोणी बलिष्ठ परकीय येईल त्याचा प्रतिकार करायचा नाही; आणि त्याचे सारे गुण-दुर्गुण स्वीकारायचे; आपल्यात त्यांचा समन्वय करून घ्यायचा आणि एक नकली जीवन जगू लागायचे. हा

आमचा समन्वय. राजधानी दिल्ली हे या नकली समन्वयाचे ढळढळीत उदाहरण आहे. जेव्हा जेव्हा कोणी परकीय आक्रमकाने दिल्लीवर आपली सत्ता प्रस्थापित केली तेव्हा तेव्हा छिनाल दिल्लीने मोहक, नखरेल रूप धारण करून तिचे स्वागतच केले. आम्ही म्हणतो, एका हातात धर्म व दुसऱ्या हातात विज्ञान घेऊन आम्ही जगावर विजय मिळवायला निघालो आहोत. मोठा अद्‌भुत समन्वय आहे हा.

एखाद्या पशूची शेपटी आवडली की ती घ्यायची; दुसऱ्या एखाद्या जनावराचे तोंड चांगले दिसले की ते घ्यायचे आणि तिसऱ्या एखाद्या पशूचा पंजा उत्तम वाटला की तो घ्यायचा आणि हे सर्व अवयव एकत्र जोडून एक जनावर जन्माला घालायचे यातलाच प्रकार म्हणजे हा समन्वय. अशा प्रकारे जेथून जे बरे वाईट मिळेल ते घ्यायचे आणि जोडायचे हेच जर एखाद्या देशाचे दर्शन आहे असे मानले; विचाराचा आधार आहे असे समजले तर त्याचे अपरिहार्यपणे अनिष्ट परिणाम होत असतात.

भारतीय राज्यघटना हा सुद्धा असाच एक समन्वय आहे. खरे म्हणजे त्यात समन्वयापेक्षा अनुकरण अधिक आहे; स्थिरतेकडे अधिक कल आहे. भारतीय घटनेत, रशियन घटनेकडून फारशी नाही, पण फ्रेंच, अमेरिकन व इंग्लिश राज्यघटनांतून उसनवारी केलेली आहे. केंद्रीकरण व विकेंद्रीकरण यांत समन्वय, नागरिकतेच्या कायद्यात समन्वय; परिवार नियोजनात समन्वय, कायद्यात समन्वय. सर्वत्र परस्परविरोधी तत्वांचा समन्वय.

मी स्वानुभवाने सांगतो की, भारत हा दुनियेतील सर्वांत अधिक असत्यभाषी देश आहे. इंग्रज लोक असा आरोप करीत त्यावेळी खूप संताप येत असे. पण आज त्यांचे म्हणणे खरे वाटू लागले आहे. भारतीय माणूस असत्यभाषी आहे हे स्वाभाविकच आहे. त्याचे कारण त्याने आपल्या बुद्धीत सगुण-निर्गुणाची फारकत केलेली आहे. एक विचित्र गोष्ट आपणास दिसून येईल. एखादे काम पुरे करणे हे भारतीय माणसाचे मुख्य ध्येय कधी असतच नाही. काम झाले नाही की ते का झाले नाही याची तो कारणे सांगतो; स्पष्टीकरण करीत बसतो. मग तो माणूस सरकारी नोकर असो नाहीतर राजकीय कार्यकर्ता असो, किंवा पुढारी असो. कारण सर्वांची बुद्धी एकाच साच्यातून तयार झालेली आहे. आपण हाती घेतलेले कार्य, लक्ष्य पुरे झाले नाही याबद्दल त्याला शरम वाटत नाही. तर ते का झाले नाही याचीच कारणे त्याची निर्गुण बुद्धी शोधू लागते; आणि मग तो अशा सुंदर भाषेत ती कारणे सांगतो, की ऐकणाराही प्रभावित होतो आणि म्हणतो, की " बरोबर आहे. "

आणखी एक बढाई आपण नेहमी मारीत असतो : “ भारत मोठा भाग्यवान देश आहे. येथे माणसाचे रक्त फारसे सांडले नाही. ” हे धादान्त असत्य आहे. फाळणीपूर्वी व नंतर निदान ६–७ लाख लोक कापले गेले हे आपण सोयीस्करपणे विसरतो. सांगितले जाते की, “ नाहीतर बघा शेजारच्या देशांकडे. तेथे रोज मारकाट, दंगली चालू आहेत. अस्थिरता आहे. जपानमध्ये लाखो लोकांनी रस्त्यावर येऊन गडबडी केल्या. नेपाळमध्ये, तुर्कस्तानात, कोरियात सर्वत्र गडबड, गोंधळ, अस्थिरता आहे. भारतात मात्र गडबड, गोंधळ नाही; अत्याचार नाहीत; माणसे मरत नाहीत. ” हे सारे असत्य आहे; नुसत्या पोलिसांच्या गोळया खाऊन मेलेल्यांचा हिशेब लावलात तरी हे लक्षात येईल. जेथे अस्थिरता आहे, गोंधळ आहे अशा कोणत्याही देशापेक्षा भारतात पोलिसांच्या गोळयांनी जास्त लोक मेले आहेत. पण त्याची कोण दखल घेतो ? भारतातील सुशिक्षित माणूस या गोष्टीला महत्त्व देत नाही. पोलीस लोकांना गोळया घालतात असे म्हटले की लगेच हे लोक त्याचे समर्थन करतात. म्हणतात, “ मग काय करणार ? लोक गुंडगिरी करतात; दगड फेकतात; आगी लावतात. मग पोलीस गोळया घालणारच. ” मूळ मुद्याची उपेक्षा करून कारणे देत बसण्याची भारतीयाला अशी संवयच आहे. प्रक्षुब्ध निरस्त्र जमावाला काबूत आणण्यासाठी नेहमीच गोळीबार अटळ असतो काय, नैतिक असतो काय हा खरा प्रश्न आहे. जपानमध्ये काही दिवसांपूर्वी आयसेनहोअर यांच्या संभाव्य भेटीविरुद्ध हजारो प्रक्षुब्ध जपान्यांनी प्रचंड निदर्शने केली. त्या वेळी एकही निदर्शक पोलिसांनी मारला नाही की जनतेने एकाही पोलिसाला मारले नाही.

भारतात मारकाट झाली पाहिजे असे मी म्हणत नाही. पण देशाला पुढे नेणारी थोडी अस्थिरता, हालचाल, गडबड झाली पाहिजे असे मात्र मला जरूर वाटते. क्रांती झाली पाहिजे, परिवर्तन झाले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. हे काहीच होत नाही, म्हणून तर भारत जगाच्या मागे, समान स्थितीतील देशांच्या मागे राहिला आहे. मी यासंबंधीचे काही आकडेच देतो. घाना व चीन यांतील दर माणशी वार्षिक उत्पन्नातील वाढ अनुक्रमे ३० व ६०-७० रुपये आहे, तर भारतातील हे प्रमाण फक्त ५ रु. आहे. आपल्या देशातील सामाजिक व राजकीय स्थिरतेचा व अप्रगतीचा अन्योन्य संबंध आहे.

भारतात व्यक्तिगत संपत्तीच्या विचाराच्या बाबतीतही मूलगामी विचारपरिवर्तन होण्याची शक्यता दिसत नाही. व्यक्तिगत संपत्तीचा नाश केला पाहिजे. त्याशिवाय जगाचे व भारताचे कल्याण असंभव आहे. पण भारतात आज तर

व्यक्तिगत संपत्ती वाढतच आहे; ती वाढविण्याकडेच सर्वांचा कल आहे. दहा-वीस वर्षे नोकरी-धंदा करून किंवा तो न करताही अन्य मार्गांनी पाच-पन्नास हजार रुपयांचा बँक अकौंट असावा, एक बंगला असावा, एक मोटर मिळावी यासाठी सर्वत्र धडपड दिसून येत नाही काय ? दरसाल असे ३–४ लक्ष लोक देशांत तयार होत असतात. मात्र तोंडात भाषा संपत्तिनाशाची. भारतीय उपनिषदे गेली तीन-चार हजार वर्षे सांगत आहेत, संपत्तीचा मोह सोडा; हें धन कोणाचें आहे ?—परमेश्वराचे. प्रत्येक भारतीय संपत्तिनाशाचा, संपत्तीचा मोह सोडण्याचा निर्गुण सिद्धांत मानतो; अनासक्तीची भाषा बोलतो. पण एक समाज या नात्यानें भारतासारखा आसक्ति मागे लागलेला दुसरा समाज जगात नाहीं. जगण्याचा कोण मोह ! देह रोगानें सडत चालला असला तरीही भारतीय माणूस मरायला तयार नसतो. इतका देहाचा मोह. आणि भाषा मात्र अनासक्तिची. मला देखील लहानपणी भारताच्या अनासक्तियोगाचा, आध्यात्मिकतेचा मोठा गर्व वाटे. वास्तविक स्थिती अशी आहे की जपान, तुर्कस्तान, इंग्लंड, अमेरिका, रशिया इत्यादी देशांत देह व धन यांच्या बाबतीत जेवढी अनासक्ति आढळते तेवढीच त्यासंबंधीची आसक्ती भारतात अनुभवास येते. येथें निर्गुण विश्वात अनासक्ति व सगुण विश्वात आसक्ति. असा मामला आहे.

अर्थातच मी असे म्हणत नाही की, संपत्ती हेच मानवी दुःखाचे एकमेव मूळ आहे; कारण आहे. परंतु ते एक महत्त्वाचे कारण आहे हे कोणीही मान्य करील. काही युरोपीय तत्त्वज्ञांनी, ऋषींनी या मूळावरच प्रहार केला आहे. संपत्ती ही संस्थाच नष्ट करण्याची घोषणा त्यांनी केली. तर भारतीय उपनिषद्कारांनी संपत्तीचा मोह सोडा असा उपदेश केला. परिणामांती असे झाले की, रशिया, पूर्व युरोपीय देश, चीन यासारख्या काही देशांत संपत्ती ही संस्थाच बहुतांशी नष्ट झाली; पण कदाचित संपत्तीचा मोह शिल्लक राहिला. भारतात मात्र संपत्ती ही संस्थाही राहिली आणि तिचा मोहही कायम राहिला. मी संपत्ती म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ पिळवणुकीची, उत्पादनाची मोठी साधने. बडे कारखाने, बडे मळे, बडी शेते. व्यक्तिगत कपडे, थोडीशी पुंजी इत्यादींचा या संदर्भात मी विचार करीत नाही. संपत्तीचा मोह व प्रत्यक्ष संपत्ति ही संस्था या दोन्ही नष्ट करता आल्या तर साऱ्या जगाचे भाग्य बदलेल; हिंदुस्थानचेही बदलेल. आज तरी अशी आशा करणे साहसाचे आहे असे अर्थातच यावर कोणी म्हणू शकेल.

पण भारताच्या भवितव्याबद्दल मी अगदीच निराश नाही, आशेला थोडी जागा आहे. गेल्या हजार वर्षांतील भारतीय जनतेच्या रोमारोमात भरलेला

डरपोकपणा थोडा थोडा कमी होत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गांधीजींनी प्रारंभ केलेले अन्यायविरोधाचे आंदोलन अद्याप जिवंत आहे. आणि आता वरिष्ठ जातीमधील श्रीमंत लोक, कनीष्ठ व गरीब लोकांचा अवमान सहजासहजी करू शकत नाहीत. इंग्रजी भाषेमुळे व जातिप्रथेमुळे भारतीय जनतेत फूट पडली आहे. आणि सामान्य माणसास तिने चेतनाहीन बनविले आहे ही गोष्ट आता काही लोकांस तरी पटू लागली आहे. भारतीय समाजातील दोष आता आपण काहीसे ओळखू लागलो आहोत. त्यामुळे त्यांच्यावर आपण विजय मिळवू शकू अशी मला आशा वाटते.

संपत्तीचे योग्य महत्त्व मानणारे पण तिला मोहाने न कवटाळणारे असे कार्यकर्ते हवेत. या देशात पुढील पाच पंचवीस वर्षांत असे नेते पैदा झाले आणि आपल्या मार्गावर ते दृढपणे काम करीत राहिले तर भारताचेच नव्हे तर साऱ्या जगाचे भविष्य उज्ज्वल होईल. त्याचप्रमाणे शस्त्रास्त्रे नष्ट झाली तर जगाचेही भाग्य सुधारेल. जगाचे भाग्य सुधारले तर भारताच्या भाग्याच्या आड येणारी जातिप्रथाही कदाचित नाहीशी होईल. अर्थातच त्यासाठी आपण दृढ व निश्चित दिशेने प्रयत्नही केले पाहिजेत. उच्चवर्णीय जातींनी जरा खाली जमिनीवर उतरून शूद्रादि जातींना उंच जागी बसविले पाहिजे. सर्वांना नाही तरी निदान त्यांपैकी ६० टक्के लोकांना. त्यांच्या अपात्रतेची अडचण सांगणे योग्य नाही. देश बुडेल ही तक्रारहि योग्य नाही. गेल्या हजार बाराशे वर्षांत उच्चवर्णीयांनी राज्य करून देश काय कमी बुडविला आहे ? अधिकाराच्या जागावर नेऊन कनिष्ठवर्णियांना संधी द्या. त्यांच्यात आपोआप योग्यता निर्माण होईल. मी उच्चवर्णीयांचा नाश करण्यास निघालो आहे असे समजू नका. शेकडा ४० जागा लायक लोकांना द्या असे मी म्हणतोच आहे. या लायक लोकांत तूर्त तरी तुमच्या मताप्रमाणे कोण येतात ? ब्राह्मण, वैश्य आदी उच्च-जातीयच ना ? [ पुणे व दिल्ली येथील दोन भाषणांचे (१९६२-६३) संकलन]

● ● ●

## आमच्या शासकांचा ' अर्धा बाप '

देश स्वतंत्र झाला तेव्हाच खरे म्हणजे स्वातंत्र्याच्या दुधांत माशी पडली होती. आणि त्यानंतर व आज तर त्यांत आणखीनच माशा पडत आहेत. इतक्या की आता भारतीय स्वातंत्र्यात दूध जास्त आहे कीं माशा अधिक आहेत हें ओळखणे कठीण झाले आहे. आपली क्रांती नासविणारे आणि तिच्या जनकाला इतक्या लौकर बदनाम करणारे भारतासारखे दुसरे राष्ट्र दुनियेच्या इतिहासात शोधूनही सांपडणार नाहीं. आपल्या राष्ट्रपित्याच्या देहान्तानंतर या देशाचा घटनात्मक जन्म झाला. पण जन्मतानाच त्याने आपल्या पित्याचे निम्मे पितृत्व काढून घेतले आणि ते आपल्या आधीच्या बापाला देऊन टाकले.

हे कसे झाले ते प्रथम पाहू आणि मग ते का झाले त्याचा विचार करू.

'वंदे मातरम्' या आपल्या क्रांतिगीताचा त्याग करून भारताने ' जनमनगण' हे सांस्कृतिक गीत राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले. ' वंदे मातरम् 'साठी हजारोंनी मरणाला कवटाळले आणि लाखोंनी तुरुंगवास पत्करला. ' जनमनगण ' हे गीत अजोड आहे. दलदलीत सुद्धा कमलपुष्प निपजतेच की ! ब्रिटिश बादशहा पंचम जॉर्ज यांच्या हिंदुस्थान भेटीच्या निमित्ताने हे गीत रचले होते, असा

एक प्रवाद आहे. या 'राष्ट्र' गीतामध्ये केलेला राष्ट्राच्या निरनिराळ्या प्रदेशांचा अलग अलग उल्लेख खटकतो.

आपल्या पूर्वीच्या बापाची इंग्रजी भाषा राज्यकर्त्यांनी चालू ठेविली; आणि हिंदी भाषेची राज्यसिंहासनावर नामधारी स्थापना केली. यामागे त्यांचा कोणता हेतू होता हे खोलात जाऊन पाहणाऱ्यालाच समजेल. हेतू काही का असेना, परिणाम स्पष्ट आहे. इंग्रजीमुळे देश अडाणी राहिला आहे. इतका की, कोणत्याही शास्त्रात सर्वोच्च कोटीचा एकही नाव घेण्याजोगा तज्ज्ञ आज भारतात आढळत नाही; देश नपुंसक व हीनदीन बनून जगभर दारोदार भीक मागत हिंडत आहे. आपल्या भाषेचा वापर करण्याची, विकास करण्याची संधी जनतेला दिली पाहिजे या साध्या गोष्टीचेहि महत्त्व राज्यकर्त्यांना कळले नाही. कारण ते भारतीय जनतेला स्वतःची वाणी नसलेले मुके जनावर समजत असावेत.

भारतीय सेनेचा सर्व कारभार ब्रिटिश थाटातच चालू आहे. तेथे अद्याप इंग्रजी भाषेचाच तोरा आहे. तोच ब्रिटिशकालीन थाटमाट, तीच वर्दी, तीच जुनी शिस्तीची कल्पना. सर्व काही ब्रिटिश काळात होते तसेच; आणि विशेष म्हणजे सेनेमागे आता पूर्वीप्रमाणे इंग्रजांची औद्योगिक व वैज्ञानिकशक्ती उभी नाही हे माहीत असूनही हा सारा मूर्खपणा चालू आहे. सेनेमध्ये एक प्रकारचे अजब अज्ञान व अंधःकार पसरलेला आहे. कारण तिच्या शासकांत व नेतृत्वात मनाची दुविधा आहे – आपण अस्तंगत ब्रिटिश साम्राज्याचे वारस आहोत की स्वतंत्र भारताचे वारस आहोत की दोन्ही आहोत याबाबत सेनेच्या मनाचा अद्याप निर्णय झालेला दिसत नाही.

पूर्वीच्या साम्राज्यवादी इंग्रजी सत्तेची परंपरा कायम ठेवण्याची एक विचित्र धडपड स्वतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांत दिसून येते. गेल्या अठरा वर्षांत कित्येक गोष्टींच्या शतसंवत्सऱ्या साजऱ्या करण्यात आल्या – भारतीय रेल्वेची, विश्वविद्यालयांची, न्यायालयांची, सैनिकी तुकड्यांची आणि पोलीस दलाची देखील. भारतातील इंग्रजांच्या आगमनाची शतसंवत्सरी समारंभपूर्वक साजरी करण्याचे राज्यकर्त्यांपैकी कोणाच्याच कसे डोक्यात आले नाही याचे आश्चर्य वाटते! कोणी म्हणतील, रेल्वे, पोलीस, न्यायालय आदि ब्रिटिश संस्था फार मोलाच्या होत्या; त्या अजूनही कायम आहेत. पण त्यांची शतसंवत्सरी कशाला? या लोकांच्या हे लक्षात येत नाही, की पोलीस दलाची शतसंवत्सरी साजरी केली जाते तेव्हा पोलिसांनी ब्रिटिश राज्यात केलेल्या अमानुष अत्याचाराचाहि

आपण अप्रत्यक्षपणे गौरव करीत असतो; किंवा ब्रिटिशकालीन शिक्षणपद्धतीची अथवा न्यायालयांची शताब्दी साजरी करतो तेव्हा आपण अप्रत्यक्षतः इंग्रजी भाषेच्या माध्यमाचा उपयोग करुन या संस्थांनी भारतीयांना जे मूर्ख व पंगू बनविले त्याचाही गौरव करीत असतो. अशा प्रकारच्या शतसंवत्सऱ्या साजऱ्या करण्यामुळे देश दोंगला ( लेकावळा ) बनत असतो.

राजधानी नवी दिल्ली येथील ब्रिटिशकालीन आलीशान महाल बहुजनांच्या उपयोगासाठी स्वतंत्र भारतात वापरले जातील अशी एक स्वाभाविक अपेक्षा होती. परंतु तेथे तर आता राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री मुक्काम ठोकून आहेत. भारताचे राष्ट्रपती १२०० एकरांच्या आवारातील भवनात राहतात, तर इतर मंत्र्यांचे महाल २५ ते ५० एकरात वसलेले आहेत. आमच्या लोकशाही भारतातील कलेक्टर आदि नोकरशहा देखील ५-१० ते २५-३० एकरांच्या आवारात राहतात. उलट, अमेरिकेचे अध्यक्ष १२ एकरांतील बंगल्यात राहतात, तर इंग्लंडच्या राणीचा राजमहाल ९-१० एकरांत आहे. कंबोजचे अधिपती देखील ३ एकरांत तर फिलिपिन्सचे अध्यक्ष ७ एकरांत राहतात. भारतात शासक व शास्ते यांच्या राहणीमानात मुद्दामच डोळयात खुपेल एवढे अंतर ठेवले आहे. असे का ? आपली प्रतिष्ठा व वचक राहावा म्हणून की विलासितेच्या आहारी जाऊन ते एवढे रुबाबात राहत आहेत ?

ब्रिटिशांचा वारसा असलेला असा क्रिकेटचा खेळ अद्यापही स्वतंत्र भारतात खेळला जात आहे. एवढेच नव्हे तर त्यास राष्ट्रीय खेळाचा दर्जा प्राप्त होत आहे. त्याला सरकारी प्रोत्साहन मिळत आहे. मंत्रीदेखील माकडासारखे क्रिकेट खेळत असतात. आपल्या अर्ध्या बापाची, ब्रिटिश राज्यकर्त्यांची ही नक्कल आहे.

स्वतंत्र भारताच्या नोकरशाहीत ब्रिटिश नोकरशाहीतील अनेक बडे अधिकारी उच्चपदावर विराजमान झाले. ब्रिटिशांचे अमेरिकेतील राजदूत सर गिरिजाशंकर बाजपेयी स्वतंत्र भारताच्या विदेश सचीवपदावर आरूढ झाले. या सद्‌गृहस्थांनीच कस्तुरबा गांधी तुरुंगात मृत्यू पावल्या तेव्हा अमेरिकेत त्याचे त्या वेळी समर्थन केले होते. हे बाजपेयी व भारताचे पहिले पंतप्रधान यांच्यात काही तरी आत्मिक मेळ असला पाहिजे. ज्या चंदूलाल त्रिवेदींनी सशस्त्र भारतीय क्रांतिकारकांचे दमन करण्याचे कामी ब्रिटिश सत्तेला सहाय्य केले ते स्वतंत्र भारतात एक बडे नोकरशहा बनले व पुढे त्यांना राज्यपाल-पदावरही विराजमान करण्यात आले. असे म्हणतात की, ज्या गृहस्थांनी ४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनाशी बेइमानी केली होती अशा एका गृहस्थांना स्वतंत्र भारताचे

पहिले राष्ट्रपतिपद बहाल करण्याचा पहिल्या पंतप्रधानांनी घाट घातला होता. इंग्रजांच्या जमान्यात नोकरशाही हे जनतेवर दडपशाही करण्याचे आणि आपल्यातील बड्या अधिकाऱ्यांचा बडेजाव माजविण्याचे हत्यार होते; कोणत्याही क्रांतिकारक परिवर्तनाच्या मार्गात अडथळे आणण्याचे साधन होते. ही नोकरशाही स्वतंत्र भारतात आहे तशीच कायम आहे. उलट अधिकच खराब झाली आहे. नोकरशाहीत काही अधिकारी जरूर तेजस्वी, इमानदार, सच्चे व देशहितैषी आहेत. पण त्यांच्या भावना व कर्तृत्व आज दडपले जात आहे. आणि जे अधिकारी भ्रष्ट, लाचार, क्रूर आहेत आणि देशाला दुर्बल व सरकारला जनताविन्मुख बनवितात त्यांना बढत्या मिळत आहेत; त्यांचा गौरव होत आहे.

आता ही यादी थांबवितो. भारतीय स्वातंत्र्याच्या दुधात किती व कोणत्या माशा पडल्या म्हणून सांगणार? आपल्या राष्ट्रपित्याचे अर्धे पितृपद हिसकावून घेऊन ते आपल्या अगोदरच्या बापाला-ब्रिटिशांना या राज्यकर्त्यांनी कसे दिले आणि त्यांना आपला अर्धा कसे बाप केले याची तरी किती उदाहरणे देत बसणार?

हे सर्व का झाले? कसे झाले? भारताचे सर्वप्रथम महामंत्री या सर्व गोष्टींना निःसंशय कारणीभूत होते. त्यांनी असे का केले याचे समाधानकारक उत्तर भावी काळातील इतिहाससंशोधकच देऊ शकतील. आपल्या पूर्वजांच्या सरकारी नोकरीच्या परंपरेच्या प्रभावापासून ते मुक्त होऊ शकले नाहीत हे एक कारण असू शकेल. कदाचित् असेही असेल की क्रांतिकारकाचा झब्बा घातलेला हा माणूस अंतर्यामी रूढिप्रिय असेल. असेही असेल की हा गृहस्थ परकीय होता. अर्थात् वरिष्ठ जातीतील बहुतेक सर्व बडे लोक जसे परकीय असतात तेवढ्याच मर्यादित अर्थाने. हे लोक जनतेपासून दूर व परकीयांच्या जवळ असतात; वाचिवीर पण प्रत्यक्ष कृतीच्या बाबतीत भेकड आणि प्रत्येक गोष्टीत समन्वयासाठी तयार.

ही कारणे खरी असतील किंवा खोटीही असतील; पण ती पूर्ण मात्र निश्चितच नाहीत. कारण हे सर्व अखेर झाले तरी कसे? का? केवळ एक माणूस हे जहर साऱ्या देशाला कसे पाजू शकेल किंवा स्वतः पिईल? देशाच्या बहुसंख्य नेत्यांची ते जहर पिण्याची व पाजण्याची तयारी होती आणि जनता कमालीची उदासीन होती म्हणूनच हे सर्व झाले असेही म्हणता येईल.

देशाच्या कित्येक शतकांच्या गतेतिहासाने जनतेला उदासीन आणि नेत्यांना समन्वयी बनविले. देशात स्वाभिमानाची अथवा देशभक्तीची किंवा समतेची

क्वचित कधी लाट पसरते तेव्हा देखील नेत्यांची ही समन्वयवृत्ती त्यांना सोडून जात नाही असा अनुभव आपण अलीकडे घेतलाच आहे. आज देशात जिवंतपणी फक्त मानसिंहालाच मान मिळतो; आणि प्रतापसिंहाला तो मेल्यावर खूप दिवसांनी लोक मानू लागतात. तेथे 'लोक' या शब्दाचा अर्थ जनमत बनविणारे लोक अथवा सर्वसाधारण उदासीन जनता असा आहे. माणसाने व्यवहारही सांभाळला पाहिजे असे हे लोक नित्य सांगत असतात. यांच्या व्यवहारवादाचा अर्थ सर्वांना खूष ठेवणे, सर्वांना बरोबर घेऊन जाणे. पण या भ्रामक व्यवहारवादानेच देश दरिद्री राहिला आहे; येथे अज्ञान व गुलामीवृत्ती कायम राहिली आहे. हिंदू समाज कधी काही टाकीत नाही; घेतच राहतो. म्हणूनच तो निर्बुद्ध बनला आहे. त्याची विवेकशक्ती काम करीनाशी झाली आहे. बुद्धीचा अर्थ संगती, संबंध, तारतम्य. व्यवहारवादाच्या नावाखाली ज्या गोष्टींचा मेळ कधी होऊ शकणार नाही अथवा होता कामा नये अशा गोष्टींना एकत्र नांदविले म्हणजे बुद्धीत दलदल माजते. आणि या दलदलीतच गुलामीवृत्ती व दारिद्र्य जन्म घेत असतात.

देशाच्या इतिहासात कदाचित् नेहमीच अशी स्थिती नसावी. समन्वयवादाचे किंवा व्यवहारवादाचे आज दिसणारे हिडीस स्वरूप प्रथम मध्यकालीन भारतात प्रत्ययास आले. स्वीकारणीय चांगले व टाकाऊ वाईट किंवा सज्जन व दुर्जन यांत फरक करायला शिकले पाहिजे. प्राचीन भारतात असा फरक केलेला आढळतो. या दोहोतील रेषा पुसून टाकून त्यांचा समन्वय करू पाहणारे राजनेते विकृत आहेत असे समजावे. अर्थात् चांगले–वाईट, सज्जन–दुर्जन यांच्यातील सीमारेषा ठरविताना माणसाने आपली बुद्धी जास्तीत जास्त निर्मळ व उदार आणि विवेकशक्ती अधिकाधिक व्यापक ठेवली पाहिजे. आजच्या राजनेत्यांनी आपल्या बुद्धीमधील चांगल्या-वाईटातील सीमारेषा पार पुसून टाकली आहे. त्यामुळे ते पोलीस व भगतसिंह यांचे मोठेपण एकाच पट्टीने मोजीत असतात. आणि गिरिजाशंकर बाजपेयी व पुरुषोत्तमदास टंडन यांना समानरित्या चांगले समजतात; कदाचित बाजपेयींनाच अधिक चांगले समजत असतील. हे असे समजणारे लोक अपराधी आहेत. अर्थात्, मनुष्य आपली चूक कधीच सुधारत नाही किंवा त्याच्यात बदल होत नाही असे समजणारे अथवा बरोबर व चूक यांच्या व्याख्येत कधीच कालानुरूप फरक करावयास तयार नसणारे लोकही अपराधी होत. परंतु चांगल्या-वाईटातील फरक न केल्यामुळें जे लोक गरिबीला व गुलामीवृत्तीला निमंत्रण देतात त्या पहिल्या प्रकारच्या लोकांपेक्षा ही दुसऱ्या वर्गातली मंडळी कमी दोषी आहेत.

भारताच्या राष्ट्रपतिपदासाठी किंवा उपराष्ट्रपतिपदाकरिता अमुक एक माणसाचीच निवड का करण्यात आली असे विचारले की कारण सांगितले जाते की, भारतात उत्तर–दक्षिण व हिंदु-मुसलमान हा वाद आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन ही निवड केली. यावर असाही प्रश्न विचारता येईल की ही निवड करताना दक्षिणेतील मानसिंहच कसा नेमका तुम्हांला दिसला? कोणी दक्षिणी प्रतापसिंह नाही का मिळाला? आणखी असाही प्रश्न विचारता येईल, की घटनेशी एकनिष्ठ राहण्याच्या घेतलेल्या प्रतिज्ञेची इज्जत राखील असा माणूस राष्ट्रपति किंवा उपराष्ट्रपतिपदासाठी दक्षिण, पूर्व किंवा पश्चिम भारतात तुम्हांला मिळाला नाही काय? हिंदी ही राष्ट्रभाषा आहे असे ज्या घटनेत नमूद केले आहे तिच्याशी एकनिष्ठ राहण्याची सतत वीस वर्षे शपथ घेऊनही त्या भाषेत कधीही न बोलणारा आणि सतत इंग्रजीत बोलून राष्ट्रभाषेची बेइज्जत करणारा, हिंदी शिकण्याचा कधीही प्रयत्न न करणारा असा घटनाभंगी माणूस नेमका तुम्ही कसा काय राष्ट्रपतिपदासाठी निवडला?

खरे म्हणजे आजचे राज्यकर्ते ढोंगी, पाखंडी, दिशाहीन व नीतिहीन आहेत त्यामुळेच असे घडले. पण श्रेष्ठपदासाठी कोणता माणूस निवडावा या संबंधीच्या व इंग्रजी भाषेविषयीच्या जनतेच्या काही समजुतीही या गोष्टीला सहाय्यभूत ठरल्या आहेत. एखादा माणूस प्रख्यात असला, चांगले इंग्रजी बोलत असला, विद्वान् म्हणून त्याची प्रसिद्धी असली, अथवा दिसायला सुरेख व बोलण्या–चालण्यात आधुनिक असला की एवढ्या मामुली गोष्टींनीही त्या इसमाला हिंदी माणसाच्या मनात एकदम वरचे स्थान मिळते. आणि हा इसम आपली मानसिंहवृत्ती लपविण्याच्या कलेत निपुण असला की मग त्याला भारतात वरिष्ठ पद पटकावायला मुळीच वेळ लागत नाही. माणूस कसा बोलतो, कसा वागतो यापेक्षा तो काय आहे हे भारतीय माणूस समजून घेत नाही; म्हणजे शैलीपेक्षा सत्याला महत्त्व देत नाही तोवर हे असेच होणार. शैली व सत्य ही दोन्ही एकाच माणसात एकत्र सापडली तर फारच उत्तम. पण यांपैकी कोणती तरी एकच गोष्ट मिळत असेल तर शैलीपेक्षा सत्य कितीतरी पटींनी श्रेष्ठ होय. साऱ्या दुनियेतील नोकरशाहीचा मुख्य गुण शैली हाच आहे. इतर देशांत शैलीबरोबरच अन्य गुणांनाही महत्त्व दिले जाते. भारतात मात्र प्रामुख्याने फक्त शैलीलाच महत्त्व आहे.

भारतातील लोकनियुक्त मंत्री नोकरशाहीचे इतके का गुलाम बनले आहेत याचे रहस्य अद्याप उलगडलेले नाही. कधी असे ऐकू येते की, मंत्रिमंडळाचे

सचिव किंवा विभागीय सचिव अथवा कलेक्टर मंत्र्यांचे गुलाम बनले आहेत. तर कधी उलट असेही सांगितले जाते की, मंत्री या लोकांच्या आहारी गेले आहेत. मंत्री हे ' शासना'चे प्रतीक असतात; आणि सचिव, कलेक्टर आदी 'प्रशासना'चे प्रतीक असतात. शासन व प्रशासन यांच्यातील संबंध विकृत बनल्यामुळे आज कोण कोणाचे गुलाम बनले आहेत हे समजणे कठीण झाले आहे. शासनाचे काम धोरणे ठरविणे व ती चालविणे हे असते, तर प्रशासनाचे काम त्या धोरणांची अंमलबजावणी करणे हे असते. पण गेल्या वीस वर्षांत जवळ जवळ या कामात उलटापालट झाली आहे.

मंत्रीलोक नोकरशाहीकडून आपल्या कुटुंबियांची, जातवाल्यांची व दोस्तांची कामे करून घेत असतात. प्रशासनाविषयक नियमांच्या व निःपक्षपातीपणाच्या विरोधी असे हे कृत्य आहे. नियमाप्रमाणे कारभार चालावा, गडबड घोटाळे व पक्षपात होऊ नये, कायद्याचा वाटेल तसा अर्थ लावला जाऊ नये आणि राज्यात सावळागोंधळ माजू नये यासाठीच तर प्रशासनाची निर्मिती केलेली आहे. पण स्वतः मंत्री प्रशासकांच्या हस्तेच राज्याचा पाया असलेल्या प्रशासनाचा विध्वंस करू लागले की मग केवळ प्रशासकांचीच अधोगती होते असे नाही, तर मंत्र्यांचीही अधोगती होऊ लागते. मंत्रीलोक धोरणे ठरविण्याचे आपले काम प्रशासकावर सोपवितात. त्यामुळे एखादे मोठे परिवर्तन करणारे धोरण स्वीकारण्यास सांगण्याची किंवा त्यांचा आग्रह धरण्याची हिम्मत मंत्र्यांमध्ये असत नाही. प्रशासक चालू रूढ मार्गाने जाणारे लोक असतात. त्यांना कोणताही बदल आवडत नाही. मंत्री स्वतःच आपल्या बेइमानीच्या खाजगी कामासाठी प्रशासकांचे मिंधे बनलेले असतात. त्यामुळे त्यांची किंमत राहत नाही. म्हणूनच रुळलेला रस्ता सोडावयास लावून कोणतेही मोठे परिवर्तनाचे कार्य प्रशासकांना मंत्री करावयास लावू शकत नाहीत. आणि म्हणूनच मंत्री हे ज्या बाबतीत प्रशासकांचे खरे पाहता गुलाम असावयास हवेत अशा कामात ते बादशहा बनले आहेत आणि ज्या कामी वास्तविक प्रशासक मंत्र्यांचे गुलाम असले पाहिजेत त्या क्षेत्रात प्रशासक बादशहा आहेत. धोरणे ठरविण्याच्या क्षेत्रात प्रशासक म्हणजेच सचिव मंत्र्यांच्या म्हणजेच शासकाच्या अधीन असला पाहिजे. धोरणाच्या अंमलबजावणी-तील तपशिलाबाबत प्रशासकाला किंवा सचिवाला स्वातंत्र्य असावयास हरकत नाही. परंतु अलीकडे परिस्थिती फार बिघडली आहे. मंत्र्यांना काबूत ठेवण्याची नोकरशाहीला चटक लागली आहे. जोपर्यंत क्रांती होत नाही आणि संपत्ति-

विन्मुख व निर्मोही मंत्री सत्तेवर येत नाहीत तोवर नोकरशाहीची ही चटक नाहीशी होणे शक्य नाही.

हा गंभीर दोष त्याच्या मुळाशी असलेल्या दुसऱ्या एका मोठ्या दोषामुळे उद्‌भवला आहे. जगातील क्रांतिकारकांनी मार्क्सवादाचा कमीजास्त प्रमाणात एक आवश्यक विचारधारा म्हणून स्वीकार केला. ही विचारधारा अपुरी आहे; त्यापुढे आता गेले पाहिजे. तथापि ही सदोष विचारप्रणाली विशेषतः गौरेतर जगाच्या बुद्धीवर आज स्वार झालेली दिसते. मार्क्सवादातील क्रांतिकारकतेचा नव्हे तर षंढपणाचा तेवढा या लोकांनी स्वीकार केला आहे. मार्क्सवादी विचार-सरणीची दोन मुख्य अंगे आहेत. एक : अर्थव्यवस्था बदला म्हणजे सारे काही बदलेल. भाषा, जातिप्रथा, नैतिकता आदिसंबंधीचे सारे प्रश्न सुटतील. दुसरे : अर्थव्यवस्था बदलण्यासाठी वैयक्तिक मालकीच्या उत्पादक साधनांचा, संपत्तीचा नाश करणे जरूर आहे. तसेच त्याकरिता यंत्रविज्ञान व औद्योगीकरण करणे आवश्यक आहे. क्रांतिकारी मार्क्सवाद व्यक्तिगत उत्पादक संपत्तिसाधनांच्या विनाशाला महत्त्व देतो. हे क्रांतिकारक कार्य करीत असतानाच तो भाषा आदि प्रश्नही क्रांतिकारक पद्धतीने सोडवितो. षंढ मार्क्सवाद अशी समजूत करून घेऊन बसतो, की विज्ञानीकरण व औद्योगीकरण केले की आर्थिक व्यवस्था बदलेल आणि आपोआप बाकी सारे प्रश्न सुटतील. स्वातंत्र्योत्तर भारताने धड गांधीवादाला आपले गुरू केले नाही की धड क्रांतिकारी मार्क्सवाद स्वीकारला नाही; फक्त षंढ मार्क्सवाद त्याने पत्करला. स्वातंत्र्यातील सरकारने देशाचे अनेक मार्गांनी अद्‌भुत रीतीनें नुकसान केले आहे. सर्व काही आपोआप होईल ! काळजीचे कारण नाही ! जरा पंचवार्षिक योजना पुऱ्या होऊ देत; औद्योगी-करण व विज्ञानीकरण होऊ दे; मग सर्व काही आपोआप घडेल. पण काहीही झाले नाही. एवढेच काय औद्योगिक व वैज्ञानिक प्रगतीही झाली नाही. विज्ञान व उद्योगधंद्यातील प्रगती काही आभाळातून टपकत नाही. एका विशिष्ट राजकीय, सामाजिक व बौद्धिक अवस्थेतूनच या क्षेत्रातील विकास जन्म घेतो. भाषा, जातिप्रथा, संपत्ति यासंबंधीचे प्रश्न टाळून काय कपाळ औद्योगीकरण होणार आहे !

नोकरशहा व मंत्री यांच्यातील वास्तविक संबंधात आज जी उलटापालट झालेली दिसते तिचे एक कारण हा षंढ मार्क्सवाद हे आहे. या षंढ मार्क्स-वादाचा आधार आहे गुलामीवृत्तीचे समन्वय तत्त्वज्ञान; काहीही सोडायचे नाही, सर्व काही पचवायचे. आजच्या भारतीय विचारसरणीचे हे तत्त्वज्ञान एक अंगच

बनून गेले आहे. या गुलामीवृत्तीच्या समन्वय तत्त्वज्ञानाचे आणखी एक मूळ आहे. आसक्ती. कदाचित् ती त्याची शाखाही असेल. शाखा असो की मूळ असो, ही आसक्ती येथें अस्तित्वात आहे हे खरे. अनासक्तियोगाचा बडेजाव असलेल्या या देशात धन व जीवन यांच्या बाबतीत जेवढी आसक्ती आहे तेवढी जगात कोठेही नाही. चारी बाजूंना दारिद्र्याचा व दुर्गंधीचा समुद्र पसरलेला असला तरी त्यामध्येही आपला एक छोटासा, चांगला बंगला असावा, पैसा मिळावा, तरच आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे भारतीय माणूस मानतो. भारतातील नवयुवक जोवर तिरस्कारापूर्वक या आसक्तीपासून दूर राहावयास शिकणार नाही आणि राजकीय नेत्यांपैकी देशाच्या संपत्तीचे वाटप करणाऱ्यांना धुडकावून देणार नाही, आणि गीतेतील अनासक्तीयोगातील शाब्दिक अर्थाखालील सत्य प्रत्यक्ष स्वीकारणार नाही तोवर भारताचे कल्याण होणे असंभव आहे.

● ● ●

मराठी
अनुक्रम ...................... वि: ......................
...................... नों: दि: ......................

# भारतीय इतिहास लेखन

गणित हा जसा शास्त्रांचा आधार तसा इतिहास हा मानवी हालचालींचा आधार होय. मानवी मनाला आकार देणारें अवजार व मसाला इतिहास आपणांस देत असतो. मी कोण आहे, आपण कोण आहोत ? इतिहासांत देखील या प्रश्नांचे अध्ययन केलेले असते आणि त्याचाच खोल असा परिणाम मानवी समाजावर झालेला दिसतो. साऱ्या जगातील कोणत्याही देशाच्या बहुतांश इतिहासातच त्या देशाचे राष्ट्रीय मन दृग्गोचर होत असते.

मर्यादित अर्थाने इतिहासलेखन ही वर्तमान व भविष्यकालीन इतिहासाची एक प्रकारे जननीही असते. इतिहास गतकालाला पुनर्जीवित करीत असतो. इतिहासलेखन हा एका अर्थाने कालप्रवाहाला उलट दिशा देण्याचा प्रयत्नही कधी कधी ठरतो. अर्थातच सर्वत्र व सर्वच कालखंडातील इतिहासाची दिशा बदलण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता नसते. एखाद्या देशाच्या इतिहासातील ज्या कालखंडाचे पुनरुज्जीवन करणे जरूर असेल तेवढ्याच कालखंडाला उलट दिशा दिली म्हणजे झाले. कालाचा संपूर्ण प्रवाह उलटविणे अशक्य आहे. तसा प्रयत्न करणेही व्यर्थ आहे. म्हणून एखाद्या कालखंडाचा इतिहास पुन्हा लिहिताना विवेक करावा लागतो. कारण एखाद्याच घटनेचे संपूर्ण वर्णन करावयाचे म्हटले

तरी त्यासाठी देखील अनेक वस्तुस्थितिजन्य तथ्यांतून कांहींची निवड करावी लागते. आणखी एक अडचण येते. कितीतरी गोष्टींची माहिती कायमची लुप्त झालेली असते तर काहींची माहिती मोठ्या मुष्किलीने उपलब्ध होते.

इतिहास म्हणजे काही केवळ सर्वच घटनांचे विवरण अथवा वर्णन नव्हे. इतिहासासाठी घटनांची फारच काळजीपूर्वक निवड करावी लागते. अशी काळजी न घेतल्यामुळे बहुतांश इतिहासात दोष व निर्बुद्धपणा भरपूर प्रमाणात आढळतो. ज्याने मनुष्याचे मन अधिक उन्नत होईल, सुसंस्कृत होईल आणि सत्याचा अंशतः तरी शोध लागेल असा भाग इतिहासात फारच थोडा असतो. चांगल्या रीतीने लिहिलेल्या इतिहासाइतकाच, किंबहुना जरा अधिकच, वाईट रीतीने लिहिलेल्या इतिहासाचा भविष्यकाळावर प्रभाव पडत असतो. इतिहास म्हणजे भूतकालाचे चांगले किंवा वाईट रितीने केलेले पुनरुज्जीवन होय. म्हणूनच तो एका मर्यादेपर्यंत व्यक्तीचे आणि राष्ट्राचे चैतन्यस्वरूप ठरवीत असतो.

इतिहास म्हणजे भूतकालाचे ज्ञान. भूतकाळ योग्य रीतीने जाणला व तो नव्या पिढीला शिकविला गेला तरच भारताचे नवनिर्माण करता येईल. परंतु इतिहास-लेखनाच्या क्षेत्रात भारत कमालीचा अभागी आहे. आमच्या विश्वविद्यालयांत इतिहास व गणित ही दोन्ही शास्त्रे मृतावस्थेत पडलेली आहेत.

प्राचीन भारतात इतिहासलेखन असे फारसे झालेलेच नाही. जे काही झाले ते महाभारत, रामायण आदि काव्ये व तत्त्वज्ञानाच्या स्वरूपातील लेखन. भारताचा इतिहास प्रामुख्याने परकीय लोकांनीच लिहिला आहे. अफगाण, मोगल, इंग्रज आदि आक्रमकांमागोमाग किंवा त्यांच्या बरोबर आलेल्या लोकांनी व लेखकांनी आणि अनेक अरब विद्वान व युरोपीय धर्मप्रचारक यांनी विविध माध्यमांतून भारताविषयी केलेले लेखन हीच भारतीय इतिहासलेखनाची प्रमुख साधने होत. आणि काही अंशी ती केवळ साधनेच नव्हे तर खुद्द इतिहासही आहे. पण त्याचा विचार तूर्त बाजूला ठेवू.

सामान्य भारतीयाला लिखित इतिहास म्हणून जो परिचित आहे आणि आज विद्वान मंडळी ज्याचे अध्ययन करतात त्याचाच विचार या ठिकाणी प्रस्तुत आहे. गेल्या हजार वर्षांच्या भारतीय इतिहासलेखनाचे कार्य प्रामुख्याने विचित्र दृष्टीच्या काही परकीय इतिहासकारांनी केलेले आहे. फरिश्ता ते व्हिन्सेंट स्मिथपर्यंत अपरिपक्व विदेशी इतिहासकारांची एक लांबलचक वंशावळ आहे. एक विशिष्ट उद्दिष्ट नजरेसमोर ठेवूनच त्यांनी इतिहास लिहिला व तो लिहितांना त्यांनी मुद्दामच काही विशिष्ट घटनांचीच निवड केली. भारतातील

परकी सत्ता बळकट करणे हेच ते उद्दिष्ट होय. कारण स्वतः हे इतिहासकार या परकी सत्तांचेच भाईबंद होते. ते विद्वान होते एवढेच. पण मेगॅस्थेनिस व फाह्यान या परकी इतिहासकारांनी मात्र इतिहास लिहिताना ज्या घटनांची निवड केली आहे त्या वेगळ्या प्रकारच्या होत्या. कारण हे इतिहासकार परकी विजेत्यांपैकी नव्हते. तरी देखील मेगॅस्थेनिस ते फरिश्ता आणि त्यांच्यानंतरच्या परंपरेचा शोध घेणे मनोवेधक ठरेल. परंतु प्रारंभी फरिश्ता ते व्हिन्सेन्ट स्मिथ यांच्यापर्यंतच्या इतिहासकारांचे सखोल व विस्तृत अध्ययन करणे अनिवार्यपणे जरूर आहे. ते केल्याशिवाय थोडेफार सत्य असे इतिहासलेखनही संभवत नाही.

भारताचा इतिहास लिहिणाऱ्या परकी विद्वानांना व लेखकांना घटनांच्या मुळात जाऊन शोध घेण्यात रुचि नव्हती. देशभक्त इतिहासलेखकांची दृष्टी व व्यथा त्यांच्यापाशी कशी असणार? त्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोण व्यापक मानवतावादीही नव्हता. तो तसा असता तर भारताची अप्रतिष्ठा व दुःख यांबद्दल त्यांना सहानुभूती वाटली असती व ती त्यांच्या इतिहासलेखनात व्यक्त झाली असती. या लेखकांनी, स्वतःच्या देशातील लोकांनीं भारतात केलेल्या प्रत्येक कृतीचे औचित्य सिद्ध करण्याचाच खटाटोप केला आहे. किंवा नवल-कथांनी व निरर्थक घटनांनी गच्च भरलेला तरी इतिहास लिहिला आहे. या परकीय इतिहासलेखकांपैकी कांहीजणांत मानवसुलभ सहानुभूति असलीच तर ती एक तर सदोष किंवा आवश्यकतेपेक्षा काहीशी जादा होती.

या इतिहासकारांनी शरणागती या दुर्गुणाला समन्वय असे गोंडस नाव दिले आणि त्याला गुण बनवून टाकले. त्यांनी गेल्या हजार वर्षांचा इतिहास व त्यापूर्वीच्या काही घटना ज्या स्वरूपात सांगितल्या त्यामुळे हिंदुस्थानी माणसाला आज बदनामी व गौरव यांतील फरकच मुळी समजेनासा झाला आहे. आम्हा लोकांची बुद्धी अशीच काहीशी चालते. आम्ही म्हणतो, "आपण लढाया हरलो तशाच जिंकलो देखील. खरे म्हणजे कदाचित जगातील कोणत्याहि अन्य वंशा-पेक्षा आपण जास्त लढायांत विजय मिळविला आहे. आपण परकीयांना जिंकले आणि त्यांना येथलेच बनवून टाकले; आपल्यात सामावून घेतले. परकीयांनी आमच्यावर मिळविलेला विजय प्रासंगिक व भौतिक होता तर आमचा विजय चिरंतन व आध्यात्मिक होता. आम्ही विजेत्यांचा आत्माच जिंकला. या प्रक्रि-येत आपण त्यांचे काही गुण व कौशल्य आत्मसात् केले. अशा रितीने भारतात गुण व योग्यता त्याची निरंतर व्यापक देवघेव होत आली आहे. यामुळेच

आपला देश हा जगातील एक महान् व अद्भुत रंगमंच बनला. येथे मानव-जातीमधील समन्वयाचा आणि आत्मसात करण्याचा सर्वोत्तम गुण प्रकट झाला आहे." एतद्देशीय इतिहासकार ही बढाई मोठ्या चवीने घोळून घोळून सांगत असतात. पण मतलबी विदेशी इतिहासकारांचे उष्टे खाणारे हे हिंदी इतिहासकार एका प्रश्नाचे उत्तर देतील काय ? विजेत्यांना आपल्यात सामावून घेण्याची भारतातील ही प्रक्रिया कधी थांबणार आहे की नाही ?

अशा भूमिकेतून लिहिलेल्या इतिहासाने भारतीयांना भेकड, संकल्पशून्य, सामर्थ्यविहीन, सुस्त व अधम बनविले असल्यास नवल नाही. आपल्या सीमांच्या बाबतीत भारतीयांमध्ये दिसून येणारी उदासीनता आणि भारतीय इतिहास ज्या पद्धतीने सांगितला जातो त्याचा अन्योन्य घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळेच आमचे नेते म्हणत असतात की, "सीमेवरील भूभागापैकी बहुतेक भाग निरुप-योगी, खडकाळ व नापीक तर आहे. काही हजार मैल ओसाड जमीन देऊन शांती प्राप्त करता येत असेल तर त्यात काय वाईट ? अखेरशेवटी दुनिया एकच आहे ना ? परस्पर समन्वय व देवघेव करून शांततेने राहता येईल अशा रीतीनेच आपण वागले पाहिजे की नाही ?"

समर्पणवृत्तीलाच समन्वयवृत्ती समजण्याच्या या भ्रामक कल्पनेमुळे शौर्य या शब्दाच्या अर्थाविषयीही भारतात गैरसमज दिसून येतो. पृथ्वीराज चौहान मोठ्या शौर्याने लढला असे इतिहासात सांगितले जाते. त्याच्या आधीचा अनंगपाळही असामान्य शौर्याने लढला असे म्हटले जाते. तो अभागी हत्ती आडवा आला नसता तर अनंगपाळ त्या लढाईत विजयी देखील झाला असता असे सांगितले जाते. राणा संग देखील सिंहासारखा लढला आणि मेला व त्यात त्याला शंभर जखमा झाल्या असेही म्हटले जाते. हे सर्व वीरपुरुष मोठ्या पराक्रमाने लढले हे खरे. पण त्यांनी एवढा पराक्रम गाजवूनही देशाचे स्वातंत्र्य गमाविले ही वस्तुस्थिती देखील विसरता येत नाही. अशा प्रकारे लिहिलेल्या इतिहासात कोठे तरी काहीतरी अवश्य चूक आहे. मध्ययुगात मुसलमान विजे-त्यांनी मंदिरे उद्ध्वस्त केली असे इतिहासात सांगितले जाते. ही एक बाजू झाली पण त्याबरोबरच हेही सांगितले पाहिजे की आमचे पूर्वज आक्रमकाचा हल्ला परतविण्याच्या बाबतीत नालायक ठरले. तरच तो खरा इतिहास होईल. इतिहासाकडे केवळ क्रोधाने पाहणे योग्य नाही; स्वतःबद्दलची आत्मचिंतनपर दयाबुद्धीही त्यात हवी.

आमचे काही वीरपुरुष शौर्याने लढले ही इतिहासाची एक बाजू असली तरी ती सर्वात महत्त्वाची बाजू नाही. त्याहूनही महत्त्वाची बाब अशी की, हे लोक

लढाया हरले; इतके हरले की त्यांच्यामागून आलेल्यांना त्या पराभवाचे विजयात रूपांतर करणे केवळ अशक्य झाले. शौर्याने पण मूर्खासारखे हे वीर पुरुष लढले. लढाईपूर्वी त्यांनी शक्ती प्रेरित व संघटित करण्याचे काम केले नाही; तसेच पराभव झाल्यानंतर भावी विजयासाठी नवे आधार निर्माण केले नाहीत; ज्यायोगे पराभवाचा सूड घेऊन स्वातंत्र्य पुन्हा प्राप्त करता येईल असे आधार निर्माण केले नाहीत. इब्राहिम लोदी व शेरशहा सूरी हे देखील शौर्याने लढले. पण राणा संगाप्रमाणे हे दोघे स्वदेशी मुसलमान देखील हिंदुस्थानच्या सामूहिक पतनाचीच अपत्ये होती. त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक मोठेपणाचे मोलही काहीसे शंकास्पदच ठरते.

लहान मुले अडखळत अडखळत काही पावले चालतात आणि पुन्हा पडतात. त्यांच्या या धडपडण्याचे त्यांच्या आई-बापांना व वडीलधाऱ्या माणसांना कौतुक वाटते. भारताच्या गेल्या एक हजार वर्षांच्या इतिहासाविषयी काहीसे असेच कौतुक आपणांत दिसून येते. विविध परकी व अपरिपक्व इतिहासकारांनीही याच दृष्टिकोणातून भारताचा इतिहास लिहिला आहे. आणखीही एक दोष दिसतो. मोगल इतिहासकारांनी आपले तत्कालीन शत्रू जे अफगाण त्यांची नालस्ती केली आहे, तर इंग्रज इतिहासकारांनी रजपूत व अफगाण यांचे मोठेपण गाऊन आपल्या तत्कालीन शत्रूंची – मोगलांची – निंदा केली आहे. परिणामी सत्याचा खून झाला आहे. इंग्रजांनी केलेल्या एवढ्याशा स्तुतीने आम्ही खूष झालो; लहान मुले होतात तसे. मुलांना आपले ऐकायला लावण्यासाठी ही युक्ती उपयोगी पडते.

भारतांत विभिन्नतेत एकता आहे हा इतिहासलेखकांचा आणखी एक आवडता सिद्धांत होय. अगदी प्रथम हा सिद्धांत व्हिन्सेंट स्मिथने सांगितला की आणखी कोणी हे निश्चितपणे सांगता येत नाही. कदाचित् एखाद्या मोगल अगर अफगाण इतिहासकाराने देखील सर्वात प्रथम हा सिद्धांत मांडला असण्याची शक्यता आहे. या असत्य सिद्धांतामागील विचारप्रणालीचा परिणाम भारताला आज भोगावा लागत आहे. भारताचे राष्ट्रपती केवळ राष्ट्रीय झेंड्यावर संतुष्ट नाहीत. त्यांना राष्ट्रपतिभवनावर स्वतःचा वेगळा झेंडा फडकवीत ठेवावासा वाटतो. अमेरिका, रशिया यांच्या अध्यक्षांना आपल्या देशाचे राष्ट्रीय निशाण पुरेसे वाटते. व्यापक चैतन्यात व्यक्तीने विलीन झाले पाहिजे असे सांगणाऱ्या आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या लंब्याचवड्या गप्पा मारणाऱ्या आमच्या तत्त्वज्ञानी राष्ट्रपतींना आपला ध्वज वेगळा असावा असे का वाटावे? तथाकथित

समन्वय सिद्धांताचाच तर हा परिणाम नव्हे ? पण त्यांच्या लक्षात यायला पाहिजे की, आपल्या आधीच्या सत्ताधीश ब्रिटिश बादशहाला होती तीच लालसा ते आपल्या या कृत्यातून व्यक्त करीत आहेत. राष्ट्रपतींपासून त्यांच्या भवनातील शिपायांपर्यंत सारी मुले एकाच दर्जाच्या शाळांत शिक्षण घेऊ लागतील, एकाच प्रकारचा गणवेष घालू लागतील अशा प्रकारचे काही घडेल तेव्हाच विविधतेतील एकता प्रयत्यास येईल. देशांतील साऱ्या भाषांची लिपी एकच झाली तर मग अशी एकता अधिकच अनुभवास येईल.

इतिहासात होऊन गेलेल्या चार महान् व्यक्तींच्या नावांचा जप करून आपल्या देशाचा पराभव व आपले दोष लपविता येणार नाहीत. दारिद्र्यग्रस्त, रोगी व अज्ञानाच्या खाईत रुतलेल्या देशांतही पुष्कळ मोठी माणसे असतात. सर्वोच्च–स्थानी किंवा त्याच्या आसपास असलेल्या कोणाही व्यक्तीला, मग ती कितीही अडाणी असली तरी मोठेपण व महत्त्व प्राप्त होते. आपल्या अंगच्या कारागिरी-मुळे एखादा सुतार किंवा शिंपी जसा आपल्या क्षेत्रात मोठेपणा मिळवू शकतो तसे काळानुरूप कौशल्य व हुषारी असलेला चतुर माणूसही इतिहासात उच्च पदी जाऊन पोचू शकतो. परंतु अशा व्यक्तींच्या कथित महत्तेखाली देशाचे दारिद्र्य, दुर्गुण व अज्ञान लपविणे योग्य नाही.

तसेच इतिहासातील काही तुरळक व विशिष्ट घटनांवर भर देऊन एखाद्या देशाच्या इतिहासासंबंधी ढोबळ निष्कर्ष काढणेहि अन्यायाचे होईल. इंग्रजी-राज्याच्या स्थापनेपूर्वी भारतात लुटारू व पेंढारी होते, सती-प्रथा होती हे मान्य आहे. परंतु हिंदुस्थानच्या संपूर्ण जीवनेतिहासात असल्या गोष्टींना महत्त्व देताना इतिहासकारांनी प्रामाणिकपणा दाखविला पाहिजे. कोणत्याही एका वर्षांत किंवा दहा वर्षांच्या कालखंडात देशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात लुटालुटीचे व सतीचे किती प्रकार घडले याची आकडेवारी इतिहासकारांनी सांगितली तर मग या घटनांना महत्त्व किती द्यावे हे ठरविता येईल. उद्या समजा, अमेरिकेवर कोणा परकीयांची सत्ता स्थापन झाली तर न्यूयॉर्क व शिकागो येथील लुच्चे लोक व खून यांचा परकीय इतिहासकार अमेरिकेच्या इतिहासातील महत्त्वाच्या प्रवृत्ती व घटना म्हणून उल्लेख केल्याशिवाय राहणार नाहीत. आणि कालांतराने खुद्द अमेरिकन लोकही ते खरे आहे असे मानू लागतील. इटलीच्या इंग्लंडमधील एखाद्या राजदूताने पंधराव्या शतकातील लंडनचे वर्णन करावे आणि त्याला आपण इंग्लंडचा इतिहास समजावे तसे भारताच्या इतिहासाबाबत आजवर घडत आले आहे.

भारतीय इतिहासच चुकीच्या पद्धतीने लिहिला गेला असल्याने भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनासंबंधी काढलेले निष्कर्ष चुकीचे आहेत. अफगाणांमुळे भारतीय समाजाचे पुनरुज्जीवन झाले; मोगलांमुळे झाले; व त्यानंतर परत इंग्रजांमुळे देशाचे पुनरुज्जीवन झाले असे हिंदी इतिहासकार सांगत असतात. आता बहुधा ही मंडळी आणखी एखाद्या परकीय आक्रमकाकडून देशाचे पुनरुज्जीवन होण्याची वाट पाहत असावेत ! त्यांच्यापुढे आता एवढाच प्रश्न असेल की, हे पुनरुज्जीवन कोणता परकी करणार ? अमेरिका, रशिया की चीन ? मोगलांनी केलेल्या पुनरुज्जीवनाचे प्रतीक म्हणून राजा मानसिंहाचे आणि इंग्रजांनी केलेल्या पुनरुज्जीवनाचे चिन्ह म्हणून राजा राममोहन रॉय यांचे नाव घेतले जाते. या दोन्ही व्यक्ती सज्जन व प्रतिष्ठित होत्या. त्यांना मोगलांची व इंग्रजांची दरबारी भाषा व रीतिरिवाज यांचे चांगले ज्ञान होते. राजा राममोहन यांनी आपल्या पूर्वजांच्या काही गलिच्छ रूढी टाकून देऊन जेत्यांच्या वरवरच्या का होईना काही पद्धती आत्मसात करण्याचा उदारपणा दाखविला. यालाच हिंदी इतिहासकार पुनरुज्जीवन असे समजतात. शंकराचार्य अथवा रामानुज यांच्यानंतर झालेले भारताचे प्रत्येक पुनरुज्जीवन भ्रामक आहे. भारतीय समाजावर कशाचाच काही मूलगामी परिणाम घडलेला नाही. एका-मागून एक आक्रमक आले, त्यांनी विजय मिळविले, आणि त्यालाच आपण पुनरुज्जीवन समजू लागलो.

परकीयांच्या विजयी सेनेबरोबर आलेल्या एखाद्या फेरिश्त्याने किंवा स्मिथने भारताचा इतिहास काय होता ते सांगितले. तोच आपण कवटाळून बसलो आहोत. भारताचे काहीही पुनरुज्जीवन झालेले नाही याचाच कदाचित हा पुरावा असेल. अंतर्गत प्रेरणेशिवाय कोणत्याही राष्ट्राचे कधीही पुनरुज्जीवन होत नसते. अत्याचारी परकी वर्चस्व क्वचितच देशाच्या अंतर्गत पुनरुज्जीवनास सहाय्यभूत ठरत असते. इंग्रजी राज्य व इंग्रजी भाषा यांचे हिंदुस्थानावर वर्चस्व नसते तर या देशाचे खरे पुनरुज्जीवन झाले असते. चीनने केलेल्या भारताच्या पराभवाची जी कारणे सांगितली जातात त्यावरूनच भारताची अंतर्गत स्थिती किती सडलेली व दिवाळखोर बनलेली आहे हे उघड होते.

देशाचे पुनरुज्जीवन ही देशांतर्गत शक्तींनी घडवून आणलेली प्रक्रिया असते. बाह्य शक्तींनी घडवून आणलेल्या समाजावरील परिणामांना पुनरुज्जीवनाची संज्ञा देता येणार नाही. देशांतर्गत शक्तीद्वारे, देशी स्वरूपात आणि देशी सामग्री व साधनांद्वारेच देशाचा पुनर्जन्म होऊ शकतो. या दृष्टिकोणातून

भारतीय इतिहास पाहिला तर गेल्या सात शतकांत येथे पुनरुज्जीवन झालेले नाही. महात्मा गांधींपासून सुरू झालेल्या युगात असे पुनरुज्जीवन झाले काय ? मी निश्चित सांगू शकत नाही. कारण गांधीयुग अकस्मात अवरुद्ध झाले आहे. त्यामुळे काही निष्कर्ष काढणे कठीण आहे. अर्थात गांधीयुग संपुष्टात आले आहे असे मात्र नाही. आशा बाळगावी अशी परिस्थिती अद्यापही आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या वाढत्या रोपट्याबद्दल ज्यांना प्रेम आहे; ते फळलेले-फुललेले पाहावयाची ज्यांची इच्छा आहे, त्यांनी काही गोष्टी स्पष्टपणे समजून घेतल्या पाहिजेत. जेत्याला आपल्यात 'सामावून' घेण्याची आपली ती तथाकथित 'अद्‌भुत शक्ती' आता मुळापासून उखडून फेकून दिली पाहिजे. भारताची ही अद्‌भुत शक्ती हा गुण नव्हे, दुर्गुण आहे. एक राष्ट्रप्रेमी म्हणून मी हे सांगत नाही, तर एक मानवतावादी म्हणून सांगत आहे. कारण जेत्यांना आत्मसात करण्याचा हा 'गुण' हे शारीरिक व मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या मानवी यातनांचे विशाल उत्पत्तिस्थान आहे.

मोंगल व इंग्रज यांची आक्रमणे भारताने परतवून लावली असती आणि त्यांची सत्ता येथे येऊच दिली नसती तर भारत काय कायमचा रानटी व मागासलेला राहिला असता ? बलाढ्य व प्रगत नेपोलियनला रशियाने हाकलून लावले म्हणून रशिया काय मागासलेला राहिला ? नेपोलियन हा त्या काळातील युरोपच्या प्रगतीचा प्रतीक होता. त्याने अनेक नवे कायदे केले; कायदेसंहिता बनविली. आपल्या देशात अनेक प्रगतिकारक गोष्टी केल्या. अशा नेपोलियनची सत्ता धुडकावून लावण्यात रशियनांनी मूर्खपणा केला असे म्हणायचे की काय ? देशांतर्गत प्रगती परकी सत्तेशिवाय होत नाही असे मानणे मूर्खपणाचे आहे; देशद्रोहात्मक आहे.

बहुतांश लोकांना व इतिहासकारांना देखील जेत्यांनी भारताच्या केलेल्या निरंतर पराभवाची काही तरी कारणे सांगून समाधान पावण्याची खोड आहे. शत्रूची शस्त्रास्त्रे अधिक चांगली होती, तो कपटी होता इत्यादी कारणे सांगितली जातात. गझनीच्या महमदाने आपल्या सैन्यापुढे भारतीयांना पवित्र असलेल्या गोमाता घालून आक्रमण करण्याचे कपट केले. आणि माओच्या चिनी सैन्याने दगाबाजी करून अचानक हल्ला केला असे रडगाणे गायले जाते हे लज्जास्पद आहे. आम्ही आमच्या शत्रूच्या श्रेष्ठत्वाचे नेहमी रडगाणे गात असतो. त्यामुळे हिंदी लोक कोणत्याही साच्यात ओतणे शक्य व्हावे असे ओल्या मातीच्या गोळ्याप्रमाणे बनतील. आपला देश आपल्या शत्रूपुढे ज्या कारणांमुळे कुचकामी

ठरला त्या दौर्बल्याच्या कारणांचा किंवा रोगाचा आमचे इतिहासकार व आम्ही कधी विचार करणार आहोत की नाही? प्रचंड लोकसंख्या असलेले हिंदुस्थानसारखे एखादे राष्ट्र शत्रूच्या वरचढ शक्तीमुळे पराभूत झाले असे म्हणणे हास्यास्पद आहे. अंतर्गत उणीवांमुळे भारत पराभूत झाला. गेल्या ७०० वर्षांच्या, खरे म्हणजे त्यातल्या ५०० वर्षांच्या काळात भारतीय जनतेत काही उणीवा राहिल्या आहेत. या उणीवांचा शोध घ्यावयास हवा. हा शोध घेतल्यानंतर मी या निर्णयाप्रत आलो आहे, की त्या उणीवा दूर करण्याची संधी आतां आपणांस मिळाली आहे.

आणखी एक मोठा लोकभ्रम नष्ट केला पाहिजे. आपल्यातील दोषांची चर्चा करताना आपल्यामधील अंतर्गत दुही व विश्वासघात यांचा आग्रहपूर्वक उल्लेख केला जातो. जयचंद व मीरजाफर हेच आमच्या इतिहासाचे खरे खलनायक असल्याची कावकाव केली जाते. असे दगाबाज लोक प्रत्येक युगात प्रत्येक देशात होऊन गेले आहेत. ज्या राष्ट्रात एखादे महान उद्दिष्ट प्राप्त करण्याची भावना जागृत असते ते राष्ट्र अंतर्गत दुही व विश्वासघात यावर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट कसा करावयाचा हेही जाणते. परंतु त्याकरिता ते ' राष्ट्र ' असावे लागते. किमान गेल्या १२०० वर्षांच्या काळात भारत हे राष्ट्र असे नव्हतेच. आपल्या सत्तेच्या रक्षणार्थ भारताने एक राष्ट्र म्हणून एकजुटीने परकीय आक्रमकांचा कधीही प्रतिकार केलेला नाही. या दृष्टीने तरी भारत हे राष्ट्र नव्हते. आजूबाजूला लढाया होत होत्या, पण जनता उदासीन होती. जनतेचे हे औदासीन्य विस्मयजनक आहे. इतिहासाच्या पुस्तकांतून त्याच्या अनेक कथा आपण वाचतो. परकी इतिहासकारांना या कथा मनोरंजक वाटत असतील. परंतु भारतीय माणसाला मात्र यातनादायक वाटतात. या औदासीन्याचा आता अंत सुरू झाला आहे; नव्या अध्यायाचा प्रारंभ झाला आहे असे वाटते. अशा वेळी आपल्यातील दुहीची उथळ चर्चा करीत बसल्याने हा नवा अध्याय अकस्मात समाप्त होण्याचीच शक्यता आहे. त्याऐवजी जनतेतील औदासीन्याची चर्चा करणे उपयुक्त होईल.

हिंदुस्थानवर झालेली आक्रमणे धार्मिक होती हा असाच एक अपसमज इतिहासकारांनी निर्माण केला आहे. तो आता नाहीसा केला पाहिजे. या आक्रमणांचे स्वरूप कधीही धार्मिक नव्हते; मुसलमानांची आक्रमणेही धार्मिक नव्हती. ज्याला आपण आपल्या इतिहासात ' मुसलमान काळ ' म्हणून खुशाल म्हणतो तसा काळ येथे कधीही नव्हता. येथें अफगाण आले, मोगल

आले, इराणी आले, अन्यही आले. पण मुसलमान म्हणून नाही; तर आक्रमक म्हणून. जसे इंग्रज आले तसे. आणि क्षणभर वादासाठी असे मानले की भारता-वर झालेली आक्रमणे धार्मिक होती तरी आक्रमकांनी आपला पराभव केला किंवा आपण त्यांच्यापुढे शरणागती पत्करली ही वस्तुस्थिती कायमच राहते.

गेल्या काही वर्षांतील इतिहासलेखनात दोन प्रमुख विचारप्रणाली दिसून येतात. या देशातील इतिहासलेखनात खरोखरच काही स्वतंत्र विचारधारा आहेत काय हा प्रश्न निराळा. तसेच भारतातील इतिहासलेखन सत्यकथनाच्या दृष्टीने मोलाचे आहे की नाही अथवा असत्यकथनाच्या दृष्टीने तरी महत्त्वाचे आहे काय हा वादाचा मुद्दा सध्या बाजूला ठेवू. पण भारतीय इतिहासलेखनात ज्या दोन विचारप्रणाली आहेत असे म्हटले जाते त्या डॉ. ताराचंद व डॉ. मुजुमदार यांच्या नावाने ओळखल्या जातात. या दोन्ही भारतीय इतिहासकारांनी इतिहासाची खूप जोराने चर्चा केली असली तरी त्या दोघांची दृष्टी मूलतः एक आहे. हे दोघेही अपरिपक्व आंतरराष्ट्रीय इतिहासलेखकांची देशी, परपुष्ट संताने आहेत. दोहोंची विचारप्रणाली असत्य धारणांवर आधारलेली आहे. कोणते असत्य स्वीकारायचे व कोणते टाकून द्यावयाचे एवढ्यापुरताच काय तो त्यांच्यात मतभेद असेल. इंग्रजी अमदानीतील इतिहासकारांनी सांगितलेल्या असत्यांचाच दोघांनीही आपल्या विचारप्रणालीत स्वीकार केलेला आहे.

आणखीही एक उपधारा आहे – अलीगढची. या विचारधारेचे काही प्रवक्ते मार्क्सवादी आहेत; ते स्वतःला प्रगतिशील समजतात. त्यांच्या वंध्या व निष्फळ मार्क्सवादानुसार इतिहासात निरंतर प्रगती होत असते. कदाचित इतिहासा-विषयीची अशी धारणा त्यांच्या विकृत आत्म्यांना शांती मिळवून देत असेल. हे लोक प्रत्येक मुसलमान आक्रमणाचे औचित्य शोधण्याच्या खटपटीत असतात. मोगल आक्रमकांनी एतद्देशीय बनलेल्या अफगाण मुसलमानांची जी हत्या केली त्याचे त्यांना काहीच वाटत नाही. किंवा या आक्रमणामुळे हिंदू-मुसलमानांत वाढू लागलेली जवळीक तुटली अथवा मागे पडली याचाही ते विचार करीत नाहीत. मोगलांनी आक्रमण केले त्या वेळी अफगाण राज्यकर्ते स्वदेशी बनलेले होते. आणि भारतमातेच्या दोन डोळ्यांप्रमाणे हिंदू-मुसलमानांत परस्पर पूरक संबंध निर्माण होत होते. मोगल आक्रमणाने या संबंधांत बिघाड झाला. हा इतिहास सर्वांना माहीत आहे. मग या अलीगढवाल्या मार्क्सवादी इतिहासकारांना काय तो माहीत नाही ? नंतर काही मोगलांनीही हिंदू-मुसलमानांना परस्परसन्निध आणण्याचा प्रयत्न केला. पण तेव्हा वेळ गेली होती; मोगल सत्ता अकबरानंतर स्वतःच खिळखिळी होऊ लागली होती; ती शक्तिहीन झाली होती.

बाहेरून भारतात आलेल्या प्रत्येक तत्त्वप्रणालीत दुर्दैवाने असा एक दोष आढळतो की, येथे त्या प्रत्येक प्रणालीला तिचे प्रवक्तेच प्राणहीन बनवितात: मार्क्सवादातही हा दोष दिसून येतो. त्यामुळे मार्क्सवाद्यांचे इतिहासलेखन नीरस व वांझ झालेले आहे. त्यात भारताच्या एका ढोबळ अथवा चक्राकार प्रगतीची एक काल्पनिक कथा रंगवून सांगण्यात आली आहे. थोडी थोडी का होईना, देशाची प्रत्येक आक्रमणाने प्रगती झाली आहे असा या इतिहासकारांचा सिद्धांत आहे. पण मग ही तथाकथित प्रगती, त्यानंतर झालेल्या आक्रमणांपासून देशाचे संरक्षण का करू शकली नाही? या एकाच कसोटीवर प्रगतीची ही काल्पनिक कथा हवेत उडून जाते.

भारतीय इतिहासलेखनाची चर्चा करताना सर्वश्री. सावरकर, पंडित सुंदरलाल किंवा वासुदेवशरण अग्रवाल यांच्यासारख्या स्वदेशी इतिहासकारांचा उल्लेख करण्याचा मोह काही लोकांना होईल. सावरकरांसारख्यांनी लिहिलेल्या इतिहासातून प्रेरणा मिळते; जनजागृती होते यात शंका नाही. तसेच इतर परभृत देशी इतिहासलेखकांनी उपेक्षिलेल्या भारतीय समाजातील उणीवा दूर करण्याचा त्यांच्या इतिहासाचा उद्देश आहे. देशाला एका विशिष्ट दिशेने नेण्याचे हत्यार म्हणून त्यांच्या इतिहासांचा उपयोग होऊ शकतो यातही वाद नाही. परंतु इतिहास म्हणून अशा लेखकांचे लेखन अधिक काळ जिवंत राहत नाही; राहताही कामा नये. वस्तुतः ते लेखन म्हणजे इतिहास नव्हेच. तो एक एकसूरी आर्त आक्रोश आहे. त्यात सत्याचा एक फार मोठा अंश अभावाने आढळतो; आणि अतीताचे पुनरुज्जीवन करण्याचेही त्यात सामर्थ्य नाही. कालांतराने या लेखनातील तीव्र आक्रोश बदसूर वाटू लागतो; कंटाळवाणा वाटतो. एकत्रित केलेली माहिती या दृष्टीने या लेखनाचा जरूर उपयोग आहे. पण असल्या मनगढन्त व अनाकर्षक इतिहासलेखनाचे प्रारंभी वाटणारे मोलहि यथावकाश नष्ट होते.

अलीकडे काही लेखकांनी पुराणकालाचे विश्लेषण करणारे काही साहित्य प्रकाशित केले आहे. ते आकर्षक व मूल्यवानसुद्धा आहे. या साहित्यात पौराणिक कथांचे विवेचन तर आहेच, पण सर्जनात्मक साहित्य म्हणूनही त्याचे मोल आहे. इतिहासाची तत्त्वज्ञानात्मक व रसाळ अशी छटा देखील त्या साहित्यावर पसरलेली दिसते. केवळ घटनात्मक इतिहासाच्या स्वरूपात काही लेखकांनी इतिहासलेखन केले आहे. उदाहरणार्थ, सरकार व सरदेसाई. आपण

इतिहासलेखन केल्याचा खोटा दावा करणाऱ्या इतर भारतीय इतिहासकारांच्या लेखनापेक्षा या लोकांचे लेखन केव्हाही अधिक चांगले.

ज्यात तारखा, सन व व्यक्तींचे कार्य यांचे निव्वळ सपाट वर्णन असते असाही इतिहासलेखनाचा एक अनाकर्षक प्रकार आहे. या इतिहासात तारखा व व्यक्तींचे कार्य यांचा अन्योन्य संबंध कोणता व का याची बरी किंवा वाईट कोणतीच चर्चा केलेली नसते. चारणकाव्यातील उद्धरणे आणि राजे-महाराजे-सुलतान-बादशहा व त्यांचे सेनापती इत्यादिकांचे किताब यांनी मात्र हे लेखन खच्चून भरलेले असते. अशा प्रकारच्या इतिहासलेखनात आणखीही एक गंभीर दोष आढळतो. मध्येच एखाद्या इंग्रजाचे नाव एकाएकी येऊन टपकते. संबंधित विषयाच्या एखाद्या अधिकारी इंग्रज विद्वानाने, एखाद्या धर्मप्रचारकाने अथवा ज्ञात्याने कोणा एखाद्या गोष्टीने खंडन-मंडन केलेले असेल तर त्याच्या नावाचा उल्लेख असायला काहीच हरकत नाही. पण ज्याचा असा काहीही संबंध नाही अशा एखाद्या इंग्रजांचा आवर्जून उल्लेख करण्यामागील प्रवृत्ती स्पष्ट आहे. अशा प्रकारच्या मूर्खपणाच्या लेखनात निरर्थक भरताडही भरपूर सांपडते.

अपरिपक्व आंतरराष्ट्रीय लेखकांनी असत्य व विध्वंसात्मक इतिहास लिहिला आहे तर प्रचारकलेखकांनी लिहिलेला इतिहास नीरस, एकांगी व विकृत आहे. या दरम्यान युनेस्कोसारख्या संस्थांनी लिहिलेला इतिहास आहे. युनेस्कोने प्रकाशित केलेल्या या मानव समाजाच्या इतिहासात जुन्या-पुराण्या गोष्टी पुन्हा सांगितल्या आहेत. रूढी व परंपरा आणि जीर्णमतवाद यांतून एकूण सर्वच इतिहासलेखन बाहेर पडणे जवळपास अशक्य असावे असे हा इतिहास वाचल्यावर वाटते. मानवेतिहास वाचायला व त्याविषयी विचार करायला मोठें गोड वाटतें. पण तो लिहिणार कोण? या किंवा त्या पूर्वग्रहदूषित दृष्टीने पूर्वी लिहिलेले इतिहाससाहित्य एकत्र करून मानवेतिहास लिहिणे व मानवी परिवारासंबंधी एखाद दुसरी कहाणी त्यास जोडणे असेच जर मानवजातीचा इतिहास लिहिण्याचे स्वरूप राहणार असेल तर अशा लेखन पद्धतीचे परिणाम आपण अनुभवतच आहोत. भारतासारखे देश हे इतिहासाच्या बाबतीतील एका सुनियोजित असत्यकथनाचे बळी झालेले आहेत. त्यांना आत्मसन्मानहीन व साहसविरहित असा जड ठोकळा किंवा कीडकिटाणू बनविण्यात आले आहे. त्यामुळे भारताविषयी लिहिलेल्या इतिहासात शरणागतीला समन्वय, मूर्खतापूर्ण साहसवादाला वीरता, तथाकथित पुनरुज्जीवनाला प्रगतीचा प्रभातकाल आणि अनेकतेला एकता असे निरंतर

खोटेपणाने संबोधले जात राहील. कित्येक कालखंडांतील भारताचा इतिहास दुःखद आहे. आणि तो लिहिला गेला आहे त्याहीपेक्षा वाईट रीतीने. त्यामुळे भारतीय समाजात उकिरडा जमला आहे. न रुचणारा भूतकाळ अनिश्चित भविष्यकाळापर्यंत ताणण्यात आला आहे. ज्या देशाची बुद्धी किंवा तिची घडण ठिसूळ बनलेली आहे तो देश कधीही विश्ववादी बनू शकणार नाही. जे राष्ट्र आपल्या सैन्यशक्तीसह आपली संपूर्ण अधिसत्ता किंवा तिचा काही अंश संपूर्ण मानवी समाजाच्या पुनर्रचनेचे प्रयत्न होतील तेव्हा त्यात विलीन करावयास तयार होईल तेच राष्ट्र विश्ववादी बनू शकेल. अर्थात त्या वेळी तें राष्ट्र या मानवी समाजरचनेचेच स्वतः एक बनलेले अंग असेल आणि त्यामुळे आपली काही अधिसत्ता व सैन्यबळ ते आपोआपच अशा विश्वरचनेच्या हाती सोपवील.
[ ‘ जन ’ या लोहिया-संपादित मासिकांतील स्फुट ]

● ● ●

## दोन :

संयुक्त राष्ट्रसंघांतर्गत युनेस्को या संस्थेने मानवजातीचा इतिहास लिहिण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय आयोग स्थापन केला होता. या आयोगाने एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. या ग्रंथाच्या पहिल्या भागात प्राक्-इतिहास व मानवी संस्कृतीचा प्रारंभ यांची चर्चा आहे. हा ग्रंथ या आयोगामार्फत प्रकाशित झाला असला तरी त्यातील मजकुराची जबाबदारी अखेर संयुक्त राष्ट्रसंघ, युनेस्को व हिंदुस्थानविषयक मजकुरापुरती भारत सरकारवरच आहे. कारण या आयोगाशी डॉ. राधाकृष्णन्सारख्या भारतीयांनी पत्रव्यवहार केला होता.

भारताच्या इतिहासाविषयी हिंदी व परकी लेखकांना किती चुकीचे ज्ञान असते याचे प्रत्यंतर या ग्रंथात येते. काही उदाहरणे सांगतो. युनेस्कोच्या या ग्रंथाचे एक लेखक लेनर्ड वूली यांनी या ग्रंथात एके ठिकाणी असे विधान केले आहे की, “ साची येथील विशाल स्तूपाच्या उत्तर बाजूचे दरवाजे ज्या पद्धतीचे आहेत ती पद्धत पाहता तिची प्रेरणा चीनमधील लाकडी स्थापत्यकलेपासून आलेली आहे असा विचार मनात न येणे कठीण आहे. ” या विधानाचे त्याच ग्रंथात रशियन विद्वान प्रा. वियाकोनोफ व ईलिन यांनी खंडन केले आहे. गंमत

अशी की, वरील विधानातील चूक भारतीय इतिहास कमिशनच्या कोणाही सभासदाने किंवा डॉ. राधाकृष्णन् अथवा अन्य तत्सम कोणी हिंदी विद्वानाने लक्षात आणून दिलेली नाही.

या गोष्टीचे तात्पर्य हे की, परभृत हिंदी लेखकांनी व परकी लेखकांनी लिहि-लेल्या भारताच्या इतिहासात सतत असे दर्शविण्यांत येते की, भारतात जे काही झाले ते दुसऱ्यांपासून प्रेरणा घेऊन झाले; किंवा जे परकी लोक येथे आले त्यांनी ते केले. येथले मूळचे रहिवासी कोणतीही नवीन गोष्ट करायला लायक नव्हते. भारतीय इतिहासाच्या वाचकांवर अशा निष्कर्षांचा काय परिणाम होत असेल हे सांगण्याची गरज नाही.

युनेस्कोच्या या ग्रंथात एका पुस्तकाचा उल्लेख आहे. त्या पुस्तकाचे नाव ऐकून आपणाला हसू येईल; विस्मय व दुःख वाटेल. नाव आहे 'पाकिस्तानची ५००० वर्षें!' पाकिस्तान हे फार प्राचीन राष्ट्र आहे असे भासविण्याचा पाश्चात्य लेखकांचा हा डाव आहे. हडप्पा व मोहनजोदडो हा फार प्राचीन संस्कृतीचा एक प्रकाशमय अंश आहे. त्यालाच पाकिस्तान हे नाव देऊन पाकिस्तानची मूळे मजबूत करणे हा या पाठीमागचा उद्देश आहे. साऱ्या पृथ्वीचा जीवनकाळ व तिचा प्राचीन इतिहास हाच एखाद्या देशाचा इतिहास होय अशा पद्धतीने एखाद्या देशाला प्राचीन ठरवायचे झाले तर इंग्लंडला २० लाख वर्षांचा किंवा भारताला ३ अब्ज वर्षांचा इतिहास आहे असेही का म्हणता येऊ नये!

या ग्रंथात आणखी एक असत्य गोष्ट सांगितली आहे. "प्राचीन भारतात काव्यसाहित्य अस्तित्वात होते असे म्हणण्याइतके पुरावे नाहीत. हिंदुस्थानात आर्य लोक इ. स. पूर्वी १५०० वर्षें आले. आपल्या भाषेचा काव्य-लेखनादि-साठी वापर करता येईल अशी तिची रचना करण्यास त्यानंतरची ५–७ शे वर्षें त्यांना लागली" अशा अर्थाचे एक विधान या ग्रंथात केलेले आहे. म्हणजेच ऋग्वेद ही भारतातील काव्यरचना या ग्रंथातील या विधानानुसार फक्त २८०० वर्षांपूर्वीची आहे. पण वस्तुस्थिति तशी नाही हे आपण सर्वजण जाणतोच. ऋग्वेद त्याहून कितीतरी प्राचीन आहे.

याच ग्रंथात आणखी एक असत्य विधान आहे. ते हडप्पा येथील एका प्रचंड गढीसंबंधी आहे. "...ही गढी ग्रामीण जनतेवर जरब बसविण्यासाठी, तिच्यापासून आपले रक्षण करण्याकरिता शासकांनी बांधली असल्याचीच अधिक शक्यता आहे. बलुचिस्तानच्या डोंगराळ भागातून येणाऱ्या हल्लेखोरांपासून संरक्षण करण्याकरिता ती बांधली गेलीअसण्याची शक्यता दिसत नाही..." अशा

स्वरूपाचे हे विधान आहे. या विधानात प्रच्छन्न खोडसाळपणा आहे. हडप्पा कालातील शासक व शास्ते हे एकच नव्हते; आणि मूळ रहिवासी हे परकी शासकाच्या पारतंत्र्यात राहत होते, असे या विधानात सूचित केले आहे. या विधानाचेही खंडन याच ग्रंथात प्रा. दियोकोनोफ व जी. एफ. इलिन या रशियनांनीच केले आहे. त्यांनी म्हटले आहे, "शासक वर्ग परकी होता असा निष्कर्ष काढता येण्याजोगे प्रमाण उपलब्ध नाही. मध्ययुगीन जर्मनीतील सरंजामदारांच्या गढ्यांसारखी ही गढी असणे शक्य आहे."

भारताचा इतिहास कसा लिहिला गेला व जात आहे याचा हा एक नमुना झाला. हा झाला युनेस्कोच्या इतिहासातील नमुना - परकी लेखकांनी लिहिलेला. पण हिंदी इतिहासकारांनी लिहिलेल्या इतिहासाची तीच गत आहे. अगदी अलीकडचे एक उदाहरण देतो. स्वतः भारत सरकारने १८५७ च्या शतसंवत्सरीनिमित्त एक ग्रंथ प्रकाशित केला आहे. प्रा. डॉ. सेन हे त्याचे लेखक आहेत. पाश्चात्य लेखकांपेक्षाही या ग्रंथातील दृष्टी व निष्कर्ष दूषित, अशास्त्रीय व असत्य आहेत. या पुस्तकाला मौलाना आझाद व पं. नेहरू यांनी भूमिका लिहिली आहे. मी हे पुस्तक चाळले. त्यातील काही विधाने भयंकर आहेत. हे एक विधान पाहा : "अयोध्येचे देशभक्त स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते नव्हते. ते लढले ते आपल्या राजासाठी व त्याच्या राज्यासाठी. कारण त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाची जाणीवच नव्हती." याहूनही आणखी एक अजब वाक्य त्यांत आहे–"१८५७ च्या बंडखोरांचा विजय झाला असता तर प्रगतीचे घड्याळ मागे गेले असते. देशावर जहागिरदार, तालुकदार यांचेच राज्य कायम राहिले असते आणि चोरीच्या गुन्ह्यासाठी हात-पाय कापण्याची सजा देण्याची पद्धत चालूच राहिली असती. इंग्रजांचा विजय न होता तर हिंदुस्थान मागासलेला राहिला असता आणि आज दिसते ती त्याची उन्नति झाली नसती; आजचा समाजच निर्माण झाला नसता." अशा स्वरूपाची विधाने करणाऱ्यांना काय म्हणावे? यांना वस्तुस्थितीची जाणीवच नाही. हे लोक १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाला 'बंड' म्हणतात; झाशीची राणी यशस्वी होती तर हातपाय तोडण्याचे अत्याचार चालू राहिले असते असे सांगतात. आणि हे पुस्तक आमचे सरकार प्रसिद्ध करते; शरम वाटली पाहिजे. १८५७ च्या युद्धात सामान्य जनतेला जे कष्ट झाले त्याबद्दल या पुस्तकात कदाचित् एकही शब्द नसेल परंतु इंग्रजी मडमिणींशी झालेल्या क्वचित् दुर्व्यवहाराबद्दल पुस्तकलेखकाला केवढी चिंता! अनेक राष्ट्रांच्या इतिहासात अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत. परंतु त्या देशांच्या इतिहासात कोणा इतिहासकाराने त्यांना एवढे महत्त्व दिले नसेल. इति-

हासलेखनातील हा रोग आता केवळ इतिहास लिहिणाऱ्या शास्त्रीय इतिहास-लेखकांच्या हातून दूर होऊ शकणार नाही. आता राज्यकर्त्यांनी इतिहासलेख-कांना इतिहासलेखनाबाबत मार्गदर्शन केले पाहिजे. अर्थातच इतिहास हा सरकारधार्जिणा, व्यक्तिप्रेमी, पोकळ राष्ट्रवादी व असत्य बनणार नाही अशी मात्र काळजी घ्यावी लागेल.

शाळा-कॉलेजांत लावलेली इतिहासाची पुस्तके किती टाकाऊ व खोडसाळ असतात याची काही उदाहरणे माझ्या निदर्शनास आली आहेत. 'ईझी स्टोरीज फ्रॉम इंडियन हिस्टरी' व 'हिस्टरी ऑफ इंडिया फॉर ज्युनिअर क्लासेस' ही दोन पुस्तके नुकतीच माझ्या वाचनात आली. ई. मार्सडेन हे या पुस्तकांचे लेखक आहेत. यांपैकी एका पुस्तकाच्या ३६ तर दुसऱ्याच्या २२ आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. इंग्रजी माध्यम असलेल्या श्रीमंती शाळांत पाठ्यपुस्तके म्हणून ही व अशीच पुस्तके अभ्यासिली जात असतात.

या दोन्ही पुस्तकांत भारतीय इतिहासाच्या निरनिराळ्या कालखंडांच्या माहितीला जी जागा दिली आहे त्यातील खोडसाळ पक्षपातीपणा मोठा सूचक आहे. भारताच्या चार हजार वर्षांच्या प्राचीन इतिहासाला यांपैकी एका पुस्तकात ३९ तर दुसऱ्यात २० पेक्षाही कमी पाने दिली आहेत. तर फक्त पांचशे वर्षांच्या मुसलमान (!) कालखंडाला एका पुस्तकात १०० तर दुसऱ्यांत १२० पाने दिली आहेत. आणि केवळ १५० वर्षांच्या ब्रिटिश कालखंडाला एकात १५० तर दुसऱ्यात ७० पाने दिली आहेत. या पुस्तकांना इतिहास म्हणता येणार नाही. फार तर एका इंग्रज पर्यवेक्षकाने केलेले भारतीय इतिहासाचे सिंहावलोकन आणि ते देखील साम्राज्यवादी दृष्टिकोणातून केलेले विकृत सिंहा-वलोकन एवढेच म्हणता येईल.

हिंदुस्थानातील आदिनिवासी लोकांविषयी या पुस्तकात म्हटले आहे, "हे ठेंगणे, काळे, कुरूप, नग्न व गलिच्छ होते." पुढे आणखी एका ठिकाणी म्हटले आहे, "कालांतराने आणखी काही लोक आले. ते उंच, गोरे, सुंदर होते..." ज्याने कोणी हिंदुस्थानात येऊन येथील लोकांवर विजय मिळविला ते नेहमीच उंच, गौर, धिप्पाड व सुंदर होते असे तर लेखकाला प्रच्छन्नपणे सुचवायचे नाही ? अशी अनेक विधाने या पुस्तकांत ठिकठिकाणी आढळतात. पुढे आणखी एके जागी असे विधान आहे की, "भारतातील हवापाण्यामुळे येथील जुने विजेते दुबळे व ऐषारामी बनले होते तर नवे आक्रमक उत्साही व बलवान होते." म्हणजे या लेखकमहाशयांना असे सुचवायचे आहे काय की,

भारतावर आक्रमणे केलेल्या आक्रमकांच्या जयापजयाची कारणे त्यांचा रंग, बांधा, सौंदर्य व येथील हवामान यांच्यात आहेत ?

असली पाठ्यपुस्तके शाळा कॉलेजांतून लावावयास मान्यता देणारे राज्यकर्ते एखाद्या परकी शत्रूचे हस्तक किंवा सहप्रवासी तर नाहीत ?

महान् इतिहासकारांचा अपवाद सोडला तर बाकीचे इतिहासकार इतिहासाला कांहीसे घोड्यांची शर्यत समजतात. या शर्यतीत जो घोडा अखेर विजयी झाला त्याच्या दृष्टिकोणातून किंवा शर्यतीतील त्याच्या मागेपुढें राहण्याकडे पाहून इतिहास लिहितात. हे बरोबर नाही. भारताच्या इतिहासलेखनाबाबत असेच झाले आहे. भारतीय इतिहासाच्या घोडदौडीत अनेक शक्तिशाली घोडे धावले आहेत; पण शेवटी या शर्यतीत जो मोगल किंवा इंग्रजी घोडा यशस्वी झाला त्याच्या चष्म्यातून भारताचा इतिहास लिहिण्याची प्रवृत्ती दिसून येते. म्हणजेच शासकांच्या दृष्टिकोणातून इतिहास लिहिला जातो. इतिहास जसा घडला तसा तो सांगितला जात नाही. भारताच्या इतिहासलेखनावर या प्रवृत्तीचा विनाश-कारक परिणाम झालेला आहे.

इतिहासाच्या घोडदौडीत विजयी घोड्यांशिवाय या इतिहासकारांना अन्य कोणाचे महत्त्व वाटत नाही. वास्तविक अशा अनेक अन्य व्यक्ती व घटना असतात, की ज्यांचा इतिहास घडविण्यात हात असतो. पण त्यांची चर्चा अशा इतिहासकारांच्या पुस्तकांत फारच त्रोटक स्वरूपात आढळते. मी वर उल्लेखि-लेल्या ई. मार्सडेन यांच्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या इतिहासाच्या पाठ्यपुस्त-कांत याचा अनुभव येतो. त्या पुस्तकांत क्लाइव्ह आदि विजेत्या आक्रमकांच्या छोट्यामोठ्या गोष्टींना आणि त्याच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्या भारतांतील त्यांच्या गुलामांना जेवढे स्थान आहे तेवढे त्या किंवा त्यानंतरच्या काळातील ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी विवेकानंद, चित्तरंजन दास इत्यादींना महत्त्व नाही. या पुस्तकांत ढाका व पाटणा येथे इंग्रजी व्यापा-ऱ्यांना व्यापारी वखारी घालण्यास परवानगी देणाऱ्या अलीवर्दीखाचा गौरव आहे, तर फोर्ट विल्यमची दुरुस्ती करण्याची परवानगी इंग्रजांना नाकारणाऱ्या सिराजुद्दौल्याला मूर्ख व क्रूर म्हटले आहे. मराठे वसूल करीत होते त्या पैशाची चौथाई म्हणून निंदा केली आहे, तर वेलस्ली वसूल करीत होता त्या पैशाला ‘ नजराणे ’ म्हणून गौरविले आहे.

वर उल्लेखिलेल्या या पाठ्यपुस्तकांची प्रकाशक मॅकमिलन कंपनी ही परकी संस्था आहे. माझे तर आता असे मत झाले आहे की, जोवर जग एक होत

नाही आणि जगात बौद्धिक समानता निर्माण होत नाही तोवर भारतात विदेशी प्रकाशन संस्थांच्या पुस्तकांना बंदी घातली पाहिजे. कारण अशा पुस्तकांतून भारतीय विद्यार्थ्यांना जहर पाजले जात आहे. मॅकमिलन, लाँगमन्स इत्यादी विदेशी कंपन्या राष्ट्राची बुद्धी भ्रष्ट व नष्ट करीत आहेत.

हिंदी इतिहासलेखकांनी लिहिलेल्या इतिहासातही यांहून मोठे दोष असणार नाहीत किंवा आज नाहीत असे मला म्हणायचे नाही. पण त्यांचा देशावर एवढा विनाशकारी परिणाम होणार नाही.

[ लोकसभेतील एक भाषणांचें व मनफाईजुमधील एका लेखाचे संकलन ]

● ● ●

राठा
अनुक्रम……………
[illegible]……………

## ऑलिम्पिक आणि भारत

मेलबोर्न येथील जागतिक ऑलिम्पिक सामने नुकतेच संपले. राहणीमान, शरीरसंपन्नता व क्रीडाकौशल्य या बाबतीत जगांतील कोणत्या देशाची किती प्रगती अथवा परागती झाली आहे हे समजून घेण्याचे सर्वोत्तम साधन म्हणजे ऑलिम्पिक सामन्यांचे निकाल. मात्र त्यासाठी त्या निकालांची अविश्रांत परिश्रमाने छाननी केली पाहिजे; आणि त्या कामाविषयी मनात प्रेमही हवे. एखाद्या प्राचीन शिलालेखावरील जुन्या लिपीत खोदलेला मजकूर समजून घेण्यासाठी जशी मेहनत करावी लागते तशीच याही बाबतीत केली पाहिजे. पण अशा प्रकारे या जागतिक सामन्यांचा अभ्यास आज होत नाही. स्वार्थ, पूर्वग्रहदूषित दृष्टी अथवा गुलामी वृत्ती ही याची कारणे आहेत.

मेलबोर्न सामन्यांचे निकाल वाचताना रशिया व अमेरिका या दोन राष्ट्रांनी एकमेकांवर मिळविलेल्या विजयांची तुलना आपण मनांमध्ये प्रथम करतो. रशियाने अमेरिकेला जवळजवळ संपूर्णपणे झोडपले आहे, निर्विवादपणे झोडपले आहे. जगातील ही दोन बडी राष्ट्रे आहेत. खऱ्या अर्थाने ही दोन राष्ट्रेच 'बडे' या संज्ञेला पात्र आहेत. क्रीडाक्षेत्रातही ती सर्वांहून बडी आहेत. तूर्त

तरी या दोहोपैकी रशिया या क्षेत्रात अमेरिकहून श्रेष्ठ आहे. याचा अर्थ, लष्करी सामर्थ्याच्या क्षेत्रांत व सांस्कृतिक क्षेत्रांत देखील अमेरिकेपेक्षा रशिया वरचढ आहे असा मात्र नाही.

या दोन बड्या देशांनी मेलबोर्न सामन्यांत मिळविलेल्या विजयांचे तात्पर्य शोधण्यासाठी त्या विजयांचा तुलनात्मक अभ्यास केला पाहिजे. काही आंकडे असे :

| | प्राप्त केलेले पॉईन्टस् | प्राप्त केलेली पदकें सुवर्ण | चांदीचा | ब्रॉन्झ |
|---|---|---|---|---|
| (१) रशिया | ६२२·५ | ३७ | २९ | ३२ |
| (२) अमेरिका | ४९७ | ३२ | २५ | १७ |

मेलबोर्नमधील अमेरिकेच्या पराभवाबद्दल विचारले तर अमेरिकन्स म्हणतील, " रशियात सरकारी नियंत्रणाखाली खेळ आहेत तर अमेरिकेत ते स्वतंत्र आहेत. त्यामुळे अमेरिका-रशियातील क्रीडास्पर्धा ही विषम व्यवस्था असलेल्या स्पर्धकांत आहे. " रशियन खेळाडू धंदेवाईक खेळाडू आहेत तर अमेरिकन खेळाडू हौशी खेळाडू आहेत असेही अमेरिकन आग्रहपूर्वक सांगतील. पण हा तर्क अमेरिकनांच्या खुल्या स्पर्धेच्या तत्त्वाविरुद्ध जाणारा आहे. अमेरिकेतील वाढती समृद्धी हे खुल्या स्पर्धेचे फळ आहे असे तार्किकदृष्ट्या अमेरिकन जसे म्हणू शकणार नाहीत तसेच क्रीडाक्षेत्रातील रशियाचे श्रेष्ठत्व हे नियंत्रणे व नियोजन यांचे फळ आहे असेही रशियनांना म्हणता येणार नाही. म्हणून त्यांनी आपल्या अपयशाचे निश्चित कारण काय ते एकदा ठरविले पाहिजे. खुली स्पर्धा व नियोजन ही तत्त्वे आपणाला हवी तशी कोणीही वापरू नयेत. कम्युनिझम अथवा सोव्हिएट समाजव्यवस्था ही या क्षेत्रांतीलआपल्या वाढत्या श्रेष्ठत्वाची कारणे आहेत असा दावा रशियनांनीही करू नये, कारण ते हास्यास्पद आहे. कॅपिटॅलिझम व कम्युनिझम या गोष्टी या संदर्भात तुलनेने फारच क्षुल्लक महत्त्वाच्या आहेत. त्यातील गुणावगुणांचे महत्त्व या बाबतीत विचारणीय नाही. जगातील इतर देशांच्या तुलनेने रशिया व अमेरिका या दोन राष्ट्रांत जो सारखेपणा आहे त्याचाच त्यांच्या क्रीडाक्षेत्रांतील कमीजास्त श्रेष्ठत्वाशी अधिक संबंध आहे. भूक्षेत्र व लोकसंख्या या बाबतीत या दोन्ही देशांची गणना जगातील मोठ्या देशांत होते. प्रत्येकाची लोकसंख्या सुमारे २० कोटी आहे. अमेरिकेची लोकसंख्या दर चौरस मैलात २० आहे तर रशियाची दर चौरस मैलात ५० आहे. दोन्ही देशांचे शेतकी

व औद्योगिक उत्पादन आणि एकूण अर्थव्यवस्था प्रगत आहे. त्यामुळे ते आपल्या लोकांना उत्तम अन्न देऊ शकतात. या दोन राष्ट्रांतील या व अशा साम्यांमुळे अमेरिकेतील लोकशाही व रशियाचा कम्युनिझम हा फरक क्षुल्लक ठरतो. आणखीही काही मामुली कारणे सांगितली जातील. रशियातील सर्व जनतेचा विचार करता रशियनांना सर्व अमेरिकनांच्या मानाने अधिक चांगले अन्न व वैद्यकीय मदत मिळते असेही असू शकेल. परंतु हे कारण अधिक ताणून चालणार नाही. कारण रशियनांना काही आजच अधिक अन्न मिळत नाही. अलीकडच्या इतिहासातील झारशाहीच्या गुलामीत व आता सामुदायिक कम्युनिस्ट अर्थव्यवस्थेत रशियन जनतेला इतर गरीब देशांच्या मानाने अधिक खायला-प्यायला मिळत आले आहे; आणि चांगली बळकट शरीरयष्टी प्राप्त झाली आहे. त्यामुळे शारीरिक कष्ट असलेल्या खेळांत ते नेहमीच श्रेष्ठ ठरले आहेत. रशियनांच्या जीवनात अगदी अलीकडच्या काळात घडलेल्या एका घटनेचा कदाचित् त्यांच्या क्रीडाक्षेत्रातील वरिष्ठतेशी संबंध असू शकेल. ती घटना म्हणजे रशियन राज्यक्रांती. यशस्वी क्रांत्या, त्या जे करतात त्यांच्यात सर्वांगीण जागृती, प्रगती करीत असतात. अमेरिकनांनी सुमारे १५० वर्षांपूर्वी क्रांती केली तर रशियनांनी ४० वर्षांपूर्वी क्रांती केली. क्रांतीनंतरचा प्रारंभिक जोम अद्यापही रशियात शिल्लक असेल; आणि अमेरिकेत तो आता काहीसा ओसरला असेल. कदाचित् काही वर्षांनी दोन्ही देश या बाबतीत एकाच पातळीवर येतील.

एखाद्या देशाची क्रीडाक्षेत्रातील श्रेष्ठता त्या देशाच्या दुसऱ्या क्षेत्रातही तितक्याच प्रमाणात प्रत्ययास येतेच असे नाही हे मी मागे सांगितलेच आहे. ऑलिम्पिक निकालांचा नीट अभ्यास केला तर महत्त्वाचे आणखीही समाजशास्त्र-विषयक निष्कर्ष निघू शकतील. उदाहरणार्थ, स्वीडन व नॉर्वे यांचा मेलबोर्नच्या ऑलिम्पिक सामन्यांत अनुक्रमे ८ वा व २६ वा क्रमांक आला आहे. स्वीडनला एकूण १४० पॉईंट मिळाले तर नॉर्वेला फक्त १८. या दोन देशांत तसे बरेच साम्य आहे. तरीही स्वीडनपेक्षा नॉर्वे अधिक थंड प्रदेश आहे तर नॉर्वेपेक्षा स्वीडनचे जीवनमान अधिक चांगले आहे.

याचा अर्थ हवामान व चांगले जीवनमान ही क्रीडानैपुण्याची अनिवार्य कारणे असतात, असा मात्र नाही. म्हणून हाही मुद्दा फार ताणता येणार नाही. उदाहरणार्थ, फिनलंड व डेन्मार्क पाहा. या दोन्ही देशांचे हवामान, रहाणीमान व लोकसंख्या साधारणपणे सारखीच आहे. तरीही त्यांच्या क्रीडाश्रेष्ठत्वात एवढा फरक का? मेलबोर्न येथे फिनलंडला १२ वा क्रमांक आणि ८९·५ पॉईंट्स मिळाले तर डेन्मार्कला १९ वा क्रमांक व २६ पॉईंट्स मिळाले.

१०३०३

जेसी ओवेनने एक फार महत्त्वाचा मुद्दा सांगितला आहे. तो म्हणतो, " खाणे-पिणे व झोप यासंबंधीच्या योग्य सवयी व जीवनातील शिस्त यांनीच क्रीडानैपुण्य प्राप्त होत असते. " इटली व फ्रान्स यांचे उदाहरण या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे. या दोन देशांना युरोपची जीर्ण राष्ट्रें असे म्हटले जाते. रशिया व जर्मनीच्या मानाने ती कदाचित जीर्ण असतीलही. परंतु या देशांनी क्रीडाक्षेत्रातील आपले अभिमानास्पद स्थान आजही कायम ठेवले आहे. लोकसंख्या, रहाणीमान इत्यादीबाबत आपल्या बरोबरीच्या, फक्त तीन सोडून सर्व राष्ट्रांच्यापेक्षा या दोन देशांनी अधिक पॉइंटस मेलबोर्नमध्ये जिंकले आहेत. मेलबोर्न सामन्यांत इटलीने १६१ पॉइंटस व ७ वा क्रमांक पटकावला तर फ्रान्सने १०८.५ पॉइंटस व १० वा क्रमांक मिळविला.

स्वार्थी दृष्टी व पराधीन वृत्ती न बाळगता ऑलिम्पिक सामन्यांच्या निकालांचे विश्लेषण केले तर युरोपीय किंवा गौरवंशीय लोक आज जगात सर्वश्रेष्ठ आहेत हे स्पष्ट होईल. युरोपियन राष्ट्रांतही कमीजास्त अंतर आहे. पण त्याला महत्त्व दिले तर ही सर्वच गोरी राष्ट्रे दुनियेतील इतर वर्णीय देशांपेक्षा कशी वरचढ आहेत या गोष्टीकडे दुर्लक्ष होईल.

मेलबोर्न सामन्यांत ६८ राष्ट्रांनी भाग घेतला. त्यांपैकी ४४ राष्ट्रांचे निकाल वृत्तपत्रांत आले. बाकी २४ राष्ट्रांची वर्तमानपत्रकारांनी दखलही घेतली नाही. ही २४ राष्ट्रे बिगर-युरोपीय होती. ज्या ४४ देशांचे निकाल वृत्तपत्रांनी दिले, त्यात फक्त १५ देश बिगर-युरोपीय होते. एखाददुसरा अपवाद सोडल्यास या पंधराही देशांनी जिंकलेले पॉइंटस, पदके व क्रमांक अगदीच उपेक्षणीय आहेत.

| क्रमांक | देश | पॉइंट्स | पदके सुवर्ण | चांदी | ब्राँझ |
|---|---|---|---|---|---|
| ९ | जपान | १२७ | ४ | १० | ५ |
| १५ | तुर्कस्थान | ५२ | ३ | २ | २ |
| १७ | इराण | ४२ | २ | २ | १ |
| २२ | कोरिया | २२ | ० | १ | १ |
| २७ | चिली | १७ | ० | २ | २ |
| २८ | मेक्सिको | १४ | १ | ० | १ |
| ३१ | भारत | १० | १ | ० | ० |
| ३२ | ब्राझील | ९ | १ | ० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | त्रिनिदाद | ९ | ० | ० | ० |
| ३५ | पाकिस्तान | ५ | ० | १ | ० |
| ३७ | उरुग्वे | ५ | ० | ० | १ |
| ३९ | बहामा | ४ | ० | ० | १ |
| ४१ | नायजेरिया | २ | ० | ० | ० |
| ४२ | क्यूबा | १ | ० | ० | ० |
| ४३ | मलाया | १ | ० | ० | ० |

यांपैकी तुर्कस्थान हे स्वतःला युरोपीय देश समजते. चिली, ब्राझील, त्रिनिदाद व बहामा या देशांच्या मेलबोर्न येथे आलेल्या क्रीडापथकात युरोपीय वंशीयांचाच अधिक भरणा असण्याचा संभव आहे. पोर्तुगाल व स्पेन या देशांचे निकाल काहीसे महत्त्वाचे आहेत. हे देश गोरे असले तरी इतर गोऱ्या देशांच्या मानाने मागे आहेत. युरोप थकलेले दिसते. पण आपल्या लॅटिन-अमेरिकन वारसांद्वारे इबेरियन स्पिरिट पुष्कळच जोम दाखवीत असल्याचे दिसते; निदान भारतापेक्षा अधिक जोम ती राष्ट्रे दाखवीत आहेत. पुढील आकडे पहा :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४० | पोर्तुगाल | ३ | ० | ० | १ |
| ४४ | स्पेन | १ | ० | ० | ० |
| २५ | अर्जेन्टिना | १८·५ | ० | १ | १ |
| २७ | चिली | १७ | ० | २ | २ |

एक आपत्ती जगावर सतत कोसळत आहे. परंतु जग मात्र सतत त्याची उपेक्षा करीत आहे. ऑलिम्पिक सामन्यांतील पहिल्या दहा विजयी देशांत फक्त एक युरोपीयनेतर देश आहे; आणि त्याचा नंबर सुद्धा १० वा आहे. पहिल्या विजयी तिसांत केवळ सहा देश युरोपीयनेतर आहेत. काही अंशी युरोपीय आणि कांही अंशी रंगीत किंवा संमिश्र रंगांच्या देशांचा या सहामध्ये समावेश आहे.

अशा वांशिक दृष्टिकोणातून ऑलिम्पिक सामन्यांचा विचार करणे पुष्कळांना योग्य वाटणार नाही. पण अंध स्वार्थापोटी किंवा भोंगळ विश्ववादापोटी भ्रामक व पोकळ सिद्धांत उराशी बाळगणेही योग्य नाही. ज्यांच्यात क्रीडानैपुण्य आहे ते या क्षेत्रात श्रेष्ठ ठरतात आणि परिश्रम केले तर हे श्रेष्ठत्वही प्राप्त करता येते, हेही एक असेच भ्रामक अर्धसत्य आहे. हा सिद्धांत मानला तर काही राष्ट्रे सतत पराभूत होत राहणार व दुसरी काही राष्ट्रे नेहमीच विजयी होत

राहणार हाही तर्क मानावा लागेल. असे झाले तर सारा मानवीसमाज कधीच समानपणे प्रगती करू शकणार नाही; काही देश सबळ तर काही दुर्बल राहतील. सर्कशीतील विदूषक देखील उड्या मारण्यात व जड वजने उचलण्याच्या कलेत निष्णात असतोच. पण त्याचे काम करमणूक करण्याचे असते. आजची परिस्थिती कायम राहिली तर ऑलिम्पिक सामन्यांत युरोपीयेतर देश या विदूषकाप्रमाणे प्रेक्षकांची फक्त करमणूक करीत राहतील. प्रत्येक सामन्यात श्रेष्ठ विजय मिळेल असे नाही; पण निदान कधीतरी तसा विजय मिळविण्यासाठी प्रयत्न तर करायला हवेत की नकोत? परंतु प्रयत्न करूनही नेहेमीच पराभव मिळणार असेल तर मग प्रेक्षकांची निव्वळ करमणूक करण्याचे तरी व्रत जागरूकपणे स्वीकारलेले काय वाईट?

ऑलिम्पिक सामन्यांतील यशापयश काही खेळाडूंच्या शारीरिक दमदारपणावर ठरत नाही, तर चापल्यावरच अधिक ठरत असते, हे म्हणणेही अर्धसत्य आहे. आपण शारीरिक सामर्थ्याच्या बाबतीतही युरोपीयनांपेक्षा कनिष्ठ आहोत हे सत्य लपविण्याचा हा युरोपीयनेतरांचा प्रयत्न आहे. ज्यात शारीरिक चापल्याची कसोटी लागते अशा खेळांत तरी युरोपीयेतर देशांनी जागतिक कीर्ती मिळविली आहे काय? जगातील राष्ट्रा-राष्ट्रात आजच्यापेक्षा समानता निर्माण झाली की ऑलिम्पिक खेळांच्या स्पर्धेच्या निकालाचे स्वरूप काहीसे बदलण्याची शक्यता आहे. परंतु आजच्याप्रमाणेच भावी काळातही क्रीडाक्षेत्रांतील एखाद्या राष्ट्राचे नैपुण्य प्रामुख्याने शरीरसामर्थ्य, खेळांचे उत्तम शिक्षण आणि त्याचबरोबर शरीरचापल्य यावरच अवलंबून राहील.

मेलबोर्न सामन्यांतील भारताच्या कामगिरीचे सूक्ष्म परीक्षण केले तर पुष्कळच बोध मिळेल. मेलबोर्नला भारताचा ३१ वा क्रमांक लागला. त्या आधीच्या हेलिसिंकी येथील क्रीडास्पर्धात ३० वा क्रमांक मिळाला होता. स्वतंत्र भारतात भारतीयांना अधिक अन्न मिळण्याऐवजी कमीच मिळाले आणि ते अधिक दुर्बळ झाले असा तर्क मेलबोर्न येथील परागतीतून निघू शकतो. खेळाडूंनी खेळलेल्या खेळांचे पॉइंट मोजण्याच्या वेगळ्या वेगळ्या पद्धतीमुळे भारताच्या क्रमांकात वरकरणी फरक पडला असेल, हेही शक्य आहे.

एका दृष्टीने ऑलिम्पिकमधील भारताचे अपयश बोधप्रद आहे. प्रतिव्यक्ती माणूस खात असलेल्या अन्नाच्या उष्णांकांच्या ( कॅलरीज ) बाबत मेलबोर्न सामन्यांत भाग घेतलेल्या ६८ देशांमध्ये भारताचा निश्चितच शेवटचा क्रमांक असेल. विजयी राष्ट्रांत भारताचा ३१ वा तरी नंबर आला याचे कारण भारताचे आर्थिक धोरण वा नियोजन हे होय असे म्हणणे कठीण आहे. भारतातील काही

लोकांना इतरांहून तुलनेने चांगले अन्न मिळते, या वस्तुस्थितीलाच या यशाचे (!) श्रेय द्यावे लागेल. भारताच्या आर्थिक धोरणाची फलश्रुती शून्य आहे. एवढेच नव्हे तर अन्य काही क्षेत्रांत तर त्या धोरणाचे विपरीत परिणाम झाल्याचेच दिसून येते. उत्तम अन्न व उत्तम क्रीडाशिक्षण हे क्रीडाविषयक धोरणाचे महत्त्वाचे अंग आहे. ऑलिम्पिक क्रीडास्पर्धांचे निकाल पाहिले म्हणजे भारत सरकार आपल्या जनतेला चांगले व आरोग्यवर्धक अन्न देण्यात संपूर्णपणे असमर्थ ठरले आहे असे म्हणावयास हरकत नाही. भारतातील क्रीडाशिक्षणही चुकीच्या दिशेने दिले जाते. खेळातील दमदारपणा ही उत्तम शिक्षणाची दुसरी बाजू आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. भारताच्या दुसऱ्या नियोजनात खेळासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेच्या आता फक्त तिसरा हिस्सा रक्कम खर्च केली जाईल असे सांगण्यात आले आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांची भारतात कशी उपेक्षा चालू आहे या गोष्टीचे हा निर्णय हे उदाहरण आहे.

जुन्या सत्ताधाऱ्यांच्या जागी आलेले नवे सत्ताधारी नेहमीच जुन्या सत्ताधाऱ्यांच्या पद्धती आणि प्रतीके स्वीकारीत असतात. आपण जुन्या सत्ताधाऱ्यांचे कायदेशीर वारस आहोत; उपटसुंभ व म्हणूनच बेकायदेशीर वारस नाही हे सिद्ध करण्याच्या प्रयत्नाचा कदाचित हा एक भाग असावा. परंतु भोवतालच्या सर्व प्रश्नांचा स्वतःच्या बुद्धीने विचार करण्याच्या प्रवृत्तीचा अभाव आणि परिचित अशा जुन्याच मार्गाने जाण्याची प्रवृत्ती यामुळेच अधिकांशाने नवे सत्ताधारी जुन्यांचे अनुकरण करीत असावेत. क्रांती ही नेहमीच अपेक्षा फार उंचावते पण प्रत्यक्षात त्या फारच कमी पुऱ्या करीत असते याचे हेच एक कारण असावे. अलीकडच्या काळातील कोणत्याही क्रांतीपेक्षा भारतीय क्रांतीचे या प्रवृत्तीमुळे अधिक नुकसान झाले आहे. याचा दोष स्वतंत्र भारताचे राज्यकर्ते व सुशिक्षित वर्ग यांच्याकडेच विशेषत्वाने आहे. ब्रिटिशांच्या जुनाट कल्पनांनी सत्ताधारी व सुशिक्षित इतके भारावून गेले आहेत की ते देशाचे पुनरुज्जीवन करण्याच्या कामी कुचकामी ठरले आहेत.

भारतात क्रिकेटची वाढती मिजास आहे. आर्थिक सहाय्य व इतर मार्गांनी क्रिकेटला सरकारही प्रोत्साहन देत आहे. भारतीय सत्ताधाऱ्यांना व सुशिक्षित वर्गाला जडलेल्या भयानक अशा एका व्यापक मानसिक आजाराचेच हे एक लक्षण आहे. या आजारामुळेच भारताचे अंतर्गत व परराष्ट्र धोरण भ्रष्ट झाले आहे. क्रिकेट हा राजेमहाराजे व गुलामांचा खेळ आहे. ब्रिटिश राष्ट्रकुटुंबातील देश सोडून अन्यत्र कोठेही तो खेळला जात नाही. या राष्ट्रकुटुंबाचे

गोरे मालक तो खेळ आपल्या सरंजामशाहीचा सुखद वारसा म्हणून खेळतात आणि त्या राष्ट्रकुलातील त्यांचे छोटे रंगीत सहकारी आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्याची नक्कल करण्याच्या प्रवृत्तीतून तो खेळत असतात. क्रिकेटमुळे शरीरसौष्ठवही लाभत नाही किंवा त्यात भारताला आंतरराष्ट्रीय श्रेष्ठत्वही मिळविता आलेले नाही. खरें म्हणजे प्रेक्षकांचीहि या खेळांत करमणुक नसते. काही थोडा वेळ सोडला तर हा खेळ पाहतानाही काही विशेषशी मजा वाटत नाही. एखाद्या देशाचे क्रीडाविषयक धोरण योग्य आहे की अयोग्य आहे हे ठरविण्याच्या तीन प्रमुख कसोट्या आहेत. (अ) खेळाडूचे मजबूत व सुंदर शरीर (आ) खेळाडूंतील आत्मानुशासन (शिस्त) (ई) खेळाडूने स्वतःच्या देशांत आदर्श निर्माण करणे आणि स्वतःला व त्याबरोबरच आपल्या देशाला जागतिक मान्यता मिळवून देणे. यापैकी एकाही उद्देशाचे पाऊल क्रिकेटमुळे पुढे पडत नाही. परंतु तरीही सुशिक्षित वर्ग व सरकार या उधळ्या खर्चिक खेळावर देशाचा अफाट पैसा व वेळ खर्च करीत असतात. विविध क्रीडा संघटनांतील गटबाजीमुळेही भारतीय क्रीडाक्षेत्राचा चुथडा झाला आहे. शारीरिक खेळ, कुस्त्या आणि फुट बॉल, हॉकी यांसारख्या खेळांना भारतीयांनीं प्रामुख्याने प्रोत्साहन दिले पाहिजे. धांवणे, उड्या इत्यादी खेळ पाह्यला जसे सुंदर तसे समाजबांधणीलाही उपकारक आहेत. सर्वांगसुंदर व्यायाम व नृत्य या दोन्ही परस्परनिकट कला आहेत, हे फार पूर्वीपासून मानले जाते. रंगीत दुनियेतील राष्ट्रांनी खेळांसाठी राखून ठेवलेला आपला सर्व पैसा व वेळ शारीरिक खेळ, कुस्त्या यांसारख्या खेळांवरच खर्च केला पाहिजे. दमदारपणा व शरीरसामर्थ्य या बाबतीत गोऱ्या दुनियेशी बरोबरी करायला काळ्या दुनियेला फार दीर्घकाळ लागेल. कारण त्यासाठी त्यांना सकस व भरपूर अन्न खायला मिळाले पाहिजे. परंतु दमदारपणा, चांगले क्रीडाशिक्षण, अन्न आणि आत्मानुशासन या सर्व गोष्टी परस्परांशी संबंधित आहेत. रंगीत देशांनी आपल्या क्रीडाविषयक धोरणाची आखणी बुद्धिमत्तेने केली पाहिजे आणि दमदारपणा व चांगले अन्न आणि उत्तम शिक्षण व आत्मानुशासन ही चारही उद्दिष्टे साध्य केली पाहिजेत. या चारही बाबतींत रंगीत देशांची धोरणे अपयशी ठरली आहेत. सरकारचे धोरण कसे प्रभावी होऊ शकते याचे एक उदाहरण जर्मनीचे आहे. या धोरणामुळेच पूर्व व पश्चिमजर्मनी मेलबोर्न सामन्यांत एकत्र आली आणि युद्धात उद्ध्वस्त झालेल्या जर्मनीने क्रीडाक्षेत्रातील आपले पौरुषत्व आणि श्रेष्ठता जगाला पुन्हा दाखविली. हंगेरीच्या काही खेळाडूंनी आपल्या देशास परत जावयास नकार देऊन निर्धारपूर्ण धोरणाची प्रभावकारिता दुसऱ्या एका

क्षेत्रात सिद्ध केली. कितीही जुलूम झाला तरी मानव त्याचा प्रतिकार केल्याशिवाय रहात नाही हे त्या खेळाडूंच्या कृतीनें सिद्ध झाले. मेलबोर्न सामन्यांत संयुक्त जर्मनीने ४ था क्रमांक पटकावला आणि २०६·५ पॉईंटस् जिंकले तर हंगेरीने ५ वा क्रमांक व १९३ पॉईंटस् मिळविले.

ऑलिम्पिक सामन्यांचे हे विश्लेषण पुष्कळांना कदाचित पटणारही नाही. काहीजणांना वाटेल की क्रीडाक्षेत्रात मानवसमाजाची गोरे व गौरेतर रंगीत अशी विभागणी करण्याचा हा प्रयत्न योग्य नाही. खरे म्हणजे ही विभागणी नाहीशी व्हावी असाच माझ्या या विश्लेषणाचा हेतू आहे. आहे त्या वस्तुस्थितीचा विचार करून जे आपली धोरणे आखतात तेच लोक आपणाला अभिप्रेत असलेल्या कल्पनेप्रमाणे जग बदलू शकतात. अपरिपक्व व भोंगळ विश्ववादी जग कधीच बदलू शकलेले नाहीत. उघड प्रतिगामी लोकांपेक्षा हे अशाप्रकारचे विश्ववादीच जास्त घातक असतात. त्यांचा उत्साह वस्तुस्थिती बदलू शकत तर नाहीच उलट त्यामुळे माणसांची मने मात्र पंगू बनतात. प्रत्यक्ष आहे त्या जगांमध्ये त्यांना अपेक्षित असे जग ते पहात असतात. आपल्या वांशिक श्रेष्ठत्वामुळेच युरोपीय लोक क्रीडाक्षेत्रातही श्रेष्ठ ठरले आहेत असे म्हणणाऱ्या उघड प्रतिगामी लोकांविषयी न बोललेच बरे. इतिहास व जीवशास्त्र या दोन्हींच्या दृष्टीने हा सिद्धांत खोटा आहे. इतर क्षेत्रांतील गौरवर्णीयांच्या श्रेष्ठतेप्रमाणेच क्रीडाक्षेत्रातील त्यांचा वरचढपणा देखील केवळ एक इतिहासजन्य घटना आहे, आणि ती कदाचित् आता हळूहळू नाशाच्या मार्गांवर आहे. क्रीडाक्षेत्रातील अमेरिकेच्या श्रेष्ठत्वाचे थोडे तरी श्रेय अमेरिकेतील काळ्या नीग्रोंकडे आहे. अनुकूल परिस्थिती असली म्हणजे रंगीत लोकही श्रेष्ठ क्रीडानैपुण्य दाखवू शकतात याचे नीग्रोंचे क्रीडाप्रावीण्य हे निदर्शक चिन्ह आहे.

खरा प्रश्न असा आहे. मानवा-मानवामधील इतर क्षेत्रांतील विषमतेप्रमाणेच क्रीडाक्षेत्रातील असमानता जाणीवपूर्वक केलेल्या मानवी प्रयत्नाद्वारे नष्ट होणार आहे की ते कार्य अदृश्य नियतीच करणार आहे? जाणीवपूर्वक मानवी प्रयत्नांनी हे कार्य झाले तरच समतेची आशा आहे. आणि नियतीच हे काम करणार असेल तर काही वर्षांनी कदाचित् गोऱ्यांऐवजी रंगीत मानवीसमाज इतर क्षेत्रांप्रमाणे क्रीडाक्षेत्रावर आपले प्रभुत्व प्रस्थपित करतील; म्हणजे पुन्हा गौर आणि रंगीत मानवी समाजातील विषमता, असमतोल दुसऱ्या बाजूने कायम राहील.

ऑलिम्पिक सामन्यांचा सर्व मानवसमाजाच्या दृष्टीने विचार करायला गौरवर्णीयातील बहुसंख्य लोक तयार होणार नाहीत. कारण त्यांना या क्षेत्रात

निरंतर मिळत असलेल्या श्रेष्ठ पदावरून त्यांचे उच्चाटन होईल असे भय त्यांना वाटेल. आणि बहुसंख्य रंगीत लोकही असा विचार करायला तयार होणार नाहीत. कारण ते निर्जीव, निष्काळजी व वस्तुस्थितीचे ज्ञान नसलेले असे आहेत. रंगीत लोकांचे नेते गोऱ्या देशांच्या या किंवा त्या गटांपासून प्रेरणा घेऊन गुलामी वृत्तीने आपली मते बनवीत असतात. अमेरिकेतील व युरोपीय देशांतील लोकांवर आता नव्याने विचार करण्याची जबाबदारी आहे. त्यांनी आपल्या कातडीचा रंग विसरून विचार करावा. त्यांच्याजवळ क्रीडाक्षेत्रात लागणारी शरीर-शक्ती व शिक्षण आहे. आणि त्यांच्या म्हणण्याचा प्रभावही अधिक पडतो. करुणापूर्ण विवेकबुद्धीची ही हाक संबंधितांना ऐकू जाईल अशी थोडीशी आशा वाटते. क्रीडाक्षेत्रातील आपल्या अपार कनिष्ठ दर्जाचा विचार आता रंगीत राष्ट्रांनीही केला पाहिजे. तसा विचार करताना भवितव्यासंबंधी कधी कधी निराशाही वाटेल. पण आपले क्रीडाविषयक धोरण भयानक मूर्खपणाचे आहे हे परि-स्थितीत दडलेले सत्य आता त्यांनी ओळखलेच पाहिजे.

• • •

## भारतीय सेना

असे एक युग होते की, माझ्यासारख्या माणसाला बंदुक ही एक अभद्र गोष्ट वाटत होती आणि ती घेऊन जाणाऱ्याला आम्ही अपराधी समजत होतो. किमान त्याची उपेक्षा तर निश्चितच करीत होतो. स्वराज्य नव्हते तेव्हाचा तो काळ होता. आज स्वराज्य आहे. अद्यापही बंदुक मला त्याज्यच वाटते. मात्र भारतीय जनतेचा सेवक असलेल्या बंदुकधारी माणसाविषयी मला अलीकडे अतिशय प्रेम वाटू लागले आहे.

परकीय राजवटीविरुद्ध जे लोक लढले त्यांनी देशाच्या सेनेचा अद्याप-पर्यंत कधी थोडासुद्धा अभ्यास केलेला नाही. त्यामुळे त्यांचे व त्याबरोबरच देशाचे नुकसानच झालेले आहे. त्यांच्यापैकी काहींना वारसदार या नात्याने दिल्लीची गादी आणि त्याबरोबर परकीय शासनाने उभारलेली सेना देखील मिळाली. गादी मिळालेल्या मंडळींनी जशा इतर सर्व परंपरागत परकीय पद्धती अविचाराने अंगीकारल्या, तसेच ब्रिटिशांनी उभारलेले सैन्यही जसेच्या तसे स्वीकारले. वारसादाखल प्राप्त झालेल्या या संपत्तीत उगीच इकडची तिकडची भर घातली की आपले काम संपले असे त्यांना वाटू लागले.

स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतलेला माझ्यासारखा एक माणूस आज भारतीय सेनेविषयी प्रथमच लिहीत आहे. बुद्धीत दोन विभिन्न कप्पे नसलेला हा माणूस आहे. तो पूर्वेतिहासाचे निव्वळ गुणगान करीत भूतकाळात रमणारा 'पीछे-देखू' माणूस नाही. तो भविष्यकाळात पहात आहे; आपल्या जनतेची सुस्थिती व समृद्धी यांकडे त्याची नजर आहे. जोवर समतेच्या पायावर आधारलेली विश्वरचना प्रस्थापित होत नाही तोवर आपले राष्ट्र सुस्थित व शक्तिशाली बनविण्याचा आपला निर्धार असला पाहिजे असे त्याचे मत आहे.

'पोटार्थ्यांची, भात-शिपायांची गर्दी' अशी भारताच्या सेनेची अगदी परवापरवापर्यंत जे लोक कुचेष्टा करीत होते तेच आज तिच्या महान् वैभवाची गाथा व परंपरा यांचे अवास्तव गुणगान करण्यात गुंतले आहेत. या दोन परस्परविसंगत भूमिका आहेत. अशा परस्परभिन्न भूमिका कधी कधी अंशतः बरोबर असण्याची शक्यता असते. पण सेनेच्या बाबतीत मात्र तसे नाही. किमान गेल्या हजार-बाराशे वर्षांत हिंदी सेना कधीही महान या संज्ञेस पात्र नव्हती आणि इंग्रजी अमदानीत तर नव्हतीच नव्हती.

तसे असते तर १९३९ च्या युद्धात युरोपच्या आघाडीवर ती कधीच का पाठविण्यात आली नव्हती ? उत्तर आफ्रिका, दक्षिण व पूर्व आशिया येथे तिचा उपयोग करण्यात आला. पण युरोपात मात्र नाही. असे का ? १९१४ साली किंवा त्यानंतरच्या काळात ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना भारतीय पलटणीबद्दल कोणत्याच दृष्टीने विश्वास राहिला नसावा. भारतातील राष्ट्रीय जागृती हे याचे एक कारण असावे. म्हणूनच गंभीर प्रसंगी त्यांना हिंदी सैन्य विश्वासार्ह वाटले नाही. दुसरी एक अशी शक्यता आहे की, दुसऱ्या महायुद्धात युरोपमध्ये अनेकदा गंभीर युद्धपरिस्थिती उद्‌भवली होती. त्या वेळी केवळ सैनिकांचे आंधळे शिस्तपालन किंवा शौर्य त्या परिस्थितीशी सामना करण्याच्या दृष्टीने पुरेसे नव्हते; स्वयंस्फूर्त व शिस्तबद्ध पद्धतीने काम करणाऱ्या आणि प्रसंगी निर्माण होणाऱ्या गरजेप्रमाणे स्वयंस्फूर्तीने कृती करणाऱ्या अशा कित्येक शूर शिपायांची त्या वेळी आवश्यकता होती. ही गुणवैशिष्ट्ये भारतीय सेनेत १९३९ साली नव्हती. १९१४ सालीही नव्हती आणि १९२६-२७ सालात देखील नव्हती. कदाचित् इ. स. ८०० नंतर भारतीय सेनेत या गुणवैशिष्ट्यांचा कधीच साक्षात्कार झाला नसेल. याला दाखला हा की, १५२६ मध्ये एका मुसलमान राजाचा व त्याच्या सेनापतीचा परकीय आक्रमकांविरुद्धच्या युद्धात पराभव झाला होता. तसेच १५२७ मध्ये एका हिंदू राजाला व त्याच्या सेनापतीला आक्रमकांकडून पराजय पत्करावा लागला होता.

या लेखात स्वकीय सत्ताधारी व परकीय आक्रमक यांच्या संदर्भातच विषयाचा विचार केला आहे. म्हणून लेखांतील चर्चा भारतीय सेनेशीच प्रामुख्याने संबंधित आहे.

केवळ काही सैनिकांच्या वैयक्तिक शौर्यामुळे एखादे सैन्य महान् अथवा उत्कृष्ट ठरत नाही. मध्ययुगीन राजस्थानी सेनेतील अनेक शिपायांनी व अधिकाऱ्यांनी व्यक्तिगत शौर्य दाखविले तरी ती सेना श्रेष्ठ किंवा उत्तम होती असे म्हणता येणार नाही. टॉडने आपल्या इतिहासात हे सत्य झाकण्याचा प्रयत्न केला आहे. ब्रिटिश अमदानीत काही शिपायांना शौर्याबद्दल ' व्हिक्टोरिया क्रॉस ' मिळाले होते. तरी ब्रिटिश काळांतील भारतीय सेना महान् आणि उत्तम होती असे म्हणतां येत नाही. कदाचित प्राचीन भारताचा कालखंड वगळल्यास, भारतात महान् सेनेची वैभवशाली परंपरा कधीही नव्हती ही सरळ साधी वस्तुस्थिती मान्य व्हावी. त्यानंतरच्या काळात काही तुरळक वैयक्तिक पराक्रमाची व मर्दुमकीची परंपरा दिसत असली तरी तिला भारतीय सेनेची महान् परंपरा म्हणून गौरविणे चूक आहे. अशी चूक देशाचा नाश करण्यासही कारणीभूत होऊ शकते.

ब्रिटिशकालीन भारतीय सेनेतील काही ' पोटार्थी ' शिपायांनी व त्यांच्या विलायतछाप अधिकाऱ्यांनी वैयक्तिक पराक्रम गाजविल्याची अनेक उदाहरणे आहेत. या त्यांच्या वैयक्तिक शौर्याची व भारतीय सेनेच्या महानतेची आज गल्लत केली जात आहे. भारतीय बुद्धी किती विवेकहीन व पढीक बनली आहे याचे हे प्रमाण आहे. जनतेने या तथाकथित श्रेष्ठ सैनिकी-परंपरेच्या बकवासीकडे दुर्लक्ष केले पाहिजे. असा दिवस उगवेल अशी आशा करू या.

आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी अथवा निव्वळ एक सैद्धान्तिक सत्य सांगण्यासाठी मी हा युक्तिवाद करीत नाही. उपयुक्ततेच्या दृष्टीनेच वस्तुस्थिती समजून सांगण्याचा माझा प्रयत्न आहे. आपली सेना आज सामर्थ्यशाली नाही. आपणास ती सामर्थ्यवान बनवावयाची असेल तर वस्तुनिष्ठ बुद्धीने त्यासाठी प्रयास केला पाहिजे. परंपरागत पद्धतींना चिकटून राहून किंवा त्यांत किरकोळ भर घालून आपणाला महान् सेना उभारता येणार नाही.

किरकोळ सुधारणा करून परंपरागत गोष्टीच आपण मूलतः कशा चालू ठेवल्या आहेत याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतीय सेनेतील अधिकाऱ्यांना व शिपायांना पराक्रमाबद्दल देण्यात येणारी मानचिन्हे. स्वतंत्र भारत आपल्या शूर सैनिकांना जी मानचिन्हे देतो त्यांच्यात व इंग्रजी राज्यातील पदव्यांत

हास्यास्पद साम्य आढळते. पूर्वीच्या 'व्हिक्टोरिया क्रॉस'ची 'व्ही. सी.' ही आद्याक्षरे आणि सांप्रतचे व्ही. सी. (वीर-चक्र) अथवा पी. व्ही. सी. (परम-वीरचक्र) ही गोष्ट सिद्ध करतात. युरोप-अमेरिकेत ११ नोव्हेंबरला पहिल्या महायुद्धानंतरच्या युद्धबंदीच्या स्मरणार्थ दुपारी ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळले जाते. स्वतंत्र हिंदुस्थानातील हुतात्मा-दिनी म्हणजे ३० जानेवारीला त्या प्रथेची सहीसही नक्कल करून दुपारी ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळण्याची पद्धत रूढ करण्यात आली. ११ वाजण्याची ही वेळ गांधीजींच्या अथवा कोणत्याही भारतीय पुरुषाच्या हौतात्म्याशी संबंधित नाही. सेनेची दैनंदिन कामे देखील अद्याप पूर्वपरिपाठानुसारच चालू आहेत. सरकारच्या हिशेबी भारतीय सेना काहीशी मनोरंजक व प्रतिष्ठित अशी एक सर्कस असावी. 'अबाईड विथ मी ओ लॉर्ड' ही बँडवरील ख्रिश्चन सुरावट देखील अद्याप पूर्ववत् वाजविण्यात येत आहे. स्वतंत्र भारतात अशा प्रकारची सुरावट वाजविली जाणार नाही अशी उमेद होती. निदान त्यांत हिंदू, शीख, मुसलमान आदि सुरावटी, धर्मनिरपक्षतेचा डांगोरा पिटणारे हे सरकार सामील करील अशी अपेक्षा होती. अशा प्रकारच्या जुन्या लष्करी प्रथांतून क्वचित् पराक्रमाचा आभास होत असला तरी त्यांचे निरर्थक अनुकरण होत असल्यामुळे त्या प्रथा घृणास्पद वाटू लागतात. ख्रिश्चन सुरावटीची सामुदायिक नक्कल तर फारच बेकार व दुर्बल वाटते. भारतीय सैनिक व त्यांचे तरुण अधिकारी यांना या प्रथेची किळस कधी कशी वाटली नाही हा एक चिंतेचा विषय आहे. या अधिकाऱ्यांना आणि आम्हांला हे कधी कळणार की, भारताला आज परंपरेच्या अंध अनुकरणाची नाहीतर सुधारणा व सृजन यांची गरज आहे?

भारतीय सेनेसंबंधी मी करतो ती टीका सांप्रत तरी खरी नाही; कारण पाकिस्तानबरोबरच्या सप्टेंबर, १९६५ मधील युद्धांत या सेनेने आपले पाणी दाखविले आहे, असे मला अडविण्यासाठी कोणी म्हणू शकतील. भारतीय लष्कराची पाक लष्कराशी तुलना करणे ही गोष्ट आपली विवेकशक्ती कुंठित झाल्याचे लक्षण आहे; पाकिस्तानची लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येच्या फक्त एक-पंचमांश आहे आणि त्याची फौजही भारतीय फौजेच्या एक-चतुर्थांशापेक्षा बहुधा अधिक नाही. अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या युद्धसामग्रीला फार महत्त्व दिले जाते. ही अमेरिकन हत्यारे कितीही सामर्थ्यवान असली तरी ती वापरण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्याच्या अभावामुळे किंवा त्यांच्या संपूर्ण तंत्राच्या अज्ञानामुळे पाकच्या बाबतीत ती निरुपयोगी ठरली ही गोष्ट या संदर्भात विसरता येणार नाही. भारताचे औद्योगिक उत्पादन लक्षात घेता पाकपेक्षा

भारताची शक्ती, तिप्पट होती. पाकशी झालेल्या युद्धात विजय मिळविला म्हणून भारतीय सेना महान ठरत नाही. कारण ते खऱ्या अर्थाने युद्ध नव्हते; चकमकी होत्या. तीन-चार दिवसांचा काळ सोडला तर भारत-पाक युद्ध काहीशा सौम्य पद्धतीनेच लढले गेले. अर्थात् या युद्धात हिंदुस्थानने जे मिळविले त्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केलेच पाहिजे.

जनता आणि देशाची सेना यांच्यात काही प्रमाणात परस्पर नाते असावे लागते. असे नाते नसले की देश व जनता यांचा मोठ्या युद्धात पराभव होतो. हा धोका एकदा स्पष्ट झालाच आहे. पाकशी झालेल्या युद्धानंतर पाकवर मिळविलेल्या आणि न मिळविलेल्याही काल्पनिक विजयाचा आनंद काहीसा असंगत व असभ्य होता. एखाद्या हत्तीने म्हशीवर (रेड्यावर नाही) विजय मिळवून तुष्ट व्हावे तसेच या बाबतीत काहीसे झाले. देशाचे नेतृत्व परिपक्व असते तर जे काही रणमैदानात कमाविले त्याचा देशाच्या पुनर्निर्माणाचा आधार व अध्ययनाचा प्रारंभबिंदू म्हणून उपयोग केला गेला असता. निदान विजयाचा नारदमोह-खोटा आनंद – तरी दाखविला गेला नसता. नेतृत्व परिपक्व असते तर युद्धबंदीनंतर त्याने स्वतःच्या व देशाच्या बुद्धीचा तोल सांभाळला असता; प्रत्येक संबंधित गोष्टीचे गंभीरपणे अध्ययन करण्यात आले असते. अठरा वर्षांचा नामर्दपणाचा शाप संपला आणि प्रथमच आक्रमक शत्रूच्या प्रदेशात घुसला तेव्हां देशाने दडपण आणून त्याच्याशी आपणास लढाई करावयास लावली याबद्दल परिपक्व नेतृत्वाने देशाचे अभिनंदनच केले असते. लोक आपल्या भवितव्याबाबत जागरूक होत आहेत आणि त्यांचे पुढारीही व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यापेक्षा राष्ट्राच्या पुनर्निमाणाच्या कामी लागले आहेत अशीही आशा या विजयानंद प्रदर्शनातून दिसली असती तरच मी अपेक्षिलेले प्रश्नाचे सम्यक अध्ययन झाले असते; सुधारणा करण्याची, नव-निर्माण करण्याची चर्चा झाली असती. पण त्याऐवजी आम्ही काल्पनिक विजयानिमित्त ‘ विजयद्वारे ’ उभारण्यात मग्न होऊन बसलो.

आपणांस अद्याप किती काम करावयाचे आहे हे समजून घेण्यासाठी १९६५ सप्टेंबरमधील भारत-पाक युद्ध समग्र स्वरूपात समजून घेतले पाहिजे. राजस्थानच्या दिशेने सिंधवर हल्ला करण्यात आला. हे कृत्य एक दुस्साहस होते; ते शिक्षापात्र नसले तरी नादानपणाचे होते. एखाद्या मोठ्या कोल्ह्याने किंवा चिपांझी वानराने आपल्यापेक्षा लहान प्राण्याला उगीचच थपडा माराव्यात तसे सरकारी नेते किंवा सेनेचे अधिकारी, किंवा बहुधा दोघेही, प्रहार करीत होते.

सरकारी नेते आणि सेनाधिकारी या दोघांनीही युद्धात कमाविलेल्या व गमाविलेल्या जमिनीबाबत चुकीची माहिती देशाला दिली. युद्धबंदीनंतर एक आठवड्याने जनतेला सांगण्यात आले की, भारताने एकूण २५० चौरस मैल जमीन गमाविली आहे. वस्तुतः पाकिस्तानच्या ताब्यात त्यावेळी हिंदुस्थानची एक हजार चौरस मैल जमीन होती आणि अजून देखील आहे. हिंदुस्थानने त्या बदल्यात पाकिस्तानची फक्त ८०० चौरसमैल जमीन मिळविली.

तरी देखील म्हशीच्या तुलनेने हत्तीने काही निर्णायक विजय जरूर मिळविला आहे. तो अधिक लोकसंख्येच्या बळावर मिळाला तितकाच जवान अधिकाऱ्यांच्या व्यक्तिगत शौर्यामुळेही मिळाला. तथापि आणखीही बरेचसे व्हावयास हवे होते. त्या वेळी फक्त एकच मार्ग राहिला होता. तो समजावयास रणनीतिज्ञ असण्याची गरज नाही. एकतर छांब-जोरियाच्या प्रदेशात घुसणाऱ्या पाकिस्तानी सैन्याला घेरून नेस्तनाबूद करावयास हवे होते आणि त्यासाठी आवश्यक तर सियालकोट पण ताब्यात घ्यावयास हवे होते. अथवा लाहोरच्या दिशेने जी मुसंडी मारली होती ती पूर्ण करावयास हवी होती. लष्करी लक्ष्य तर त्यामुळे साधले असतेच पण त्याबरोबरच एका अत्यंत उपयुक्त अशा राजकीय उद्दिष्टाची पूर्तीही त्यामुळे होऊ शकली असती. पण पहिले तीनचार दिवस वगळल्यास या उद्दिष्टांपैकी एक देखील प्राप्त करण्याचा प्रयत्न झाला नाही. त्यानंतर युद्धात केवळ टिकून राहण्याचाच पवित्रा घेतला गेला किंवा निरुद्देश प्रहार चालू ठेवण्यात आले.

ठाम सरकारी मार्गदर्शनाचा त्या वेळी अभाव होता हे यावरून स्पष्ट होते. १ सप्टेंबरपासून २३ सप्टेंबरपर्यंत भारत सरकार जणू अस्तित्वातच नव्हते. या काळांत सैनिकी कारवाईच्या महत्त्वाच्या उद्देशांची चर्चा आणि तत्संबंधी निर्णय करणे यासाठी कॅबिनेटची क्वचित एखादी बैठक झाली असेल. संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका आणि धोरण याबाबत विचार करण्यासाठीच प्रामुख्याने काही बैठका झाल्या असल्याची शक्यता आहे. काही एक विशिष्ट उद्दिष्ट ठेवून वागणारे क्रियावान कॅबिनेट किंवा तसा एखादा जरी नेता त्या वेळी असता तर सप्टेंबरच्या त्या २३ दिवसांत उपरिनिर्दिष्ट दोन लक्ष्यांपैकी एखादे तरी मिळविता आले असते. व्यापक सैनिकी मार्गदर्शनाचा देखील तितकाच अभाव असावा अशी शंका येते. काही सेनापतींनी आपआपल्या परीने कदाचित क्षमता दाखविलीही असेल. मर्यादित कारवाई करून पायदळ आणि वायुसेना यांच्या प्रमुखांनी देखील योग्यता दाखविली असण्याची शक्यता आहे. या बाबतीत संपूर्ण

हकीकत माहीत झाल्यानंतरच काही निर्णय करणे शक्य आहे. तरी देखील सांप्रत जी काही माहिती उपलब्ध आहे तिच्या आधारे एक गोष्ट सिद्ध झालेली आहे; आणि ती म्हणजे त्या दिवसांत सरकारी मार्गदर्शनाचा अभाव होता आणि त्या अभावामुळेच बहुधा सैनिकी नेते कोठे आवश्यकतेपेक्षा अधिक सावधानतेने वागले तर कोठे विनाउद्देश घाव घालीत राहिले. परिणामतः त्यांचेपुढे एखादे व्यापक लक्ष्य शिल्लक राहिले नाही.

याचे एकच प्रमाण सांगितले म्हणजे पुरेसे आहे. ६ आणि ९ सप्टेंबरच्या मधल्या तीनचार दिवसांत जनतेला सांगण्यात आले की, भारतीय फौजा लाहोर-जवळच्या मोगलपुरापर्यंत पोहोचल्या आहेत; तेथील रेडिओ स्टेशन निकामी करण्यात आले आहे आणि काही तासातच फौज लाहोर शहरात घुसणार आहे. वृत्तपत्रांतील या बातम्या दिल्लीस्थित संरक्षण आणि माहिती खात्याच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या निवेदनानुसार प्रसिद्ध झाल्या असणार. कारण त्या तीन-चार दिवसांत आघाडीवर पुढे जाणाऱ्या सैनिकांबरोबर वृत्तपत्रांचे वार्तांहर नव्हते. नंतर मग प्रचाराची दिशा एकदम पालटली. लाहोरमधील जनतेला अन्न पुरविणे आणि त्या शहराचे नागरिकशासन सांभाळणे या गोष्टी इतक्या दुरापास्त होत्या, की लाहोर घेण्याची कल्पना कधी डोक्यातच आली नाही, असे सांगण्यांत येऊं लागले. हा युक्तिवाद निराधार व हास्यास्पद होता.

पहिल्याच तडाख्यात काही विजय मिळाले. तसे नेहेमीच मिळतात. पण नित्याप्रमाणे त्या वेळीही उद्दिष्ट पूर्णपणे प्राप्त करण्यात अपयश आले. कारण सरकारचे ठाम मार्गदर्शन नव्हते. सैन्याचे नेतृत्वही घाबरले आणि स्वतःच्या जबाबदारीवर दुसऱ्या तडाखा त्याने दिला नाही. सरकारी व सैनिकी नेतृत्वांत ठाम धोरणाचा अभाव होता हे जसे एक कारण तसे पाकिस्तान आणि चीन यांच्याबाबत कोणते व्यापक लक्ष्य असावे याचाही निर्णय झालेला नव्हता हे दुसरे कारण होते. तेच अधिक उचित वाटते. चालू हालचालींबाबत निर्णय तर घेताच आले नाहीत, पण पर्यायी धोरणाचा देखील विचार केला नाही. निदान तसा जाहीर पुरावा तरी नाही. माझ्या माहितीप्रमाणे मंत्रिमंडळात अथवा संरक्षण खात्यातही पर्यायी धोरणाचा खल झालेला नाही. लक्षावधी सैनिक आणि हजारो सैन्याधिकारी यांना पाक आघाडीवर कूच करण्यासाठी सांगितले गेले तेव्हा तर पाकधोरणासंबंधीच्या उद्दिष्टाची जाहीर चर्चा त्याआधी अनेक वर्षे चालू ठेवून त्याबाबत निश्चित निर्णय घेतला जावयास हवा होता.

पहिल्या तडाख्यानंतर आणखी तडाखे देण्याबाबत दिसून आलेली असमर्थता आणि पाक-चीनविषयीच्या समग्र धोरणाचा अभाव यांचा काही परस्परसंबंध आहे काय? होय, आहे. पण संपूर्णपणे नाही. शिवाय समग्र धोरणाचा अभाव हे एकच या असमर्थतेचे कारण नाही. आणखीही काही गोष्टी आहेत. देशाची संरक्षणयंत्रणा निश्चित केलेल्या समग्र धोरणानुकूल बनविण्यातील सरकारचे अपयश हेही एक महत्त्वाचे कारण आहे. फील्ड मार्शल हिंडेनबर्गने एकदा म्हटले होते, " मुसोलिनीला इटालियन जनतेला ' इटालियन ' बनविण्यापेक्षा अधिक काही करता आले नाही. " म्हणजे इटालियनांना तो चांगले सैनिक बनवू शकला नाही. परंतु इटालियन हे शूर रोमनिवासीयांचे वंशज होते. लष्कराला श्रेष्ठ बनवावे लागते. जर्मन लष्कराचे उदाहरण या दृष्टीने लक्षात ठेवण्यासारखे आहे. जर्मन सैन्य पूर्वीपासून श्रेष्ठ होते असे नाही. जर्मन शिपाई देखील प्रथम भाडोत्री व भेकड होते. देशाची समाजपद्धती आणि धोरणे काहीही असोत, प्रत्येक देशाची स्वतःची म्हणून काही वैशिष्ट्ये असतात. ही वैशिष्ट्ये काळाबरोबर व धोरणांच्या अनुषंगाने बदलत असतात. भारतीय जनतेचीही काही वैशिष्ट्ये आहेत. भारतीय सेनेच्या पुनर्निर्माणाचा विचार करताना या वैशिष्ट्यांचा विचार केला पाहिजे आणि त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. भारताची संरक्षणव्यवस्था हे एक प्रभावी हत्यार बनविण्यासाठी या वैशिष्ट्यांना नव्या साच्यात घालून ती सुधारली पाहिजेत.

प्रस्तुत लेखात संक्षेपाने का होईना खालील गोष्टींबाबत विचार करणे प्राप्त आहे. १) तडाख्यामागून तडाखे देणे अथवा जिंकू किंवा मरू असा संकल्प २) अहिंसेचे तात्पर्य आणि ती लागू करण्याचे क्षेत्र, ३) भारतीय सेनेत काय दोष आहेत ते उदाहरणाने सिद्ध करण्याचा प्रयत्न, ४) जनतेची मनःस्थिती आणि तीत अपेक्षित परिवर्तन, ५) एका व्यापक संरक्षणनीतीची निर्मिती आणि आंतरराष्ट्रीय बाबतीत एका व्यापक उद्देशासह त्या धोरणाची अमलबजावणी, ६) संरक्षणात्मक तयारी म्हणून आणि आपले उद्दिष्ट प्रभावशाली पद्धतीने प्राप्त करण्याकरिता प्रहार करण्याची क्षमता बाणविणे. त्यासाठी ठोस उपाय.

सप्टेंबरमधील पाक-भारतातील लढाई आणि त्यात घडलेले मृत्यू यांना युद्ध म्हणत नाहीत. तीन हजारांहून कमी माणसे या लढाईत कामास आली असे सरकार सांगते. मरण पावलेल्यांच्या खऱ्या संख्येचा तिसरा हिस्सा कमी करून ही संख्या सरकार सांगत असेल. तसे सांगणे सोपे नाही हे खरे असले तरी देखील एकुण दहा हजारांवर लोक मेले नसावेत. वस्तुतः लढाईशिवाय जिंकलेले

युद्ध सर्वांत श्रेष्ठ होय. पण लढाई करावीच लागली, टाळणे अशक्यच झाले आणि अशा वेळी जनता आणि सेना जर मृत्यूला घाबरू लागली तर उद्दिष्ट-पूर्ती अशक्य आहे. तीन किंवा दहा हजार माणसे तर साध्या वादळात किंवा भूकंपातही मरतात. आणि कुंभमेळ्यासारखी चेंगराचेंगरी पाच-सहा वेळा झाली तरी देखील इतके लोक मरतील.

लाहोर घेण्यासाठी किंवा छांब-जोरियाच्या भागात पाकिस्तानी फौजेला घेरण्यासाठी जास्त माणसे बळी द्यावी लागली असती अशी शक्यता आहे. लाहोर युद्धात फक्त दीड डिव्हिजन सैन्य आघाडीवर पाठविण्यात आले होते आणि जवळपास तितकेच सैन्य तयार ठेवण्यांत आले होते असे इकडच्या तिकडच्या विश्वासार्ह चर्चेत बोलले जात आहे. ते खरे असेल तर तो मूर्खपणा होता. ६ सप्टेंबरच्या सरकारी घोषणेनंतर लाहोर कारवाईचे उद्दिष्ट स्पष्ट झाले होते. आणि त्याच्या प्राप्तीसाठी निदान तीन डिव्हिजन्स तरी आघाडीवर पाठवावयास हव्या होत्या आणि तितक्याच मागे तयार ठेवावयास हव्या होत्या.

इच्छोगिल कालवा आणि डेराबाबा नानक पूल यांबाबतच्या आणि आघाडी-वरील तत्सम अन्य चुका, दुर्घटना, विलंब किंवा दुःसाहस याविषयी मला कांही म्हणावयाचे नाही. यामुळे आणि पराभूतवादी मनोवृत्तीमुळे किंवा धोकेबाजीमुळे घडलेल्या चुका चांगल्यातल्या चांगल्या पलटणीकडूनही तिचे डावपेच अचूक असले तरी घडू शकतात. येथे प्रश्न आहे तो कोणते हुकूम देण्यात आले आणि त्याची अमलबजावणी कशी झाली हा. याबाबत काहीही माहिती उपलब्ध नसल्याने आहे तो पुरावा गोळा करून परिश्रमपूर्वक व प्रामाणिकपणे त्यांतून अनुमान काढणे एवढेच सध्या शक्य आहे.

सरकारचे आणि लष्कराचे निश्चित मार्गदर्शन नसल्यामुळे लक्ष्यप्राप्तीची साधने उद्दिष्टानुरूप नव्हती. अर्थात तरी देखील पहिल्याच तडाख्यात संपूर्ण इष्ट-सिद्धी झाली असती असे नाही. अशी सिद्धी असामान्यालाच मिळते. पहिला प्रहार अयशस्वी झाला तर फौजा पुन्हा एकत्रित कराव्या लागतात आणि शक्य तितक्या अल्पावधीत दुसरा किंवा तिसरा प्रहार करावा लागतो. या प्रक्रियेत रणसाहित्याची प्रचंड हानी होईल, कित्येक माणसे गमावतील हे उघड आहे. पण पाकशी झालेल्या युद्धात तर दोन-तीन हजार माणसे बळी पडताच दिल्लीत विजय चौक उभारणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे नाजूक हृदय धडधडायला लागले असावे अशी शंका येते.

या संदर्भात युरोपमधील काही युद्धांची उदाहरणे ध्यानात ठेवण्यासारखी आहेत. निर्धारित लक्ष्य साध्य करण्यासाठी युरोपीय लढायांत कधीकधी एक लाख लोकांना बळी जावे लागले आहे. गेल्या महायुद्धात सोव्हिएट रशियाचे जवळपास दोन कोटी लोक कामी आले. बर्लिनमध्ये दोन रात्रीतील हवाई हल्ल्यांत बॉम्बफेकीमुळे बेघर झालेल्या पाच लाख लोकांना एका दिवसात हालवून सुरक्षित जागी नेण्याची कठीण कामगिरी करावी लागली होती. जर्मनांच्या डझनावारी शहरांत तर एका दिवसात किंवा रात्रीत पन्नास-पन्नास हजार लोक एकेका शहरात हवाई हल्ल्यात मेलेले आहेत. युरोप आणि अमेरिकेचे काळीज मजबूत आहे. त्यांच्या तुलनेने आम्ही फारच कमजोर मनाचे आहोत. खरे म्हणजे युध्द म्हणजे काय हे आम्हांला माहीतच नाही.

आमचे लोक मरत नाहीत असे मात्र नाही. भूक, रोगराई आणि अशाच अनेक कारणांनीं येथे लक्षावधी लोक अकाली मरतात. ज्या मृत्यूंना वास्तविक येथील सामाजिक व्यवस्थाच जबाबदार आहे असे अकाली मृत्यू भारतीय मन निमूटपणे पत्करते. परंतु स्वेच्छेने वा अर्धस्वेच्छेने मरायला मात्र भारतीय जनता घाबरते. अकाली मृत्यू पावणारे लोक बहुतांश गरीब व कनिष्ठ वर्णीय असतात. म्हणून कदाचित् आम्ही त्याची पर्वा करीत नसू. युद्धातील मृत्यूंचे तसे नाही. गरीब जवानांप्रमाणेच सैनिक अधिकारीही युद्धात मरतात. त्यामुळे त्या मृत्यूची झळ ते ज्या मध्यम व उच्च वर्गातून आलेले असतात त्यांना देखील लागते. अर्थात् माझा हा एक तर्क आहे. निश्चित अनुमान काढण्यासाठी या प्रश्नाचे विस्तृत अध्ययन करणे जरूर आहे; जनमानसाचा तलास त्यासाठी घेतला पाहिजे.

लाहोर न घेताच हे युद्ध संपविण्यात आल्यामुळे या युद्धात निरर्थक आणि उगीच जास्त मनुष्यहानि झाली असे वाटते. लाहोरवर कब्जा करावयास पाहिजे होता असा माझा आग्रह का ? पाकिस्तानसंबंधी ठाम समग्रनीतीचा आग्रह आहे म्हणून हाही आग्रह आहे. गेल्या सतरा वर्षात सरकार असे ठाम सम्यक् धोरण आखू शकले नाही. पाकिस्तानी सैन्य व पाकिस्तानी जनता यांना बंड करायला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही काहीही केलेले नाही. तसेच भारतात हिंदु-मुसलमानातील दुरावा कमी करून त्यांना अधिक जवळ आणण्याच्या दृष्टीने आणि या मार्गाने देशाची फाळणी नष्ट करण्याच्या दिशेने आम्ही कांहीही केले नाही. परंतु हीही चर्चा मी जरा आगाऊच करीत आहे. पाकिस्तानाविषयी आपली व्यापक नीती काय असावी यासंबंधी माझे मत सांगताना या प्रश्नाची अधिक व संपूर्ण चर्चा करणेच योग्य ठरेल.

सांप्रत इतके म्हटले तरी पुरेसे आहे की, पाकविषयीच्या धोरणाबद्दल मनात दुविधा असल्यामुळे आपले सरकार परकीय, विशेषतः सामर्थ्यशाली बड्या राष्ट्रांच्या दडपणाला बळी पडले. या संदर्भात शेजारी राष्ट्रांव्यतिरिक्त आज रशिया व अमेरिका यांना महत्त्व आहे. अन्य देशांचा विचार करण्याची गरज नाही. रशिया व अमेरिका या दोन्ही देशांनी आपापल्या पद्धतीने भारतावर नरमाईने वागण्यासाठी दडपण आणले असावे असा संशय वाटतो. या देशांनी भारताला शांतिपाठही दिले असतील. त्याने भारत सरकार प्रभावित झाले असावे. कारण योगायोगाने भारत सरकारची उथळ अहिंसा व रशिया अमेरिकेची शांततेची बकवास यात साधर्म्य आहे.

शांतता व अहिंसा या दोन भिन्न धारणा आहेत. त्यांच्यात गल्लत केल्यामुळे फार मोठे नुकसान होत असते. भारतीय जनता व सेना यांनी या दोन विभिन्न धारणांच्या बाबतीत आपली बुद्धी स्वच्छ ठेवली पाहिजे. एक आदर्श या स्वरूपात शांती हे उत्कृष्ट व अमूल्य तत्त्व आहे. पण युरोप, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रसंघ हे आपणाला शांतीचा उपदेश करतात तेव्हा त्यामागील त्यांचा हेतू आपल्या लक्षात आला पाहिजे. रशिया व अमेरिका यांच्या सीमांवर आक्रमण झाले तर तेथील शांतीचे पुजारी कोणती भाषा वापरतील याचे उत्तर मला मिळेल काय? भारत-पाक संघर्षाचे स्वरूप मूलतः घरगुती आहे. दोन भिन्न राष्ट्रांतील हा संघर्ष आहे असे वरकरणी दिसत असले तरी त्याचा खरा संबंध भारत-पाकच्या अंतर्गत घटनांशी आहे. असाच अंतर्गत संघर्ष रशिया अमेरिकेत उद्या निर्माण झाला तर हे शांतिपाठक काय धोरण पत्करतील हेहि मला समजेल काय? हजारो मैलांवरून रशिया–अमेरिका भारताला शांतिपाठ देत आहेत. वास्तविक ज्या शांततेचा ते आम्हाला उपदेश करीत आहेत ती त्यांनीच स्थापन करावयाची आहे. या दोन बड्या राष्ट्रांनी आपले संबंध सुधारून जागतिक सरकार स्थापन केल्याशिवाय ही शांति जगात कधीही प्रस्थापित होणार नाही.

हिंदुस्थान व पाकिस्तान संघर्षाचा प्रश्न केवळ औपचारिक दृष्ट्या आंतरराष्ट्रीय आहे. अंतर्गतदृष्ट्या तो बहुतांशाने भारताचा राष्ट्रीय प्रश्न आहे. या प्रश्नाची सोडवणूक नेहेमीच युद्धाद्वारे करू पाहणारा माणूस गुन्हेगार आहे. परंतु आमच्यावर युद्ध लादले जाते तेव्हा त्यात विजय मिळविण्यासाठी ठाम धोरण आणि तदनुरूप राष्ट्राचे पुनर्निर्माण केले पाहिजे. संकल्प करून असे युद्ध लौकरात लौकर व यशस्वीपणे संपविले पाहिजे. असे न करणाराही गुन्हेगारच

समजला जाईल. युद्धामध्ये मनाचा निर्धार हीच शक्ती असते. या निर्धाराच्या पूर्ततेचे दोनच मार्ग असतात. जय अथवा मृत्यू. युद्धात आवश्यक असलेली दुसरी शक्ती म्हणजे विकसित कारखाने व शेती. तिसरी शक्ती उत्कृष्ट युद्ध-कौशल्य. आणि चौथी उत्तम शस्त्रास्त्रे. या प्राथमिक आवश्यकतांची आपण चुकीने गल्लत करीत असतो किंवा त्याचा क्रम उलटापालटा करतो.

पाकिस्तानशी युद्ध करण्याची भाषा मी तरी सहजासहजी करू शकत नाही. मी केवळ शांततेचा नव्हे तर अहिंसेचाहि समर्थक आहे; आणि भविष्यकाळातही राहीन. पण शांततेचा प्रयत्न आणि त्याचबरोबर युद्धाची जोरदार तयारी या दोन्ही गोष्टी एकाच वेळी करणे अयोग्य नाही; अशक्यही नाही असे मला वाटते. अमेरिका व रशिया ही राष्ट्रे असे करू शकतातच कीं नाहीं? मला कोणतेच युद्ध आवडत नाही. आणि रशिया-अमेरिका ही बडी राष्ट्रे सोडून छोटी दुर्बळ राष्ट्रे आपापसात लढतात तेव्हा तर युद्धाचा गैरलागूपणा मला अधिकच जाणवतो. पाक-भारत एकमेकांशी लढतात तेव्हा तर तो त्याहून आणखी जाणवतो. आमच्यापाशी हत्यारे तरी अशी काय आहेत? आणि ती किती काळ काम देतील? रशिया व अमेरिका यांच्यापैकी कोणीही एकटा, अर्थात् दुसरा गप्प राहिला तर, भारताला व भारतीय शहरांना आणि चीनला व चीनी शहरांना एका तासाच्या आत नष्ट करू शकतात. रशिया–अमेरिका तर बहुधा नित्य अंतरिक्षातून प्रवास करीत असतात. जुनाट खेळणी घेऊन लहान मुलांनी खेळावे तसे तर भारत-पाक युद्ध झाले! उद्दिष्ट गाठीपर्यंत भारत लढलाच नाही. युद्ध करणे भागच असेल तेव्हा ते अखेरपर्यंत लढले पाहिजे. कारण त्यामुळे उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असते. शिवाय भारत-पाक युद्धामुळे जागतिक शांततेला कांही धोका निर्माण झाला नसता. रशिया–अमेरिकेत युद्ध जुंपले तर मात्र ते जागतिक संकट ठरेल.

अहिंसा हे आजवर एक ढोंग बनून राहिले आहे. खरे म्हणजे गांधीजींच्या मृत्युनंतर अठरा वर्षांत फसवणुकीचे एक साधन म्हणूनच अहिंसा वापरली गेली. भारताचे सरकार गांधीवादी तर नाहीच, आणि मार्क्सवादाचा थोडासा अंश देखील त्याच्यात नाही. काही विधायक कार्यकर्ते आणि काही तथाकथित संतजन आजही अहिंसेचे ढोंग करीत आहेत. गांधीजींबरोबरच्या आपल्या जुन्या संबंधांची आठवण म्हणून आणि प्रत्येक भारतीय बुद्धीत दोन कप्पे असतात तसे या संतजनांच्या बुद्धींतहि असल्याने अहिंसेचे केवळ ढोंग हे सर्वोदयी करीत असावेत. पण १९६५ च्या सप्टेंबरमध्ये या पाखंडाचे पितळ

अगदी उघडे पडले. ज्यांनी एकतर्फी निःशस्त्रीकरणाची बाजू उचलून धरली होती आणि रशिया-अमेरिका येथे त्यासाठी आपले प्रतिनिधी पाठविले होते, त्यांनीच पाक-भारत युद्धात आघाडीवर लढणाऱ्या आणि पुढे कूच करणाऱ्या सेनेला आशीर्वाद दिला. ही केवळ ध्येयच्युती नव्हती. आदर्श आणि वस्तुस्थिति यांमध्ये येणारी ती अनिवार्य छायाही नव्हती, तर अहिंसा व हिंसा या दोन्ही आदर्शांचे ते वेशरम सह-अस्तित्व होते. एका बाजूला एकतर्फी निरस्त्रीकरण आणि दुसऱ्या बाजुला युद्ध ! हिंदुस्थानी बुद्धीत दोन परस्परविरोधी चौकटी आहेत. सोयीनुसार कोणत्याही या अथवा त्या चौकटीचा उपयोग केला जातो. एकतर्फी निरस्त्रीकरणाची भाषा बोलणाऱ्यांची गोष्टच सोडा. १९६५ मधील सप्टेंबरच्या त्या २३ दिवसात गांधी आणि अहिंसा यांना मानणाऱ्यांच्या या देशात युद्धाला विरोध करणारा एकही माणूस निघाला नाही !

देशांतर्गत अन्याय व अत्याचाराविरुद्ध सविनय कायदेभंगाचा पुरस्कार करणाऱ्या आमच्या सारख्यांना फार पूर्वीच समजून चुकले होते की, ज्याला जग गांधीवाद म्हणते त्या गांधीवादाचा प्रस्थापित सरकारने कधीच विक्रा करून टाकला आहे. गांधीजींच्या परदेशस्थ अनुयायांना आता तरी हे सत्य पटेल अशी आशा करू या. पाक-भारत युद्धाच्या वेळी तर थोडे थोडे करून मारण्याच्या प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या गांधीवादाने आत्महत्त्याच करून घेतली! अशा परिस्थितीत अहिंसावादात अद्यापहि कांही तथ्य असेल तर तें सांगणे हे या कर्तव्यपतित गांधीवाद्यांचे काम आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लगेच किंवा काही दिवसात भारताने आपले सैन्य विसर्जित केले असते तर अहिंसावादावर भारताचा विश्वास आहे हे सिद्ध झाले असते. ती अखेरची संधी होती; ती हातून गेली आहे. अर्थात् अठरा वर्षांपूर्वी देखील, तात्विक दृष्ट्या कां होईना, अशी संधि खरोखरच होती किंवा नाही याचीहि मला शंका आहे. बर्ट्रंड रसेल यांना युद्धे नष्ट करण्याची भाषा बोलणे सोपे आहे. कारण त्यांच्या देशापाशी टँक्स व ट्रॅक्टर्सहि आहेत. म्हणून " टँक्स व युद्ध की ट्रॅक्टर व तांदूळ ?" असा प्रश्न विचारू शकतात. त्यांचा देश गेली आठ शतके तरी स्वराज्य उपभोगीत आहे. याच काळात नेमका भारत दास्यात होता. जे स्वतंत्र नाहीत, म्हणजे संपूर्ण अर्थाने स्वतंत्र नाहीत त्यांना बंदुकीचा व टँक्सचा त्याग करावयास सांगणे निरर्थक आहे. खरेखुरे स्वातंत्र्य ही केवळ भावनात्मक आवश्यकता नाही, तर शारीरिक गरजहि आहे. खरे स्वातंत्र्य नसले म्हणजे माणूस दरिद्री व कामचुकार बनतो.

गरीब व दुर्बळ राष्ट्रांना स्वरक्षणासाठी युद्ध अनिवार्य आहे; युद्धाचा मार्ग गैरलागू असला तरी अशा राष्ट्रांच्या बाबतीत तो अपरिहार्य आहे. अहिंसावादापुढील ही समस्या आहे. दुसरी समस्या आहे, रशिया अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्रांतील युद्धाचे भय. अहिंसावादात या समस्यांना उत्तरे देण्याचे सामर्थ्य येईल तेव्हाच लहान मोठी सर्व युद्धे नष्ट होतील.

अहिंसापालनाची जबाबदारी भारतासारख्या दुर्बळ राष्ट्रांना पार पाडता येणार नाही. ज्यांच्यातील युद्धामुळे स्वतः त्यांच्यावर आणि साऱ्या मानवतेवर आपत्ति कोसळेल अशी रशिया–अमेरिकेसारखी बडी शक्तिशाली राष्ट्रेच अहिंसा प्रस्थापित करू शकतात. हिंसा की अहिंसा यांचा निर्णय त्यांनी करायचा आहे. अर्थात भारतासारखे दुर्बळ देशहि त्यांना साहाय्य करू शकतील. आज नसलेली पण साऱ्या मानवजातीच्या संयुक्त संकल्पाद्वारे जी निर्माण करता येणे शक्य आहे अशी जागतिक व्यवस्था स्वीकारण्याचा निर्णय या दोन बड्या देशांनी केला पाहिजे. जागतिक लोकसभा अथवा विश्वपंचायत हा अशा व्यवस्थेचा एक प्रकार असावयास हरकत नाही. ही विश्वपंचायत म्हणजे सध्यासारखा राष्ट्रसंघ नव्हे. साऱ्या जगातील लोकांनी निवडून दिलेली पंचायत. कमी अधिक लोकसंख्येचा प्रश्न प्रादेशिक गट करून आणि काही देशांना जादा प्रतिनिधित्व देऊन सोडविता येणे शक्य होईल. एकदा अशी विश्वपंचायत बनली म्हणजे तिचे निर्णय चुकीचे किंवा अप्रिय असले तरी त्या निर्णयांचा विरोध लष्करी किंवा युद्धाच्या मार्गाने केला जाणार नाही अशी शक्यता आहे.

बड्या राष्ट्रांनी अहिंसेसाठी प्रयत्न केला आणि छोट्या देशांनी विश्वपंचायतीची स्थापना करण्याच्या कामी त्यांना मदत केली तर विश्वसरकार या क्षणीदेखील प्रस्थापित होईल. हे होत नाही तोवर दुर्बळ व नुकतेच डोके वर काढणाऱ्या देशातील अहिंसावाद्यांनी राष्ट्र सामर्थ्यशाली व स्वाभिमानी बनविण्याच्या कामी बाधा आणणारा आपला अहिंसावाद कांही काळ बाजूला ठेवावा. या व्यतिरिक्त अहिंसावाद्यांनी घेतलेल्या कोणत्याही भूमिकेने गेल्या अठरा वर्षांतल्याप्रमाणे अहिंसावादाची खोटी बकवास मात्र वाढेल.

अमेरिकेतील 'नोम' अथवा 'प्लाऊ शेअर' सारख्या योजनांच्या प्रयोगात भारत सरकार सध्या गुंतले असावे असे वाटते. केंद्रीय मंत्र्यांची 'शांततेसाठी अणुस्फोट' अशा प्रकारची वक्तव्ये आणि तत्सम जे काही पुरावे आमच्यापाशी आहेत त्यातून हा तर्क निघतो. भुयारे पाडण्यासारख्या शांतिपूर्ण कामासाठीच अणुस्फोट केले जातील असे सांगण्यात येते. खरे म्हणजे अशा

अणुस्फोटासाठी लढाईत केल्या जाणाऱ्या अणुस्फोटापेक्षा जादा कौशल्याची गरज असते. युद्धासाठी असो की शांततेसाठी असो अणुस्फोट तो अणुविस्फोटच. अणुस्फोटाच्या भीषण परिणामाची एका बाजूने ओरड करावयाची आणि त्याच वेळी त्याची तयारीहि करीत राहावयाचे हे ढोंग आहे; किमान एका मेंदूत दोन प्रकारच्या बुद्धीचे सह-अस्तिव असल्याचे तें सूचक आहे. अशा मार्गाने प्रश्न सुटत नाहीत.

सांप्रत तथाकथित आंतरराष्ट्रीय अहिंसेवरचा आपला विश्वास बाजूला ठेवला पाहिजे. आणि अहिंसेवरील श्रद्धेतून निर्माण होणाऱ्या शांततेचा इमानाने शोध घेत असतानाच देशाच्या सैनिक यंत्रणेतील उणीवांचेही अध्ययन अधिकाधिक करीत राहिले पाहिजे. त्यासाठी आजवर झालेल्या चुकांची व्यापक माहिती करून घेणे जरूर आहे. अशासाठी की त्यांची पुनरावृत्ती होऊ नये. शवविच्छेदनात मला रुचि आहे असे नाही. माझ्या मते रोग बरा होऊ लागला आहे. अशावेळी रोगांचे मूळ व त्याचा इतिहास समजून घेणे सहाय्यभूत होईल. उर्वसीयम ( नेफा ) आघाडीवर आपला पराभव कां झाला याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या ब्रुक्स हेंडरसन यांचा अहवाल या दृष्टीनेच प्रसिद्ध व्हावयास हवा होता. तो न करण्यात सरकारने चूक केली. आज देशाच्या पलटणीबाबत आपल्यांत कांहीसा अवास्तव असा विश्वास वाढत आहे. अशावेळी तर आपल्या उणीवा जनतेला समजल्या पाहिजेत. ब्रुक्स हेंडर्सनचा अहवाल व तत्सम इतर अहवाल साऱ्या शिपायांना व विशेषतः तरुण सेनाधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिले पाहिजेत. रोग लपवून ठेवला तर आतल्याआत वाढणाऱ्या गळवाप्रमाणे तो एक दिवस फुटेल आणि त्याचे विष साऱ्या शरीरात पसरेल.

"पराभवाचा धोका असेल तर तो प्रदेश खाली करा" असा आदेश देणारे पत्रक उर्वसीयम आघाडीवरील युनिट कमांड अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे ऐकले होते. त्याबाबत मी लोकसभेत दोनदा खुलासा विचारला. प्रश्नरूपानेही तो प्रश्न उपस्थित केला. पण त्यात यश आले नाही. सरकार लज्जित होऊन गप्प बसले. असे पत्रक निघाले असेल तर ते काढणाऱ्या सेनापतीला लष्करी कोर्टापुढे उभे करून कठोरात कठोर सजा द्यावयास हवी होती. पण तसे झाले नाही. कारण बहुदा त्या परिपत्रकाची जबाबदारी वरिष्ठ मंत्र्यावर अथवा लष्करी अधिकाऱ्यावर असावी.

धोका वाटू लागला तर माणूस स्वाभाविकच पळून जाऊ पहातो. या प्रवृत्तीला या परिपत्रकाने पुष्टीच देण्यात आली. हा आदेश भेकडपणाचा होता.

काही लोकांना आवडणाऱ्या सभ्य शब्दात सांगायचे तर शस्त्रसज्ज असूनही शस्त्राचा वापर करावयास नाकारणाऱ्या तथाकथित शांततावाद्याने हा आदेश दिला असावा. हे परिपत्रक ज्या मंत्र्याने किंवा जनरलने काढले असेल त्याचे नाव जाहीर करणे हे पलटण व तिचे भवितव्य या दोन्ही दृष्टींनी फार उपयुक्त ठरले असते. उर्वसीयम आघाडीवरील या भेकड घटनेप्रमाणे मी लडाख सीमेवरील एका सेनाधिकाऱ्याच्या शौर्याचीही एक गोष्ट ऐकली. त्याने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा आदेश मानण्यास नकार दिला आणि परिणामी त्या भागातील चीनी सेनेच्या आगेकुचीस जवळजवळ पूर्णपणे पायबंद बसला. या ब्रिगेडीयरचा सन्मान करावयास हवा होता. अर्थात्‌च आज्ञाभंग करणे हे देखील एक कर्तव्य कधी असते याचा निर्णय करणे कठीण आहे.

उर्वसीयम आघाडीवरून माघार न घेता आपली सेना लढत राहिली असती तर जितके लोक मेले असते त्यापेक्षा कितीतरी जास्त लोक न लढल्यामुळे मारले गेले. सेला सीमेवरील ब्रिगेडची व्यूहरचना इतकी पुरेशी होती आणि खाण्यापिण्याची सामग्री तिच्याजवळ इतकी पुरेशी होती की तिला जर कुमक पोचती झाली असती तर चिनी सेना त्या ब्रिगेडने तेथेच रोखून धरली असती. पण तिला माघार कां घ्यावी लागली आणि चिनी हल्ल्यात व जंगलात त्या सीमेवर एवढ्या मोठ्या संख्येने सैनिक का मृत्युमुखी पडले हे आता साफ जाहीर झाले पाहिजे. बोमदीला तर एकहि चीनी सैनिक दृष्टीस पडण्यापूर्वीच खाली करण्यात आले; कारण म्हणे काळोख पडला होता आणि चिन्यांच्या बंदुकांचा आवाज ऐकू आला. वालांग बाबत प्रथम भारतीय सेनाधिकाऱ्यांनी सांगितले की तेथील बर्फमय सडकेवरून जाणे शक्य नव्हते. त्याच सडकेवरून चीनी सैनिक आपल्या हद्दीत घुसले. इतके होऊनहि आमचे सैनिक तेथे तळ देऊन राहिले असते तर दिब्रुगडमध्यें असलेली कुमक तिच्या मदतीला आलीच असती. विमानतळावरती पाण्याचा पुरेसा पुरवठा नव्हता. अर्ध्या रात्री व्यवस्था झाली, ती देखील सरकारच्या अथवा सैन्याच्या प्रयत्नाने नव्हे तर बिगर सरकारी मदत संस्थांमार्फत.

ऑक्टोबर १९६२ च्या चकमकी नंतर चीन्यांनी भारताची शस्त्रास्त्रे परत केली. याहून अधिक किळसवाणी घटना इतिहासात कधी झालेले नाही. हत्यारे परत करण्याच्या वेळी हजर असलेल्या दोन अधिकाऱ्यांनी ती हकीकत तपशील-वार मला सांगितली आहे. चीनी म्हणाले, "तुमच्याजवळ अधिक चांगली हत्यारे होती; तुमचा नेम देखील अधिक चांगला होता; तुमच्याजवळ मनुष्यबळ

देखील अधिक चांगले होते. पण आत्मबलाचा आणि नेतृत्वाचा अभाव यामुळे तुम्ही पळालात. कसेहि असो. ही हत्यारे घ्या. तुम्हाला यांची आवश्यकता आहे." माझ्या मते आमची शस्त्रास्त्रें, नेमबाजी आणि माणूसबळ याबाबतीतले चिन्यांचे म्हणणे बरोबर होते. आणखी एका प्रसंगी चिन्यांनी आमच्या अधिकाऱ्यांना कांही वेळ आराम करण्याचा सल्ला दिला. कारण स्ट्रेचर वाहून नेणे इत्यादि जे काम चीनमध्ये स्त्रिया करतात, ते करताना भारतीय पुरुष थकतात इतके हिंदुस्थानी पुरुष नाजुक आहेत हे चिन्यांना माहित होते. वस्तुतः चीनने लढाई जिंकली नाही तर भारतानेच स्वतः पराभवाला कवटाळले. कारण त्याचे मन दुभंगलेले होते.

इंग्रजी राजवटीत हिंदुस्थानी सेनेने जो कांही पराक्रम गाजवला तो इराण, इथियोपिया अथवा चीन यांच्या कमजोर सैन्याशी लढताना, ही गोष्ट विसरता कामा नये. त्याशिवाय युरोपात असो की डोंगरमाथ्यावर लढताना असो, कोणत्याही परिस्थितीत भारतीय सेनेच्या पाठीशी इंग्लंडची सत्ता, तेथले कारखाने, अधिकारी आणि त्यांची सरंजामशाही, आणि साम्राज्यवादी शिस्त होती त्यामुळेच ते शौर्याने लढू शकले. आज ब्रिटिश सत्तेच्या जागी जनता आणि राष्ट्रपती आहेत. आज पलटणीच्या पाठीशी प्रगत कारखानादारी नाही. भारताचे उद्योगधंदे तुलनेने अविकसित आहेत. सैन्यातील जुनी शिस्तही आज उरलेली नाही. आता फक्त अप्रगत जनताच आपल्या अप्रगत कारखान्यांसह आपल्या पलटणीच्या पाठीशी आहे. आणि म्हणूनच अधिकाऱ्यांच्या क्षमतेवरच सारे अवलंबून आहे.

स्वतंत्र भारतात अधिकाऱ्यांची जी पहिली तुकडी भरती केली गेली तींत अधिकतर उच्चवर्गीयच लोक होते आणि या अहिंसेच्या भूमीत पलटणीची गरज, विशेषतः गणतंत्र दिवसाच्या परेडपुरतीच आहे अशी त्यांची समजूत होती अशी मला शंका आहे. पण सप्टेंबर १९६५ च्या लढाईत कमीशनप्राप्त आणि कमीशन न मिळालेले कनिष्ठ अधिकारी यांनी गाजवलेल्या पराक्रमाबद्दल मी जे कांही ऐकले त्यामुळे माझ्या मनात पुन्हा आशा पालवली आहे. फक्त गणवेषावर खूष होणाऱ्या मूर्ख जवानांच्या सैन्यभरतीचा काळ आता उलटला आहे असे वाटते; तो कायमचा संपला आहे अशी मी आशा करतो. परंतु वरिष्ठ अधिकारी अद्याप देखील सँढहर्स्टच्या पद्धतीचे खडाखडा इंग्रजी बोलण्यात मोठेपणा मानीत आहेत. आणि त्याचे कांटा-सुरीवाले रीतिरिवाज बहुसंख्य स्वदेशी शिक्षणप्राप्त अधिकाऱ्यांत न्यूनगंडाची भावना निर्माण करीत

असतात. खडकवासला आणि डेहराडून येथील लष्करी ॲकॅडमी अन्य दृष्टीने तर चांगल्या नाहीतच. पण महागही आहेत. कारण त्या वेस्ट पॉइंट शाळा इतक्या नसल्या तरी कमी महागड्या देखील नाहीत. अमेरिकेतील लोकांची राहाणी भारताच्या तुलनेने दहापटीने उच्च आहे. सामान्य जनतेच्या जीवनाशी सैन्याच्या जीवनाची तार जोडलेली असली पाहिजे तरच कोणत्याही पलटणीत लढण्याची शक्ती येऊ शकेल.

स्वित्झर्लंड मध्ये आणि अन्यत्र आधुनिक पलटणींची कुशल संघटना करण्या-बाबत गंभीरपणे चर्चा चालू आहेत. जनरलपासून सामान्य शिपायापर्यंतचे जेवण आणि गणवेश एक असले पाहिजे असे गंभीरपणे बोलले जात आहे. कार्यातले वैशिष्ट्य, शौर्य आणि नेतृत्वाचा गुण यापेक्षा अधिकाऱ्यात व शिपायांत अधिक वेगळेपणा असता कामा नये. या देशात असे व्हावयास बराच काळ लागण्याची शक्यता आहे. मात्र अन्य देशांपेक्षा येथे या गोष्टीची अधिक आवश्यकता आहे. तरूण वयाचे अधिकारी मनांत आणतील तर ही अवस्था आपल्या येथे लवकर आणणे शक्य आहे. जनरलपदापर्यंतच्या उन्नतीचा दरवाजा कनिष्ठांना उघडा असला पाहिजे. त्यासाठी इंग्रजीचे तात्काळ उच्चाटण झाले पाहिजे, अन्य आवश्यक परिवर्तनाप्रमाणे हे देखील एक परिवर्तन आवश्यक आहे. आज वरिष्ठ पदे लष्करी अकादमीमधून शिकून बाहेर पडलेल्या लोकांसाठीं राखून ठेवलेली आहेत. कनिष्ठ श्रेणीचे शिपाई आदीचा या मोठया मोठया जागांवरचा हक्क मान्य करणे आणि प्रगतीसाठी कौशल्य, हिंमत व नेतृत्व याच गोष्टी मानदंड म्हणून मानणे हे या अधिकाऱ्यांच्या देखील हिताचे होईल. आज किती तरी प्रतिभावंत व्यक्ती, जुने शिष्टाचार आणि पद्धती-रिवाज यांना महत्त्व देण्यात येत असल्यामुळे नष्ट होऊन राहिले आहेत ! शिपाई आणि अधिकारी आघाडीवर परस्परांचे साथी असतात, म्हणून आपल्या युद्धेतर जीवनात देखील त्यांनी ही साथ कायम राखली पाहिजे. कांगोत गेल्यानंतर कांही दिवस सामान्य भारतीय शिपायाला शंभर रुपये रोज भत्ता मिळत होता. परंतु नंतर तो कमी करून पांच रुपये देण्यात येऊ लागला. अधिकाऱ्यांच्या बाबतीत देखील ही कपात झाली असेल. अखेरीला ही सारी राष्ट्रीय विटंबना आहे; यात साऱ्या देशाची वेइज्जत आहे. हे शिपाई देशात दरिद्री आहेतच आता बाहेर देखील त्यांच्या दारिद्र्याचे प्रदर्शन व्हावे ! कांगोमधील शिपायांच्या वेतना संबंधीच्या माझ्या प्रश्नाचे उत्तर देताना संरक्षण मंत्र्यांनी बिलकुल खोटी माहिती दिली. संसदीय कामाकाजाच्या नियमाचा चुकीचा अर्थ लावून त्या प्रकरणावरचा पडदा मला संपूर्णपणे फाडूं दिला नाही.

देश गरीब आहे. मोठे मोठे पगार तो देऊ शकत नाही. कोणत्याही क्षेत्रात कोणासाठीही मोठे पगार मागणे मला घृणास्पद वाटते. देशातील कमालीची विषमता मला असह्य होते आणि शिपायांनाही ती असह्य झाली पाहिजे असे मला वाटते. पण तसे दिसत नाही. याचे कारण आमच्या पलटणीत जबरदस्त बौद्धिक ओढाताण आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्या पलटणीतील लोकांच्या पगाराची तुलना या संदर्भात करण्यासारखी आहे. त्याबाबतीत मी माहिती मिळविली आहे. तिच्यात काहीशी चूक झाली तर मला दोष देऊ नये. कारण मी ती अनेकदा पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला आहे आणि अनेक प्रकारच्या माहीतीच्या जंजाळातून काही निष्कर्ष काढले आहेत. भारतीय शिपायाचा पगार पंचावन्न रुपये महीना याप्रमाणे सुरू होतो तर पाकिस्तानी शिपायाला अठ्याहत्तर रुपये महीना मिळतात. भारतीय सुभेदाराची १७३ रु. महिना पगारापासून सुरवात होते तर पाकिस्तानच्या सुभेदाराची २५० रु. पासून. दोन्ही पलटणी मधल्या अधिकारीवर्गाला जवळपास समान पगार मिळतो. दोन्ही सैन्यातील कप्तानांची जवळपास ७०० रु. पगारापासून सुरवात होते. मेजरची हिंदुस्थानांत १००० रु. वर आणि पाकिस्तानात ११०० रु. पासून सुरवात होते. दोन्ही देशांच्या सैन्यात फार विषमता आहे. भारतात तर अधिकच. पृथ्वीच्या या भागातील छोटा माणूस खरोखरच छोटा, किंबहुना फारच छोटा होत आहे.

मोठे व्यापारी, उच्चपदस्थ, नोकरशहा आणि मंत्री यांचे उत्पन्न व खर्चांशी या पगाराची तुलना केली तर स्थिती अधिकच भयानक वाटू लागते. या विषमतेमुळे जीवनातला सर्व, किमान अधिकांश आनंद हिसकावून घेतला गेला आहे. युरोप आणि अमेरिकेच्या पद्धतीने चालणाऱ्या विलासी खर्चामुळे शेती आणि कारखाने यांना फार कमी पैसा उरतो. उपाशी पोटाने लढण्याची आवाहने उठल्या बसल्या केली जातात. जगात कधी कोठलीच सेना व जनता रिकाम्या पोटी लढलेली नाही. समतेची स्थापना दुसऱ्या अनेक कारणांसाठी आवश्यक आहे. तशीच लोकांचे पोट भरता यावे आणि कारखान्यांची प्रगती साधता यावी यासाठीहि ती जरूर आहे. सेनाधिकारी, शिपाई व सारी सेना यांचा, राष्ट्रीय हिताचे व विश्वव्यवस्थेचे योग्य साधन म्हणून उपयोग करता यावा याकरिता तर समतेची अधिकच गरज आहे.

सर्व संभाव्यता लक्षात घेऊन आपल्या भावी लष्करी हालचालींचे नकाशे तयार करणे प्रत्येक देशाच्या सेनेला आवश्यक असते. छांब – जोरिया क्षेत्रावर

पाकिस्तानी सेनेने हल्ला केला तर त्याला लाहोर-सियालकोटच्या बाजूने प्रत्युत्तर देण्याच्या दृष्टीने भारतीय सेनेने १९५० सालीच आपल्या हालचालीचे नकाशे बनविले होते. पण पाक-भारत युद्धांत लाहोर-सियालकोट क्षेत्रांत झालेली प्रति-कारवाई जणूं आमचे शूर पंतप्रधान व संरक्षणमंत्री यांच्या सूचनेवरून करण्यात आली असे भासविण्यांत आले. आधुनिक युद्धांत अशा प्रत्युत्तरात्मक चढाईची आखणी आयत्यावेळी करता येत नाही; माघार घेण्यापासून तो कडव्या प्रति-कारापर्यंतची कोणतीही कृती पूर्वसंकल्पानुसारच करता येणे शक्य असते. सप्टेंबर १९६५ च्या भारत-पाक युद्धात भारताने शरणागती पत्करायची असा फार तर पूर्वनिर्णय केला असेल. पण विजयाचा संकल्प अगोदर केलेला नव्हता. १९५० च्या नकाशात एक रस्ता बांधण्याचीही योजना होती. बहुधा मधवापूर हे त्या रस्त्याचे नाव असावे. या रस्त्याने जाऊन भारतीय सेना पाक सेनेला घेरू शकल्या असत्या. हा रस्ता कां तयार करण्यात आला नाही याची चौकशी झाली पाहिजे.

नेहमीच नकाशातील प्रत्येक आंखणीनुसार कृती केली पाहिजे असे नाही. पण नकाशाप्रमाणे सर्व तयारी असणे जरुरीचे असते. नकाशे बनविण्यात अमेरि-केत आणि रशियात हजारो अधिकारी गुंतलेले असतात. त्यांना तर साऱ्या जगाचे नकाशे बनवावे लागतात. भारतासारख्या देशाने किमान आपल्या सीमांच्या दृष्टीने तरी नकाशे तयार केलेच पाहिजेत. चीन पुन्हा आमच्या उत्तरी सीमांवर आक्रमण करील काय हे सांगता येणार नाही. पण कोणत्याही देशाची थोडीशी देखील लायक असलेली सैन्याची कमाण्ड याबाबतीत उदासीन राहणार नाही. अशा नकाशात तिबेटवर प्रतिकारवाई करण्याच्या योजना देखील निश्चितपणे असल्याच पाहिजेत. त्यायोगेच तिबेटमधील खंपा बंडखोरांचा आत्मविश्वास वाढू लागेल. कोणत्याही परिस्थितीत दलाई लामाला इतस्ततः बेकार फिरावे लागता कामा नये.

जोपर्यंत जगातून लढाया नष्ट होत नाहीत तोवर कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी योजना तयार असली पाहिजे. तडजोड करण्याच्या संधीचा उपयोग करू नये असा याचा अर्थ नव्हे. खरे म्हणजे संरक्षणाचे प्रयत्न वेग-वेगळ्या बाजूंनीं झाले पाहिजेत. विश्वपंचायत आणि विश्वसरकार यांच्या स्थापनेसाठी होणाऱ्या सामूहिक प्रयत्नांबरोबरच हे प्रयत्न चालू राहिले पाहिजेत. सर्व वाईट संभाव्यतांसही तयार राहणे ही प्रयत्नाची आणखी एक

बाजू. स्वातंत्र्य आणि समता या उद्देशांसाठी राष्ट्रांराष्ट्रांमध्ये मेळ घडवून आण॰ण्याच्या प्रयत्नात साहाय्य करणे ही आणखी एक बाजू होय.

कोणत्याही राष्ट्राच्या सेनेला आपल्याच देशवासीयांविरुद्ध शस्त्र उचलणे खरोखर आवडणार नाही. तरी देखील विशेषत: गरीब व मागासलेल्या देशात जनतेविरुद्ध सेना वापरल्याचे प्रसंग वारंवार घडतात. कारण अशाच देशात क्रांतिकारक परिवर्तनाचे प्रयत्न जनता करीत असते. प्रगत देशांतही तेथील जनता व सरकार यांच्या दृष्टिकोनात बहुधा नेहमीच अंतर आढळते. आणि जनतेशी संघर्ष उद्भवला की तिच्याविरुद्ध सेनेचा वापर करण्याचा मोह या सरकारांनाहि आवरता येत नाही. सरकारशी संघर्ष उद्भवला की जनतेच्या हाती एकच शस्त्र असते. ते म्हणजे सरकारला त्याच्या मर्यादांची आठवण करून देण्याचे, आवाहने करण्याचे आणि अखेर ते उलथून टाकण्यासाठी अंतीम कृति करण्याचे. याशिवाय अन्य मार्गच जनतेला शिल्लक नसतो. अशा विशिष्ट परिस्थितीत याशिवाय दुसरा प्रभावी मार्ग अजून सांपडलेला नाही. शिस्त व आंधळे शिस्तपालन हा सेनेचा आधार होय. तरीदेखील एखादा वरिष्ठ अधिकारी आक्रमकांपुढे भेकडपणा दाखवील अथवा आपल्याच देशवासीयांवर पशुतुल्य अत्याचार करण्याची आज्ञा देईल तेव्हां सैनिकांनी त्या आज्ञेचा भंग केला पाहिजे. याबाबतीतील त्याचे कर्तव्य स्पष्ट आहे. जनता हत्या करीत नसेल अथवा सरकारविरुद्ध सशस्त्र बंड करून उठली नसेल अशा प्रसंगी जनतेवर शस्त्र चालविण्यापूर्वी विचार करणे हे सेनेचे कर्तव्य आहे. सेना आणि जनता यांच्यात जितका संघर्ष कमी होईल तितकी सेना ही आक्रमकांचा मुकाबला करण्याच्यादृष्टीने समर्थ होईल.

आणखीही एका बाबतीत लष्कराच्या शासनात फार मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणण्याची गरज आहे. लष्करी कॅन्टोन्मेन्ट बोर्डस या गुलामगिरीच्या द्योतक असलेल्या भारतीय-ब्रिटिश संस्था आहेत की नाही याविषयी मतभेद असू शकतील. परंतु या संस्थांचे शासन आजच्या युरोपीय कॅन्टोन्मेन्टसप्रमाणे होत नाही, हे मात्र निश्चित. जवळपास एक कोटी लोक म्हणजेच भारताच्या लोकसंख्येच्या एकपन्नासावा भाग कँटोन्मेंट बोर्डांच्या कक्षेत राहतात. त्यांना जबाबदार शासन पद्धतीचे फारच अल्प अधिकार आहेत. बोर्डांचा अध्यक्ष किंवा नगरप्रमुख अपरिहार्यपणे एखादा सैनिक अधिकारीच असतो. निम्मे सदस्य नियुक्त असतात. अंदाजपत्रकावर बोलण्याचा त्यांना मर्यादित अधिकार असतो. स्थानिक स्वराज्याचे तत्त्व अशा रीतीने सीमित करणे किंवा संपुष्टात

आणणे अगदी चूक आहे. या बोर्डाप्रमाणेच देशाच्या अनेक लोकनियुक्त संस्थांतील महत्त्वाच्या कार्यकारी पदांवर सरकारी अधिकारी नियुक्त केलेले असतात. स्थानिक स्वराज्याची ही निव्वळ चेष्टा आहे. लष्करी कँटोन्मेंट बोर्ड असलेल्या शहरातील नागरिक आणि सेना, विशेषतः तिचे अधिकारी यांच्यातील संबंध बिघडले तर ते हानिकारक ठरण्याचा संभव असतो. एका ब्रिगेडीयरने कँटोन्मेंट बोर्डाच्या एका सदस्याला थप्पड मारल्याची घटनाही घडली आहे. परसत्तेविरुद्ध लढण्याची सैन्याची क्षमता अशामुळे कमी होत असते.

१९६२ च्या चिनी आक्रमणानंतर उर्वसीअम्-नेफाच्या एका भागात मी गेलो होतो. आपल्या गुप्तहेर खात्याची जी अवस्था मी तेथे पाहिली ती वर्णन करण्यापलीकडची आहे. अतिशय भिकार झोपड्यांकडे बोट दाखवून कोणी तरी मला सांगितले की हेरगिरी करणाऱ्या आपल्या लोकांची ती घरे आहेत. त्यात राहणारे ते भारतीय हेर तिबेटात डोक्यावर ओझे घेऊन जाणारे मजूर होते. हे मजूर आपल्या प्रवासांतील ज्या काही गोष्टी सांगत तीच आमची माहिती आणि त्याच आधारावर आमच्या सैन्याच्या हालचाली होत. यापेक्षा अधिक वाईट गोष्ट कोणती असू शकेल काय? तेविसशे वर्षांपूर्वीचे भारतातील शासक देखील यापेक्षा अधिक डोके वापरीत होते. साऱ्या जगात, किमान भारताला माहीत असलेल्या भू भागात उपदेशक, नागरी वेषांतील गुप्तहेर, वक्ते आणि सामान्य गुप्तहेर यांचे पुरे जाळे पसरलेले असायचे. स्त्री गुप्तहेरांना त्यात खास स्थान असे. त्यापैकी काहींना विषकन्या म्हणण्यात येई. ते शब्दशः देखील खरे होते. त्यांच्यात प्रसिद्ध सौंदर्यवती असत. अन्य कामांमध्ये, सामान्य रूप असलेल्या स्त्रियांचाही उपयोग होत असावा. शिवाय नगर-वधू या आकर्षक आणि सुंदर नावाने ओळखल्या जाणाऱ्या अनेक स्त्रिया असत. आणि राजधानीतील त्यांचे घर हे राज्यकर्ते आणि राजदूत यांचा अड्डाच असे. त्यांच्या घराची झडती घेण्यात मनाई असे. या नववधू परदेशात देखील जाऊन राहात आणि हेरगिरी करीत असे दिसते. अत्यंत कार्यक्षम व सुंदर स्त्रियांना शत्रूसैन्यात जाऊन करता येतील अशी अनेक कामे असतात आणि ती फक्त स्त्रियाच करू शकतात.

शिपायांच्या विधवांचा देखील एक प्रश्न आहे. आपण युद्धात कामी आलो तर आपली पत्नि व मुले यांची समाज व सरकार आपुलकीने काळजी घेतील असा विश्वास सैनिकांच्या मनात उत्पन्न झाला तर त्यांच्या डोक्यावरील ओझे किती तरी कमी होईल. सैनिकांच्या मानसिक स्वास्थ्यापाशी सैन्याच्या सामर्थ्यांचा

संबंध आहे. उत्तम शिक्षण, शिस्त व शस्त्रे याबरोबरच शिपायाचे मन प्रसन्न व संतुष्ट असणे ही सैन्याची शक्ती वाढविण्यासाठी आवश्यक अशी बाब आहे.

संरक्षण प्रयत्नामागे आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणाची प्रखर इच्छा असलेली जनता उभी असली पाहिजे; उभी केली पाहिजे. हा प्रश्न भारताच्या पूर्वेतिहासाशी निगडित आहे. ज्यावर सर्वांत अधिक परकी आक्रमणे झाली असा हिंदुस्थान हा जगातील एकमेव देश असेल. ती का झाली, त्यात आपला सतत पराभव का झाला याची कारणे शोधली पाहिजेत. राज्या-राज्यातील भांडणांमुळे नव्हे तर आक्रमकांविषयीच्या जनतेमधील औदासीन्यामुळे आक्रमकांना यश मिळाले हे सत्य प्रत्येक शाळकरी मुलाच्या मनावर बिंबविले पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्याविषयी व भवितव्यासंबंधी जनतेत आस्था निर्माण करणे हेच खरे आजचे महत्त्वाचे काम आहे. सांप्रत देखील पक्षापक्षामधल्या फाटाफूटीलाच महत्त्व देऊन जे लोक चर्चा करतात ते कळत न कळत जनतेची शक्ती आणि पर्यायाने संरक्षणसामर्थ्यही कमजोर बनवीत आहेत. जनतेतील औदासीन्याचे एकमेव सर्वांत मोठे कारण म्हणजे जातिप्रथा आहे यात शंका नाही. म्हणून जातिप्रथा नष्ट करणे ही युद्धातील यशस्वितेसाठी देखील अत्यावश्यक बाब आहे. जातीमुळे जनता उदास बनते आणि तिच्या औदासीन्यामुळेच युद्धात पराभव पत्करावा लागतो.

परकीयांविषयी उदासीनता आणि स्वकीयाविषयी रोगट दृष्टी अशी आपली विचित्र अवस्था आहे. चिनी आक्रमणाच्या काळात एकाही चिनी माणसाला येथे कोणी छेडले आहे असे मला आढळले नाही. याचे कारण आपली उच्च संस्कृती व अहिंसावादी वृत्ती आहे असे म्हणणे ही शुद्ध बकवास होय. कारण हिंदु-मुसलमान तंट्यात व विविध भाषिक गटांतील भांडणाच्या वेळीं ही उच्च संस्कृति व अहिंसावादी वृत्ति अभावानेच तळपत असते. धर्म, भाषा, प्रांत आदि अंतर्गत संघर्षांत आणि सर्वांवर कडी म्हणजे जातिप्रथेत भारताची बुद्धी इतकी गुंतून पडली आहे की, परकीयांसंबंधी विचार करायला तिला उसंतच मिळत नाही. पाकिस्तानच्या बाबतीत भारतीय मन पेटते असे म्हणण्यात अर्थ नाही. कारण पाकिस्तानी लोक परकी नाहीत. हिंदुस्थानांतर्गत धार्मिक प्रश्नाचेच ते एक अपत्य आहे. पूर्णपणे अंतर्मुख होऊन पाहिले तर पाकिस्तानी हे देखील हिंदुस्थानीच आहेत असे दिसून येईल.

भारतीय बुद्धी ही विलक्षण आत्मसंतुष्ट बनली आहे. आपल्यातील दोष तिला दिसत नाहीत. परकीयांना मात्र आपण जंगली किंवा असंस्कृत

समजतो. शत्रूपेक्षा आपण कसे श्रेष्ठ आहोत हेच आपण सतत स्वतःला पटवून देत असतो. आपल्या श्रेष्ठत्वावर आपण स्वतःच अत्यंत खूष असतो. यामुळेच शत्रूच्या शक्तीची आपण पुष्कळदा उपेक्षा करतो; तिचे ज्ञान आपण करून घेत नाही. आपल्या दुर्गुणांतही आपणाला गुण दिसतात. जातिप्रथेप्रमाणेच या स्वयंतुष्ट मनोवृत्तीबरोबर लढणे ही युद्धयशस्वितेसाठी एक अतिशय मोठी गरज आहे. देशातील शिक्षणक्षेत्राने या सर्व उणीवा नष्ट करण्याचे कार्य हाती घेतले पाहिजे. पण त्या क्षेत्रातील लोकांना आपल्या समोरील प्रश्नांचा उमज लौकर पडत नाही. त्यामुळे त्यांची गती मंद असते. पलटणीच्या अधिकाऱ्यांना मी म्हणतो ते पटले तर ते याबाबतीत झटपट प्रयत्न करू शकतील; काय करावयास पाहिजे ते त्यांना उमगेल. जाती, धर्म, भाषा, प्रदेश आदी ज्या ज्या उणीवा आपली शक्ती खच्ची करीत आहेत त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तरुण सेनाधिकाऱ्यांनी आता चपळाईने पुढे सरसावले पाहिजे. भाषा, धर्म, प्रांत आदी अंतर्गत कलहात न गुंतता त्यांनी परकीय शत्रूकडे अधिक लक्ष पुरविले पाहिजे.

भारताशेजारील परकीयांचा विचार करताना आपणासमोर फक्त चीन व पाकिस्तान हे उभे राहतात. पण ते योग्य नाही. इतर शेजाऱ्यांची आपण उपेक्षाच केली आहे. या शेजाऱ्यांशी आपले गाढे मैत्रीचे संबंध असायला हवे होते. सुमारे एक हजार वर्षांपूर्वीच्या गौरवशाली युगात आपले शेजारी व भारत एकत्रच होते; एकमेकांपासून स्वतंत्र असले तरी परस्परांचा भाग होते. आतापर्यंत स्वतंत्र भारताचे परराष्ट्रधोरण व्यर्थ व मूर्खपणाचे राहिले आहे. दलाई लामा, ऊ नू, बा स्वे, विश्वेश्वर कोईराला (आणि कदाचित् राजे त्रिभुवन देखील) व खान अब्दुल गफारखान यांच्यासारख्या भारतास अनुकूल असलेल्या शक्ती आमच्या या मूर्ख धोरणामुळे नष्ट होऊन गेल्या. उलटपक्षी स्वदेशात शेख अब्दुला आणि फिझो यांसारखी डोकेदुखी आम्ही पोसली. परराष्ट्रीय धोरणाच्या संपूर्ण वैचारिक आधारातच काहीशी उणीव आहे. एका शेजारी देशाच्या राजाची संरक्षण आणि परराष्ट्रसंबंध या बाबी भारताकडे सोपविण्याची फार इच्छा होती हे मला माहीत आहे. एक प्रकरण तर असे आहे की, अन्य देशी संस्थानांप्रमाणे हेही राज्य भारतात सामील होऊ इच्छित होते आणि आपण व आपला परिवार यांना पेन्शन मिळावे एवढीच राजाची इच्छा होती. पण हा प्रस्ताव भारत सरकारने ठोकरून लावला. त्याबद्दल इतिहास भारत सरकारला कधीही क्षमा करणार नाही. त्या शेजाऱ्याची ही मागणी मान्य केली असती तर आज आमच्यावर जितक्या जबाबदाऱ्या आहेत त्यांत काही आणखी वाढ झाली नसती. खरे म्हटले तर आपला बोजा काहीसा कमीच झाला असता.

पण हिंदुस्थान स्वतंत्र झाला तेव्हा प्रारंभालाच प्रकरण बिघडविले गेले. त्यानंतर दोन वर्षांनी चीनमध्ये साम्यवाद्यांची सत्ता सुरू झाली. आपणाला साम्राज्यवादी म्हणतील या भयाने, योग्य वेळी योग्य कृती करण्यास हिंदुस्थान कचरला. परिणाम असा झाला की, तदनंतर एक अनिष्ट आणि साम्राज्यवादी भासावे असे कृत्य करावे लागले. सद्भावपरिप्लुत पण कधी ना कधी अनिवार्यपणे गुंड बनणाऱ्या पाखंड्यांना केव्हाच देशाचे शासन करू देता कामा नये. स्वातंत्र्य अमोल आहे. स्वातंत्र्याचे रक्षणही बहुमूल्य आहे. जग एक झाले पाहिजे, लोकांना चांगले खावयास मिळाले पाहिजे आणि ते सुखी झाले पाहिजेत, हे सर्वसामान्य सिद्धांत आहेत. त्यांच्या पायावरच परराष्ट्रीय धोरण उभे असले पाहिजे. कोणत्याही राष्ट्राने अथवा त्याच्या सरकारने कधीच कोणाच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करता कामा नये. मग ते राष्ट्र कितीही चुकीच्या मार्गावर असो. पण आपल्या स्वातंत्र्यरक्षणार्थ मात्र सदैव सज्ज असावयास हवे. विशेषेकरून आसपासच्या प्रदेशांशी आणि इतर सर्व शेजाऱ्यांशी परस्परसंमतीने एक मोठा संघ बनविला पाहिजे.

चीन आणि पाकिस्तानविषयीचे धोरण ठरविताना या दोन्ही देशांशी एकदम लढाई करावी लागली तर काय, या भयाचे भूत आमच्या मानगुटीवर सतत बसलेले असते. सत्तारूढ नेते आणि बहुधा सेनेचे अधिकारीही या भयाने ग्रस्त झालेले दिसतात. दोन आघाड्यांवर लढण्याचा प्रसंग टाळण्याचा शक्य त्या सर्व मार्गांनी प्रयत्न करावयास हवा यात शंका नाही. पण सर्व उपाय संपले आणि दोन्ही आघाड्यांवर एकदम लढणे प्राप्त झाले तर त्यासाठीहि सिद्ध असले पाहिजे.

गेल्या महायुद्धात जर्मनीपुढे देखील असाच पेच होता. जर्मनीच्या पूर्वपश्चिमेला दोन मजबत आघाड्या होत्या, परंतु जर्मनी घाबरला नाही. उलट असेच म्हणावे लागेल की, त्याने वास्तवतेची उपेक्षा केली आणि उलट बाजूने चूक केली. चीन ही दुसऱ्या दर्जाची व पाकिस्तान ही चौथ्या दर्जाची शक्ति आहे. हिंदुस्थान देखील दुसऱ्या दर्जाची शक्ती आहे. पण हिंदुस्थानचे धोरण आणि कृती कधी कधी तिसऱ्या दर्जाच्या शक्तीइतकी कमजोर असतात. आपल्या स्वतःच्या भूमीत घुसलेल्या शत्रूशी भारताने पहिल्या दर्जाच्या शक्तीसारखा विजय मिळेपर्यंत सामना द्यावा अशी अपेक्षा करणे चुकीचे होणार नाही. तिबेट हा चिनी प्रदेश नाही. सिंकियांग देखील आहे असे म्हणता येणार नाही. पाकिस्तानही हिंदुस्थानकडून उधार दिला गेलेला प्रदेश आहे असे मानले पाहिजे. अर्थात् ही उधारी किती दिवस ठेवायची हे बरेचसे हिंदुस्थानवर अवलंबून आहे.

भारत-पाकिस्तान संबंधातील गुंता आता कायमचा कसा सोडविता येईल याचा प्रयत्न झाला पाहिजे. पाकिस्तानात काही अनुकूल शक्तिशाली प्रक्रिया चालू आहेत. सिंधी, बलुची, पठाण, बंगाली हे अल्पसंख्य गट असंतुष्ट आहेत. पाकिस्तानात सत्ताधाऱ्यांची एक विशिष्ट प्रदेशातील जात तयार होत आहे. त्याविरुद्ध या अल्पसंख्य गटात असंतोष वाढत आहे. स्वयंनिर्णयाची मागणी होत आहे. भारतातील सरकार, पलटण व जनतेने ही प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. या अल्पसंख्याक गटांना भारताने सक्रिय अथवा तटस्थ, प्रकट वा मूक पाठिंबा दिला पाहिजे. पाकिस्तान इतके विस्कळीत आहे की, वर उल्लेखिलेली अंतर्गत प्रक्रिया प्रखर बनली तर ते नष्ट होणे कठीण नाही. आता यापुढे पाकिस्तानशी तात्पुरता तह करून सरकारने व सेनानेत्यांनी त्यात स्वतःला व देशाला अडकवून घेऊ नये.

●

सैन्यभरतीची प्रचलित पद्धत बंद केली पाहिजे. धंदेवाईक किंवा नोकरीसाठी भरती झालेल्या सैनिकांची पलटण स्वतंत्र देशाच्या दृष्टीने अपुरी व अनुपयुक्त आहे. देशातील सर्व नागरिकांना स्वातंत्र्य उपभोगावयास मिळत आहे तर मग त्याच्या रक्षणाची जबाबदारी सर्वांवर सोपविली पाहिजे. त्यांनी ती घेतली पाहिजे, तशीच ती त्यांना देण्यात आली पाहिजे. बलिदान करण्याच्या संधी-तही सर्वांना समान वाटा मिळाला पाहिजे. मातृभूमीच्या आणि भावी काळातील विश्वराज्याच्या रक्षणार्थ आपले प्राण वेचणे हे सर्वश्रेष्ठ आणि अंतिम बलिदान होय. सैन्यभरती सक्तीची व सार्वत्रिक केली पाहिजे.

विशिष्ट वयावरील सर्व युवकांच्या बाबतीत आणि काही गटांतील युवतींच्या बाबतीत देखील सैन्यशिक्षण किंवा सैन्यभरती सक्तीची केली पाहिजे. युद्ध-काळात वय लक्षात घेऊन सक्ती करण्यात यावी. असे झाले तरच देशातील लक्षावधी लोकांना देशासाठी व दुनियेसाठी बलिदान करण्याची संधी मिळू शकेल. बलिदानाच्या या आवाहनाला जनता अननुभूत अशा आनंदाने साथ देईल. भंग्याचा मुलगा व पंतप्रधानाचा मुलगा मृत्यूशी खांद्याला खांदा भिडवून झुंजतील तर देशात एका नव्या युगाचा जन्म होईल.

सैन्याधिकाऱ्यांच्या भरतीच्या पद्धतीतही सुधारणा आवश्यक आहे. प्रामुख्याने देशातील सरकारी लष्करी शिक्षणसंस्थांतच सैन्याधिकारी तयार केले पाहिजेत. सॅंढर्स्ट, वुलविच, मेरियोने येथे प्रशिक्षित सेनाधिकाऱ्यांनी आमच्या सेनेचे कायम

नेतृत्व करीत राहावे हे योग्य नाही. सैन्याचे सर्वांत वरिष्ठ अधिकारी अद्यापही या ब्रिटिश संस्थांतच तयार झालेले आहेत. देशांतर्गत लष्करी शिक्षण-संस्थांत तयार होत असलेला सेनाधिकाऱ्यांचा नवा वर्ग देखील, त्यातील बहु-तांश लोक तरी, ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांचे दुबळे व उथळ अनुकरण करीत आहेत ही तर फारच वाईट गोष्ट आहे. इंग्लंडमध्ये शिक्षण घेतलेल्या अधिकाऱ्यांत काही चांगले अधिकारी आहेत, परंतु ब्रिटिश सेनापद्धतीच्या भारतीय सेनेतील अंध अनुकरणामुळे त्या अधिकाऱ्यांची स्वतंत्र कर्तृत्वशक्ती नष्ट होत आहे. त्यांचे कर्तृत्व नष्ट होण्यास इंग्रजी भाषा ही कारणीभूत आहे. इंग्रजी हे सैनिकी संस्थांच्या शिक्षणाचे माध्यम आहे, ते बंद केले पाहिजे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट झाली पाहिजे. पलटणीतील वरिष्ठ जनरल पदापर्यंतच्या सर्व अधिकारपदांवर सैन्यातील कनिष्ठ अधिकाऱ्यांतून भरती केली पाहिजे. त्याचे निकष काय असावेत ही तपशिलाची बाब आहे. शौर्य अथवा कौशल्य किंवा या दोन्ही निकषांना उतरणारा सामान्य शिपाई देखील वरिष्ठ पदापर्यंत पोचू शकला पाहिजे. खालून वर चढलेल्या अशा वरिष्ठ अधि-काऱ्यांची संख्या एकूण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निम्मी असावी की तीन-चतुर्थांश असावी हे अनुभवाने ठरविता येईल.

गरज पडण्यापूर्वी कृती करणे आमच्या प्रकृतीतच नाही. सैन्याची संघटना अशा प्रकारे होऊ शकत नाही. सैन्याला कोणत्याही संभाव्य परिस्थितीशी सामना करण्याचा प्रसंग येतो. त्यासाठी पूर्वनियोजन असणे जरूर आहे. या संदर्भात छत्री डॉक्टरांची आवश्यकता विचारात घेतली पाहिजे. १९६२ च्या चिनी आक्रमणामुळे मोठ्या संख्येने छत्री डॉक्टरांची आवश्यकता भासू लागली. त्या लढाईत काही थातुरमातुर व्यवस्था केली गेली. त्यानंतर देशातील वैद्यकीय संघटनांनी अडीच तीन लाख छत्री डॉक्टर बनविण्याची एक योजना तयार करून ती सरकारपुढे ठेवली. त्या योजनेनुसार कामही सुरू झाले. परंतु थोड्याच दिवसांत ते बंद झाले. त्या योजनेबाबतचा उत्साह थंडावला आणि ती योजनाच दुर्लक्ष्यात पडली. केवळ तात्कालिक उत्साहाच्या लाटेबरोबर इतरांप्रमाणे सेनाधिकाऱ्यांनीही काम करणे योग्य नाही. त्यांनी समजून उमजून आणि हिशेबाने काम केले पाहिजे. जनता जागृत झाली तर ती असा हिशेब मागीलही.

शेवटी एका अविस्मरणीय घटनेचा उल्लेख करून हा लांबलेला लेख संपवितो. माझ्या जीवनातील ती घटना म्हणजे एक मूल्यवान अनुभव आहे. १९४२ साली भूमिगत राहून काम करीत असतानाचा तो प्रसंग आहे. ऑगस्टचे

उघड बंड थंडावले होते. आम्ही जनतेंतील असंतोषाची आग पेटवून क्रांतिकारी बंड भडकविण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यावेळच्या वायुसेनेचे सर्वात वरिष्ठ भारतीय अधिकारी श्री. मुजुमदार हे होते. त्यांना त्यांचे मित्र जम्बो – जम्बो मुजुमदार म्हणत. आम्ही ज्या गुप्त जागी राहत होतो तेथे जम्बो आम्हांला भेटायला आले. दोन तास मनमोकळेपणाने ते आमच्याबरोबर राहिले. कोणी आपल्याला या ४२ वाल्या पुढाऱ्यांबरोबर पाहिले तर आपले काय होईल याची तिळमात्र भीती त्यांच्या मनात नव्हती. वायुसेनेच्या सर्व अधिकाऱ्यांच्यावतीने जम्बोंनी बोलता, बोलता आम्हाला आश्वासन दिले की, जनतेने पुन्हा क्रांतिकारी उठाव केला तर भारतीय वायुसेना त्यातील आपला वाटा उचलील. ऑगस्ट उठावाच्या वेळी आम्ही बेसावध होतो, परंतु यापुढे तसे होणार नाही.

मी त्या वेळी फार प्रभावित झालो होतो. उंच व सुंदर देहयष्टी आणि स्थिर व मोकळे मन असलेले जम्बो एवढी मोठी जोखीम उचलीत असतानाही किती शांत होते. माझ्या दृष्टीने जम्बो हे निर्मळ व हितकारी निष्ठेची जितीजागती तस्वीर होते आणि आजही आहेत. भारतीय सेनेने जम्बोंना आपला आदर्श मानले तर चांगले होईल. आपल्या सार्वजनिक जीवनात इतकी घाण भरलेली आहे की, निष्ठा कशाला म्हणायचे आणि गुलामी वृत्ती कशाला म्हणायचे हे ठरविणे कठीण जाते. आझाद् हिंद् सेनेला स्वतंत्र भारताच्या सेनेत न सामील करून घेण्याचे हेच कारण होते की काय ते मला माहीत नाही. जम्बो माझ्या दृष्टीने अद्यापही आदर्श आहेत. माझ्या देशाच्या सेनेची जबाबदारी माझ्यावर पडली तर ज्या महान ध्येयाची चर्चा मी या लेखात केली आहे त्याविषयीची आस्था भारतीय सेनेत निर्माण व्हावी म्हणून मी सेनेपुढेही जम्बोचाच आदर्श ठेवीन.

[ ‘ मनकाइंड ’. १९६६ ]

● ● ●

## भारतमाता

'भारतमाता' याचा अर्थ तिची जमीन व तिचे लोक. भारतमातेची हजारो मुले दरसाल मरतात. कारण तीन-चतुर्थांश लोकसंख्येला साऱ्या आयुष्यात कधी पुरेसे शरीरपोषक अन्न मिळत नाही. भारतमातेच्या लोकसंख्येत अशा रीतीने क्षय होत असल्याचे आपणास माहीत आहे. तसेच भारतमातेंची जमीनही शेजारी आक्रमक लुबाडून नेत असल्याचेही आपण पाहतो. परंतु आता तर याहून एक अधिक भयानक गोष्ट उघडकीस आली आहे. आता भारत मातेच्या जमिनीच्या आकडेवारीत स्वतः सरकारच भयंकर गडबड घोटाळा करून राहिले आहे. राष्ट्राची सीमा आकुंचित केली जात आहे. ही घटना राष्ट्रीयतेशी निगडित आहे. कारण माणसाच्या शरीराच्या त्वचेला जे महत्त्व तेच देशाच्या सीमांना. राष्ट्रीय शरीराच्या या त्वचेवर हल्ला होत असताना एखाद्या योग्याप्रमाणे शांत बसणे शक्य नाही. भारताची भूमी ही सरकार आपली कौटुंबिक संपत्ती समजते की काय ?

जाणतेपणी म्हणा अथवा अजाणतेपणाने म्हणा, सरकारने देशद्रोह केला आहे. आपल्या एका पुस्तकात भारत सरकारने गेल्या पंधरा-सतरा वर्षांत देशाचे क्षेत्र-

फळ जवळपास १३ हजार चौरस मैलांनी कमी दाखविले आहे. आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेने प्रकाशित केलेल्या एका पुस्तकात त्याच्या जवळपास सात पट कमी जमीन दाखविली आहे. सं. रा. संघटनेच्या पुस्तकातील भारतीय भूमीच्या क्षेत्रफळाच्या आकड्यांपैकी सर्वांत जास्त व सर्वांत कमी आकडा यात २½ लाख किलो मीटर्सचा फरक आढळतो. एक चौरस मैल म्हणजे २.९ चौरस किलो-मीटर्स. भारतीय क्षेत्रफळासंबंधीचे आकडे भारत सरकारच संयुक्त राष्ट्र-संघटनेकडे पाठवीत असते. १९६१ पासून सं. रा. संघटनेच्या पुस्तकात भारतीय भूमीचे क्षेत्रफळ कमी दाखविण्यात येऊ लागले. कारण भारत सरकारने पाठविलेले आकडेच कमी होते. सरकार म्हणते, त्या वेळी जमिनीची मोजणी पुरी झाली नव्हती; मग अर्धवट आकडे पाठविण्याचा मूर्खपणा सरकारने का केला? १९६१ नंतर सं. रा. संघटनेच्या पुस्तकात जम्मू-काश्मीरची भारतव्याप्त भूमी भारतीय भूमीच्या क्षेत्रफळातून वगळण्यात येऊ लागली. त्या आधी ती दाखविण्यात येत असे. सरकार म्हणते, आम्ही याबद्दल सं. रा. संघाकडे विरोध नोंदविला आहे. आझाद काश्मीर या पाकव्याप्त प्रदेशाच्या भूक्षेत्राचा समावेश भारत सरकारनेच आपल्या आकड्यातून वगळल्याचे दिसते. तरीही सरकार सांगते, की ती भारतीय भूमीच आहे. आतल्या आत गुप्तपणे काश्मीरची जमीन पाकिस्तानला देण्याचे घाटत आहे की काय, अशी शंका येते. अर्थात पाक-भारताचा महासंघ बनेल तेव्हा काश्मीर कोठे जाते, कोठे राहते याची चिंता वाटण्याचे कारण नाही. पण तसे होत नाही तोवर संपूर्ण जम्मू-काश्मीरचा समावेश भारतीय भूमीतच केला गेला पाहिजे.

संयुक्त राष्ट्रसंघटना ही एक प्रकारची, तिच्या सदस्यांवर कायदेशीर व दंडात्मक बंधने असलेली संस्था आहे. म्हणून या संस्थेने काहीही आकडे प्रसिद्ध केले तरी त्याची आम्हांला पर्वा नाही; आम्ही जे आकडे सांगतो तेच महत्त्वाचे आहेत असे म्हणणे बालिशपणाचे व धाडसाचे आहे. अज्ञानापोटी दाखविलेली ती बेपर्वाई आहे. आपल्या चुकीचे समर्थन करण्यासाठी सरकारी मंत्री म्हणतात की यात विशेषसे काही नाही. दुसरे देशही अशी चूक करतात हा युक्तिवाद भ्रामक आहे. अमेरिका-रशियासारख्या देशांच्या १९५० ते ५८ पर्यंतच्या क्षेत्रफळांच्या आकड्यात सतत आठ वर्षे काहीही बदल आढळत नाही. फक्त १९५८ चा अमेरिकेचा आकडा १० लाखांनी जास्त आहे. कारण त्या वर्षीच्या आकड्यात अमेरिकेच्या हवाई सीमेचाही समावेश आहे.

भारत सरकारच्या 'इंडिया सर्व्हे' या पुस्तकातील भारतीय भूमीच्या क्षेत्रफळाच्या आकड्यांप्रमाणे देशाची ८४ लाख एकर जमीन कमी झाली आहे.

आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या पुस्तकातील आकड्यांनुसार ५ कोटी ९० लाख एकर जमीन कमी झाली आहे. या प्रश्नाची भारत सरकारच्या विदेशमंत्र्यांनी व शिक्षणमंत्र्यांनी (छागलांनी) लोकसभेत नुकतीच जी संभावना केली ती ऐकून कोणाही देशप्रेमी माणसाचा थरकाप उडेल.

सरकारने असा खुलासा केला की, 'इंडिया सर्व्हे' या पुस्तकातील आकड्यात फरक आढळतो याचे कारण सरकारतर्फे चालणाऱ्या जमिनीच्या मोजणीच्या पद्धतीत सतत सुधारणा होत आहे; आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या पुस्तकातील आकड्यांत दिसणारे अंतर त्या आकड्यांत जम्मू व काश्मीरचे क्षेत्रफळ कमी दाखविले गेले आहे, म्हणून दिसत आहे. या दोन्ही गोष्टी चूक आहेत. इंडिया सर्व्हे गेली ऐंशी वर्षे देशाची एकेक इंच जमिनीची मोजणी करीत आहे. तेव्हा जास्तीत जास्त १०-२० किंवा काही शेकडा मैलांचा फरक फार तर क्षेत्रफळाच्या आकड्यात पडू शकेल. परंतु हजारो मैलांचा पडणे शक्य नाही. तसेच १९६१ मध्ये भारतीय प्रदेशात गोवा, दीव, दमण, नगरहवेली, पाँडिचेरी, चंद्रनगर, कराईकल, माहे हा प्रदेश समाविष्ट झाला. त्या सर्व प्रदेशाचे क्षेत्रफळ चार-पाच हजार चौरस मैल आहे असे सांगितले जाते. हे क्षेत्रफळ लक्षात घेता सरकारचे आकडे व वास्तविक आकडे यांच्यात खरे म्हणजे ७ हजाराचे अंतर आहे; सरकार म्हणते त्याप्रमाणे २ हजारांचे नाही. खरे म्हणजे मूळ अंतर २ हजार नाही तर ८ हजार आहे. त्यात गोवा, पाँडेचरी आदींचे ५ हजार चौरस मैल मिळविले तर हे अंतर १३ हजार चौ. मैल होते. म्हणजे एवढी जमीन भारताच्या मूळ क्षेत्रफळातून घटली आहे.

ही जमीन कोठे गेली हे सांगणे हे सरकारचे कर्तव्य आहे; जनतेचे नाही. सरकारची लबाडी व देशद्रोह बाहेर आला आहे. जमीनमोजणीच्या पद्धतीत फरक झाल्याने जमिनीच्या क्षेत्रफळाच्या आकड्यात फरक आढळतो, या सरकारच्या उत्तराने जनतेचे समाधान होणार नाही. एखाद्या परिपक्व लोकशाही असलेल्या देशातील जनता सरकारने असे उत्तर दिले असते तर उपहासाने हंसली असती आणि त्या नुसत्या हास्याच्या पुरात तेथील सरकारला जलसमाधी मिळाली असती.

सरकारने असे समजून सुस्कारा टाकू नये की, आपल्या गुन्ह्याचा परिणामच केवळ जनतेच्या ध्यानी आला आहे. सरकारने या क्षेत्रात केलेली काही दुष्कृत्येही देशाच्या लक्षात आली आहेत. उदाहरणार्थ, पंतप्रधान नेहरूंनी लांगजू खोरे चिन्यांसाठी सोडून दिले त्या वेळी देशाला व लोकसभेला त्यांनी सांगितले की,

ते खोरे मैल दोन मैल आहे. नेहरू त्या वेळी घाद्यांत खोटे बोटले. लांगजू खोऱ्याचे क्षेत्रफळ चांगले १०० चौरस मैल आहे. "आपल्या सव्हेंत आणखी कोणत्या व किती भारतीय भूमीचा आपण समावेश केलेला नाही?" असे संतप्त होऊन देशाने सरकारला विचारले पाहिजे. मला असे समजले आहे की, मानसरोवराजवळील मनसर या गावाचे क्षेत्रफळही भारतीय भूमीच्या क्षेत्रफळातून सरकारनें गाळले आहे. ती भारतीय भूमी आहे यासंबंधीचा पुरावा उपलब्ध आहे. १९३१ व १९४१ च्या शिरगणतीत त्या गावच्या लोकसंख्येचा समावेश केलेला होता. त्या गावावरचा भारताचा अधिकार सरकारने सोडला काय? अक्साई चीनची कोणती व किती जमीन चीनला देण्यात आली हे सरकारलाच माहीत! जो बाराहोती भाग चीनला दिला गेला तो भाग म्हणजे बडी बाराहोती गाव; छोटा बाराहोती नाही. बडी व छोटी अशी दोन बाराहोती गावे आहेत.

ब्रह्मदेशलाही बरीच जमीन देण्यात आली असावी. बहुधा ३–४ हजार चौरस मैल असेल. लोकसभेत नेहरूंना जाब विचारणारे कोणी नव्हते त्या वेळी ही जमीन दिली गेली. पुढे कांही वर्षांनी अक्साई चीनची भूमी चीनला दान करताना नेहरूंची जी भूमिका होती तीच या ब्रह्मदेश-भारत सीमा कराराच्या वेळीही होती. त्या वेळी ते म्हणाले होते, "तेथे नुसते दगड-धोंडे तर आहेत. गवताची एक काडी देखील तेथे उगवत नाही." कोणी कम्युनिस्ट असे वाक्य बोलला तर त्याला जगणे कठीण होईल. आजकाल प्रधानमंत्र्याच्या गादीतच काही तरी दोष निर्माण झाला असला पाहिजे. त्या गादीवर बसणाऱ्या माणसाच्या बुद्धीत देशद्रोहाचे व दुर्बलतेचे किडे घुसतात की काय कोण जाणे! भारतीय नेत्यांना, विशेषतः कॉंग्रेसनेत्यांना आणखी एक दुर्गुण जडला आहे. त्यांच्या कोशात 'मी' व 'देश' हे समानार्थी शब्द आहेत. प्रधानमंत्री नेहरूंनी हा परिपाठ सुरू केला. तीन–चार हजार चौरस मैल भारतीय भूमी दान करून दुनियेत किंवा ब्रह्मदेशात 'शांति-दूत' म्हणून प्रधानमंत्र्यांना ख्याती मिळाली की बस्स! मग ते इतर कशाचा विचार करणार नाहीत. कारण त्यांना असे वाटते की भारताच्या प्रधानमंत्र्याला शांतिदूतपद मिळाले की त्यात साऱ्या भारताचे कल्याण आलेच! अशा प्रकारच्या वर्तनाचा फायदा काही काळच लाभतो, दीर्घकाळ नाही. दोन-चार वर्षे ब्रह्मदेश भारताचा दोस्त बनतो; गोडवे गातो. पण त्यानंतरच्या ब्रह्मदेशच्या धोरणावर या गोष्टीचा काहीही प्रभाव शिल्लक राहत नाही.

आता या प्रश्नाच्या बाबतीत सरकारने खरे काय आहे ते सांगितले तरच त्याची सुटका होऊ शकेल. आपल्या स्वतःच्या सर्व्हेतील आकड्यांनीच सरकारने आपला देशद्रोह शाबीत केला आहे. तेव्हा आणखी असत्य बोलून आपला देशद्रोह सरकारने चालू ठेवू नये.

आता राहिला संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आंकडेवारीचा प्रश्न. भारतीय क्षेत्रफळात सं. रा. संघटनेने जम्मू-काश्मीरच्या भूमीचा समावेश केला नाही असे उडवाउडवीचे उत्तर देऊन भागणार नाही. या प्रकरणात सर्वत्र आणखी काही-तरी काळेबेरे आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या पुस्तकात सालवार दाखविलेल्या भारतीय भूमीच्या क्षेत्रफळाच्या आकड्यात १९५७ सालापुढे दाखविलेले क्षेत्रफळ सर्वांत अधिक म्हणजे ३२,८८,८७६ चौरस किलोमीटर्स आहे. आणि सर्वांत शेवटच्या म्हणजे १९६६ या वर्षापुढे दाखविलेले क्षेत्रफळ ३०,४०,२२० चौरस कि. मी. आहे. म्हणजे २,४८५६ चौरस कि. मी. कमी आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या १९५१ मधील पुस्तकातील आकड्यांनुसार जम्मू-काश्मीरचे क्षेत्रफळ २,१३,४० चौरस कि. मी. आहे. म्हणून ही गोष्ट स्पष्ट आहे की, जम्मू-काश्मीरच्या क्षेत्रफळाव्यतिरिक्त ३० किंवा ३६ हजार चौरस कि. मी. जमीन सं. रा. संघटनेने भारतीय क्षेत्रफळातून काढून टाकली आहे. ही जमीन कोणती ? ज्या अक्षम्य बेफिकीरीने मंत्री लोक या प्रश्नाचे उत्तर देत असतात त्यांना कोणती सजा द्यावी ? मंत्री अडचणीत सापडला की सत्यासत्याची पर्वा न करता काही तरी उत्तर ठोकून देत असतो. त्यानुसार विदेशमंत्र्याने सांगून टाकले की, सं. रा. संघटनेच्या पुस्तकात जेथे भारतीय क्षेत्रफळाचे आकडे दिलेले असतात तेथे जम्मू-काश्मीरचे क्षेत्रफळ त्यात समाविष्ट नाही अशी टिपणी जोडलेली असते. १९६४ च्या किंवा बहुधा दुसऱ्याही वर्षांच्या सं. रा. संघटनेच्या पुस्तकात अशी कोणतीच टिपणी दिसत नाही.

भारतमाता म्हणजे तिचे ४८ कोटी लोक व १२,६९,६४० चौरस मैल जमीन. लोक व जमीन. काँग्रेसी लोक व अन्य लोक छाती फुगवून नेहमी इंच इंच जमिनीची भाषा करीत असतात. आपल्या देशात उक्ती व कृती यांमधील संबंध पार नाहीसा झाला आहे. अशा वेळी संयुक्त समाजवादी पक्षाच्या खासदारांनी भारतीय क्षेत्रफळाचा प्रश्न लोकसभेत प्रभावीपणे उपस्थित केला; काँग्रेसवाल्यांची झुंडशाही व कधीकधी विरोधीपक्षीयांनी केलेली टवाळी व आडकाठी यांना न जुमानता उपस्थित केला ही गोष्ट खचितच अभिनंदनीय आहे. [ जन : १९६६ ]

## दो गज जमीन....

जनरल थिमैय्या सायप्रसमध्ये मरण पावले. परंतु त्यांचे शव हजारो मैलांवर असलेल्या भारतात बंगलूर येथे आणून त्याचा दफनविधी करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या वतीने काम करीत असताना जनरल निम्मो यांना काश्मीरमध्ये मृत्यू आला. पण त्यांचे शव त्यांच्या देशात ऑस्ट्रेलियामध्ये ब्रिस्बेन येथे नेण्यात आले. हे दोघेहि संयुक्त राष्ट्रसंघटनेचे कार्य करीत होते. दुनिया एक आहे. पण दुनियेसाठी काम करणाऱ्यांना अन्यत्र मृत्यू आला की त्यांची कलेवरे मात्र त्यांच्या देशात आणली जातात. अर्थात् ते फार प्रख्यात किंवा श्रीमंत असले तरच. कारण त्यांची शवे विमानाने आणण्यासाठी पैसा लागतो.

जग लहान होत चालले आहे अशी एक पोपटपंची आपण नेहमी ऐकतो. जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत कांही तासांतच जाता येते. राष्ट्रवाद कमी होत आहे आणि आंतरराष्ट्रवाद वाढत आहे असेही म्हटले जाते. पण बड्या माणसांची मृत शरीरे त्यांच्या देशात अंत्यविधी-साठी आणली जातात तेव्हा असेच म्हणावे लागते की, जग जवळ येत असले तरी राष्ट्रवाद वाढत आहे.

मरण पावलेल्या माणसाचे आप्तेष्ट व मित्र त्याच्या देशात असतात हे खरे. त्या माणसाचा चेहरा एकदा शेवटचा पाहावयास मिळावा अशी त्यांची इच्छा असते. त्या देशाचीही त्या माणसाचा अखेरचा सन्मान करावा अशी इच्छा असते. परंतु अखेर जग म्हणून काही आहेच ना? निरनिराळ्या राष्ट्रमाता राहणारच. तथापि सर्वांची एक अशी पृथ्वीमाताहि आहे ना? पृथ्वीमातेला विष्णुपत्नी म्हणणे अधिक योग्य ठरेल. समुद्रवसना व पर्वतस्तनया पृथ्वी. अशा पृथ्वीमातेच्या विशाल कायेवर कोठेही तिच्या पुत्राचा किंवा पुत्रीचा अंत्यविधी होणे हा किती रोमांचकारी प्रसंग आहे! माणूस कोठेही मेला व त्याचा अंत्यविधी तेथेच केला गेला तर त्याचे शेवटचे दर्शन जगाच्या पाठीवरील कोठल्याही देशात होणे टेलिव्हिजनमुळे आज शक्य झाले आहे. अर्थात तो माणूस बडा व श्रीमंत असला तरच!

एक जमाना होता की ज्या वेळी जगातील निरनिराळ्या देशांत जाण्या–येण्यासाठी प्रमाणपत्र किंवा प्रवेशपत्र यांची जरुरी नसे. आता तीं लागतात. तर मग राष्ट्रवाद कमी होतो आहे की वाढतो आहे? एकमेकांविषयीचे भय वाढले आहे की कमी झाले आहे? दुनियेतील देशांना एकमेकांपासून दूर ठेवणारे कायदेकानू व नियम वाढले आहेत व पृथ्वीमातेचा निरादर होतो आहे असेच दिसत नाही काय? परंतु या निरादराला स्वदेशासंबंधीचा आदर म्हणून आज संबोधिले जात आहे. का व कसे कोणाला माहीत!

थिमैय्या व निम्मो हे दोघेही सेनापती आंतरराष्ट्रीय काम करीत होते. यांपैकी जनरल थिमय्यात काही दोषही असतील. कारण अखेर इंग्रजांच्या गुलामीत त्यांचे शिक्षण झाले होते ना? परंतु त्यांच्यात एक अद्भुत गुण होता. तो म्हणजे त्यांच्यातील शांतिवृत्ती. या गुणामुळेच कोरियामधील बिकट स्थिती त्यांनी निभावून नेली. अर्थात् अशी शांतिवृत्ती ही भारतीय माणसांत असावी यांत काही मोठेसे नवल व कौतुक नाही; ते सोपे आहे. तोच आपल्या इतिहासाचा खरा वारसा आहे. म्हणजे हिंदुस्थानी माणसात असलेले अन्य दोष जगातील अन्य लोकांतही असत नाहीत असा याचा अर्थ नाही. येथे एकच विचार प्रस्तुत आहे. आंतरराष्ट्रीय कार्यात असलेल्या एका शांत वृत्तीच्या मृत आत्म्याला आपण विशाल पृथ्वीमातेपासून हिसकावून घेऊन त्याच्या देशात आणले.

हा प्रश्न येथेच संपत नाही. आपल्याच देशात दूर अन्यत्र मरण पावलेल्या बड्या माणसाचे शव त्याच्या गावी आणून त्याचा अंत्यविधी करण्याची प्रथा

आहे. म्हणजे मृत्यु एके ठिकाणी तर अंत्यसंस्कार दुसऱ्या गावी. डॉ. पंजाबराव देशमुख मरण पावले तेव्हा त्यांचे शव त्यांच्या जन्मभूमीस, अमरावतीला न्यायचा विचार होता. परंतु त्यांच्या पत्नींना, विमलाबाईंना व मुलाला सद्‌बुद्धी सुचली म्हणून बरे.

जेथे माणूस मेला तेथे त्याचा अंत्यसंस्कार करणे कमीपणाचे समजले जाते. तो माणूस मोठा नव्हता असे लोक म्हणतील अशी भीती वाटत असावी. त्यामुळे कदाचित त्याला अंत्यसंस्काराकरिता त्याच्या गावी नेले पाहिजे अशी फॅशन पडली आहे. एवंच, पृथ्वीमातेच्या अनादराबरोबरच भारतमातेचाही अनादर होऊ लागला आहे.

या फॅशनपायी केवढा अफाट खर्च होत असेल! बहुतेक प्रसंगी हा पैसा सरकारचा किंवा गरीब जनतेचा असतो. कधी कधी तर मेलेल्या माणसाच्या आप्त-मित्रांना प्रेत नेण्यासाठी सरकारकडे विमानाची भीक मागावी लागते. मेलेला माणूस समजा खूप श्रीमंत असला व त्याच्याच पैशाने विमानाने प्रेत नेले गेले तरी या विलासी फॅशनची काही गरज आहे काय?

जसजसा पैसा वाढतो आहे तसतशा खर्चिक फॅशन्स वाढत असल्याचे दिसत आहे. जन्म, विवाह व मृत्यूप्रसंगी आज किती अवाढव्य पैसा उधळला जातो आहे आणि किती भपका केला जातो आहे याला सीमा नाही. बुद्धीला हे पटते की, मृत शरीराला चांगले स्नान घालून अंत्येष्टीस्थलावर नेले की बस्स झाले. त्यासाठी कमीत कमी खर्च केला पाहिजे हेही पटते. पण तसे कधी कोणी करीत मात्र नाही. कारण माणसात बुद्धीच्या जोडीला मोहहि असतो. अंतिम क्षणी देखील तो आवरता येत नाही. मोह किती व कसा दाखवावा हे ज्याच्या त्याच्यावर अवलंबून असते. या मोहाच्या जोडीला आणखी रीति-रिवाज व फॅशन्स आहेत. निर्मोही बनून या सर्वांचा त्याग करायला शिकले पाहिजे.

साऱ्याच दुनियेत, विशेषतः भारतात, मृतशरीराचा अनादर होत असतो. पायतणे घालून लोक शवगाडीवर बसतात. इतर देशांत अशा प्रकारचा अभद्र-पणा होत नाही. परंतु अनेक प्रकारांनी खर्च व थाट तेथेही केला जातोच. या संदर्भात प्राचीन इतिहासातील दाखला द्यावयाचा झाला तर ईजिप्तचे रमसेस व टुटांखमन यांचा देता येईल.

या सर्व प्रकारामागे माणसाच्या शरीराला महत्त्व देण्याची प्रवृत्ती हे एक कारण आहे. नागरिकतेसंबंधीचे कायदे हे याचे निर्विवाद प्रमाण आहे. असे वाटले होते की, नागरिकतेची व्याख्या व कायदे या बाबतीत स्वतंत्र हिंदुस्थान

दुनियेला आपल्या कृतीद्वारे नवी दिशा देईल. परंतु त्यानेही या बाबतीत युरोप-अमेरिकेची नक्कल केली. माणसाच्या शरीराला महत्त्व दिले. तो कुठे जन्मला, कोणाच्या पोटी जन्मला, ज्याचे नागरिकत्व तो मागतो आहे त्या देशात तो किती दिवस राहतो ? वगैरे. या सर्व गोष्टी शरीराशी संबंधित आहेत. माणसाच्या आत्म्याचा विचार ह्यात नाही. मनाने एखाद्या देशाला व संस्कृतीला एखाद्या माणसाने स्वीकारले की तो त्या देशाचा नागरिक का होऊ शकत नाही ? याहून थोर असे कोणतेही तत्त्व नाही. ते स्वीकारण्यात अडचणी अवश्य आहेत. एखादे बलिष्ठ राष्ट्र हें तत्त्व स्वीकारावयास तयार झाले तरच त्याचे रक्षण होऊ शकेल. कारण सर्वत्र संदेह व भय यांचे वातावरण आहे. म्हणून कमजोर राष्ट्रे या तत्त्वाचा स्वीकार करायला तयार होत नाहीत.

मानवी अधिकारात आणखी एका अधिकाराची भर घालणे जरूर आहे. इतर कोणत्याही मानवी अधिकारापेक्षा त्याचे महत्त्व कमी नाही. हा अधिकार म्हणजे जेथे वाटेल तेथे रहाण्याचा व मरण्याचा. आज मनुष्याला हा अधिकार नाही. गरीब व असहाय्य परकीयांची तत्काल हकालपट्टी होत असते. कारण परकीय लोक आपल्या देशात राहिले व धंदे-व्यवसाय-नोकऱ्या करू लागले, तर ऑस्ट्रेलिया, रशिया, अमेरिका आणखी अन्य कित्येक देशांना भीती वाटते की, आपल्या लोकांचे राहणीमान घसरले. आणि भारत, पाकिस्तानसारख्या राष्ट्रांना भय वाटते की आपले संरक्षण धोक्यात येईल. बिचारा माणूस या चक्कीत आज पिसला जातो आहे.

मनुष्यजातीला आता वाचविले पाहिजे. जात व राष्ट्र यांच्या बंधांनी माणूस आज इतका जखडला गेला आहे की, जन्म, विवाह व मृत्यू या प्रसंगी देखील तो स्वतंत्र नाही. युद्ध व त्यातील विजय यामुळे हे स्वातंत्र्य माणसाला काही अंशी मिळाले आहे. परंतु जगाने ते त्याला समजून उमजून क्वचितच दिले आहे. वर्णसंकर होतील तेव्हांच खरी दुनिया उदय पावेल.

कालांतराने जुन्या वर्णसंकरांची आठवण बुजते आणि ते प्रतिष्ठा पावतात. नवीन वर्णसंकरांकडे काहीशा आशंकेने व मिथ्याभिमानाने पाहिले जाते. त्याचे एक कारण या नव्या वर्णसंकरात काही दोष असतात हे देखील आहे. दीर्घकाळ-पासून जिवंत असलेल्या भारतासारख्या समाजात तर वर्णसंकरांकडे अधिकच साशंकतेने पाहिले जाते. हे त्याच्या जुनेपणाचे अनिवार्य व स्वाभाविक फळ आहे. कारण त्या समाजातील विशेष अधिकार प्राप्त असलेल्या गटांच्या हितसंबंधांवर अशा वर्णसंकरामुळे गदा येत असते. तथापि भारतासारख्या प्राचीन समाजातील वर्णसंकराच्या घटना या नव्या दुनियेची नांदी असतात यात शंका नाही.

भारतातील अँग्लो-इंडियन जमातीने कीलरबंधूंच्या रूपाने भारतीयत्वाला व मानवतेला एक मोठी देणगी दिली. या वैमानिक कीलरांचा पराक्रम इतर कोणत्याहि वीरापेक्षा कमी दर्जाचा नाही. त्यांनी शरीर व मन यांच्याद्वारे दुनियेला आपल्या भारतीयत्वाचा एवढा परिचय करून दिला की त्याला तोड नाही. कीलरबंधूंनी सिद्ध केले की, अँग्लो-इंडियनांचे विशेषधिकारी खतम केले पाहिजेत. त्यांच्या या विशिष्ठ गुणांचा जेवढा फायदा देशाला घेता येईल तेवढा घेतला गेला पाहिजे. अँग्लो-इंडियनांना मिळणाऱ्या ज्या विशेषाधिकारांमुळे ते देशात अलग जमात म्हणून राहतात व त्यांचे प्रतिनिधी लोकसभेत नियुक्त केले जातात असे विशेषाधिकार तरी रद्द केले पाहिजेत. सरकार त्यांची नियुक्ति करीत असते. थिमैय्यांना सायप्रसमधून बंगलूरमध्ये अंत्यसंस्कारासाठी आणणारे, देशांतल्या विविध जाति-जमातीत कलह लावून स्वतःचा स्वार्थ साधणारे आणि भीती व संदेह या पोटी कोणतेहि नवीन पाऊल न उचलणारे सरकारच अँग्लो-इंडियनांना असे विशेषाधिकार देत असते.

अँग्लो-इंडियनांचे लोकसभेत अलग प्रतिनिधी असले पाहिजेत असे मानले तरी ते कमीत कमी निवडून आलेले असले पाहिजेत, सरकारी कृपेने नेमलेले नाहीत. जोवर त्यांची सरकार नेमणूक करीत आहे तोवर हे लोक इंग्रजीचे गुलाम राहणार; आपल्या मातृभाषेचे भक्त कधीही होऊ शकणार नाहीत. आपले अलगपण कायम ठेवण्यासाठी हे लोक सरकारशी भांडतील, पण इतर मूलभूत बाबतींत सरकारचे पिट्टू म्हणूनच ते वागतील. येशूची भाषा इंग्रजी होती असे सांगून ते स्वतःला व आपल्या समाजाला सदैव भ्रमात ठेवतील. तसे तर भारतातील खिश्चनही याच भ्रमात वावरत असतात. खरे म्हणजे येशूची भाषा अरेमिक होती. ही भाषा इंग्रजीपेक्षा आजच्या हिंदीला अधिक जवळची आहे.

मानवाच्या मनात फारच कचरा साठलेला आहे. तो साफ करणे फार कठीण काम आहे. कांही लोकांना माझ्या या सर्व विचारांत भारतीयता व मानवता यात मी गोंधळ करतो आहे असे वाटेल. कारण त्यांची स्वतःचीच दृष्टी सदोष आहे; तीत गोंधळ आहे. खऱ्या भारतीयतेच्या जागी या लोकांनी नकली, भ्रामक उदारतापूर्ण व खंडित मानवता जोपासली आहे. आणि खऱ्या मानवतेऐवजी संकुचित व मनाचा कोंडमारा करणारी भारतीयता ते कवटाळून बसले आहेत. त्यांना वाटते, आपण विश्वमानव बनून राहिलो आहोत. परंतु अनैतिक विश्वमैत्रीपेक्षा त्यांच्या प्रयत्नात अधिक काही नाही. या त्यांच्या चुकीच्या प्रयत्नामुळे हे लोक आपला देशही गमवीत आहेत आणि दुनियेलाही

वंचित होत आहेत. मृतशरीरे देशात आणीत आहेत व देशाला मात्र मृतशरीर बनवीत आहेत. स्वतःच्या देशाला त्याची भाषा बोलू देत नाहीत, तर त्यावर अशा एका देशाची भाषा लादीत आहेत की ज्या देशाचे आपण गुलाम होतो. अनैतिक विश्वमैत्रीविरुद्ध धर्मयुद्ध पुकारल्याशिवाय खरी विश्वमैत्री कधीही साध्य होऊ शकणार नाही.

दिल्लीचा अखेरचा बादशहा बहादुरशहा जफर याच्या काव्यपंक्ती या वेळी आठवतात– " दफ्न के लिए दो गज जमीन भी न मिली कुए यार में ! " कूए-यार, मातृभूमी इत्यादी कल्पना मानवावर आपली नशा कांहीना कांही अंशी पसरवीत राहतील हे खरे. परंतु असे किती व्हावे, कधी व्हावे याचा विचार झाला पाहिजे. एखाद्याचा देश त्याच्यापासून हिरावून घेतला जातो तेव्हा त्या देशांतील ' दो गज ' जमीनीसाठी त्याने आक्रोश करावा हे स्वाभाविक आहे. परंतु ज्याला आपला देश आहे त्याला जगातील कोणत्याहि देशातील ' दो गज ' जमिनीला आपली जमीन का मानता येऊ नये ? व त्यानेही तसे का मानू नये ? खुद्द देशवासीयांनाही असा अनुभव आज येत आहे की त्यांच्याच काही देश बांधवांनी त्यांची घरे बळकाविली आहेत व त्यांना घराबाहेर राहावे लागत आहे. हे लोक आपल्या ' कुए-यारा 'ला सुधारता सुधारता त्यांची- ' दो गज ' जमीनच हिरावून घेत आहेत.

हिंदुस्थानी काव्यातील उर्दू काव्यात उदासीनतेची अजोड, असीम अभिव्यक्ती दिसते. गालिब व मीर हे कवी १८५७ च्या आसपास होऊन गेले. देशाचे स्वातंत्र्य त्यावेळी अस्तंगत होत होते. अशा वेळी कवीचे प्रेममय मृदु मन काहीशा अधिक सुलभतेने आणि अधिक प्रमाणांत तुटत असते. जेव्हा मन हंसत असते तेव्हा देखील कधी कधी उदास बनण्यात मजा येत असते, पण थोडाच वेळ. जफरचे हृदय कायमचे निराश झाले होते. कारण तो आपल्या देशाला मुकला होता. तसें झाले नसते त्याची निराशा काही क्षणच राहीली असती.

[ ' जन ' मासिक : फेब्रुवारी, १९६६ ]

● ● ●

## भारताचा राजा : इंग्लंडची राणी

भारताचा राजा सध्या एका राणीच्या स्वागताची जय्यत तयारी करीत आहे. राजा हा एक अकल्पितपणे सत्ताधनाचा लाभ झालेला यजमान आहे, तर राणी ही रानटी वैभवाची प्रतिनिधी असलेली पाहुणी आहे. या पाहुणीला कल्पना नाही की, आपले भयानक जंगली स्वागत होणार आहे त्या अगोदर या देशात देवी, पटकी, प्लेग व इतर साथीच्या रोगांनी निदान चाळीस लाख लोकांना अकाली मरण आलेले आहे. हे सर्व त्या यजमान राजालाही माहीत आहे पण त्याची त्याला चिंता नाही. कारण तो म्हणतो, रोज मरे त्याला कोण रडे! राणीच्या देशात देवी, प्लेग, कॉलरा व अपुरा आहार इत्यादी आपत्ती पार नष्ट केल्या गेल्या आहेत. तेथे या आपत्तींनी वीस-पंचवीस लोक जरी मेले तरी बंड होईल. पण आमच्या या राजाच्या देशात दरवर्षी अशा प्रकारच्या साथीच्या आजारात दरसाल तीन ते सहा दशलक्ष लोक अकाली मृत्युमुखी पडत असतील. ज्या देशात माणसांचे प्राण इतके स्वस्त असतात, इतके सहज खर्ची टाकले जातात त्या देशातील सरकारवर कोणत्याच नैतिक व शासकीय कायद्याचे नियंत्रण चालू शकत नाही. मग आपोआपच ही सरकारे बेछूटपणे

भपका व उधळपट्टी करीत असतात. त्यांच्या प्रजेलाही भपक्याचा षोक असतो. कारण तिने दारिद्र्यामुळे स्वतः असा थाटमाट कधी अनुभवलेला नसतो किंवा तो डोळ्यानी पाहिल्यावर भूतकाळातील आपल्या वैभवाच्या सुखद आठवणीत ती रमून जाऊ शकते. जे धनिक व शक्तिमान असतात त्यांना त्यांच्या जीवनातील रिक्ततेमुळे अशा थाटमाटात व भपक्यात एक प्रकारचा आधार लाभतो. त्यांना हा भपका हे देशात स्थैर्य असल्याचे लक्षण वाटते. नाहीतर ज्या देशातील लोकसंख्येपैकी फक्त एक टक्का लोक सत्ता उपभोगतात आणि चाळीस टक्के जनतेला रोज दोन वेळ भरपूर जेवायला मिळाल्याचेही कधी स्मरत नाही; पन्नास टक्के लोक अर्धपोटी जगतात आणि केवळ नऊ टक्के लोकाना चांगले नाही तरी पुरेसे अन्न मिळते, त्या देशात स्थैर्य आहे असे समजायला दुसरे साधन तरी काय ? राजा व राणी या दोघांनाही स्थैर्य हवे आहे. अर्थात् दोघांची कारणे भिन्न आहेत.

ज्या राजघराण्यातील एका राजाचे प्रेत थडग्यातून काढून कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे नंतर फासावर टांगण्यात आले अशा राजवंशातील ही राणी आहे. पुन्हा तसा प्रसंग तिच्या देशात उद्‌भवण्याची आता मुळीच भीती नाही. देशांतर्गत जुलमाविरुद्ध अनेकदा बंड केल्यामुळे त्या देशातील जनतेची मने आता मजबूत बनली आहेत. त्यामुळे आपल्या देशात ती जनता आता जुलमी सत्तेला सहजासहजी मूळ धरू देणार नाही. म्हणून तिच्यावर ती उखडून टाकण्याचा प्रसंगही येणार नाही. पण आमचा राजा ज्या देशाचा मालक आहे त्या देशाने गेल्या हजार वर्षांत एकदाही स्वकीयांच्या जुलुमी सत्तेविरुद्ध बंड केलेले नाही. उलट या काळात सात वेळां परचक्रांना तो देश बळी पडला आहे. आणि दीर्घकाळ सतत गुलामीत राहण्यात त्या देशाने जगात लीलेने उच्चांक प्रस्थापित केला आहे. राजा व त्याची प्रजा या दोघांनाही आहे त्या परिस्थितीत मजा वाटत असते. वारा येईल तशी पाठ फिरवावी आणि आहे त्या जीवनाच्या गलिच्छ डबक्यात डुंबत राहावे यातच राजा व प्रजा या दोघांनाही मोठेपणा वाटतो. हा प्रजासत्ताक राजा व ही राजेशाहीतील राणी यांच्यातील हा संबंध थेट महाराणी व्हिक्टोरियापासून चालत आलेला आहे. व्हिक्टोरिया राणीच्या पोलीसखात्यात १८५७ साली या राजाचा पणजा आरदली होता. त्याचाच पणतू आज व्हिक्टोरियाच्या खापरपणतीचे एवढ्या थाटात खर्चिक व जंगली स्वागत करून राहिला आहे. जुने रक्त तर आपला खरा रंग दाखवीत नसेल ? की देशातली जनताच बेशरमपणाने इतकी स्वाभिमानशून्य बनली आहे की ती गुलामीवर परंपरेचा व सौजन्याचा मुलामा चढवून ती झाकू पाहत आहे ?

हिंदुस्थान घाण चाटण्यातच आनंद मानतो. या देशाच्या सध्याच्या राजाला तर ही कला फारच अवगत आहे. त्याचा पणजा, जेव्हा देशातील जनता परकी सत्तेविरुद्ध बंड करून उठली होती, तेव्हा तिच्या नोकरीत होता. कमालीचा गलिच्छ देशद्रोह! या पणजाचा पणतु आपल्या कृत्यांद्वारे देशांतील श्रीमंत किंवा उच्चवर्णीय अथवा उच्चशिक्षित कुटुंबांनी परंपराच जतन करीत आहे. या परंपरेतील लोकांनी पिढ्यान्‌पिढ्या थुंकी चाटण्याची जी कृत्ये केली त्यांचा या राजाला विसर पडला आहे. द्वितीय एलिझाबेथ राणीचे भारतात जे अफाट स्वागत होऊ घातले आहे ते या उच्चवर्गीय व इंग्रजीशिक्षित सत्ताधारी वर्गाच्या थुंकीझेलू प्रवृत्तीचेच द्योतक आहे. जनतेच्या अफाट दारिद्र्याच्या महासागरातील आपले लहानसे बेट सुरक्षित व स्थिर ठेवण्याचा हा प्रयत्न आहे.

एलिझाबेथ राणीच्या स्वागतासाठी जनतेचा वीस कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसा उधळला जाईल. तितक्याच रकमेचे किंवा त्याहून थोड्या कमी रकमेचे आहेर तिला दिले जातील. ही असमर्थनीय उधळपट्टी कशासाठी चालली आहे? राणीचा देश तर या देशासाठी एक पैसा खर्च करीत नाही! उलट हिंदुस्थानातील व्यापार, राष्ट्रकुटुंबीय संबंध आणि येथील इंग्रजी बडबडणारी माकडे यांच्या सहाय्याने ब्रिटन फायदाच मिळवून राहिले आहे. आणि त्याच्या मनाला त्याचे काही वाटतही नाही. युरोपीय लोक येथे आले की येथल्या माणसांनी खांद्याने चालविलेल्या रिक्षात बसून खुशाल हिंडतात. त्याचेहि त्यांना काही वाटत नाही. ही माणसासारखी माणसे रिक्षा का चालवितात हे आपण सांगेपर्यंत त्यांच्या ध्यानीही येत नाही. स्वतःच्या देशात असे मनुष्यचलित रिक्षा दिसले तर त्यांना धक्काच बसेल. कदाचित संवय झाली तर तेही कालांतराने होणार नाही. माणूस हा संवयीचा भयंकर गुलाम आहे. नट्टापट्टा करून हिंडणाऱ्या श्रीमंतस्त्रिया तर फारच. त्यांना तर अशा रिक्षात बसताना काहीच संकोच वाटत नाही. नव्या जमान्याची ओळख करून देणारा आवाज उठविला गेला नाही तर माणसाची ही अधोगती रोखणे अशक्य आहे.

राणीच्या स्वागताच्या समर्थनार्थ राजा सांगत आहे ती कारणे प्रथमदर्शनी भयानक असली तरी स्वाभाविक आहेत. राजाला राष्ट्रकुटुंबाबरोबरचे आपले संबंध अधिक घनिष्ठ करावयाचे आहेत. कारण त्यामुळेच सत्तान्तराच्या वेळी भारतीय शासनात, पूर्वीच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांशी असलेल्या वारसा संबंधाचे जें सूत्र जतन करून ठेवण्यात आले ते पुढेही राजाला कायम ठेवता येईल. राजाला इंग्रजी कायम ठेवायची आहे. कारण त्याद्वारे त्याला देशातील

नव्वद टक्के लोकांना वाचाहीन व बहिरे बनविता येऊ शकेल. आणि लोक मुके व बहिरे बनले की मग राजाला विरोध होण्याचा प्रश्न फारसा राहतच नाही. परंतु राजाची परिस्थिती राणीपेक्षा बिकट आहे. राणीच्या देशात तिच्याविरुद्ध जनतेचा उठाव होण्याची भीती केव्हाच मावळली आहे. परंतु राजाच्या देशात उठावाची चिन्हे दिसू लागली आहेत. म्हणून राणीच्या स्वागताचे वेळी वैभवाचे प्रदर्शन करून दारिद्र्यग्रस्त जनतेचे डोळे दिपवून टाकण्याचा व सत्ताधारी वरिष्ठ, इंग्रजीशिक्षित वर्गीयांना स्थैर्याचे खोटे समाधान मिळवून देण्याची राजाची धडपड आहे.

जुलमी स्वकीयांविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ती व परकीयांची आक्रमणे ही परस्परांशी निगडित असावीत. जे स्वकीयांच्या जुलुमाविरुद्ध लढतात त्यांच्यावर आक्रमण करायला परकीयही फारसे धजावत नाहीत. या विचाराला व इतिहासातील या सत्याला इतिहासाच्या आजवरच्या क्रमिक पुस्तकांत स्थान दिले गेले नाही. आजवरचे, निदान गेल्या तीनशे वर्षांतले भारतीय इतिहासलेखक हे स्वतःच बंडखोर राष्ट्रातील होते. याच काळात त्यांच्या देशांत अंतर्गत जुलमी सत्तेविरुद्ध अनेक बंडे झाली होती. ही बंडे हा त्यांच्या राष्ट्रीय चारित्र्याचाच एक स्थायी भाग होता. आपल्या या बंडखोर प्रवृत्तीमुळेच ते आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकले; परकीयांपासून आपल्या देशाला बचावू शकले. पण रंगीत राष्ट्रात नेमका या बंडखोर प्रवृत्तीचा अभाव का होता त्याचे विश्लेषण या बंडखोर देशातील भारताच्या इतिहासकारानी केलेले नाही. रंगीत राष्ट्रांना आपल्या शरीरावरील व मनावरील साम्राज्यवादी सत्तेच्या प्रभुत्वाचे काही वाटत नव्हते; तीं मुर्दाड बनली होती. त्यामुळेच युरोपीयन इतिहासकारांना सारे रान मोकळे मिळाले. हिंदुस्थान हा तर साऱ्या रंगीत जगात सर्वांत कमी विद्रोही, सर्वांत कमी स्वाभिमानी व सर्वांत गुलाम देश आहे.

राजा नेहरू राणी एलिझाबेथचे जे स्वागत करणार आहे त्यामुळे भारताच्या एकूण चारित्र्यावर चांगलाच प्रकाश पडला आहे. असा प्रसंग अलीकडच्या काळात कधीच आला नव्हता. या स्वागतावर पाण्यासारखा पैसा वापरला जात आहे. दुसऱ्या एखाद्या कमी रोगट व कमी दरिद्री देशात असे घडते तर तेथे बंड झाले असते. परंतु भूकग्रस्त व रोगग्रस्त हिंदुस्थानात बंड होत नाही. गेली बारा वर्षे भारताच्या कपटी राज्यकर्त्यांनी एका परकी भाषेत देशाचा कारभार चालवून जनतेची जीभच छाटून टाकली तरी जनता त्यांच्याविरुद्ध उठली नाही. राणी एलिझाबेथ आता येथे आली आणि मुलायम इंग्रजी बोलू लागली की आमच्या देशांतील पिढीजाद इंग्रजी गुलाम राज्यकर्त्यांना जणू

१ ०३०३

आणखीन जोर चढेल. सध्याचे पंतप्रधान हे काही एकटेच परकीय सत्तेची गुलामी पत्करलेल्या आपल्या पूर्वजांचे वंशज नाहीत. जवळपास आजचे सर्वच शासक याच गुलाम वंशातले आहेत. हे शासक देशात सरकारविरोधी भावना गंभीर बनत चालली आहे असे दिसताच क्रांतिकारकतेचा आव आणतात. कारण त्यांना आपले आसन स्थिर ठेवायचे असते व क्रांती होऊ द्यावयाची नसते. हे शासक धनिकवर्गातले असतात असे नाही. त्यांच्यामध्ये गरीबही असतात. पण आपल्या देशात पैशाइतकेच शासकांच्या जातीला व शिक्षणाला महत्त्व आहे. या जातीमुळे व शिक्षणामुळे शासकवर्गात एक प्रकारची कमालीची लबाडी वसत असते. वेळ मारून नेण्याचे कौशल्य व लवचीकपणा असतो. भारतीय जीवनात व धर्मात या लोकांनी अशा काही प्रवृत्ती स्थिर केल्या आहेत की ज्या येथे क्रांतीच होऊ देत नाहीत; कदाचित केव्हाच होऊ देणार नाहीत. तशी तर सारी मानवजात बड्या व छोट्या माणसांत विभागली गेली आहे. ही मोठी माणसे देवदूत म्हणून वावरत असतात तर छोटी माणसे हजारो अनामिक व यत्किंचित् जीवजिवाणूंपैकी एक असतात. मग ही छोटी माणसे बड्यांविरुद्ध कशी बंड करणार ? राणी एलिझाबेथ व राजा नेहरू हे दोघेहि मूलतः ख्रुश्चाव व केनेडी या रशियन-अमेरिकन देवदूतांच्या वर्गातले आहेत. त्यांच्यातील राष्ट्र भेद त्यांना एकमेकांपासून अलग करू शकत नाही. आणि या देवदूतांची जमेल तेवढी मर्जी संपादन करणे एवढेच काम छोट्या माणसांनी करावयाचे असते. आपली स्वाभाविक बंडखोर प्रवृत्ती गमावून बसला आहे इतका भारताप्रमाणे कोणत्याच दुसऱ्या देशातील छोटा माणूस छोटा नाही. पण भारतात मोठ्या माणसाच्या लेखी छोट्या माणसाला एखादी निर्जीव खुर्ची किंवा टेबल यापेक्षा जास्त किंमत नाही. तर मग हिंदुस्थानातील छोटा माणूस कधीच बंड करणार नाही काय ? तसे दिसते खरे. कारण येथे बडा व छोटा माणूस यांतील फूट अमिट आहे. या फुटीमुळेच येथे सत्य-असत्य, न्याय्य-अन्याय्य यांतील विवेक पार संपला आहे. भारतातील शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान हे जगातील श्रेष्ठ तत्त्वज्ञान आहे. पण शंकराचार्यांनी ऐहिक सत्य व पारलौकिक सत्य यांत भेद केल्यामुळे तर हा विवेक अधिकच संपला. राजा नेहरू, राणी एलिझाबेथचे स्वागत करून त्यासाठी कोट्यवधी रुपये उधळतात आणि देशाची अप्रतिष्ठा करतात, हे झाले ऐहिक सत्य व आपल्या कृतीचा नेहरू आपणच मागाहून धिक्कार करतात हे झाले पारलौकिक सत्य. जनताही ही परस्परविरोधी सत्ये मुकाट्याने गिळून टाकते. कारण ती दारिद्र्याने पिडलेली आहे. अनेक वर्षे दुःख सहन करीत आली आहे. चुकीच्या तत्त्वज्ञानावर पोसली आहे आणि आपल्या भूतकालीन वैभवाच्या

आठवणीवर जगत आली आहे. तिला सत्यासत्यातील विवेक कळत असला तरी त्याची चिंता नाही. ती डुकरासारखी आपल्याच घाणीत लोळत आहे. आणि सत्ताधारी वर्ग तर अशाप्रकारच्या व्यावहारिक व अंतिम सत्यातील फारकतीवरच पोसला व वाढला असल्यामुळे त्याला ही फारकत नाहीशी करावयाची इच्छाच नाही. नाहीतर, १९६० हे वर्ष जपान, कोरिया, तुर्कस्थान व अन्य देशांना वाईट गेले असले तरी भारताला ते चांगले गेले, असले भयंकर व धादान्त असत्य राजा नेहरू बोललेच नसते. कोणतीही मान्य कसोटी लावली तरी या वर्षात इतर कोणत्याहि देशापेक्षां वास्तविक भारतात माणसाला कमी अन्न मिळाले आहे; अपुऱ्या अन्नामुळे जास्त लोक मेले आहेत; सरकारी बंदुकींना जास्त लोक बळी पडले आहेत; भांडवल गुंतवणूक व औद्योगिक आणि कृषिक्षेत्रातील प्रगति कमी प्रमाणात झालेली आहे. फक्त एकाच कसोटीला हिंदुस्थान उतरला आहे आणि ती म्हणजे आपले राज्यकर्ते वारंवार न बदलण्याच्या; त्यांना स्थिरता देण्याच्या. राजा नेहरू आपल्या गादीवर स्थिर आहेत. सर्व काही स्थिर आहे. जनता समाधानी आहे. आपणच केलेल्या घाणीत लोळणाऱ्या डुकराला असेच आपल्या स्थैर्याचे समाधान वाटत असते. कारण त्या घाणीचे त्याला भानच नसते. ते जवळपास बेशुद्धावस्थेत असते.

राणीला आता दुर्गापूरचे पोलादपूर व ट्रॉम्बेचे अणुपूर दाखविले जाईल. जणू काही ही नगरे म्हणजे हिंदुस्थानात चालू असलेल्या परिवर्तनाची व आधुनिकीकरणाची प्रतीकेच होत. पण वैभवाची अशी केंद्रे पूर्वीही होती. ब्रिटिशांनी उभारलेली नगरे – उदाहरणार्थ, चौरंगी असलेले कलकत्ता व मरीन ड्राइव्ह असलेली मुंबई ही शहरे आणि चांदणी चौक असलेली दिल्ली व आग्रा ही मोगलकालीन नगरे–ही अशीच केंद्रे आहेत. परंतु या वैभवसंपन्न शहरांमुळे काही देशांतील आर्थिक व सामाजिक परिस्थिती भरभराटली नाही. भरभराटणे शक्यही नाही. दुर्गापूर व ट्रॉम्बेबाबत तसेच म्हणता येईल. भारताची आर्थिक व्यवस्था शेती, व्यापार व छोटे कारागीर यावर फारच अधिक प्रमाणात आधारलेला आहे. अशा अर्थव्यवस्थेत या किरकोळ औद्योगिक प्रगतीने मूलभूत परिवर्तन होणार नाही. शिवाय दुर्गापूर येथील औद्योगिक प्रकल्पांत प्रचंड पिळवणूक होत आहे. परकी राष्ट्राला त्यातील नफ्याचा तीस टक्के भाग मिळत आहे. कामगारांना मिळणाऱ्या दरडोई उत्पन्नाच्या पन्नास पटीपेक्षांही जास्त दुर्गापूरच्या अधिकाऱ्यांचे पगार व भत्ते आहेत. एका बाजूला अत्याधुनिक घरे व इमारती उभ्या राहत आहेत तर दुसऱ्या बाजूला अफाट गलिच्छ वस्त्या निर्माण होत आहेत. जमीनमालकाना जमिनीच्या भरमसाठ किंमती मिळत

आहेत तर गरीबांना राहायला 'दो गज जमीन'ही मिळत नाही. दुर्गापूर कारखान्यातील उत्पादित पोलादाच्या किंमतीहि भरमसाट आहेत. गिन्हाइकांची ती फसवणूकच आहे. म्हणून औद्योगीकरण व विकासाविषयीचे धोरण मूलतः बदलल्याशिवाय देशाचे परिवर्तन होणे शक्य नाही. औद्योगीकरणाने इतर सर्व प्रश्न आपोआप सुटतील हा भ्रम झटकून टाकला पाहिजे. खरे म्हणजे इतर प्रश्न सोडविल्याविना औद्योगीकरणही यशस्वी होणार नाही. उत्पन्न, पगार, खर्च, भत्ते व इतर सवलती या बाबतीत कामगार व अधिकारी वर्ग यांच्यात असणारी तफावत दूर केल्याशिवाय व इंग्रजीचा सार्वजनिक उपयोग बंद केल्याशिवाय औद्योगिक प्रगती झपाट्याने होणार नाही. ती होईल असे मानणे हास्यास्पद आहे. इंग्रजी व ही विषमता यांना मजबुती आणण्यासाठीच राणीचे येथे आगमन होत आहे. सत्ताधारी वर्गाचे आसन बळकट व स्थिर व्हावे म्हणूनच तिला हिंदुस्थानात बोलाविण्यात येत आहे.

बहुजनसमाज व सत्ताधारी वर्ग यांच्यामध्ये असणाऱ्या सुशिक्षित वर्गातील तरुणांना क्रिकेटचा मोठा षोक आहे. ही गोष्ट लज्जास्पद आहे. आपल्या पूर्वीच्या मालकाचे आपण अनुकरण केले पाहिजे असे त्यांना वाटत असेल. परंतु क्रिकेट हा ब्रिटिशांचा राष्ट्रीय खेळ नाही. तो मूठभर ब्रिटिश धनिकांचा खेळ आहे. सामान्य ब्रिटिश जनतेचा खेळ आहे फूटबॉल. भारतातील सत्ताधारी, सामान्य ब्रिटिश जनतेची नव्हे तर तेथील मूठभर बड्यांची माकडाप्रमाणे नक्कल करीत आहेत. हे सत्ताधारी क्रिकेटच्या सामन्याच्या दिवशी सुटी देत असतात. त्यांना आकाशवाणीवर बेसुमार प्रसिद्धी देत असतात. क्रिकेटवर आज सरकार अफाट पैसा खर्च करीत आहे. केवळ बांडगूळ लोकांमध्येच हे क्रिकेट-प्रेम असू शकेल.

आमच्या देशाला खोट्या स्थैर्याचे अमर्याद वेड आहे. अस्थिरतेची भीती वाटते. गेल्या दहा वर्षांत देशात झालेली सर्व मोठी व प्रभावी आंदोलने संकुचित व प्रादेशिक मागण्यांसाठीच झाली. व्यापक मागण्यांसाठी केलेल्या चळवळींना पाठिंबा मिळू शकला नाही. एखादी विशिष्ट जात, भाषा, धर्म, प्रादेशिक विभाग यासंबंधीच्या मागण्यांसाठी लोक लढले; पण सर्वांच्या हिताच्या प्रश्नांसाठी मात्र लढले नाहीत. असे वाटते की भारतीय जनतेचा सबंध देशाच्या पुनरुत्थानाच्या प्रयत्नावरचा विश्वास उडाला आहे आणि ती छोट्या छोट्या गटांच्या विकासाकरिताच लढू इच्छित आहे. अशा प्रकारची संकुचित आंदोलनेही सत्ताधारी पक्षातील एका गटाच्या सहाय्यानेच प्रभावी होऊ शकतात. अशा आंदोलनांनी देशाचा मात्र नाश होईल; ती सत्ताधारी वर्गाच्या स्थैर्याला किंचितही धक्का

लावू शकणार नाहीत.

प्रगती म्हणून ज्यांची जाहिरात केली जाते त्यापैकी प्रत्येक गोष्ट ही अंशतः परागतीच आहे. आणि त्यामुळे भविष्याविषयी कमालीची निराशा वाटते. सर्व सरकारी खात्यातील व सार्वजनिक आणि खाजगी उद्योगधंद्यांतील अधिकाऱ्यांनाही आपण प्रगती करीत नाही याची जाणीव असेल. हे अधिकारी व त्यांचे देशबांधव यांच्यामध्ये इतके अंतर आहे की त्यामुळे त्यांच्यातील व युरोपीय सत्ताधारी वर्गातील अंतरहि त्यांना दिसेनासे होते. कधीतरी या अधिकाऱ्यांनाही कदाचित आपल्या परिस्थितीचा वैताग येईल. आणि मग त्यांना उमजेल की आपले देशप्रेम किती दुर्बळ व फसवे आहे आणि आपणाला आपल्या देशबांधवांना अन्न देण्यासाठी परक्यांच्या दारोदारी कशी झोळी पसरावी लागत आहे. मग कदाचित देशाच्या सत्ताधारी वर्गातले काही लोक समाजातील जाती व वर्णाधिष्ठित विषमता नष्ट करावयाला पुढे येतील. आपल्याच परिस्थितीचा त्यांना एक दिवस कधी तरी वीट येईल आणि व्यापारी व झाडूवाला, अधिकारी व चपरासी यांना अधिक सामाजिक व आर्थिक समान दर्जा द्यावयास ते स्वतःच तयार होतील. जगातील तो सर्वात मोठा त्याग व शरणागती ठरेल. मात्र विषमतेचे जे बळी झाले आहेत अशा मागासलेल्या वर्गांना विशेष अधिकार दिले जातील तेव्हांच ही प्रक्रिया सुरू होईल. दारिद्र्यग्रस्त जनता व आपल्या स्थितीला विटलेले सत्ताधारी जमातीतील लोक यांच्या युतीतूनच हे घडू शकेल आणि मग राणीच्या भेटीसारख्या प्रसंगांतून वैभवाचे खोटे प्रदर्शन करण्याची प्रवृत्तीही नष्ट होईल.

राणी मोहक आहे. ज्या वयात स्त्री आपल्या सौंदर्याच्या शिखरावर असते असे आधुनिक सौंदर्यतज्ञ समजतात, त्या वयांत राणी आहे. हिंदुस्थानांत ही राणी खर्चिक केशभूषा करून आणि अंगावर भारी किंमतीची हिरेमाणके घालून मिरवील. भूकग्रस्त देशात असे नटूनथटून आपल्या वैभवाचे प्रदर्शन करू नकोस असे तिला तिचे सल्लागार सांगतील काय? तिची इंग्रजी भाषाही येथल्या एक टक्का सत्ताधाऱ्यांच्या हातचे नव्याण्णव टक्के लोकांना पिळण्याचे एक साधन बनले आहे हे तिला कोणी सांगेल काय? कोणीही सांगणार नाही. कारण तिच्या पंतप्रधानाला भारतातील आपला प्रभाव कायम ठेवायचा आहे आणि भारताच्या पंतप्रधानाला आपल्या स्थैर्यासाठी तो कायम राहू द्यावयाचा आहे.

['मनकाइंड': फेब्रुवारी १९६१]

● ● ●

मराठी [illegible]
अनुक्रम [illegible]
[illegible]

# हिंदू विरुद्ध हिंदू

पाच हजार वर्षांहून अधिक काळ चालत आलेले हिंदूधर्मातील उदार पंथ आणि कट्टर पंथ यांच्यातील युद्ध हे भारतीय इतिहासातील सर्वांत मोठे युद्ध आहे. आणि या युद्धाचा शेवट अद्यापही दृष्टिपथांत दिसत नाही. वस्तुतः कट्टर आणि उदार पंथांतील या संघर्षाच्या संदर्भात भारतीय इतिहासाचे पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न व्हावयास हवा होता पण तो तसा झालेला नाही. किंबहुना भारताच्या इतिहासविषयक ग्रंथांतून या संघर्षांचा जो उल्लेख आढळतो तो देखील तुरळक आणि क्वचित आहे. परंतु तरी देखील देशातील घडामोडींचे हा संघर्ष हेच एक सततचे कारण आहे.

सर्वच धर्मात कधी ना कधी उदारवादी आणि कट्टरवादी यांच्यात झगडा झालेला आहे. पण हिंदूधर्माचा अपवाद वगळता अन्य धर्मांमध्ये अशा प्रकारच्या संघर्षांमुळे फूट पडली आणि वेळोवेळी दोन्ही पंथांनी परस्परांचे रक्त सांडले. कमीअधिक कत्तली केल्यानंतर झगडे मिटवण्यात त्यांना यश आले. हिंदूधर्मात मात्र उदारवादी आणि कट्टरवादी यांच्यात सतत लपंडाव चालूच आहे. आणि त्यात कधी एकाची तर कधी दुसऱ्याची सरशी झाली आहे. पण

उघड उघड मोठा रक्तपात मात्र कधीच नाही. घडला आजमितीसही हा झगडा अनिर्णितच आहे आणि या संघर्षाला कारणीभूत असलेल्या प्रश्नांवर एकप्रकारचे सांवट आलेले आहे.

ईसाई, इस्लाम आणि बौद्ध या साऱ्या धर्मांत अंतर्गत दुफळ्या झालेल्या आहेत. एकेकाळी कॅथॉलिक पंथीयांत कट्टरवाद्यांचा इतका जोर वाढला होता की, त्यांच्याशी सामना करण्यासाठी उदारवादी प्रॉटेस्टन्ट पंथ उदय पावला. पण या रिफॉर्मिस्ट चळवळीतून खुद्द प्रॉटेस्टट पंथातही पुढे कट्टरता निर्माण झाली ही गोष्ट सर्वज्ञातच आहे. कॅथालिक आणि प्रॉटेस्टन्ट यांच्यात तात्त्विक दृष्ट्या अद्यापही अनेक भेद आहेत. पण त्यांचेपैकी एक कट्टर आणि दुसरा उदार आहे असे म्हणणे कठिण आहे. ईसाई धर्मातील दुही सैद्धान्तिक आणि संघटनात्मक पातळीवरची आहे तर इस्लाम धर्मातील शिया आणि सुनी ही फूट इतिहासातील घटनाक्रमाशी संबंधित आहे. त्याच-प्रमाणे बौद्धधर्मातही हीनयान आणि महायान असे दोन पंथ झाले. या दोन पंथांत रक्तपात झाला नाही. तथापि त्यांच्यातील भेद धर्मातील सिद्धान्ताविषयी आहेत. समाजव्यवस्था कशी असावी या विचारातून ते भेद उद्भवलेले नाहीत.

हिंदूधर्मात असे कोणतेच भेद पडले नाहीत. मात्र त्यात वारंवार अनेक छोटे छोटे संप्रदाय निर्माण झाले आणि प्रत्येक नव्या संप्रदायाबरोबर मूळ हिंदूधर्मातच एका नव्या संप्रदायाची भर पडत गेली. परिणामी मूलभूत तात्विक मतभेदांची स्पष्ट अशी मांडणी कधी झालीच नाही आणि सामाजिक झगडे अनिर्णित राहिले. प्रॉटेस्टंटांप्रमाणेच हिंदूधर्म देखील संप्रदायांना जन्म देण्याच्या बाबतीत बहुप्रसव आहे. कॅथॉलिक पंथाने अंतर्गत संप्रदायांवर बंदी घालून साधली तशा प्रकारची एकता हिंदूधर्माने धर्मांतर्गत संप्रदायावर एक अस्पष्टसा पडदा टाकून साधली. हिंदूधर्मात एका बाजूने नवे नवे विचारप्रवाह येत असतात, तर दुसरीकडे अंधश्रद्धा आणि कर्मकाण्डही तेथे मोकाटपणे वावरत असतात.

धर्मांतर्गत कट्टर आणि उदार पंथांमधील संघर्ष मिटविण्याच्या बाबतींत अद्यापपर्यंत हिंदूधर्माला यश का आले नाही याचा तलास घेण्यापूर्वी तेथे नित्य वावरणाऱ्या व्यापक मतभेदांचा विचार केला पाहिजे. जात, स्त्री, संपत्ती आणि परमतसहिष्णुता या चार महत्त्वाच्या आणि ठोस प्रश्नांच्या बाबतीत हिंदूधर्म सदैव उदारमतवाद आणि कर्मठपणा यांच्यात लंबकाप्रमाणे झुलत राहिला आहे.

चार हजार वर्षे किंबहुना त्याहूनही अधिक काळ होऊन गेला. कोणत्याही शूद्राने वेदाध्ययन अथवा वेदश्रवण करू नये असा वर्णव्यवस्थेचा नियम होता आणि त्यानुसार काही हिंदूंनी दुसऱ्या काही हिंदूंच्या कानात उकळत्या शिशाचा रस ओतला किंवा त्यांची जीभ बाहेर खेचली असे आपण ऐकतो तीनशे वर्षांपूर्वी हिंदूधर्मपद्धतीप्रमाणे राज्यारोहण समारंभ करून घेण्यासाठी आपले वंशज आपले मंत्री नेहमी ब्राह्मणांतूनच निवडतील असे आश्वासन शिवाजीला द्यावे लागले. सुमारे दोनशे वर्षांपूर्वी पानिपतचे अंतिम युद्ध झाले. आणि त्या युद्धाचा परिणाम म्हणून कालांतराने हिंदुस्थानचा राजमुकुट ब्रिटिशांच्या हातात गेला. त्या प्रसंगी जातीश्रेष्ठत्वानुसार आपला तंबू उंच ठिकाणी असला पाहिजे या प्रश्नावरून एका हिंदू सरदाराचा दुसऱ्याशी झगडा झाला होता. जवळपास पंधरा वर्षांपूर्वी अस्पृश्यताविनाशाच्या मोहिमेवर महात्मा गांधी निघाले तेव्हा हिंदूत्वाच्या रक्षणार्थ एका हिंदूने त्यांचेवर बॉम्ब फेकला होता. अगदी अलीकडच्या काळापर्यंत आणि काही ठिकाणी तर आजमितीसही अहिंदूंची सेवा करण्यास पूर्णतया राजी असणारे हिंदू न्हावी अस्पृश्य हिंदूची हजामत करण्यास मात्र तयार नसतात.

पण त्याचबरोबर प्राचीन काळात वर्णव्यवस्थेविरुद्ध दोन मोठाली बंडेही झालेली आहेत. जातिव्यवस्था संपूर्णपणे नष्ट करण्याच्या हेतूने एक संपूर्ण उपनिषद रचलेले आहे. प्राचीन भारतीय साहित्यात जातीव्यवस्थेवर हल्ला केल्याचेही आढळते. त्या हल्ल्याचे स्वरूप, त्याची भाषा आणि कक्षा यांचा विचार करता हा हल्ला कधी टीकेच्या स्वरूपात तर कधी संपूर्ण निषेधाच्या स्वरूपात अशा दोन अवस्थांमध्ये झालेला दिसतो. हा प्रश्न अधिक संशोधनासाठी तूर्त बाजूला ठेवू या. तथापि एक गोष्ट निश्चित आहे की, जातिव्यवस्थेला व्यापक विरोध झाला त्या नंतरच्या काळातच मौर्य आणि गुप्त यांचे सुवर्णयुग अवतरले. पण जात कधी पूर्णपणे जात नाही हेच खरे. जातिबंधने काही काळात भयंकर कडक असतात तर अन्य काळी ढिली पडतात. जातिव्यवस्थेच्या चौकटीतच कट्टरपंथी आणि उदारपंथी परस्पराशी जमवून घेऊन राहतात. हिंदूधर्माच्या इतिहासातील कोठल्याही दोन कालखंडातील परिस्थितीमधील फरक फक्त इतकाच असतो की, कधी कट्टरपंथाचा उदारपंथावर प्रभाव असतो तर कधी उदारपंथ कट्टरपंथावर वर्चस्व गाजवतो.

सांप्रत उदारवादी पंथाचा जोर आहे; तर कट्टरपंथी तोंडात मिठाची गुळणी धरून आहेत. परंतु कडवे धर्मवेडे, उदारमतवादी विचारपरंपरेत घुसून आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करून राहिले आहेत. जन्मना जातीचे समर्थन

करणे आज कालबाह्य आहे. म्हणून लोक आज व्यवसायावरून जाती ठरवू पाहतात. लोक सध्या जातिव्यवस्थेचे समर्थन करीत नसले तरी जातिव्यवस्थे-विरुद्ध ते क्वचितच लढतात. परिणामान्ती आज एक असे वातावरण तयार झाले आहे की हिंदू माणसाचा विवेक आणि त्याचें परंपरागत मन यात संघर्ष चालू आहे. एक संस्था म्हणून जाति–पद्धतीत काहीसा ढिलेपणा आला असेलही पण मानसिक संवयीच्या दृष्टीने जात मुळीच नष्ट झालेली नाही. आणि म्हणूनच हिंदुधर्मातील उदार आणि कट्टर या दोन विचारप्रवाहांतील संघर्ष अनिर्णित स्वरूपात पुढेही चालू राहण्याचे भय कायम आहे.

आपल्या संततीचा पिता कोण हे केवळ स्त्रीलाच माहीत असते या वस्तु-स्थितीची चर्चा आता कोठे जगाच्या साहित्यात होऊ लागली आहे. पण तीन हजारांहून अधिक वर्षे होऊन गेली. भारतीय पुराणातील एका स्त्रीने - जाबालेने आपल्या अपत्याचा पिता कोण हे खात्रीपूर्वक सांगता येत नाही असे म्हटले होते अशी कथा आहे. प्राचीन साहित्यात एक सत्यनिष्ठ स्त्री म्हणून जाबालेचे नाव अभिमानाने घेतले जाते. पण उलट जातिव्यवस्थेने मात्र तिच्या मुलाला ब्राह्मण ठरवून पचवून टाकले आणि तिच्या सत्यनिष्ठेवर बोळा फिरविला. नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ तपासू नये. कारण दोघांच्याहि उगमस्थानी चिखलच असतो, असा इषारा उदारमतवादाचा प्रभाव असलेल्या कालखंडातील साहित्यातून दिलेला आढळतो. स्त्रीवर बलात्कार झाला आणि ती त्या जुलमाचा प्रतिकार करू शकली नाही तर ती दोषास पात्र ठरत नाही किंवा ती अपवित्रहि होत नाही. कारण स्त्री दर महिन्याला पुन्हा पवित्र होत असते असे त्याच काळातील साहित्यात म्हटले आहे. त्याचप्रमाणे स्त्रीला घटस्फोटाचा आणि मालमत्तेचाही अधिकार असला पाहिजे. हिंदूधर्मातील देदीप्यमान कालखंडा-मध्ये स्त्रीच्या बाबतीत असा विशाल दृष्टिकोन आढळतो, तर धार्मिक कडवे-पणाच्या काळात तिला पिता, पती अथवा पुत्र यांच्या संरक्षणाखालील जणू एक खाजगी मालमत्ता अशा हीन दर्जाप्रत पोचवण्यात आलेले दिसते.

हिंदू स्त्रीविषयी उदार आणि कट्टर असे दोन्हीही दृष्टिकोन सांप्रत अस्तित्वात आहेत. ही एक विलक्षण स्थिती आहे. जगात अन्यत्र मिळणार नाही अशी महत्त्वाच्या पदापर्यंत पोचण्याची संधी आज हिंदू स्त्रीला सुलभपणे मिळते. पण विवाह आणि संपत्ती या संदर्भात स्त्री आणि पुरुष यांच्यात न्यायाचा काटा समान असावा या गोष्टीला विरोध चालूच आहे. मी अशा विलक्षण पुस्तिका वाचल्या आहेत की, ज्यांत अन्यधर्मीय पुरुषाच्या प्रेमात पडून हिंदू स्त्रीने आपला

धर्म बदलू नये म्हणून तिचा संपत्तीवरचा हक्क डावलण्यात आला आहे. जणू हिंदू पुरुषाच्या बाबतीत असे घडतच नाही. उलटपक्षी अनेकवार पुरुषांच्या हातून असे घडलेले आहे. जमिनीचे अधिक तुकडे पडण्याचे बंद झाले पाहिजे हा अगदी वेगळा तर्क आहे. आणि तो स्त्री व पुरुष अशा दोन्ही वारसांना लागू आहे. कमालधारणेची मर्यादा घालून जमिनीचे तुकडे पडणे थांबविण्यासाठी काही मार्ग शोधून काढला पाहिजे हे खरे परंतु जमिनीचे तुकडे पडतील हे निमित्त करून स्त्रीचा जमिनीवरील वारसा हक्क नाकारणे योग्य नाही. विवाह व संपत्ती या बाबतीत स्त्री पुरुषात भेद करणारे कायदे, रूढी व समजुती कायम आहेत तोवर हिंदुधर्मातील कर्मठता पूर्णतया कधीही नाहीशी होणार नाही. आपली स्त्री ही आपल्या उच्चपदावरून कधीही खाली न उतरणारी अशी देवता असली पाहिजे अशी प्रत्येक हिंदूची आकांक्षा असते. ही आकांक्षा उदारातील उदार अशा हिंदूलाही निस्तेज व संशयी बनवीत असते. प्रत्येक हिंदू आपल्या स्त्रीला आपल्याप्रमाणेच माणूस समजणार नाही तोवर हिंदू धर्मातील सनातन प्रवृत्ती व उदार प्रवृत्ती यातील फरक वरवरचा राहील.

असंग्रह व अपरिग्रह या तत्त्वांवरील श्रद्धेमुळे संपत्तीविषयीचा हिंदू दृष्टिकोन काहीसा उदार बनला आहे. परंतु त्याचबरोबर हिंदुधर्मातील कट्टरपंथीयांनी कर्मविपाक सिद्धान्ताद्वारे संपत्ती, जात व सत्ता या बाबतीत समाजातील काही लोकांना वरचे स्थान दिलेले आहे आणि प्रस्थापित समाजव्यवस्थेत या मूठभरांच्या हक्कानाही संरक्षण दिलेले आहे. संपत्तीवर व्यक्तीची मालकी असावी की समाजाची असावी या स्वरूपातील संपत्तीविषयीची चर्चा अलीकडील काळात सुरू झाली हे खरे. परंतु फार प्राचीन काळापासून निरासक्ती की संपत्तीविषयीची चालू व्यवस्था मानावयाची अशा स्वरूपात हिंदुधर्मात संपत्ती-संबंधीचा विचार सतत वावरत आहे. अर्थात् अन्य प्रश्नांप्रमाणेच संपत्ति व सत्ता यासंबंधीचा आपला विचार देखील त्याच्या तार्किक परिणतीपर्यंत करण्याच्या बाबतीत हिंदू माणूस असमर्थ ठरला आहे. संपत्तीसंबंधीच्या कधी या किंवा त्या रूढ विचारालाच काल व व्यक्तिपरत्वे हिंदुधर्माने प्राथमिकता दिलेली आहे.

सहिष्णुता हे हिंदूधर्माचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य मानले जाते. तथापि हिंदू-धर्माला ढळढळीत कत्तली मान्य नाहीत एवढ्या मर्यादेपर्यंतच ही सहिष्णुता आहे. एरवी तशी सहिष्णुता नाही. आपले प्रभुत्व स्थापन करू पाहणाऱ्या कट्टरपंथीयांनी नेहमीच एकजिनसी एकता लादण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आपल्या मतप्रणालीला विरोधी अशा श्रद्धा बाळगणाऱ्यांना व अन्य पंथीयांनाही दडपले आहे. परंतु त्यांचे हे प्रयत्न कधीहि यशस्वी झालेले नाहीत.

आणि या प्रयत्नांची बालिश चाळे अशीच संभावना करण्यात आली आहे. कारण अगदी अलीकडच्या काळापर्यंत हिंदुधर्माने स्वधर्मातील विविध पंथीयांनी विविधतेतील एकतेचा सिद्धान्त मान्य करून वागले पाहिजे असेच मानले आहे. त्यामुळे साहजिकच हिंदुधर्मात सक्तीपेक्षा सहिष्णुवृत्तीच जवळपास सदैव अधिक प्रमाणात बळकट असल्याचे दिसून येते. तथापि युरोपीय लोकांत बुद्धिवादाद्वारे सहिष्णुतेसारखीच मनाची जी प्रवृत्ती उदित पावली तिच्यात आणि हिंदुधर्मातील सहिष्णुतेच्या कल्पनेत फरक केला पाहिजे. आपला विरोधक घेत असलेली भूमिका चुकीची आहे हे माहीत असूनही व्हॉल्टेअरने विरोधकाला स्वमतप्रतिपादनाचा अधिकार दिला आणि अशा सहिष्णुतेच्या तत्त्वासाठी तो लढायला सिद्ध झाला. उलटपक्षी सत्य हे वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होऊ शकते अशी हिंदुधर्माची धारणा आहे आणि ही धारणाच त्याच्या सहिष्णुवृत्तीचा आधार आहे. सिद्धान्त व त्याचा व्यवहार भिन्न भिन्न परिस्थितीत व वेगवेगळ्या वर्गांत भिन्न भिन्न स्वरूपात होऊ शकतो असे हिंदुधर्माने मानले आहे. यापैकी अमुक एक स्वरूप योग्य किंवा दुसरे अयोग्य यासंबंधी हिंदू-माणूस कधीही निर्णय करावयास तयार नसतो. मानवी जीवनात एकजिनसीपणा आणावयाची हिंदुधर्माची मुळी इच्छाच नाही. अगदी स्वेच्छेने कोणी एक-जिनसीपणा आणला तरी हिंदुधर्माला ते खपत नाही. विविधतेमधील स्थूल ऐक्यच हिंदुधर्माला हवे आहे. आणि आजवर आपल्या सर्व पंथोपंथांना अगदी यशस्वीपणे एकत्र नांदवून असे ऐक्य त्याने साधले आहे. हिंदुधर्मातील सहिष्णुता, दुसऱ्याच्या जीवनात ढवळाढवळ न करण्याच्या वृत्तीमधून आणि भिन्न भिन्न संप्रदाय असणे यात काही चूक नाही; एका सत्याचेच ते वेगवेगळे आविष्कार आहेत या श्रद्धेतून निर्माण झालेली आहे.

कट्टरपंथीयांनी मात्र हिंदुधर्मावर एकजिनसी एकता लादण्याचा निरंतर प्रयास केलेला आहे. त्यांचे हेतू नेहमीच वाईट होते असे नाही. कधी कधी स्थैर्याच्या व सामर्थ्यप्राप्तीच्या भावनेनेही हे प्रयत्न त्यांनी केले. परंतु त्याचे परिणाम मात्र सदैव घातकच ठरले. हिंदुधर्मातील कट्टरपथीयांच्या प्रयत्नामुळे हिंदुस्थानी इतिहासाच्या कोणत्याही कालखंडात ऐक्य व समृद्धी नांदत असल्याचे आढळत नाही. उलट जात, स्त्री, संपत्ति व सहिष्णुता या बाबतीतील उदार प्रवृत्ती ज्या कालखंडात प्रभावशाली होती त्या वेळी मात्र भारतात ऐक्य व समृद्धी वसत होती असे दिसते. हिंदुधर्मातील सनातनी वृत्ति जेव्हा जेव्हा उफाळली तेव्हा तेव्हा सामाजिक व राजकीय दृष्ट्या देशाची व समाजाची छकले उडाली आहेत. अगणित राज्यांत जेव्हा जेव्हा हिंदुस्थानचे तुकडे तुकडे झाले त्या

प्रत्येक वेळी सनातनीवृत्तीचा जोर होता की नाही हे मी निश्चितपणे सांगू शकत नाही. परंतु हिंदुमनावर उदारमतवादाचा प्रभाव होता अशा काळात देशाची भरभराट झाली व देशात ऐक्य नांदले हे मात्र निश्चित.

देशाचे ऐक्य साधण्याचे आधुनिक इतिहासात काही महान् प्रयत्न झाले; पण ते विफल ठरले. महाराष्ट्रात ज्ञानेश्वरांनी उदारमतवादाची परंपरा सुरू केली. शिवाजी व पहिल्या बाजीरावाच्या काळात ती उच्च बिंदूपर्यंत पोचली परंतु त्यानंतर अंतिम यशाचे शिखर गाठण्यापूर्वीच या परंपरेचे पेशव्यांच्या कट्टरवादी परंपरेत पतन झाले. तसेच पंजाबात गुरु नानकने जी उदारपरंपरा सुरू केली ती रणजितसिंगच्या काळी शिखरावर पोचली. पण लगेचच शीख सरदारातील माथेफिरू कलहात तिचा शेवट झाला. उदारमतवाद खच्ची करण्याचे कट्टरपंथीयांचे प्रयत्न तरी देखील असफलच झाले असे दिसते. आज हे प्रयत्न नव्याने आणि तीव्रतेने होऊन राहिले आहेत. महाराष्ट्र व पंजाबमध्ये सध्या घडणाऱ्या घटना कट्टरवाद्यांच्या याच जुन्या प्रयत्नांशी निगडित आहेत. भारतीय इतिहासाच्या विद्यार्थ्याला या साऱ्या घटना हा अभ्यासाला एक चांगला विषय आहे. त्याचे विविध बाजूंनी अध्ययन झाले पाहिजे. उदाहरणार्थ भारतीय संघराज्य उभारण्याचा राजकीय प्रयत्न आणि धर्मगुरूंचे आदेश यात काही परस्पर संघर्ष आहे किंवा काय? पतनाची बीजे कोठे आहेत? आणि ती प्रथमपासूनच अस्तित्वात होती की मागाहूनच्या मिश्रणातून उद्भवली? कट्टर-वादी गटांना पुन्हा तेच तेच अपयशी प्रयत्न करण्याची प्रेरणा तरी कोठून मिळते? विजयानगरच्या प्रयत्नामागील प्रेरणा शंकराचार्यांची होती की निम्बा-र्कची होती? त्याचप्रमाणे हम्पीला जो गौरव एकदा प्राप्त झाला त्याच्या बुडाशी कोठले कुजके बीज होते, या साऱ्यांचा अभ्यास मोठा वेधक आणि लाभदायी होऊ शकेल. त्याचप्रमाणे शेरशहा आणि अकबर यांच्या उदारमत-वादी प्रयत्नांच्या मुळाशी काय प्रेरणा होत्या आणि औरंगजेबाच्या धार्मिक कडवेपणामुळे त्या दोघांचा पराभव का झाला, हा देखील एक अभ्यासाचा विषय आहे.

हिंदी जनता आणि महात्मा गांधी यांचा देशाचे ऐक्य साधण्याचा अगदी अलीकडचा प्रयत्न अंशतः सफल झाला आहे. पाच हजार वर्षांहूनही अधिक काळ वाहणाऱ्या साऱ्या उदारवादी प्रवाहांमुळेच हा प्रयत्न निःसंशयपणे प्रगती करीत आहे हे खरे. युरोपातील उदारवादी प्रभाव हेही या प्रगतीचे आणखी एक कारण असू शकेल. पण ही कारणे वगळल्यास त्यामागचे ताजे कारण कोणते असावे? तुलसी, कबीर, चैतन्य इत्यादींची महान संतपरंपरा आणि

फैजाबादचा बंडखोर मौलवी व राममोहन रॉय यांसारख्या आधुनिक धर्म सुधारकांचे प्रयत्नच महात्मा गांधींच्या उदारवादी प्रयत्नांच्या आंशिक यशाला निश्चितपण कारणीभूत आहेत. सांप्रत गेल्या पाच हजार वर्षांतील सर्व जुनाट आणि कर्मठ प्रवाह, हा उदारमतवादी प्रयत्न हाणून पाडण्यासाठी एकवटले आहेत आणि म्हणून आताच कट्टरवादाचा पराभव झाला तरच तो पुनरपी डोके वर काढणार नाही.

केवळ उदारवादीच देशाचे ऐक्य साधू शकतात. हिंदुस्थान फारच प्राचीन आणि अवाढव्य देश आहे. स्वयंस्फूर्त मानवी इच्छेशिवाय कोणतीच ताकद देशाचे ऐक्य साधू शकत नाही. कट्टरपंथी हिंदुधर्म स्वभावतःच अशी इच्छा निर्माण करू शकणार नाही. पण उदारमतवादी हिंदुधर्म गतकाळाप्रमाणे आजही ते कार्य करू शकतो. अर्थातच मर्यादित अर्थाने, ज्याला राजकीय संघटना आणि सिद्धान्त आहेत असा हिंदुधर्म हा धर्म नाही. देशाची एकता साधण्याचे योग्य माध्यम आणि प्रेरक शक्ती या दृष्टीने मात्र हिंदुधर्माचा उपयोग झाला आहे. हिंदुधर्मातील कट्टर आणि उदार या पंथांमधील महान् संघर्ष म्हणजेच देशाची एकात्मता आणि विघटन या प्रक्रियामधील झगडा होय.

तथापि हिंदुउदारमतवाद हा झगडा सोडविण्याच्या दृष्टीने पूर्णतया असमर्थ ठरला आहे. विविधतेतील एकतेच्या तत्त्वामध्ये सर्वनाश आणि फूट यांचे बीज सुप्तरूपाने आहे. अगदी श्रेष्ठतम उदारमतवादी हिंदुकल्पनांमध्येही छुप्या स्वरूपात विनाशाची व विघटनेची बीजे आहेत. अगदी उदारातील उदारवादी हिंदूच्या विचारात कट्टरवादी प्रवृत्ती घुसून तर त्याच्या बुद्धीत गोंधळ निर्माण करतातच, परंतु विविधतेतील एकतेचे तत्त्वही उदारवादी हिंदूची बुद्धी सुस्त व निष्क्रीय बनवीत असते. आपापली भांडणे जोराने भांडणाऱ्या असंख्य जातीजमातीत हिंदुधर्माचे निरंतर होत असलेले विघटन खरोखरच खेदजनक आहे. उदारमतवादी ही भांडणे विविधतेतील एकतेच्या पडद्याआड लपविण्याचा विफल प्रयत्न करीत आहेत. परंतु देशाच्या सामुदायिक जीवनात हे कलह दौर्बल्य निर्माण करीत आहेतच. आणि यातून एक प्रकारची भयकारी उदासीनता सर्वत्र पसरत आहे. आपण अखेर एकाच हिंदू समाजाचे घटक राहणार आहोत याची खात्री असल्यामुळे हिंदुधर्मात पडत असलेल्या फुटीची कोणाला चिंताच वाटत नाही. अशा परिस्थितीत कडव्या हिंदुवादाला अवसर मिळत असतो आणि आपला विस्तार करण्याची व आपली पाळेमुळे रुजविण्याची आकांक्षा त्याच्यात उद्भवते आणि कट्टरवादाच्या या प्रयत्नामुळे समाज अधिकच दुर्बल बनत जातो.

सांप्रत दिसणाऱ्या मुसलमानांविषयीच्या भिन्नभिन्न भूमिका ही हिंदुधर्मातील उदारवाद व कट्टरवाद यांतील सनातन संघर्षांचीच बाह्य रूपे आहेत. अर्थातच ती फक्त बाह्यरूपे आहेत हे क्षणभरही विसरता कामा नये. सर्व जुने अनिर्णित संघर्ष जसेच्या तसे चालू आहेत व सुप्त रूपात अधिक निर्णायक अवस्थेपर्यंत पोचले आहेत. हिंदुधर्मातील कट्टरवादी व उदारवादी यांच्यातील संघर्ष अद्याप संपलेला नाही. महात्मा गांधींची हत्याही या संघर्षातूनच झाली. हिंदु-मुसलमानांतील झगड्याची ती परिणती होय असेच केवळ म्हणता येणार नाही. जात, स्त्री, संपत्ती व सहिष्णुता यासंबंधीच्या कडवेपणावर हिंदूमाणसाने कधीही प्रखर प्रहार केलेला नाही. त्यामुळे हा कडवेपणा जिवत राहिला व वाढत गेला. गांधीजींना मारण्याचा पूर्वी एकदा प्रयत्न झाला होता. हा हल्ला वरकरणी हिंदुधर्माचे रक्षण करण्यासाठी झाला असला तरी खरे म्हणजे तो जातिरक्षणाकरिताच करण्यात आला होता. गांधीजींवरील त्यानंतरचा व अंतिम यशस्वी हल्ला वरकरणी मुसलमानांच्या दंडेलीपासून हिंदुधर्माचे रक्षण करण्यासाठी करण्यात आला असला तरी वस्तुतः तो उदारमतवादी हिंदुधर्माशी चाललेल्या आपल्या संघर्षात कट्टरवाद्यांनी खेळलेला एक फार मोठा दुष्ट जुगार होता. हिंदू मनात सतत घर करून असलेली धार्मिक कडवेपणाची प्रवृत्तीच गांधीजींच्या खुनाला कारणीभूत झाली आहे. ही प्रवृत्ती कधी अचल असते तर कधी सक्रिय बनते. काही हिंदूंच्या मनात ती प्रखरपणे असते तर काहींच्या मनात नरमपणे वास करीत असते. महात्मा गांधींची हत्या हा कट्टरवाद व उदारवाद यातील संघर्षाचाच परिपाक होता असा निर्वाळा भावी इतिहासाने दिला आणि गांधीजींच्या स्त्री, संपत्ती, जातिप्रथा व सहिष्णुता याविषयीच्या उदारतापूर्ण व्यवहारामुळे भडकलेल्या लोकांना त्या हत्येबद्दल दोषी ठरविले तर कदाचित हिंदूधर्मातील उदासीनता व बेपर्वाई यांचा नाश होईल.

हिंदुधर्मात उदारवादी व कट्टरवादी प्रवृत्ती सुखाने एकत्र कशा काय नांदतात आणि स्पष्ट व निर्णायक सामना करण्याचे आव्हान ते परस्परांना कधीच का देत नाहीत हा खरे म्हणजे एक प्रश्न आहे. परंतु एक गोष्ट मात्र वादातीत आहे की, हिंदू मनातील धार्मिक कट्टरता पूर्णपणे निपटून काढून ते शुद्ध बनविण्याचे काम येथे कधीच झाले नाही. त्यामुळे मूळ संघर्ष अनिर्णितच राहिला आणि त्याचे घातक परिणाम होत राहिले. हिंदू माणसाच्या मनातून जात जोवर संपूर्णपणे जात नाही किंवा स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे त्याच्या मनात स्थान मिळत नाही आणि माणसाचे समाजातील स्थान संपत्तीवर अव-

लंबून असता कामा नये असे तो मानीत नाही तोवर कट्टरवाद मरणार नाही. तो वारंवार धुमाकूळ घालीत राहील आणि भारतीयांच्या मानगुटीवर बसलेले औदासीन्य कायम राहील. इतर धर्मांप्रमाणे हिंदुधर्म हा एकच एक धर्मश्रद्धा जोपासणारा अथवा एकच एक पूजास्थान असलेला धर्म नाही. हिंदुधर्म ही सामाजिक संघटनेची एक पद्धती आहे. आणि म्हणूनच हिंदुधर्मात उदार व कट्टर प्रवृत्तीमधील लढाई कधीही निर्णायक स्वरूपात लढली गेली नाही. आणि चांगले असो की वाईट असो, परिणामांती ब्राह्मण-बनियांनी संयुक्तपणे शतकानुशतके देशावर सत्ता गाजविली. ही सत्ता कधी कट्टर तर कधी उदारवादी होती एवढाच काय तो फरक.

जात, संपत्ती, स्त्री व सहिष्णुता यासंबंधीच्या प्रश्नांची सोडवणूक केवळ उदारमतवादाच्या सहाय्याने करता येणार नाही. हे प्रश्न मुळातच एकदाचे कायम निकालात काढले पाहिजेत. आणि त्यांच्याविषयीचे हिंदू मनातील सनातनी विचार पार उखडून टाकले पाहिजेत.

सगुण वास्तव व निर्गुण सत्य यांच्यातील परस्पर संघर्षाचा तत्त्वज्ञानाशी संबंधित असा प्रश्न हाच हिंदुधर्मामधील सर्व संघर्षांमागे प्रामुख्याने आहे. या प्रश्नाबाबत उदारवादी व कट्टरवादी यांच्या विचारात खरोखरच फारच कमी अंतर आहे. सगुण वास्तवाच्या पलीकडे जाऊन निर्गुण सत्याचा शोध घेण्याचा हिंदू मनाचा सामान्यतः प्रयत्न असतो. हिंदू मन वास्तवाला असत्य मानीत नाही मात्र त्याला हिणकस असे सत्य मानतें. आणि परम सत्याच्या शोधाचे कामी ते निरुपयोगी असल्याने ते सोडून दिले पाहिजे असे हिंदू तत्त्वज्ञानी समजतो. जगातील सर्व धर्मांत व तत्त्वज्ञानांत सगुण-निर्गुण सत्याची चर्चा होत आली आहे. परंतु त्यात व हिंदुधर्मात या बाबतीत एक फरक आढळतो. तो असा की, अन्य धर्मांत या प्रश्नाची चर्चा केवळ धर्मचिंतकच करीत असतात तर येथे भारतात सामान्य माणसाच्या धर्मश्रद्धेत देखील या प्रश्नाने प्रवेश केलेला आहे. येथे धर्मतत्त्वांना संगीताचे स्वर देऊन त्याचे श्रद्धेत रूपांतर करण्यात आले आहे. अन्य देशांतील तत्त्ववेत्त्यांनी परम सत्याचा शोध घेताना सांसारिक किंवा वास्तव सत्याचा सर्वसाधारणपणे अस्वीकारच केला आहे वैज्ञानिक व ऐहिक भावनेने पाश्चात्य देशांतील लोक मोठ्या उत्सुकतेने निसर्गाची सर्व रहस्ये शोधून काढून त्यांची वर्गवारी करीत आहेत आणि त्यांची संगतवार मांडणी करून त्या आधारे एका सूत्रात गोवलेले जगरहाटीचे नियम शोधीत आहेत. आधुनिक माणसाचा पिंड प्रामुख्याने युरोपीय आहे. त्याने आधुनिकतेच्या

सहाय्याने जीवनाविषयीचा एक खास दृष्टिकोण विकसित केला आहे. हा दृष्टिकोण आहे त्या स्वरूपात सगुण वास्तवता खुशीने स्वीकारीत असतो. ख्रिश्चन नीतिविषयक तत्त्वज्ञानाने तर याहीपुढे जाऊन मानवाच्या सत्कृत्यांना म्हणजेच सगुण वास्तवाला ईश्वरी कृत्याचा दर्जा दिलेला आहे. आणि म्हणूनच मानवी जीवनातील वास्तवाचा युरोपीय लोक वैज्ञानिक व नैतिकदृष्ट्या उपयोग करीत असतात. परंतु हिंदुधर्मातील चिंतनाचा आधार सदैव आध्यात्मिक व आदि-भौतिक राहिला आहे. त्यापासून त्याची कधीच मुक्तता होऊ शकलेली नाही. जनसाधारणांची धार्मिक श्रद्धा देखील इंद्रियजन्य व दृग्गोचर वास्तवापलीकडे पाहत असते आणि निराकार, निर्गुण सत्य शोधीत असते. मध्ययुगात युरोप-मध्ये देखील काही प्रमाणात असाच दृष्टिकोण वावरत होता. पण फक्त तत्त्व-ज्ञान्यांमध्येच. सामान्य जनतेने मात्र नैतिक श्रद्धा म्हणून ख्रिश्चन धर्माचाच स्वीकार केला. आणि त्या मर्यादेपर्यंत सगुण वास्तवाचाही स्वीकार केला. हिंदुधर्मात सगुण वास्तवाचा संपूर्ण अस्वीकार नाही हे खरे असले तरी कनिष्ठ प्रतीचा आपद्धर्म म्हणूनच त्याचा मर्यादित स्वीकार केला गेला. आणि आज-मितीसही सामान्य माणसासकट प्रत्येक हिंदू निराकार, निर्गुण अशा उच्चतम सत्याचा शोध घेऊ पाहतो.

याचे एक ठळक उदाहरण मला आठवते. कोणारकच्या महान परंतु भग्न मंदिरात दगडावर कोरलेल्या असंख्य शिल्पमूर्ती आहेत. त्या खोदताना शिल्प-काराने वास्तवतेचा निःसंकोच व मुक्त वापर केलेला दिसतो. त्याने त्या सर्व मूर्ती समृद्ध विविधतेने खोदल्या आहेत. त्या खोदतानाही काही विशिष्ट व व्यवस्थित मांडणी दिसते. तळापासून अगदी सर्वांत वरच्या रांगेपर्यंत सर्वत्र शृंगार, शिकार, संगीत व पराक्रम अशा क्रमाने विशेष विचक्षणा न करता विविध स्वरूपात शिल्पमूर्ती खोदलेल्या आहेत. प्रत्येक शिल्पात गतिमानता व जिवतपणा आहे. परंतु मंदिराचा गाभारा मात्र अगदी साधा आहे. तेथील मूर्ती अगदी शांत व गतिहीन आहेत. मंदिराचा बाह्य भाग गतिमान व सजीव आणि अंतर्भाग गतिहीन व निर्जीव. मंदिराच्या बांधणीतही हिंदू मनाचा अंतीम सत्याचा शोध घेण्याचा अंतहीन छंद स्पष्टपणे प्रत्ययास येतो. भारतात चित्रकले-पेक्षा वास्तुकला व शिल्पकला यांचा अधिक विकास झाला त्यामागेही, अंतिम सत्याबाबतच्या आपल्या कल्पना भारतीय माणसाला वास्तू व शिल्पकलेद्वारेच अधिक प्रमाणात व्यक्त करता येतात ही वस्तुस्थिती आहे की काय न कळे.

आणि म्हणूनच हिंदू माणसाचे व्यक्तित्व विभजित व विच्छिन्न झालेले आढळते. विचाराच्या उच्चतम पातळीवर हिंदू माणूस अंतिम सत्याकडे दृष्टि

ठेऊनच वास्तवाचा स्वीकार करतो आणि आपली अंतर्दृष्टी सतत समृद्ध बनवीत असतो. तर कृतीच्या पातळीवर हिंदू माणूस अत्यंत ढोंगीपणा करतो. हिंदूचा ढोंगीपणा अजोड आहे. जगातील तो कदाचित सर्वश्रेष्ठ पाखंडी असेल. जगातील अन्य ढोंगी माणसांप्रमाणे तो इतरेजनांना तर फसवतोच पण स्वतःला घातक ठरणारी आत्मवंचनाही तो करीत असतो. याचे कारण सगुण वास्तव व निर्गुण सत्य यासंबंधीची त्याच्या बुद्धीतील फारकत हे होय.

हिंदू धर्माने भूतकाळात व आजही केवढा चमत्कार केला आहे! आपल्या अनुयायांत – अगदी सामान्यातील सामान्यात देखील, या धर्माने आध्यात्मिक एकतेची श्रद्धा निर्माण केली आहे. या श्रद्धेच्या पातळीवर हिंदू माणूस सारी चराचरसृष्टी एक मानतो. अशी श्रद्धा प्राप्त करण्याचे भाग्य जगात इतरत्र कोणाही माणसाला लाभलेले नाही. पण या आध्यात्मिक एकतेवरील श्रद्धेच्या जोडीनेच हिंदू माणूस अत्यंत दुष्ट अशी सामाजिक विषमतेची भावना मनात बाळगीत असतो. एखादा अध्यात्मवादी श्रीमंत व सुखी हिंदू गरीबांना व कनिष्ठवर्णीयांना जनावरांप्रमाणे, जनावरांना दगडासारखे आणि एकंदर वस्तु-मात्राला कःपदार्थ समजून वागतो तेव्हा मला त्याच्या वर्तनाचा उलगडाच होत नाही. शाकाहार व अहिंसेच्या सिद्धांताचे येथे पतन होऊन त्याचे छुप्या क्रौर्यात रूपांतर होते सर्वच मानवी इतिहासात कधी ना कधी सत्याचे क्रौर्यात व सुंदरतेचे अनैतिकतेत रूपांतर झाल्याचे आढळते हे खरे असले, तरी हिंदु-धर्मात ही गोष्ट अधिकच पाहावयास मिळते. अन्य देशांना ठेंगणी करणारी अशी सत्य व सौंदर्याची अनेक उत्तुंग शिखरे हिंदुधर्माने उभी केली. परंतु त्याच-बरोबर अन्यत्रचा कोणताही माणूस जिच्यात पडला नसेल अशा काळ्याकुट्ट खोल गर्तेत हिंदू माणसाचे पतन झालेले देखील आपण पाहतो व्यवसाय व यंत्रे आणि उत्पादन; परिवार व लोकसंख्यावृद्धी, भूक व अत्याचार इत्यादींसारख्या जीवनातील वास्तवतेचा विशुद्ध वैज्ञानिक व ऐहिक दृष्टिकोणातून विचार करा-वयास हिंदू माणूस जोवर तयार होत नाही तोवर त्याला आपल्या विभक्त व्यक्तित्वावर विजय प्राप्त करता येणार नाही किंवा भूतकाळात त्याच्या विना-शास कारणीभूत ठरलेल्या धार्मिक कट्टरपणावर त्याला अंतिम प्रहार करता येणार नाही.

याचा अर्थ हिंदुधर्माने आपल्या विचाराच्या भावनिक आधाराचा त्याग करावा आणि चराचरातील ऐक्य शोधण्याचा आपला प्रयत्न सोडावा असा नाही. कारण हा आधार व हा प्रयत्न हे तर हिंदुधर्माचे सर्वोच्च वैशिष्ट्य आहे; गुण

आहे. एखादा मुलगा भरवेगाने धावणाऱ्या मोटारीपासून वाचविण्यासाठी रस्त्यावरून जाणारा एखाद्या लहानग्या कोकराला झटदिशी पकडून आपल्या काळजाशी घट्ट धरून ठेवतो, जणु आपल्या काळजाचाच एक भाग असे तो समजतो. किंवा एखाद्या मुळे व शाखा पसरलेल्या वृक्षाच्या हिरव्यागार पानाकडे माणूस ममत्वाने व एकरूपतेने पाहतो. अशी दृश्ये आपण जगात सर्वत्र पाहतो. ममत्वाची, व्यापकतची व चराचराशी एकरूपता साधण्याची ही भावना जगातील सर्व धर्मीयात समान प्रमाणात आढळते. परंतु हिंदू माणसात ही भावना जितकी खोलवर गेलेली आहे आणि अविनाशी स्वरूपात वास करून आहे तितकी ती कोठेच आढळत नाही. बुद्धिरूपी देवतेत दयारूपी देवताही वास करते असे कधीही होत नाही. ईश्वर आहे की नाही ते मला माहीत नाही. परंतु साऱ्या चराचर सृष्टीला एकरूप मानणारी ममत्वाची भावना मात्र दुर्मिळ असली तरी अस्तित्वात आहे हे मी जाणतो. अर्थात मानवामानवातील संघर्ष आणि इतर मानवी हालचालींतही ही ममत्वाची भावना कायम राहिली पाहिजे असे म्हणणे कदाचित अव्यवहार्य व धाडसाचे होईल.

सगुण व दृग्गोचर वास्तवाचा जशाच्या तसा व एकांगी स्वीकार केल्यामुळे उद्‌भवलेल्या संघर्षातून युरोपीय माणूस आत्मनाशाकडे झपाट्याने चालला आहे तर वस्तुमात्रामागील निर्गुण सत्याचा शोध घेण्याच्या आदिभौतिक विचारामागे हिंदू माणूस लागल्यामुळे त्यातून उद्‌भवलेल्या जडतेपायी तो तितक्याच वेगाने आत्मनाशाकडे प्रगती करीत आहे. जडतेपायी मरण्यापेक्षा अर्थातच समाजातील संघर्षात माणसाला आलेले मरण मला अधिक पसंत आहे.

परंतु माणसापुढे हा एकच पर्याय आहे काय? संशोधन प्रवृत्तीचे वैज्ञानिक मन व ममत्वपूर्ण भावनाप्रधान मन यापैकी एकाला श्रेष्ठ व दुसऱ्याला हीन न लेखता आणि संपूर्णपणे समान गुणधर्मांच्या त्या दोन प्रक्रिया आहेत असे समजून त्यांचे संतुलन साधणे अशक्य आहे काय? या दोन्ही प्रक्रियांना मानवी प्रयत्नांत समान स्थान का असू नये? कारण भारतीय मन विज्ञाननिष्ठ बनविता आले तर ते जातिप्रथा नष्ट करण्यासाठी, स्त्री-पुरुष समानतेसाठी, भूक, गरिबी व संपत्तीविरुद्ध व सहिष्णुतेसाठी लढू शकेल. आणि एकरूपतेची सृजनशील भावना अशी शक्ती निर्माण करील की जिच्या अभावी माणसाचे सर्वश्रेष्ठ प्रयास देखील लालसा, असूया व घृणा यात परिणत होत असतात.

हिंदू धर्म असे नवे मन घडविण्यास आणि विज्ञान व भावना यांचे हिंदू मनात संतुलन साधण्यास समर्थ आहे की नाही हे सांगणे कठीण आहे. परंतु

अखेर हिंदुधर्म म्हणजे तरी निश्चितपणे काय आहे? या प्रश्नाचे एकच एक उत्तर नाही. हिंदुधर्माचे सुस्पष्ट व अविवाद्य असे तत्त्वज्ञान नाही किंवा त्याची संघटना नाही. अथवा हिंदुधर्मातील श्रद्धांचे व व्यवहारांचे नियमन करणारी एखादी अनिवार्य व सर्वमान्य अशी संहिताही नाही. हिंदुधर्माचे सारे जग श्रुति-स्मृती, तत्त्वज्ञान व परंपरा व कर्मकांड यांनी भरलेले आहे. या जगाचा काही भाग अगदी वाईट आहे तर काही भाग मानवतेला कल्याणदायी होईल असा आहे. या साऱ्यांचे मिळून हिंदू मन बनलेले आहे.

या हिंदू मनाचा एक अनिवार्य गुण म्हणून काही विद्वान सहिष्णुतेचा व विविधतेत एकता पाहण्याच्या गुणाचा गौरवपूर्ण उल्लेख करतात. या गुणातील किंवा विचारातील दोष काय आहेत आणि हिंदू माणसातील मानसिक जडता नाहीशी करण्यासाठी ते कसे नाहीसे केले पाहिजेत हे मी मागे सांगितलेच आहे. सहिष्णुता व विविधतेत एकता पाहण्याच्या तत्वाचा विचार करताना एक चूक नेहमी केली जाते. असे समजले जाते की, हे तत्त्व मान्य करणारे उदार-मतवादी हिंदू इष्ट अशा कोणत्याही विचारांचा व कल्पनांचा मोकळ्या मनाने व बुद्धीने स्वीकार करीत असतात. मग ते विचार व कल्पना कोठूनही आलेल्या असोत. माझ्या मते ही समजूत इतिहासाच्या अज्ञानातून निर्माण झाली आहे. हिंदुस्थानच्या इतिहासात मला असा एकही कालखंड आढळलेला नाही की ज्यात कोणाही हिंदूंनी अन्य देशांतील कल्पनांचे व वस्तूंचे संशोधन केले किंवा त्यांना स्वीकार्ह मानले. हिंदुस्थान व चीन यांचा हजारो वर्षे संबंध होता. परंतु शेंदूर व इतर दोन-चार वस्तु सोडून आपण चीनपासून काहीही उचलेले नाही. कल्पनांची व विचारांची तर गोष्टच सोडा.

हिंदुस्थान स्वतंत्र होता तेव्हा देखील त्याचे बाह्य जगाशी प्रामुख्याने एक-तर्फी दळणवळण होते. चांदी व तत्सम काही वस्तू वगळता बाहेरून येथे अन्य वस्तूंहि आलेल्या नाहीत. आणि विचार तर मुळीच नाहीत. परकीय जमाती येथे वस्ती करून राहात व कालांतराने हिंदुधर्मातील पोटजात बनण्याचा प्रयत्न करीत तेव्हा थोडीबहुत कल्पनांची व वस्तूंची भारतात आयात झाली असेल कदाचित्. याउलट हिंदुस्थानचे स्वातंत्र्य गेले आणि गुलामीचे युग सुरू झाले तेव्हा मात्र त्याने व हिंदुधर्मानेही विजेत्यांची मोठ्या तत्परतेने नक्कल केल्याचे आढळते. विजेत्याच्या भाषेची, संवयींची आणि संस्कृतीची देखील नक्कल केली आहे. स्वतंत्र असताना बौद्धिक आत्मनिर्भरता व गुलामीत असताना संपूर्ण बौद्धिक दिवाळखोरी या दोन्ही गोष्टी भारतात पाहावयास मिळतात. हिंदुधर्मातील या दोषाचा कधी विचारच केला गेलेला नाही. अशी वस्तुस्थिती

असताना उदारवादी हिंदू अज्ञानापोटी व प्रचारासाठी त्या उलट गोष्टी पसरवीत असतात. हिंदुस्थान स्वतंत्र होता तेव्हा त्याची बुद्धि मुक्त होती; अर्थात तिच्यात फक्त देशांतर्गत घटनासंबंधीच्या विचारांना प्रवेश मिळत होता एवढ्याच अर्थाने. बाह्य जगातील विचारांना आणि कल्पनांना त्या वेळीही भारताच्या बुद्धीची दारे बंदच होती. भारताची ही मोठी दुर्बलता आहे आणि त्याच्या पारतंत्र्याचेही ते एक प्रमुख कारण आहे.

भारत आता पुन्हा स्वतंत्र झाला आहे. केवळ देशांतर्गत घटनांच्या बाबतीत नव्हे तर बाह्य जगातील घडामोडींबाबतही हिंदूच्या बुद्धीची दारे उघडली पाहिजेत. आणि विविधतेत एकता पाहण्याच्या आपल्या सिद्धान्ताद्वारे साऱ्या दुनियेतील विचार व व्यवहार यांचे परिशीलन केले पाहिजे. परकी विचारांची एकतर अगदी उपेक्षा करावयाची नाही तर त्यांचा असंबद्ध स्वीकार करावयाचा ही आपली संवय भारताने आता सोडून दिली पाहिजे.

हिंदुधर्मातील उदारप्रवृत्ती व कट्टरप्रवृत्ती यांच्यातील सनातन संघर्षांनी सांप्रत हिंदू-मुसलमानांतील झगड्याचे वरकरणी स्वरूप घेतले आहे. परंतु खरा झगडा निराळाच आहे. गेली पाच हजार वर्षे जे प्रश्न अनिर्णित राहिले त्यासाठी अद्याप चालू असलेल्या संघर्षाचेच हे एक रूप आहे. हिंदू माणसाला आपल्या धर्माच्या इतिहासाचे वास्तव ज्ञान नाही. त्यामुळे या संघर्षामागे मूलतः असलेल्या प्रश्नांची तो दखल घेत नाही. स्त्रियांच्या विमोचनासाठी आणि जात व संपत्ती यांविरुद्ध जो हिंदू लढू इच्छित नाही तो मुसलमानांच्या बाबतीत खरोखरी सहिष्णु बनू शकत नाही. उदार व कट्टर हिंदुधर्मातील लढा आता विविध अंगांनी लढला जात आहे. कदाचित् त्याचा आता शेवटही समीप आला असावा. या लढ्यात कट्टरपंथी हिंदू यशस्वी झाले तर, लढ्याचा उद्देश कांहीही असो त्यांच्यामुळे भारतीय संघराज्याचे तुकडे तुकडे पडतील. पाच हजार वर्षांपासून चालत आलेला उदार व कट्टर प्रवृत्तीमधील लढा आता अशा एका अवस्थेपर्यंत येऊन पोचला आहे की, या लढ्यात उदारवादाने कट्टरवादाचा पराभव केला नाही तर एक राष्ट्र म्हणून हिंदुस्थानी जनतेचे आज असलेले अस्तित्व लयास जाईल.

आजच्या धार्मिक व मानवी समस्यांचे स्वरूप प्रामुख्याने राजकीय आहे. नष्ट व्हायचे की आपल्या बुद्धीत क्रांतिकारक परिवर्तन करावयाचे या दोहोंमधून हिंदू माणसाला काही तरी एक निवडावयाचे आहे. हिंदूने आता स्वतःला

खिश्चन व मुसलमानही समजायला तयार झाले पाहिजे. त्यांच्याप्रमाणेच स्वतःला समजले पाहिजे. मी हिंदू-मुसलमान ऐक्याच्या संदर्भात हे म्हणत नाही. कारण तो प्रश्न प्रामुख्याने राजकीय व संघटनात्मक आहे. फार तर सांस्कृतिक आहे असे म्हणता येईल. हिंदूने मुसलमान व खिश्चन यांच्या धर्मश्रद्धा स्वीकाराव्यात असेही मला म्हणावयाचे नाही. त्याने या जमातींशी भावनात्मक ऐक्य साधले पाहिजे एवढेच मला सांगायचे आहे. असे भावनात्मक ऐक्य साधणे कठीण वाटेल. कारण बहुधा ते एकतर्फीच असण्याची व ते प्राप्त करीत असता प्राणहानी होण्याची शक्यता आहे. या संदर्भात मला अमेरिकन गृहयुद्धाचे स्मरण करून द्यावेसे वाटते. अमेरिकेत चार वर्षे चाललेल्या या युद्धात भावा-भावांनी एकमेकांची कत्तल केली आणि त्यात सुमारे सहा लाख लोक बळी पडले. परंतु अब्राहम लिंकनने आणि अमेरिकन जनतेने उत्तर व दक्षिण अमेरिकेतील नागरिकांत असेच परस्पर भावनिक ऐक्य निर्माण करून आपल्या विजयावर कळस चढविला. भारताच्या भविष्याच्या पोटात काय दडलेले आहे कोण जाणे ! पण तरीही स्वतःमध्ये आमूलाग्र परिवर्तन करून मुसलमान समाजाशी हिंदूंनी भावनिक एकता साधलीच पाहिजे. साऱ्या चराचरात भावनिक एकरूपता पाहण्याच्या हिंदूंच्या पारंपरिक श्रद्धेचा याही बाबतीत आविष्कार झाला पाहिजे. ती भारतीय संघराज्याची आजची गरजही आहे. या मार्गाने जात असताना पराभवाचे व अडचणीचे डोंगर सामोरे येतील. परंतु हिंदू माणसाने त्या मार्गावर अविचल राहिले पाहिजे.

हिंदुधर्मातील उदार व कट्टर प्रवृत्तींमधील संघर्ष कायमचा संपविण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे एकूण धर्मसंस्थेविरुद्ध दंड थोपटणे हाच होय असेही कोणी म्हणतील. हे म्हणणे कदाचित् बरोबरही असेल. परंतु हा अत्यंत सावकाशीचा मार्ग आहे. आणि शिवाय हा प्राचीन, अनुभवी व धूर्त हिंदुधर्म अशा धर्मविरोधकांनाही आपल्या अगणित पंथांतील एक पंथ म्हणून पचवून टाकणार नाही याची तरी काय शाश्वती ? त्याशिवाय अशा धर्मविरोधी पंथाशी कट्टरवादी शहरी हिंदू कदाचित् असहिष्णुपणाने वागतील. परंतु ग्रामीण भागातील साधेसुधे लोक हजारो वर्षांपासून त्यांच्यात वसत असलेल्या व्यावहारिकतेमुळे इतके हुषार व सहिष्णु बनलेले आहेत की ते या धर्मविरोधकांना पचवूनच टाकतील. अशीहि एक शक्यता आहे की, हिंदुधर्मातील कट्टरवादी स्वतःच धर्मविरोधाचा बुरखा पांघरतील. कारण विशिष्ट वंश, जात व नेतृत्वाच्या विशिष्ट गटावर अधिष्ठित असलेल्या लोकतंत्रविरोधी कम्युनिझमने व फॅसिझमनेही असाच बुरखा घेतला

होता. त्यांनी या मार्गाने सामर्थ्य मिळविले तसे आपणही मिळवावे असे येथील हिंदू कट्टरवाद्यांनाही वाटण्याची शक्यता आहे.

आता हिंदू माणसाने शतकानुशतके आपल्या डोक्यात साठत आलेला कचरा साफ केला पाहिजे. जीवनातील सगुण वास्तवता आणि अंतिम निर्गुण सत्य शोधण्याचा प्रयत्न यामध्ये आता त्याने प्रामाणिक व फलदायी परस्परसंबंध स्थापन करण्याचा प्रयास केला पाहिजे. तरच हिंदुधर्मामधील जात, स्त्री, संपत्ती व सहिष्णुतेसंबंधीची कट्टरता नेस्तनाबूद होईल. या कट्टरतेमुळेच त्याची धर्मश्रद्धा भ्रष्ट झाली आणि देशाचे विघटन झाले. पराभवाच्या अवस्थेत ही कट्टरता उदारवादी हिंदु-प्रवृत्तीत लपून बसलेली आहे. पुन्हा असे होता कामा नये. हिंदुधर्मासमोराल प्रश्न सुस्पष्ट आहेत. त्यांच्या बाबतीत कोणतीही तडजोड करण्यात आली तर पूर्वीच्या चुकांचीच पुनरावृत्ती केल्यासारखे होईल. कट्टरवाद व उदारवादातील हा घृणास्पद संघर्ष आता कायमचा संपविलाच पाहिजे. तरच भारतीय माणूस नव्या प्रयासास लागेल. या प्रयासात बुद्धी व भावना यांचा संगम झालेला असेल. विविधतेत एकता पाहण्याच्या विचारातील निष्क्रियता काढून टाकून तो सार्थ बनविण्यात येईल. आणि त्यातूनच साऱ्या चराचर सृष्टीत एकात्मता पाहण्याचा आपला द्रष्टेपणा न सोडता हिंदू माणसाला जगातील निर्मळ आनंद लुटता येईल. (जुलै : १९५०)

● ● ●

## रामायण मेळा : एक स्वप्न

चित्रकूट येथे देश-विदेशांतील रामायणप्रेमी लोकांचा एक ' रामायण मेळा ' भरवावा अशी कल्पना आहे. हा मेळा अयोध्येत घेता आला असता तर योग्य झाले असते. परंतु चित्रकूट हे देखील एक रमणीय स्थळ आहे.

रामायण मेळ्याचे प्रयोजन काय?

आनंद, प्रेम व शांती यांची प्राप्ती हे प्रधान प्रयोजन आहे. तसेच भारतीय ऐक्य साधण्याचा प्रयत्न हाही एक तात्कालिक उद्देश आहे.

कृष्ण हा जसा पूर्व-पश्चिम भारताच्या एकतेचे प्रतीक आहे तसा राम हा उत्तर दक्षिण भारताच्या ऐक्याचा प्रतीक आहे. राम-कथा हा आधुनिक भारतीय भाषांच्या उत्पत्तीचा किंवा विकासाचा स्त्रोत आहे. कम्बनचे तमिळ रामायण, एकनाथाचे मराठी रामायण, कीर्तिदासाचे बंगला रामायण यांनी आणि अन्य भारतीय भाषांतील रामायणांनी आपापल्या भाषांना जन्म दिला आहे; त्यांच्यावर प्रभाव पाडला आहे. वास्तविक रामायण हा उत्तर-दक्षिण एकतेचा प्रतीक असलेला ग्रंथ आहे. तथापि उत्तर व दक्षिणेतील लोकांच्या अज्ञानामुळे उभय भागांतील लोकांत त्याच रामायणाने एकमेकांविषयी गैरसमज निर्माण केल्याचे आज दिसते.

रावण हा दक्षिणेचा राजा होता व त्याचे कार्यक्षेत्र दक्षिणेत होते असे मानले जाते. वानर व माकड हे प्राणी दक्षिणेतले असेही सांगितले जाते. परंतु वस्तुत: ते देवतांचे अवतार आहेत. मग ते दक्षिणेचे का उत्तरेचे हा प्रश्न कोठे येतो ? रावण देखील उत्तरेतलाच राजा असावा असे वाटते. देवता व ॠषि-मुनी यांचा छळ करणारे राक्षस हे दक्षिणेतले असाही एक समज आहे. पण तो समज चूक आहे. विश्वामित्र राम-लक्ष्मण यांना अयोध्येहून मिथिलेला घेऊन गेला तेव्हा मार्गात त्याने अनेक राक्षसांचे व निशाचरांचे वध करविले अशी कथा आहे. हे राक्षस दक्षिणेतून उत्तरेस आले काय ? उत्तरेतल्याच एखाद्या मानव वंशातले ते असले पाहिजेत.

वरदानप्राप्तीनंतर रावण आपले उत्तरेतील राज्य सोडून दक्षिणेत लंकाद्वीपात गेला असे स्पष्ट म्हटले आहे. लंकेत आपणाला अजिंक्य असे राज्य बनविता येईल अशी त्याची कल्पना असावी. आजकाल रामलीला ज्या पद्धतीने खेळली जाते तिच्यामुळे दक्षिणेतल्या लोकांत रामायणाविषयी निष्कारण गैरसमज निर्माण होत असतात. रावण वंश हा एक काळाकुट्ट वंश आहे असा समज व्हावा अशा प्रकारे रामलीलेतील रावणाचे सोंग बनविले जाते. रावणाविषयी तिरस्कार वाटावा म्हणून त्याचे दात बाहेर आल्याचे दाखवितात. पण रावणाची बहीण शूर्पणखा ही तर अतिशय सुंदर होती असे वर्णन आहे. रावणाची पत्नी मंदोदरी ही देखील सुंदर आहे. हें कसें ? राक्षस हे मायावी होते असे वर्णन आहे. आपल्याला हवे ते रूप ते घेऊ शकत असत. कधी कधी दहशत बसविण्यासाठी ते विक्राळ रूप धारण करीत असतील. ते त्यांचे खरे रूप नव्हे. म्हणून दाक्षिणात्यांनी रावणाला आपल्या वंशाचा समजणे किंवा उत्तरेतल्या लोकांनी त्याला दाक्षिणात्य समजणे चूक आहे. राम व भरत यांना उत्तरेतले समजले जाते. या दोघांचाही वर्ण काळा होता. म्हणजे दाक्षिणात्यांशीच त्यांचे अधिक्य साम्य होते.

सहज एक गोष्ट सुचली ती सांगतो. रावण कुळांतील बहुतांश व्यक्तींची नावे धारदार व उच्चारताना मोठा ध्वनी निर्माण करणारी आहेत. उदा. मेघनाद, कुम्भकर्ण, शूर्पणखेचा पती विद्युत्‌जिव्ह. रावण याचा अर्थ रव म्हणजे गर्जना करणारा. रावण कुलातील ही नावे नाद, आवाज यांच्या आधारे कवींनी व कथा लेखकांनी का रचली हा एक संशोधनाचा विषय बनू शकेल.

राम व भरत या दोघांचाही कृष्णवर्ण होता. तरीही रामायण हा आर्यांचा, उत्तरेचा ग्रंथ होय असे का म्हटले जाते ? माझे तर असे मत आहे की आर्य, द्रविड, मंगोल आदी मानववंश अस्तित्वांत होते हे विदेशी इतिहासकारांनी पसरविलेले असत्य आहे. हे मानववंश अस्तित्वात असलेच तर ते कदाचित्

३–४ हजार वर्षांपूर्वी असतील. आता असे विभिन्न मानववंश शिल्लक नाहीत. परंतु हिंदुस्थानचा इतिहास, साहित्य, भूगोल, संस्कृती यांची सर्व माहिती हे मानववंश आहेत असे गृहीत धरून दिली जाते. आणि त्यामुळे अनर्थ होत आहे.

भारतीय भाषांचे वर्गीकरणही असत्य आहे. तमिलमधील ' मैलम ' व संस्कृत-हिंदीतला ' मयूरम् ' एकच आहेत. उच्चार करताना ' यू ' चा ऐ ' व ' र ' चा ' ल ' होतो ही भाषाशास्त्रांतील सर्वमान्य गोष्ट आहे. संस्कृत व तमिल या दोन्ही भाषात असे अनेक सारखे शब्द आहेत. ते तमिलने संस्कृतकडून घेतले की संस्कृतने तमिलकडून घेतले याचे मला महत्त्व वाटत नाही. त्यांनी एकमेकांचे शब्द घ्यावेत आणि एक होऊन जावे अशीच इच्छा केली पाहिजे. काही निराळे आंकडे व शब्द यांचा दाखला देऊन आर्यांची भाषा निराळी, द्रविडाची वेगळी, ऑस्ट्रिक वेगळी असे भेद मानणे मूर्खपणाचे आहे. चार हजार वर्षांपूर्वी सुद्धा हे भाषाभेद नसावेत. आणि गेल्या तीन हजार वर्षांत तर ते मुळीच नाहीत. रामायण मेळयात भारतीय भाषा व लिप्या यांच्यावर जी भाषणे होतील त्यात वस्तुस्थिती काय आहे हे सांगितले जाईल.

भारतीय संस्कृति व विशेषतः रामायणावर या मेळयांत निवडक विद्वानांची वीस पंचवीस व्याख्यानें ठेवली जातील. होमार, वरजिल, वाल्मीकी, तुलसी इत्यादी जगातील निरनिराळया महाकवींच्या महाकाव्यांवर एक भाषण होईल. दुसरे व्याख्यान राम, कृष्ण, येशू, महंमद यांच्याविषयीच्या कथा-काव्यातील साम्य व भेद या विषयावर होईल. आणखी एक व्याख्यान, जगातील साहित्यातील स्त्री-पुरुष संबंध, स्वामित्व, वर्ग, जाती या विषयांवर होईल. परदेशांतील विद्वानांना या भाषणमालेसाठी पाचारण करण्यात आले आहे. राजगोपालाचारी, जवाहरलाल नेहरू, राजनारायण यांच्यासारख्या राजकीय नेत्यांनाही रामायणावर भाषण करण्यासाठी बोलविले आहे.

भारतामधील व विदेशांतील निरनिराळया रामायणांचे एक प्रदर्शन भरविण्याचीही कल्पना आहे. थाई, कंबोज व हिंदेशिया या देशांनी आपापली रामायणें या प्रदर्शनात पाठविण्याचे कबूल केले आहे. येथे सहज एक माहिती सांगतो. खोतानी (तुर्की) रामायणात सीतेचा विवाह राम व लक्ष्मण या दोघांशीही झाला असल्याचें म्हटले आहे. असे काही फरक रामायणा-रामायणांत असले तरी मूळ रामायण-कथेशीच आपणाला कर्तव्य आहे.

रामायण मेळा हा एक महान आनंदोत्सव झाला पाहिजे. काव्य, चित्र, संगीत, नृत्य आदी विविध माध्यमातून आनंदरसाचा आविष्कार करण्याचा

प्रयत्न होईल. आंध्रचे महाकवी विश्वनाथ सत्यनारायण, महाकवी निराला यांना आमंत्रित केले आहे. इमामुद्दिन डागर, वहीदनबाई, जौहरी यांनी संगीत संमेलनास येण्याचे कबूल केले आहे. विख्यात चित्रकारांना त्यांच्या कलाकृती मेळयात ठेवण्याची विनंती केली आहे. हुसेन यांनी त्यास मान्यताही दिली आहे. नाट्यमंडळींना व नृत्यकारांनाही बोलाविले आहे. या सर्व कलाकारांनी आपापल्या कलांच्या सहाय्याने रामायण कथेबरोबरच कबीर, जायसी, रहीम यांच्या कथांतील सौंदर्याचाही आविष्कार करावा अशी अपेक्षा आहे.

या मेळयाच्या दहा दिवसांतील नऊ दिवस रामायणाचे नवान्ह पठण व्हावे अशीही कल्पना आहे. काही लोक तुलसी रामायणातील दोहे-चौपाया प्रथम म्हणतील. त्यांच्या मागोमाग हजारो लोकांनी त्यांना साथ द्यावी. दोहे-चौपाया म्हणणाऱ्या या लोकात स्त्रिया, शूद्र व अन्यधर्मीयांचाहि समावेश केला जावा अशी अपेक्षा आहे. काही सनातनी हिंदुधर्मीयांना वाटेल की, हिंदुधर्म भ्रष्ट करण्याचा हा उद्योग आहे. तर काही अन्यधर्मी कट्टरपंथीयांना शंका येईल की आपणाला खाऊन टाकण्याचा हा डाव आहे. परंतु खरे म्हणजे रामायणाचे नवान्ह पाठ म्हणण्यात सर्व धर्मीयांनी व हिंदुधर्मीयांतील स्त्री–शूद्रांनी भाग घेतला तर एक प्रकारचा उन्मुक्त आनंद तर मिळेलच, पण हिंदुस्थानच्या ऐक्याला त्यामुळे उजळाच मिळेल.

रामायण कथेतील शूद्र व दलित वर्गासंबंधीची दृष्टी अविवेकी आहे हे मला माहीत आहे. आणि याचीही मला कल्पना आहे की, ब्राह्मणांना प्रत्येक ठिकाणी इतके मोठे स्थान देण्यात आले आहे की त्यांच्यापुढे वनवासी, शूद्र व दलित लोक कःपदार्थ वाटावे. हा कालदोष आहे, कालमहिमा आहे असे समजून रामायण कथेतील आनंद चाखला पाहिजे.

धर्म व राजकारण यांची क्षेत्रे अलग ठेवणेच योग्य आहे. पण तसे करताना ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, धर्म व राजकारण यांचे मूळ एक आहे. धर्म म्हणजे दीर्घकालीन राजकारण तर राजकारण म्हणजे अल्पकालीन धर्म. एक दीर्घकाल चालणारा आहे तर दुसरा अल्पकाळ. कालाच्या दीर्घतेत संथपणा असतो, शांतपणा असतो. आणि अल्पतेत घाई असते, रौद्रता असते. परंतु दोघांचे तात्पर्य एकच असते. दीर्घकालिन धर्म भले करू इच्छितो, भल्याचे स्तवन करतो. अल्पकालिन राजकारण वाईटाविरुद्ध लढते, त्याला विरोध करते. भलेपणाची कामना करणे व वाईटाशी लढणे यात अंतर आहे. हे अंतर वाढते किंवा त्यांचा अन्योन्य संबंध तुटतो तेव्हा भलाईची स्तुती निर्जीव ठरते आणि वाईटाचा विरोध कलही बनतो.

अगदी चांगल्यातला चांगला धर्म देखील अर्धमृत होऊ शकतो. आणि अगदी चांगल्यातले चांगले राजकारण सुद्धा कलही बनू शकते.

धर्म व राजकारण यांचे विवेकहीन मीलन झाले तर दोन्ही भ्रष्ट होत असतात. कोणत्याही एका धर्माने कोणत्याही एका विशिष्ट राजकारणावर कबजा करणे योग्य नाही. त्यातूनच सांप्रदायिकता जन्म घेत असते. धर्म व राजकारण हे एकमेकांपासून दूर ठेवण्याचा उद्देश हा की, सांप्रदायिकता व कट्टरता यांपासून समाजाचा बचाव व्हावा. आणखीही एक असा उद्देश आहे की, समाजाचे कायदेकानू व धार्मिक कायदे कानू हे त्यामुळे निरनिराळे राहू शकतील. हे दोन्ही एकच असले तर अत्याचार वाढतील, प्रतिगामीपणा पोसला जाईल.

परंतु तरीही आपापल्या मर्यादा सांभाळून धर्म व राजकारण यांनी परस्पर संबंध ठेवला पाहिजे. धर्मामुळे जाणते-अजाणतेपणाने प्रतिगामीपणा, गुलामी व अधर्मेऽपणा यांना राजकारणात प्रोत्साहन मिळाले आहे. म्हणून माझ्या-सारख्या राजकीय व्यक्तीला धर्माची ही दोषास्पद बाजू साफ करण्याचा किंवा कमून घेण्याचा जरूर अधिकार आहे. राजकारणांत तात्पुरते पाहण्याची व कलही प्रवृत्ती वाढत आहे असे धार्मिक कार्यकर्त्यांनाही वाटत असेल. म्हणून अधिक चिरंतन मूल्यांकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्याचा अधिकार धार्मिक नेत्यांनाही आहे असें मी मानतो.

अशा चिरंतन मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी धर्मातील आस्तिकता राजकारणाने स्वीकारली पाहिजे असे मुळीच नाही. राजकारणाने मात्र एक आश्वासन धर्माला जरूर द्यावे की, आस्तिकतेचा किंवा नास्तिकतेचा प्रचार कायद्याद्वारे केला जाणार नाही. नास्तिकता व आस्तिकता या दोहोंनाहि समान स्थान असलेली नवीन समाजसंस्कृती भविष्यकाळात कदाचित जन्म घेऊ शकेल. रामायण मेळ्यात अन्य सव गोष्टींबरोबर याहि गोष्टींविषयी विचारमंथन झाले पाहिजे. [ १९६०–६१ : टिपणे ]

( अखेर ' रामायण मेळा ' हे लोहियांचे केवळ एक भव्य स्वप्न ठरले. ती कल्पना साकार होऊ शकली नाही. याची कारणे सांगताना त्यांनी म्हटले होते, " सत्ता व सरकार यांच्या आसपास जे लोक नाहीत त्यांना जनतेच्या सहकार्याच्या आधारे एवढी प्रचंड योजना प्रत्यक्षात आणणे शक्य राहिलेले नाही. सनातनी विचारांच्या धनिकांना माझ्या धर्म-विषयक कल्पनांविषयी शंका वाटते तर उदार विचारांच्या लोकांत माझ्या राजकारणाबद्दल संदेह आहे. " )

• • •

१०३०३

REFBK-0017303

प्रेस्टीज
प्रकाशन

• • •

डॉ. राममनोहर
लोहिया
साहित्य

• • •

ललित लेणी

• • •

भारतीय फाळणीचे
गुन्हेगार

• • •

जन गण मन

• • •

अन्तहीन यात्रा